म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र.

REFBK-0001316

म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
क्र. नं.

# बरवे घराण्याचा इतिहास

## भाग पहिला

REFBK-0001316
REFBK-0001316

लेखक
गोविंद विनायक आपटे

गं. [illegible]

[illegible]

[illegible] ता. २१-५-२९-२

से.

इतिहास २४०

स. इ. २४०

श्रीगुरुदेवदत्त प्रसन्न

# वरवे घराण्याचा इतिहास

लेखक व प्रकाशक

गोविंद विनायक आपटे

पुणें, आर्यभूषण छापखान्यांत छापिला.

(ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

भाद्रपद शु॥ ४ शके १८३८

किंमत २ रुपये

हें पुस्तक
पुणें येथें **आर्यभूषण** छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन**
यांनीं छापिलें व **गोविंद विनायक आपटे** यांनीं
भा. इ. सं. मंडळ शनवार पेठ ४५६ पुणें येथें
प्रसिद्ध केलें.



कै. विष्णु लक्ष्मण ऊर्फ आप्पासाहेब चरवे, यवत

कै० वा० विष्णु लक्ष्मण उर्फ आप्पासाहेब

बरवे यांच्या कुलाभिमान, धर्मनिष्ठा,

निरालस्य, शालीनता, औदार्य

इत्यादि गुणांवर लुब्ध होऊन

त्यांच्या स्मरणार्थ हा बरवे

घराण्याचा इतिहास

रचिला असे.

गो. वि. आपटे

# प्रकाशकाचे दोन शब्द

**आपटे घराण्याचा इतिहास** प्रसिद्ध केल्यानंतर बरोबर दोन वर्षांनीं च **बरवे घराण्याचा इतिहास** प्रसिद्ध करण्याचा योग आला. हा इतिहास माहिती मिळवून तयार करण्याचे कामीं व तयार केल्यावर छापवण्याचे कामीं मला अत्यंत त्रास झाला. विशेषतः त्रास होण्याचें मुख्य कारण पैशाचा अभाव ! परंतु ही अडचण ज्यांचें ध्येय दुसऱ्यावर उपकार करणें अशा सुजन दयार्द्र अंतः-करणाच्या उपकारी पुरुषाचे सहाय्यानें दूर होऊन पुस्तक प्रसिद्ध झालें; व वेळो-वेळीं प्रत्येक गोष्टींत ज्यांनीं मला सहाय्य केलें ते **श्रीमंत सरदार खंडेराव चिंतामण उर्फ तात्यासाहेब मेहेंदळे** होत. या उपकारावद्दल मी त्यांचा ऋणी आहें. सदरहु इतिहासांतील वंशवृक्षांत व माहितींत कोठें चूक झाली अस-ल्यास ती कळवावी. दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचा सुयोग आल्यास दुरुस्त करूं.

बरवे मंडळींपैकीं, हरि विष्णु बरवे, यवत; शंकर नारायण बरवे, पुणें; सर-दार त्रिंबकराव शिवराव बरवे, पांढुरली व कचेश्वर त्रिंबक बरवे, सरदेशमुख येवलें यांनीं मदतीबद्दल जें आश्वासन दिलें आहे, ती मदत लवकर करावी अशी त्यांना विनंती आहे. तसेंच आर्यभूषण छापखान्याचे व्यवस्थापक यांनीं हें पुस्तक लौकर छापून दिलें याजबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

नेवरें येथील केशवराव जनार्दन बरवे मोकादम व रामकृष्ण वासुदेव बरवे, बी. ए. यांनीं योग्य मदत करून माहिती देण्याचे कामीं हि विशेष मदत केली. जालगांवचे रा. रावजी विश्वनाथ बरवे, यांनीं वेळोवेळीं काळजीपूर्वक माहिती दिली. याबद्दल वरील सर्व बरवे मंडळीचा मी आभारी आहें. विशेषतः रा. हरि-भाऊ बरवे, यवत, यांनीं विशेष मदत करण्याचें कबूल केलें हें त्यांना भूषणावह आहे. शेवटीं ज्यांनीं आपला अमोलिक वेळ खर्चून **आरंभींचे चार शब्द** लिहून माझ्या या छोट्या इतिहासास भूषित केलें त्या **रावबहादुर काशिनाथ नारायण साने**, यांचे आभार मानून, भारत इतिहास संशोधक मंडळाकडून योग्य उत्तेजन व सहाय्य मिळेल अशी आशा धरून पुढील कामास लागतों.

४५६ शनवार पेठ पुणें,<br>
भाद्रपद शु॥ ४ शके १८३८.

**गो. वि. आपटे**

# आरंभींचे चार शब्द

वीस वर्षे होऊन गेलीं. पुणें येथील 'वसंतव्याख्यानमालेंत' मला एकदां भाषण करावें लागलें होतें. 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' हा भाषणाचा विषय होता. अर्थात् तीं साधनें कितीं मिळालीं, कितीं मिळविणें आहेत, तीं कोठें मिळतील व कोणास मिळावितां येतील इत्यादि मुद्दे त्या भाषणांत आले. त्या प्रसंगीं आपल्या देशांतील जातीजातींच्या इतिहासाचा छडा लावून त्या त्या जातीची उन्नति किंवा अवनति कशी होत गेली, तो इतिहास सप्रमाण बाहेर येईल तर एकंदर देशाच्या इतिहासाच्या कामीं त्या जातिविषयक इतिहासाचा फार उपयोग होईल असें मीं जातां जातां सुचविलें होतें. तसें च त्या वेळीं 'कायस्थ प्रभू'नीं आपल्या जातीचा इतिहास तयार करण्याचें काम सुरू केलें होतें, त्या गोष्टीचा हि उल्लेख मीं केला होता, व तें उदाहरण पुढें ठेवून प्रत्येक जातीनें आपापला इतिहास लिहावा अशी शिफारस केली होती. त्यावर आज १८।२० वर्षांनीं रा. गोविंद विनायक आपटे यांनीं कोंकणस्थ ब्राह्मणांच्या निरनिराळ्या कुलांचा इतिहास जमविण्याचा जो यत्न सुरू केला आहे, तो ह्या ब्राह्मण जातीचा इतिहास लिहिण्यास बहूत उपयोगी पडेल; किंबहुना हे निरनिराळ्या कुलांचे इतिहास म्हणजे ह्या जातीचा इतिहास च होईल असें म्हटलें तरी चालेल.

रा. आपटे यांनीं दोन वर्षांपूर्वीं 'आपटे' घराण्याचा इतिहास लिहिला तो चांगला साधला आहे. त्यांत सुमारें ३००-३२५ वर्षांची भिन्नभिन्न छोट्या मोठ्या अशा आपटे घराण्यांची हकिकत आली आहे. त्या नमुन्यावर च आज ते 'बरवे' घराण्याचा इतिहास महाराष्ट्रजनांस सादर करीत आहेत. ह्यांत हि निरनिराळ्या लहान थोर बरवे घराण्यांची हकिकत सुमारें शके १५०० पासून त्यांनीं गुंफिली आहे. हें अत्यंत परि-

श्रमाचें काम रा. आपटे यांनीं स्वतःच्या स्फूर्तीनें च केलेलें पाहून त्यांचें कौतुक कोण करणार नाहीं? अशा कामांत आपल्या लोकांकडून त्यांस सर्व प्रकारचें प्रोत्साहन मिळालें पाहिजे. योग्य प्रोत्साहन मिळाल्यास लवकरच ते 'पटवर्धन' घराण्याच्या इतिहासाचें काम हातीं घेणार आहेत. त्याप्रमाणें च आणखी हि घराण्यांचे इतिहास ते तयार करणार आहेत. ह्या कामगिरीनें त्यांचे स्वजातीयांवर च नव्हेत तर सर्व महाराष्ट्रजनांवर हि उपकार होतील यांत संशय नाहीं. अशा कामास त्या त्या घराण्यांतील गृहस्थांनीं रा. आपटे यांस जुन्या कागदपत्रांचें, दंतकथांचें व इतर माहितीचें आणि द्रव्याचें हि साह्य देणें अत्यंत आवश्यक आहे—फार काय? हें त्यांचें कर्तव्य आहे—असें मी समजतों. ज्यानें त्यानें आपापल्या घराण्याचा इतिहास लिहून प्रसिद्ध केला तर उत्तम च पण तसें न घडे तर आपटे या कामीं पुढाकार घेत आहेत, त्यांस सर्व प्रकारें मदत करणें हें आपलें काम नव्हे काय?

अशा कामासाठीं रा. आपटे यांस कितीतरी प्रवास करावा लागतो; माहिती मिळविण्यासाठीं, छपाईसाठीं, व थोर थोर पुरुषांच्या चित्रांसाठीं कितीतरी पैशाची तजवीज करावी लागते; व कधीं कधीं तर पदरास खार हि लावून घ्यावा लागतो. ह्या सर्व गोष्टी मनांत आणिल्या म्हणजे सर्व महाराष्ट्रजनांनीं, विशेषतः इतिहासप्रिय जनांनीं,— त्यांस नानाप्रकारांनीं मदत करणें किती आवश्यक आहे हें सांगावयाला कशास पाहिजे?

कोंकणस्थांची गोत्रावळी पाहिली, तर तींत 'बरवे' हें उपनांव मूळचीं जीं साठ उपनामें त्यांमध्यें सांपडत नाहीं. हें उपनांव 'टेंगेमती' आहे. बरवे हे 'वाड' या घराण्याच्या पोटांत येतात असें श्रीमंत सरखेल आंगरे यांची जी सनद जालगांवकर बरवे यांस मिळाली आहे, तिजवरून स्पष्ट होत आहे. कोणा एका वाड घराण्याचें 'बरवेपण शिगेसि आलें.' त्यावरून त्या घराण्यास 'बरवे' असें टोपणनांव पडलें असावें. या तर्काशिवाय 'वाड' उपनांव मागें पडून 'बरवे' आडनांव पुढें कसें

आलें तें सांगतां येत नाहीं. 'जोगदेव' हे हि बरवे च होत. कांहीं बरवे आपणांस 'जोगदेव' कां म्हणवितात तें पुढील इतिहासांत येईल च.

कर्यात नेवरे येथील अधिकारी मोकद्दम रा. मल्हारपंत बरवे यांची व त्यांच्या वंशजांची बखर, मोठ्या सात जुन्नरी तावांवर पाठपोट लिहिलेली, सरदार पांडुरलीकर बरवे यांनीं रा. आपटे यांच्या स्वाधीन केली. ही बखर अस्सल कागद व परंपरागत माहिती यांवरून त्यांच्या एका विश्वासू कारभाऱ्यानें रचिली. ह्या लेखांत नेवरेकर बरवे यांची हाकिकत शके १५०० पासून आली आहे. ह्या घराण्याच्या शाखा खुद्द नेवरें, कोटुरें, पांडुरली, पिंपळस, डुबेरें, येवलें, निंब, वसई-पापडी, पनवेल, जालगांव, वांई इत्यादि ठिकाणीं आज नांदत आहेत. श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचे मेहुणे, म्हणजे पत्नीचे बंधु, रा. मल्हार दादाजी बरवे हे प्रथम साताऱ्यास येऊन त्यांनीं कोणते पराक्रम केले त्यांची व एकंदर नेवरेकर बरव्यांची हकिकत विश्वसनीय अशी ह्या बखरींत आलेली आहे. बखरीचा उतारा रा. आपटे यांनीं आपल्या पुस्तकांत दिला आहे. ह्या व इतर बरवे कुलांच्या निरनिराळ्या शाखांचा इतिहास पूर्वींपासून आज मितीपर्यंत रा. आपटे हे आपणांपुढें आज ठेवीत आहेत.

असो. अशाप्रकारें रा. आपटे हे फार मेहनत घेऊन व झीज सोसून हें काम करीत आहेत, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडें च. या नमुन्यावर दुसऱ्या कोंकणस्थ घराण्यांचा च नव्हे, तर देशस्थ कराडे, इत्यादि ब्राह्मणघराण्यांचा व मराठे घराण्यांचा हि इतिहास प्रसिद्ध करण्याची रा. आपटे यांची उमेद आहे. याकरितां त्यांस सर्व लोकांनीं सर्व प्रकारची मदत करावी अशी पुन्हां शिफारस करून, व रा. आपटे यांस या कामांत पूर्ण यश येवो अशी श्रीहरीची प्रार्थना करून हा अल्पसा प्रस्तावलेख संपवितों.

**काशिनाथ नारायण साने**

# अनुक्रमणिका


| गांव | पृष्ठ |
|---|---|
| पांढुरली, डुबेरें, कोठुरें, पिंपळस व येवलें ... ... | १।८६ |
| नेवरें ... ... ... ... ... | ८७।१०२ |
| फलटण व पुणें... ... ... ... ... | १०३।१०६ |
| लिंब, वाई, पापडी व पनवेल ... ... ... | १०७।११२ |
| जालगांव ... ... ... ... ... | ११३।१२७ |
| सागवें वाडा बुर्वे ... ... ... ... | १२८।१३१ |
| पिंगळसई ... ... ... ... ... | १३२।१३५ |
| तासगांव, पुणें व यवत ... ... ... ... | १३६।१४८ |
| ( लोहगड ) आंबेगांव व पुणें ... ... ... | १४९।१५० |
| तारापूर ... ... ... ... ... | १५१।१५४ |
| गांवखडी ... ... ... ... ... | १५५।१५७ |
| ओटवणे, मिरज, धार व वाई ... ... ... | १५८।१६० |
| नागांव व आक्षी ... ... ... ... | १६१।१६४ |
| सोनगांव, धार व कर्डी ... ... ... ... | १६५।१७३ |
| कल्होळी ... ... ... ... ... | १७४ |
| वाडे–पडेल ... ... ... ... ... | १७५ |
| बावधन ... ... ... ... ... | १७६ |
| तळेगांव व सुसेरी ... ... ... ... | १७७।१७८ |
| तळवणें व आक्षी ... ... ... ... | १७९ |
| जांभळी व साकोर्डे ... ... ... ... | १८०।१८१ |
| प्रांत गोमांतक ... ... ... ... ... | १८२।१८६ |
| बरवे मंडळीस विनंती, श्रीकुलस्वामी व कुलदेवी ... | १८७ |
| गावांची यादी.... ... ... ... ... | १८८ |


**सूचना**:—वंशवृक्षांतील नांवावर ० असें चिन्ह असलेले सज्ञान, \/ असें चिन्ह असलेले अज्ञान समजावे.

श्री गजानन प्रसन्न

# बरवे घराण्याचा इतिहास

## भाग पहिला

श्रीपरशुराम क्षेत्रांतील पुण्यस्थान 'श्रीगणपतीपुळें' या श्रीसिद्धि-विनायक-विघ्नहर्त्याचें स्मरण करून, पुण्यशील कीर्तिमान् मल्हार दादाजी बरवे यांच्या घराण्याचा इतिहास लिहिण्याचें काम मी करीत आहें. हें पवित्र कार्य या अज्ञ लेखकाकडून पूर्ण करणार श्री गजानन समर्थ आहे. कर्यात नेवरें यांतील कसबे नेवरें पैकीं वाडा-सुरुग येथील वास्तूंत पुण्यशील कीर्तिमान् मल्हार दादा बरवे यांचे पूर्वज जोगदेव-भट नारायणभट बरवे यांनीं ज्या भूमि[illegible] केले त्या [illegible]ीला आगर जोगदेवभट असें नांव प्राप्त झालें असून, [illegible] [illegible]पत्रीं आगर जोगदेवभट असेंच नमूद आहे. [illegible] राजापूर प्रांतांत चौदा महाल होते ते येणेंप्रमाणें:-१ कर्यात नेवरें, २ तर्फ केळेमा-जगांव, ३ तर्फ धामणसे, ४ तर्फ फुणगुस, ५ तर्फ हातखांबे, ६ तर्फ पावस, ७ तर्फ हरचिरी, ८ तर्फ सैतवडें, ९ तर्फ देवरुख, १० तर्फ लांजे, ११ तर्फ देवळें, १२ तर्फ संगमेश्वर, १३ कों[illegible]वरे, १४ कसबे प्रभानवली मामले-मजकूर. आतां कर्यात नेवरें महालांतील गांवें देतों:-कसबा नेवरें, मौजे नाचणे, मौजे शिरगांव, मौजे कोतवडें, मौजे झाड-गांव, मौजे रहाटागर, मौजे करलें, पेठ शिवापूर, पेठ कोट किल्ला-रत्नागिरी, वाडाजुवें, वाडाआरें, वाडाजून, वाडासडचे, वाडा-पिरधवणे, वाडा काळबादेवी, वाडा ढोकमळें (केळकरांचे), वाडा बसणी, वाडा भरिया, वाडा कासारवेल येणेंप्रमाणें. कसबा नेवरें पैकीं वाडा-ढोकमळें, सुरुग,

काजिरभाटी, विरापुळें, भंडाळपुळें, चिंचवणें, नरसनाक, पावणशी, उंमर, देवपाट, लावगन, नेवेद्र, पिंपळवट, बाजेकुम, मिठापुळें, व श्रीगणपतीपुळें; सदरहु वाड्यांपैकीं मुरुग-वाड्यांत **जोगदेवभट बरवे** याचें आगर असून, त्याच आगरांत **जोगदेवभट बरवे** यांचे वंशज हल्लीं रहात आहेत.

कसबा नेवरें रत्नागिरी शहरापासून उत्तरेस दहा मैलांवर आहे. या गांवीं जाणेचे असल्यास रत्नागिरीहून जाण्यापेक्षां, तिवरी बंदराहून जाणेचें बरें. कारण, पल्ला सात मैलांचा असून खाडीचा त्रास विशेष नाहीं. शिवाय श्रीगणपतीपुळें याचें दर्शन होतें. रत्नागिरीहून दोन रस्ते आहेत. एक काळबादेवीचे मार्गानें, व दुसरा रस्ता कासारवेल वरून. पहिल्या मार्गानें चालत जाणाऱ्यास बरें; परंतु खाडीचा त्रास विशेष होतो. दुसरा मार्ग रत्नागिरीहून कासारवेलच्या खाडीपर्यंत रस्ता बरा असून खाडी केव्हांही होडीनें उतरून जातां येते; व पुढें कासारवेलहून नेवऱ्यास गाडीरस्ता आहे. परंतु गाडीपेक्षां चालत जाणें सर्वांत उत्तम. या गांवाचे उत्तर, पूर्व व दक्षिण या तिन्ही बाजूनीं डोंगर असून पश्चिम बाजूस महासागर आहे. सृष्टिनियमानें पहातां सदरहु डोंगरावर गगनचुंबित मोठाले प्रचंड वृक्ष; व त्यांना आलिंगन देणाऱ्या तऱ्हतऱ्हेच्या सुंदर वेली; जगाचें पोषण करणारे औषधी वृक्ष, वेली व मुळ्या असून शिवाय डोंगराकडे पहाण्याबरोबर मनास आनंद उत्पन्न करणाऱ्या आणि चित्र-विचित्र फुलांनीं सुशोभित अशा ऐश्वर्यानें नांदत असलेल्या डोंगरांवरून प्रवास करणें किती आनंदकारक असतें ! हें सर्व जरी खरें, तरी नेवऱ्यास वेष्टण करणाऱ्या डोंगरांनो ! ! तुम्हांला आश्चर्य वाटलें असेल कीं, हा काल असा नियम-व्यतिरिक्त विचित्र कां ? परंतु डोंगरबाबांनो ! ! हा काल व ही सत्ता अघटित-घटनेची आहे, हें तुम्हांस कोठें माहित आहे ? तुमच्या प्रचंड देहावरून आम्हीं प्रवास करतांना, उन्हाच्या तडाक्यानें आमचे प्राण कासावीस होऊं लागून जरी गेले तरी प्राण अमर

आहे बरें का ! असो, डोंगरबाबांनो ! ! मी नेवरें पहाण्याकरितां आलों असतां तुमची ही स्थिती पाहून जंगली कायद्याची आठवण झाली. बा ! डोंगरा ! ! इतकी हीन स्थिति या कालीं तुझीच झाली आहे, असें मात्र मानूं नको हो ! ! ! कारण, आमच्या पूर्वजांचे पराक्रम आठवितां सद्यःस्थितींत आम्ही किती हीन दशे-प्रत पोचलों आहों बरें ! !!

---

## कर्यात नेवरें येथील ऐतिहासिक माहिती

शके १४०० त कर्यात नेवरें येथें आपटे व जोशी या ब्राह्मणांची आणि मराठे थोरात व नाईक यांची वस्ती होती. १५०० शें शतकांत थोबा उकिडवा म्हणून कोणी आला तो थोरात यांचेकडे बागेच्या कामावर राहिल्यामुळें त्यास **थोबा उकिडवा बागवान** असें म्हणूं लागले. यावेळीं गद्रे व बरवे रयत आले. सदरहु उकिडवा वारल्यानंतर थोरात यांचे बागेच्या कामावर विसबा उकिडवा नांदिवडें गांवाहून आला; तो केसो जोगदेव याचे कारकीर्दींत आला. जोगदेवभट बरवे नेवरें येथें आले कीं जोगदेवाचे वडील नारायणभट आले, हें जरी निश्चित सांगतां येत नाहीं, तरी ज्या जमिनीला **आगर जोगदेवभट** असें नांव अद्यापही चालत आहे, त्यावरून पहातां प्रथम जोगदेवभट बरवेच नेवरें येथें आले असावेत. यांस मोकादम हा हुद्दा अदिलशाहीपासून चालत आहे. “मोकादम, देसाई व कुळकर्णी यांना रामचंद्र निळकंठ अमात्य यांनीं इनामत दिल्ही ” असा एका कागदांत उल्लेख आहे. शके १५०० त नेवरें येथें उकिडवे, बरवे, गद्रे, कोल्हटकर, साठे, परांजपे व खेर या उपनांवांची मंडळी रहात होती. बरवे यांस मोकादम, कोल्हटकर यांस देसाई, परांजपे यांस पोतदार व खेर यांस कुळकर्णी असे हुद्दे पूर्वींपासूनचे हल्लीं चालत आहेत. विसबा उकिडवा हा गरीब जाणून, केसो जोगदेव यांनीं जवळ करून घेतला. व थोब्याचे आगरावर ठेवून, त्याशीं सोईरगत

केली; आणि आपटे यांचा वाटा निसबत नाईक पैा चालत होता तो विसबा उकिडवाकडे चालविला. या गांवीं हल्लीं उकिडवे यांचें एक घर आहे; या घराचे दोन्ही बाजूंस बरवे यांच्या च जमीनी आहेत. सदरहु घरांतील कर्ते भास्कर नारायण उकिडवे हे विसबा उकिडवा याचे वंशज असावेत, असें अदमासें वाटतें. जोगदेवभट बरवे यांनीं सही करतांना " जोगदेवभट बरवे खोत " अशी केलेली आहे. जोगदेव भटास एकंदर पुत्र दहा; पैा हल्लीं पांच पुत्रांचा वंश हयात आहे. त्यांच्या वडील स्त्रीचे दादो, विठल व बाळो; आणि कनिष्ठ स्त्रीचे केसो व राघो; यांत दादो व विठल यांचा वंश पुणें व नाशिक जिल्ह्यांत आहे. बाळो यांचा वंश पूर्वजांचे वास्तूंत मोकादमी हक्क उपभोगीत आहे. केसोचा वंश सातारा जिल्ह्यांतील लिंब येथें आहे; आणि राघोचा वंश देशावर बरे च ठिकाणीं आहे.

( पांढुरली, डुबेरें, कोठुरें, पिंपळस व येवलें या ठिकाणीं मल्हार दादाजी बरवे यांच्यापासून पुढील पिढ्यांची रावबाजीच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंतची सर्व ऐतिहासिक माहिती त्यांचे पिढीजाद इमानी नोकर त्रिंबक रामचंद्र वैद्य यानें लिहून ठेवलेली पुढें दिली आहे. )

# कोंकणदेशांतील प्रांत राजापूरपैकीं मौजे कर्यात नेवरें येथील बरवे यांचा शके १५००शें पासूनचा मुख्य वंशवृक्ष

- विठ्ठलभट
  - नारायणभट
    - जोगदेवभट
      - १ दादो
        - मल्हार
          - …गथडी …दाकांट)
            - …चा वंश कोळुरें …बेरें, पांढुरली व …पळस येथें.
        - त्रिंबक
          - याचा वंश नंदुरबार हल्लीं येवलें.
      - २ विठ्ठल
        - गोविंद
          - याचा वंश येवलें येथें.
      - ३ नानो
        - बापू
        - हरी
      - ४ बालो
        - बाबाजी
          - निळकंट
            - याचा वंश खुद्द नेवरें व रत्नागिरी येथें
      - ५ केसो
        - कृष्णाजी
        - जिवाजी
          - हरी
            - याचा वंश लिंब येथें.
      - ६ राघो
        - याचा वंश वसई, पापडी, वांई, पिंगळसई व पनवेल वगैरे देशावर.
    - विठ्ठलभट
      - बाळ
        - कृष्ण
          - बल्लाळ
            - याचा वंश(लोहगड) आंबेगांव, हल्लीं पुणें, (काळें वावर)
          - गोपाळ
      - गोपाळ
        - कृष्ण
        - गणेश
          - गोपाळ
            - बापजी
              - याचा वंश पुणें. (काळें वावर.) यवत, सातारा व तासगांव


जि. नाशिकपैकीं पांढुरली, पिंपळस, डुबेरें व कोठुरें येथील बरवे यांचा वंशवृक्ष
जोगदेव भट
बापो १
मल्हार (पु० ३)
त्रिंबक
खंडेराव
बापुराव
हरिपंत
मल्हार (पु०३)
नारायण
गंगाधर
गणेश
विश्वनाथ
बळवंत
केशव
कृष्ण
माधव
मार्तंड
गजानन
गोविंद
रघुनाथ
वामन
(नडुरबारकडील हल्लीं येवलें)
शंकर
हरी
विश्वनाथ
(पिंपळसकर)
वासुदेव
रामाजी
(कोल्हूरकर)
अनंत उर्फ बापूराव
भिकाजी
मल्हार
गोपाळ
कृष्णाजी
यशवंत
त्रिंबक
गोपाळ
माधवराव
रामराव
विश्वासराव द. (डुबेरकर)
कृष्ण (पु०३)
शिवराव
त्रिंबक उर्फ बाळासाहेब
काशिनाथ
विश्वास द. गो.
गंगाधर
गणपत
पुरुषोत्तम
(पांढुरलीकर)


रामाजी (कोल्हुरकर)
गणपत
रामचंद्र
धोंडो
आपाजी
रामराव
व्यंकटराव
रामकृष्ण
दामोदर
हरी
जगन्नाथ
परशराम
वामन
बळवंत
रामचंद्र
बळवंत
रामचंद्र
श्रीधर
वामन
शंकर
माधव
गणपत
भास्कर
रंगनाथ
केशव
गोपाळ
रंगनाथ
वासुदेव
रामकृष्ण
पुरुषोत्तम
नरहर
नारायण
विनायक
B.A LL.B.
दत्तात्रय
पुरुषोत्तम
सदाशिव
पांडुरंग उर्फ आबाजी
माधवराव
पांडुरंग
दिनकर
गोविंद
गोविंद
गणपत उर्फ आबाजी
रामचंद्र
शंकर
अनंत
केशव
शंकर
रघुनाथ
बाळकृष्ण
सदाशिव
विश्वनाथ
लक्ष्मण
मोरेश्वर
अनंत
कृष्ण
रघुनाथ
वासुदेव
M.A B.Sc.
निळकंठ
चिमणराव
विनायक
अच्युत
बाळकृष्ण
नारायण
सदाशिव

श्रीगजानन

श्रीगणेशसरस्वतीभ्यां नमः

श्रीकुलस्वामी लक्ष्मीनारायणाय नमः

मी त्रिंबक रामचंद्र वैद्य, माझें वय सत्तर बहात्तर वर्षांचें आहे. त्यांत शके १७२० कालयुक्त नामसंवत्सरापासून आज एकसष्ट वर्षें मी लहानपणापासून डुबेरे संस्थानीं याचेच अनुषंगानें आहें. त्या दिवसापासून मला वडिलांचे मुखें ऐकिल्यावरून व दंग्याचे पूर्वी कागदपत्र दृष्टीस पडले होते त्याजवरून व अलीकडील साठवर्षांचे कामकाजाची पैरवी दृष्टीस पडल्यावरून माहिती थोडीबहुत आहे. खरीखोटी याचा वेता भगवान् श्रीहरी आहे. लिहिण्याचा दोष स्थापन न व्हावा ही प्रार्थना आहे.

हल्लीं यजमान रावसाहेब यांनीं आज्ञा केली कीं, जुनीं माहितगार माणसें पूर्वींचीं कोणीच नाहींत. हल्लीं खंडो बळवंत वाळुजकर व त्रिंबक रामचंद्र वैद्य उभयता माहितगार, पौ खंडोपंत बापूस देवआज्ञा जाली. त्रिंबक रामचंद्र याचाही वृद्धापकाळ. पुढें मंडळी पैा संग्रहीं मुलें आहेत तीं—

१ खंडोपंत याचे चिरंजीव श्रीपतराव हे वयानें शेचाळीस वर्षांचे आहेत, परंतु त्याचे वडिलाचे वेळेस ते येथें राहून व्यवस्था कांहीं न पगहिल्यामुळें त्याजला माहिती नाहीं.

१ त्रिंबक विठल याचे चिरंजीव विठल त्रिंबक हे लहान वय सवीसावें वर्ष आहे याजला माहिती नाहीं.

१ त्रिंबक रामचंद्र याचे चिरंजीव मोरो त्रिंबक याजला तेवीसावें वर्ष आहे याजला माहिती नाहीं.

---

एकूण तिघेही गैरमाहित आहेत. याजला माहिती होण्यास्तव आपण मल्हार दादाजी याचे वंशांतील त्या मूळ पुरुषापासून कोंकण प्रांतांतून देशी आलियापासून दरोबस्त ल्याहावी म्हणजे तिघांस व आम्हांस ही माहिती दृष्टीस येईल अशी आज्ञा जाल्यावरून मजला जें माहित होतें तें सर्व लिहिलें आहे. कांहीं विस्मृतीनें राहिले असल्यास किंवा कमजाजती लिहिल्यास आलें असल्यास हें पुस्तक ऐकणारांनी क्षमा करून मजला सांगावे ती मी नीट करीन.

---

श्रीगजानन

## ऐतिहासिक माहिती

पुस्तक कौसिक गोत्राचे ठाई उपनाम बरवे आश्वलायनसूत्रांत सिंधुदेशांत भार्गव क्षेत्रांतील जंजिरे रत्नागिरी प्रांतांत कर्यात नेवरें या ग्रामाचे ठाई गांवचे अधिकारी मोकादम याचे कुळांत शालिवान शके १५०० पंधराशाचे शकांत पुण्यसील कीर्तिमान असा मल्हारपंत म्हणून एक पुरुष उत्पन्न जाला. त्याचे पराक्रमाचे वंशजाचें वर्णन माहितीकारितां त्या पुरुषवंशस्थ गोपाळराव मल्हार बरवे दुबेरकर याचे समजुतीस लिहून तयार केले. मिति आश्विन शुध दशमी शके १७८० कालयुक्त नामसंवत्सरे. मूळ विठ्ठलभट त्याचा पुत्र नारायणभट. त्याचा पुत्र जोगदेवभट म्हणोन. त्या जोगदेवास स्त्रिया दोन होत्या. त्या स्त्रियाची संतति वडिल स्त्रीस पुत्र पांच, पैा येक लहान वयात मृत्यु पावला. बाकी च्यार पुत्र मोठे जाले. त्यांत नानो जोगदेव म्हणोन तिसरा पुत्र, त्याचे वंशाचे नकल जाली. बाकी तिघांचे वंश हल्लीं आहेत. दादो जोगदेव वडील, विठ्ठल जोगदेव दुसरे, नानो जोगदेव तिसरे, बालो जोगदेव चौथे. हे चौघे बंधु जाणतपणा जाणती प्रज्या होईपर्यंत येकत्र असतां पैा नानो जोग-

देव तिसरा याचे पुत्र वडील बापूजी नारायण, कनिष्ट हरि नारायण; दादो जोगदेव वडील याची वडील संतति थोरले स्त्रीची मल्हारपंत; कनिष्ट स्त्रीचे त्रिंबकपंत; कन्या येक; ती देशराजपुरीचे देशमुख श्रीवर्धनचे राहणार उपनाव भट गार्ग्य गोत्री; विश्वनाथ याचा पुत्र बाळाजीपंत यास दिली. ते बाळाजीपंत लहानपणापासून मोठे पराक्रमी होता. त्रिवर्ग यात्रा करून घरी गेलीयावर साताऱ्याचे राजधानीचे बंदोबस्ता प्रकर्णी वर्तन केले. ते समई बालाजीपंत जावई हेहि भेटावयाकरिता नेवऱ्यास आले होते. तो साताऱ्याचा मार्ग सर्वत्रानी ऐकून मल्हारपंत दादो जोगदेव यांचे वडील पुत्र व जावई बाळाजीपंत उभयतां जाणते याणीं आपसात विचार केला कीं घरीं बसून काय करावे. सातारा येथील राज्यधानीकडे जावे. असे बेतानें निश्चय करून बाळाजीपंत श्रीवर्धनास जाऊन सुमुहूर्ते घराऊन निघोन नेवाऱ्यास आले. मल्हारपंत याणी वडिलांची आज्ञा घेवोन मुहूत पाहून उभयताही बराबर निघोन किल्ले सातारा येथे राजाचे संनिध येऊन भेट घेऊन तजविजीत राहिले. ते समई राज्यधानीस पेशवे पिंगळे. प्रतिनिधी कऱ्हाडकर, वगैरे सुमंत, अमात्य, मंत्री, सेनापति, न्यायाधीश इत्यादि अष्टप्रधानांची योजना होऊन राज्याचे बंदो (बस्त) प्रकर्ण चाललें होतें; त्या प्रकर्णांत कांहींयेक दिवसांनीं बाळाजीपंत व मल्हारपंत उभयतांचा सहवास होता. हे दोघेहि मोठे पराक्रमी दिसतात असे राजानी मनांत आणोन याची कामाची योजना करावी. तेव्हां बाळाजीपंत यास कांहीं स्वार ठेवण्याची तजवीज सांगितली. त्यांनीं स्वार जमा करण्याची मेहनत करून पहिल्यानें वीस घोडी घरची व ऐसी सिलेदार ठेऊन शंभर घोड्यांची हजेरी देऊन नंतर आणखी थोडकेच दिवसांनीं दोनशें स्वार जमा करून हजेरी देणे.यैसा तीनशाचे पतक केले. सातारे मुकामी राज्याकडे दक्षणचे सरदेशमुखीचा अमल बसविण्याची तजवीज चालली. त्यांत प्रांत गंगथडी सरकार संगमनेर चौदा महाल येथे सरदेशमुखीचा अमल बसाविण्याची योजना मल्हारदादाची, याची राजआज्ञेनें जाली. ते समई

या प्रांतांत मोगलाई अमल. राज्यकारभार अव्यवस्थीत. त्यात गंगथडी चौदा माहालचा मोगलाईकडील अमलदार अमृतराव देशमुख काळे परगणे सिन्नर येथील याजकडे बंदोबस्त प्रांताचें काम असोन ते सिन्नरास रहात होते. मल्हारपंत राजअज्ञा घेऊन मौजे विरगांव पो अकोले सरकार संगमनेर येथील थोरात आडनांवाचे मराठे सातार्‍यास राजाजवळ चाकरीचे उद्देशे काही शिबंदीचा जमाव करण्याकरितां राहिले होते. ते विरगांवास येतानी त्याचे सोबतीने सरदेशमुखी चौदा माहालचे अमल बसविण्याचे कामाच्या सनदा राजापासोन मिळाल्या, त्या सिरपाव सुद्धा घेऊन राजाचे चरणावर मस्तक ठेवून शालक बाळाजीपंत याचे सल्याने सातारियाहून निघोन सिन्नरास आले. ते समई दहा स्वार व पंचवीस पायदळ इतका जमाव जवळ होता. हे कृत्य शके १६१५ चे सालचे आहे. मल्हारपंत गंगथडीस आल्यावर मागे नेवार्‍यास येकत्र मंडळी सापत्न मातोश्री तिजला संतति पुत्र त्रिंबक दादाजी व कन्या लहान व तीन चुलत्यांचा वंश याप्रमाणें होते. पैा कनिष्ट चुलते बाळो जोगदेव याचे पुत्राकडे नेवर्‍याचे मोकाइमीचें काम नेमून बाकी विठ्ठल जोगदेव याचे पुत्र गोविंद विठ्ठल व नानो जोगदेव याचे पुत्र बापूजी नारायण व हरि नारायण असे इकडे आणविले. गोविंद विठ्ठल मातोश्रीसुद्धां होते. पैा गोविंद विठ्ठल यास पो पाटोदे येथील सरदेशमुखीचे कामावर रा केले. बापूजी नारायण याचे नेमणूक साडे तीनशे करून देऊन सिन्नरचे संस्थानास ठेविले. त्याणी आपले स्वतः सिन्नरास वेगळें घर कमळेश्वराचे विहिरीजवळ बांधिले. हरि नारायण हे सातारा मुकामीं इकडून जबाब जातील ते पोहोचवावे मा समजवावा अशी योजना करून सातार्‍यास ठेविले. त्यांनीं राजाची मर्जी संपादन करून राजा सिव याजपासून चार बिघे इनाम मिळविले. त्याचे राजपत्र राज्याचा शक ३८ चैत्र बहुल ३ म्हणजे शके १६३३ सन इंग्रजी १७११ होता. त्याकाळीं जंजिरे रत्नागिरी येथील अमल राज्याकडील रामचंद्र निलकंठ अमात्य प्रधान याजकडे होता. त्यांनीं कर्यात नेवरे येथें इनामी सनद करून

दिल्ही. ती छ २१ सफर सन सलास अशर मया व अलफ बिघे १५ पो देशमख बिघे ५ व देश कुळकर्णी बिघे ५ मोकाद्म बरवे बिघे ५ त्या सालचा शक १६३४ होता इंग्रजी १७१२ होता। येकूण हरी नारायणाचे राजपत्र बिघे चार अमात्य याचे सनद पो बिघे ५ येकूण नऊ बिघे इनाम जमीन होय. याजला नवीनपाटिलकीस हक मिळाला. जोगदेवभट याचे कनिष्ट स्त्रीचे संतती पैा जेष्ट पुत्र केशव जोगदेव याचा कृष्णाजी केशव याजला बाळो जोगदेव याचे पुत्रास मोकाद्मीचे कामावर योजिले. त्याचे सोबतीस कृष्णाजी केशव; असें उभयतांनीं मिळोन वतनाचे कामावर योजून दिल्हे. वतनाचा बंदोबस्त ठेविला. मल्हारपंत सिन्नरास राहिल्यावर सिन्नर कसब्यांत देशमुख याचा अमल गांवचे जमिनीची कासबंदी शेत हस्तगत होण्यासारख नाहीं. या पुरुषाची शेतावर द्रिष्ट मोठी. कारण नेवऱ्यास वतन मोकद्मी व दोनर्षीचा व्यापार; या हेतूनें कोठेंतरी घ्यावे ते श्रीगोदातीर पाहून घ्यावे असा विचार मनांत योजून तपास करताना मौजे कोटुरें, मामले जाफराबाद उर्फ चांद्वड सरकार संगमनेर गोदातीर उत्तरतीर गांव चांगला देशी असा पाहून त्या गांवास मोगल पाटिल कुणबी याचे मोकादमीचे वतन ते सर्व घेण्याचे ठराव होऊन, किंमतीचे रुा याचा भरणा झाला. परंतु मनांत आणिले कीं याचा उछेद करावा हे श्रेयस्कर नाहीं. असे जाणून आवघे किंमतीचे रुा मोगल पाटिल यास दिल्हे. ते परत न घेता तिसरा हिसा वतन त्याजला ठेऊन, दोन हिशाची पाटिलकी मोकाद्मी वडीलपणा सुा घेतली. शके १६३० चे सालांत, त्याकाळीं चांद्वड माहालचे देशमुख कानडे होते. खरेदीखत महजर करून वतन सही पहिल्यानें केलें. सातारे मुकामी बाळाजी विश्वनाथ याची भेट व्हावी. कोठें कामगिरीस गेले असल्यास कांहीं दिवस पंतांनी तेथें राहून ते येतील त्याची भेट घेऊन नंतर कोठुऱ्यास यावे. बाळाजी विश्वनाथ याचा उदयकाळ आणि पराक्रमी पुरुष. त्यांत रात्रंदिवस राज्याची सानिध्यता. याजमुळें पंतापेक्षां बाळाजीपंतावर राज्याचा लोभ विशेष वाढून आस्ता बसली. पेशवाईचा

अधिकार यांजकडे नव्हता. पिंगळे यांजकडे; परंतु पेशवे पिंगळे व प्रतिनिधी याचे बगवरीनें याजला कामाकाजांत घ्यावे असा बोध चालला. येके वर्षी पंत सातान्यास जातांना, आंताजी मल्हार, पंताबरोबर गेले. राज्यास भेटविले. सरदेशमुखीचा गुमास्ता सरकार तो हा मुलगा समजाविले. पिंगळे याची भावाची मुलगी नवरी होती. पंताचा मुलगा पाहून त्याचे मनांत आले का ही मुलगी याजला द्यावी. त्यांणीं बाळाजी विश्वनाथ याजजवळ गोष्ट काढिली.त्यांणीं उत्तर केलें आम्ही कोंकणचे राहणार. आपण देशावरील. मल्हारपंतांनीं मान्य केले पाहिजे. हा मार पिंगळे यांणीं ऐकून राज्याचे कानावर मार घातला. राज्याकडून मल्हारपंतास सांगिविले. ती आज्ञा मान्य करणे आली. देशस्ताची मुलगी असोन करणे आली. त्यात इतकेच कीं मुलगी फार सुरूप गौरवर्ण होती. कोठुन्याहून सटके नेऊन सातारे मुकामीच आंताजीपंतदादाचे लग्न करून घेऊन मुलगी सुध्धा कोठुन्यास परत आले. सातारे मुकामी राज्याजवळ पिंगळे पेशवे होते. राज्याचा बंदोबस्त होणे तो पिंगळे याचे हातून होण्यासारखा दिसत नाहीं; असे छत्रपतीस दिसोन आल्यावरोन पेशवाईची वस्त्रें बाळाजी विश्वनाथ यांस द्यावी. असे मनांत येऊन प्रतिनिधी सेनापती इत्यादिकाचे विचारे द्यावी. बाळाजीपंताचे व सर्वांचे साधन होतेच. शके १६३६ चे साली पिंगळे याची पेशवाईची वस्त्रें बाळाजी विश्वनाथ यांस मिळाली. त्यासमई मल्हारपंत जवळ होतेच. पुढें बंदोबस्ताकरितां आगोदर पुणीयास यावयाचे ते वेळेस पुणें प्रांताचे अधिकारी मोगलाईकडील. याचे राहाणे पुणे व का लोहोगांव येथें असे. बाळाजी विश्वनाथ आपले जमावानिसी निघोन मल्हारपंत बराबरच असे कर्यात सासवडनजीक पुरंदर येथें आले. पंत त्याचा निरोप घेऊन कोठुन्यास आले. बाळाजीपंत सासवड मुकामी येऊन तेथें पुरंदरे देशस्त ब्राह्मण वतनदार याचा स्नेह करून त्याजला चिरंजीवात गणना करून आपल्या अधिकाराचा बंदोबस्त होईल, त्याची दिवाणगिरी पुरंदरे याची, असे संकेत होऊन उभयतां पुणीयास येऊन पुणे देश स्वाधीन करून घेऊन त्या दिवसापासून पाच साहा

वर्षांचे सुमारे स्वारी-सिकारी करून गोदातीरापर्यंत आपला शह दिल्हा. शके १६४२ चे साली बाळाजी विश्वनाथ यास देवआज्ञा जाली. बाळाजीपंत याजला नाना असे म्हणत होते. उभयता येकदाच राज्यास भेटले. राज्याचा लोभही उभयतावर सारखाच असे. बाळाजीपंत नानाची राज्याजवळ सानिध्यता नेहमीं, मल्हारपंताचे राहाणें दूरदेशी, वर्षांतून येक वेळ साताऱ्यास जाणे. आठच्यार दिवस राहाणे याजमुळें तितका लोभ याजवर. याजमुळें ते पेशवाईपदास गेले. मल्हारपंत गंगथडीचे सुभेदारच राहिले. तात्पर्य, कोठेही सानिध्यता आहे ती विशेष; तिचे फळही तसेच. योग्य पुरुष म्हणताहेत जाणावे. शके १६३६ चे साली साताऱ्याहून पंत कोठुऱ्यास. पुढें गंगातीरी देवालय सिवाचे बांधावे अशी योजना मनांत आणून उत्तम प्रकारचा बाणलिंग मिळवून शके १६३९ चे सालीं देवालय व गंगातीरी घाट बांधून तयारी जाली. श्रीशिवरात्रीचे उत्साहाची योजना मनांत आणून बाळाजीपंतनानाचे विचारें राजआज्ञा घेऊन उत्साहास आरंभ केला. तो कुंडमंडप घालून होमद्वारा अतिरुद्र; ब्राह्मणाचे बायकास पातळें; गोसावी बैरागी फकीर याजला चादरी; कोणास लंगोटे; आले ब्राह्मणास धाकार; अन्नशांति असे खर्चाचे बेतानें उत्साहास बारा हजार रुा खर्च होत असे. तितका खर्च करून सालदरसाल उत्साह चालविला. तो खर्च माहालचे उत्पन्नांत व खासगी प्रापंच्याचा खर्च पस्तीस हजार रुपये; येकूण सत्तेचाळीस हजार माहालचे उत्पन्न ऐनकाळी व जकाती सुद्धां; त्यापैा खर्च जाऊन बाकी राहिले सरकारास द्यावे, असे राज्यांनीं व पुढें बाळाजीपंतनाना पेशवे जाले त्यांणीं चालविले. शके १६४० चे सालीं बाळाजी विश्वनाथ साताऱ्यास गेले आहेत, अशी बातमी आणवून मल्हारपंत निघोन साताऱ्यास गेले. सिवालय बांधल्याची सर्व हकिकत हुजूर समजाऊन, मौजे कोठुरें हा गांव मोकासा बाबती इनाम संपादन करून राजपत्रें करून घेतली. कर्यात नेवरें येथील वतनाचे कामावर मल्हारपंत याचे इसमाचे पैा बाळो जोगदेव याचे पुत्र व सापत्न इसमापैा केशव जोगदेव याचे पुत्र

कृष्णाजी केशव उभयता होते. तेथील येक मोकाद्मीस कमी होता. येवीसी राजे छत्रपति याजला विनंति त्याच साली शके १६४० म्हणजे राज्याचा शक ४५ या सालात मोकाद्मीचे राजपत्र मल्हार दादाजी व कृष्णाजी केशव उभयताचे नांवे करून घेतले. त्याचा तपसील येणे प्रो.

| | |
|---|---|
| ३०० नक्त लाहारी | इनाम जमीन चावर येक |
| १०० कदीम | ८१० बागाईत बिघे |
| २०० जाजती | ॥२० जिराईत |
| —— | ॥१५ ढेपभात |
| ३०० | ।५ वरकस |
| १ पालक | |
| घरे | ----- |
| म्हसी | ॥२०. |
| — | |
| १ | |

सदरहुप्रमाणें इनामपत्र करून घेतले ते समई रत्नागिरी जंजिऱ्यास अमल छत्रपंतीकडून अमात्य याजकडे होता. पुढें कांहीं येक दिवसांनीं संताजी आंगरे कुलाब्याचे याजकडे जाला. त्यांजपासून पेशवे सरकारात आला. मल्हारपंत सातार्‍याहून निघोन कोठुऱ्यास आलीयानंतर हरिपंत टकले याची कन्या वधू होती, ती मधील चिरंजीव रामाजीपंत यास केली. टकले यास प्रांा गंगथडीची मजमूची हरकी असामी दिल्ही. दुसरे टकले यास फडणिसीची आसामी हरकी करून दिल्ही. सातारकर राज्याचे चिटनीस याचे सांगितल्यावरून कल्याणकर परभू यास चिटनिसीची आसामी दिल्ही. मल्हारपंत येक वेळ सिन्नरास आले होते. येथें बाग असावा असे योजून सिन्नरकर देशमुख याजपासून शके १६४१ चे साली बागाकरिता सहा बिघे इनाम घेऊन इनामपत्रक करून घेऊन त्यात विहिरी बांधून बागाची दुरुस्ती करण्यास सांगितली. तेथून कोठुऱ्यास गेल्यावर मल्हारपंत यांणीं पाटिलकी घेतल्याचे पूर्वीं कोठुरें हा

गांव कांहीं दिवस खराब उज्या [ड] होता. त्या संधीत कोठुऱ्याची जमीन पश्चिमेकडे मौजे पिंपलस पो चांदवड यांणीं जहागिरदार याचे आश्रयानें वहित केली. त्याची पंचाईत जमीदार भोवरगांव मिळवून त्या जमिनीचे खोट-पत्र लिहून घेऊन ती जमीन कोठुरें या गांवाकडे माघारी आणिली. हे खोट-पत्र शके १६४१ चे साली जाले आहे. शके १६४२ बाळाजी विश्वनाथ यास देवआज्ञा होईपर्यंत, वर्षासनें, इनामगांव, जमीन ही देहनगी राज्यपत्रानें व हुकुमानें चालत असे. बाळाजीपंतनानास देवआज्ञा जालीयावर त्याचे दोन पुत्र बाजीरावसाहेब व चिमाजी आपासाहेब उभयताकडे पेशवाईचा अधिकार छत्रपतींनीं देऊन बाजीरावसाहेब याजला सनदा होऊन वस्त्रें जाली. आंताजी मल्हार यांणीं पंताबरावर कोठुऱ्यास जाऊन शके १६३१ चे साली मौजे मांजरगांव पो चांदवड नजीक कोठुरें पूर्वेकडे गोदा दक्षिणतीर येथील दरोबस्त कुळकर्ण पंताचे आज्ञेनें घेऊन खरीदखत महजर करून घेतले. दोन वर्षांत दोन वन्ने घेतली. या प्रांतांत जाहागिरीचा अमल मोगलाई आणि स्वराज्य म्हणजे मोकाशाचा अमल गांवची चौथाई सातारेकर छत्रपती राजे यांणीं मोगलाईवाल्यापासून तहाने अमल चालू करून ते माहालोमाहालचे मोकाशे राज्याचे. हुजूरचे मानकरी लोक फार करोन मराठे; याजला दिल्हे. फौजेच्या खर्चास म्हणोन चौथाईचा अमल बसविला. त्या वेळेस कसबे सिन्नर हा आपला राहाता गांव, येथील मोकाशाचा अधिकार आपला असावा; असे मल्हारपंत यांणीं मनांत आणून तो मोकासा आपले सुभ्यात लावून घेतला. आणि त्या कामावर कारकुनाची योजना करून पुढें थोडेच दिवसांनीं वाळूजकर याचे वडील रोजगार उद्देशें इकडे आले. त्याजला पंतांनीं संग्रही सिन्नरास ठेऊन मोकाशाचे काम याजकडे सांगून वाळूजकर यांणीं आपले घर राहावयास निराळे बांधून मोकाशाचे काम पंताचे वाड्यांत करून राहिले. सरकार संगमनेर चौदा महालचे सरदेशमुखीचा बंदोबस्त होऊन माहालो-माहाल कारकून सिबंदीकामाचे बेतानें पंतांनीं नेमणूका करून दिल्ह्या. त्यांत पो पाटोरे येथील

माहाल मजकूरची नेमणूक गोविंद विठ्ठल यास खुद्द वेतन रुा ५०० खेरीज मुशाहिरा भोजनखर्च वगैरे रुा ५०० व सिबंदी रुा१००० येकूण दोन-हजार रुा याची नेमणूक करून दिल्ही. गोविंद विठ्ठल कांहीं दिवस ठाण्या-बाहेर परगांवीं राहात होते. नंतर ठाण्याचें गांव पाटोदे माहालचे मौजे येवलेपेठ या गांवांत त्यांणीं वाड्याची योजना करून वाडा बांधून तेथें कटुंबसुद्धां राहिले. कामकाजानिमित्य कोठुऱ्यास पंताकडे यावें. पुन्हा माहाली जावें. या बेतानें पंताचे आज्ञेवरून कोठुऱ्यासही गोविंदपंतांनीं वाडा बांधिला. कोठुरची गांवची वसाहत करून आपला वाडा बांधावयाचा कारखाना लाविला. ब्राह्मण वस्तीस मंडळी आणिली. केळकर, उपाध्ये कोंकणातून आले. सत्पात्र ब्राह्मण विद्वान् उपनांव केतकर याजला आणिले. आणखी ब्राह्मण भिक्षुक व गृहस्थ आणून त्यांचीं घरें बांधण्याची तजवीज. कोणास वर्षासनें कोणास रोजगार कोणास नेमणुका कोणी माहालोमाहालचे कामावर, अशी योजना करून सरासरी पाऊणशे घरें ब्राह्मणाची कोठुऱ्यांत केली. आपण कुटुंबसुद्धां सिन्नराहून कोठुऱ्यास रहावयास गेले. सिन्नरास सरदेशमुखीचे कामावर पळनीटकर; घरखट-ल्याचें काम बापूजी नारायण बरवे; आणखी हाताखालीं कारकून कामाचे योजनेप्रमाणें होतेच. पंतांनीं कधीं सिन्नरास यावें असे काम चालले. इकडे सालभर अमलाची वहिवाट करून अखेर साली साताऱ्यास राज्याचे भेटीस जावें. खर्चवेच होईल तो कच्चा राज्यास समजावून शिल्लक राहिली राज्यास नेऊन द्यावी. मल्हारपंत साताऱ्याहून निघून या प्रांतीं येतांनीं श्रीजेजुरीचे देवदर्शन करून इकडे आले. पहिले नेवऱ्यास यांचे घरीं मार्तंडाचा टाक नव्हता. पुढें सिन्नरास आलियावर देव बसविला. सर-देशमुखीचे वतन राज्याचे वतन त्याची वहिवाट वृत्तीप्रमाणें जालीं पाहिजे. मल्हारपंतास राज्यांनीं सुभा नेमिले. तेव्हां सातारे मुकामीं आज्ञा जाली. सरदेशमुखीचे वतनास दुसरे गुमास्ते म्हणोन वहिवाटीस नांव पाहिजे. त्या आज्ञेवरून यांणीं आपला ज्येष्ट पुत्र आंताजीपंत बाबा जाणता घरीं होता. त्याचे नांव सरदेशमुखीचे गुमास्तगिरीस राज्या-

जवळ नेमून सनद घेतली सिन्नर मुक्कामी आलियावर घर बांधावयास काम लाविले आणखी घरची थोडी मिळविली. पायदळ जाजती ठेविले. घरचे जनावरांचे वैरणीची योजना पाहिजे. सबब देशमुख सिन्नरकर याचे स्नेहाने चं सिन्नर कसब्यांत पाथरवाडी चे कुरण आपले ताब्यांत घेतले मौजे डुबेरें येथील आखलदरा व डुबेरें डोंगर येकूण चाऱ्याची थोडीबहुत सोय केली. नंतर नेवऱ्याहून कुटुंब आणविले. ते समयीं ज्येष्ट पुत्र आंताजी मल्हार, व कनिष्ट रामाजी मल्हार, आज्ञानदशेत, असे सिन्नरास आलियावर थोडके च दिवसांत मल्हारपंत याची स्त्री सिऊबाई गरोदर जाली. त्या वेळेस कोणी पंढरीचा साधू यांचे घरीं आला. त्याणें बाईस आशिरवाद दिल्हा कीं पंढरीनाथ तुम्हास पुत्र देईल, त्याचे नांव विठल असे ठेवावे. त्याप्रमाणें प्रसूत होऊन पुत्र जाला. ते नांव विठल ठेविले. येकूण आंताजी मल्हार, रामचंद्र मल्हार, विठलराव मल्हार असे तीन पुत्र मल्हारपंतास.

बाजीरावसाहेब याजला पेशवाईची वस्त्रे होऊन ते पुणीयासी मातुश्री राधाबाई व बंधु चिमाजी आपासाहेब सुद्धा पुणीयास येऊन शनवारचे वाड्याचा कारखाना चालवून तेथें राहून राज्यकारभार तेथें च चालू जाला. ते समयीं मल्हारपंत यांची वहिण राधाबाई व उभयता बंधू भाचे येथेंच अखेर सर्व ही हिशेब व ऐवज देणे. हे पुणीयासच काम होऊ लागले. तेव्हां साताऱ्यास हुजूर जाणे, हुजूरची भेट, मंडळीचे साधन, हे अवघे च कमी पडले येखादेवर्षी साताऱ्यास गेले तर जावे असे जाले. शके १६४३ चे साली मौजे पिंपळस येथील दरोबस्त पाटिलकी पौ तीन हिशे पाटिलकी मोकादमी वडीलपण मानपान सुद्धा खरीदी करून त्याच खतावर जमीदाराच्या साक्षी करून घेतल्या. पिंपळसची गढी पाटिलकी-कडे घरठाण्यास आली. तिची दुरुस्ती केली. कोठुऱ्यास राहणे. गुराची खटला फार जमला. गंगथडीस चाऱ्याची सोय नाहीं. कोठें माहाल देश म्हणजे नाशिक माहालांत सोई करावी. या हेतूनें शके १६४४ चे सालीं मौजे कसबे लोहोसिंगे पो नाशिक येथील कुळकर्ण दरोबस्त



मल्हारराव दादो बरवे, यांच्या भगिनी
सौ० राधाबाई भ्रतार श्रीमंत बाळाजी विश्वनाथ भट ( पेशवे )



सरदार त्रिंबकराव शिवराम चरवे, पांढुरली

खरेदी करून त्याचे खरीदखत महजर जमीदाराचे साक्षीनसी करून घेतले. त्या गांवास मोठा वाडा घालून सर्व गुराचा खटला मौजे मजकुरी ठेवून इनामात आंबराईची लावणी केली. दुधदुभते तेथचे तूप कोठुऱ्यास आणावे. याप्रमाण गुराचा बंदोबस्त केला. कनिष्ट पुत्र विठलराव याचा जन्म जाली [यावर] श्री पंढरीचे देवाचे ठिकाणी मल्हारपंत याची भक्ती बसून सालदरसाल देवास व बडव्यास दिंडी पुजापत्री दक्षगा पाठवावी असें चालले होते. शके १६४४ चे साली पंढरपूर क्षेत्री धर्मशाळेदाखल एक वाडा बांधला. देवळाचे सभामंडपांत दक्षणेकडील वोरी चे खण चिरेबंदी बांधिले. त्या चिऱ्यावर शके १६४४ असे खोदले अद्याप दृष्टीस येत आहे. कोठुरं मुक्कामी गंगास्नानास पालखीत बसोन जावे. तर ब्राह्मणास दक्षणा भिकार भणगास नित्यशा देत असावी. गंगेस महापूर येऊन गांवाजवळ पाणी आले. त्याची पुजा मल्हारपंती करितां वीस हात पाणी मागें हटले ! इतका पुण्यश्लोक तो पुरुष त्याचे वर्णन काय करावे ! कोठुऱ्याहून पुणीयास जाणे. तर तेथून परत येण्याचा मूहुर्त, पेशवे यांजकडून निवाडे करण्यास खटले यावे. ते वाजवी फैसल करणे. जाण्यायेण्याचा [ मूहुर्त ] येथून पाहून पुणीयासी जाऊन पाहिले. मूहुर्ताचे पूर्व दिवशीं बहिणीस व भाच्यास सांगावें कीं आम्हांस उद्ईक घरास जाणे आहे. याअन्वयें सांगून दुसरे दिवशीं निघोन यावे. याप्रमाणें दरोबस्त मल्हारपंताची कारकीर्द शके १६७० पावेतो एकसारखी चालत आली. पंताचे ज्येष्ट पुत्र आंताजीपंत बाबा याचे सरदेशमुखीकडे आंताजी मल्हार सुभेदार प्रांत गंगथडी याप्रमाणें. दुसरें नांव बाबूराव मल्हार हें हि चालत होते. अशी एका च पुरुषाची दोन नांवे चालत होती. ते बाबूराव मल्हार पुणीयास जाऊन येऊन होतेच. याची हुशारी पाहून औरंगाबादेस मोगल. त्यांत दिवसेंदिवस शरिरास वृद्धत्व व आंताजीपंत बाबा व रामाजीपंतभाऊ दोघे पुत्र जाणते होऊन कर्ते निघाले. त्या उभयतांनीं च पुणीयासी जाणे येणें दरबार सांभाळले. कनिष्ट विठलराव यांनीं पंताजवळ असावे. दोन कन्या पंतास होत्या. त्यांची लग्ने पेशजीच करून दिल्ही

वडील मनुबाई ती चासकर कृष्णराव महादेव जोशी यास दिल्ही. ते बाजीराव साहेब यांचे आप्त; मोठे संस्थानी होते. तिचा वंश हाली दत्तक पुत्र कृष्णराव महादेव नांवकरी चासेस पाटिलकी चे वृत्तीवर आहे. दुसरी चिमाबाई म्हणून. ती कुंटे यांचे घरीं दिल्ही. ते सामान्य च होते. तिचा वंश कोणी नाहीं. तिसरी सापत्न मातोश्रीची कन्या नेवऱ्याहून कोठुऱ्यास मातोश्रीबराबर आली. ती धोंडभट चिपोलणकर यास दिल्ही. ती पंताची सापत्न बहिण. तिचा वंश हाली पुणीयास व सिन्नरास कायम आहे. नाशिक क्षेत्र मोठे आहे. येथें वास्तू असावी असे पंताचें मनांत येऊन शके १६४८ चे साली दिल्लीदरवाज्याजवळ जागेची योजना करून मोठे इमारतीचा वाडा बांधिला. तो गंगेस महापूर येऊन खराब जाला. नंतर दहेरी कोट बांधून आंत हलकी च इमारत केली. सरदेशमुखीचे काम दर्वे याजकडे पंताकडून होते. त्या शहरांत मातबर-पुऱ्याची नवी वस्ती होण्याचे संधीत बाबूराव मल्हार यांणीं नवीन जागा खरीदी दर्वे याचे हातून केली. त्याचे कागद बाबूराव याचे नांवचे दर्वे यांजवळ; तेथें इमारत बांधण्याची तरतूद राहिली नाहीं. ती जागा सरस्वतीचे काठी श्री बालाजीचे पश्चमेस कांहीं एक दिवसांनीं दर्वे यांनीं च हलकी इमारत बांधून तिकडे कोणी पाहिले नाहीं. ते घराचे महजर बाबूराव याचे नांवाचे दर्वे याजपाशीं आसोन हाली ते घर दर्वे यांचे वंशानीं फरोक्त केलें आहे. बाळाजी विश्वनाथ यास देव-आज्ञा जाली. बाजीराव साहेब यास पेशवाईची वस्त्रे होऊन पुणीयासी आले. त्या अवसरांत मल्हारपंत पुणीयासी गेले होते. वाड्याची योजना करून शनवार पेठेत वाडा बांधावयाचे काम चालविले. व बागाची यो-जना करून बागास जागा नेमून घेऊन विहिरी बांधून बाग तयार कर-ण्याकडे कारकून नेमून दिल्हा. व शहरालगत पुणीयाचे खर्चाचे मद-तीस एक गांव असावा, या विचारे सरकारांत विनंति करून मौजे पिंपळे निलख ताा हवेली प्रांा पुणे पाषाणानजीक तो गांव सरासरी हजार रुप-याचा आपलेकडे करून घेतला.

बाबूराव मल्हार यास जेष्ट स्त्रीस पुत्र जाला. त्याचे नांव कृष्णराव ठेविले. ती स्त्रीस देवआज्ञा झाली. यावर दुसरी पळनीटकर याची केली. ती संतान न होता निधन पावली. तिसरी पळनीटकर याची केली. ती फार सुरूप नांव लक्ष्मीबाई होते. ती गरोदर होऊन शके १६६६ चे साली पुत्र जाला, त्याचे पाचवे सातवे दिवशीच निधन पावली. त्या पुत्राचे नांव भिकोबा असे. नंतर चौथी स्त्री कोकणांतून वसई प्रांतातून कान्हेरे याची कन्या आणून लग्न केले. त्याजवर थोडकेच दिवसांनीं शके १६७१ चे साली देवआज्ञा झाली. म्हणजे मल्हारपंताचे वर्षश्राध्ध होऊन दोन महिन्याचे सुमारास त्या वेळेस भिकाजी बाबूराव याचे वय पांच वर्षांचे होतें. वडील पुत्र कृष्णराव; पिंगळे याचे नातू; याजला रास्ते याची कन्या म्हणजे गोपिकाबाई पेशवे यांची चुलत बहीण केली. तिचे नांव येथें गोपिकाबाई च ठेविले होते. रामाजी मल्हार याची जेष्ट स्त्री राधाबाई टकले याची कन्या; इजला आपाजी रामचंद्र व गणपत व रघुनाथ व धोंडो आसे. त्यात कनिष्ट धोंडो हे भिकाजी बाबूराव याचे समवई होते. त्याजवर दुसरी स्त्री त्यांणीं केलीं. तिचे नांव रमाबाई तिजला संतान जाले च नाहीं. विठलराव मल्हार याची स्त्री रखमाबाई याजला संतान जाले च नाहीं. मल्हारपंत यांणीं नाशिक ची हवेली बांधली. यावर मौजे पांढुरली पो। नाशिक येथील पाटिलकी निमे शके १६५६ चे साली खरीदी करून खरीद खत महजर जमीदार याचे साक्षीनसी करून घेतले. ते काम बापूजी नारायण सिन्नरास ठेविले होते, त्याजला बोलावून त्याचे हातून ते काम चालविले. गांवास गांवकुसू व वतनाची खरीदी हवेली मोठी. शिवालय व मारुतीचे देवालय चिरेबंदी व बंधारे सिकस्त जाले होते. नवीन तयार करून गांव उस्तवरीस आणिला. इ॥ मोगलाई राज्यातील अमलदार फत्तेसिंग याजला मार्र बंधारी याचा समजाऊन त्यांणीं एक चाहूर जमीन इनाम वंशपरंपराची दिल्ही. त्याची सनद घेऊन गांवचा बंदोबस्त करून ब्राह्मणवस्ती अडाण वगैरे वस्तीची आबादी केली. बापूजी नारायण यांणीं पांढुरलीस खास घर बांधून,

मिरासी जमीन त्यांत आंबराईची लावणी केली. बापूजी नारायण याचे कनिष्ट बंधू पंतानी साताऱ्यास ठेविले होते. ते ज्येष्ट बंधूनी आणून पांढुरलीचे घर बांधले त्यात ठेविले. त्यास दोन पुत्र येक धोंडो हरी व बाळाजी हरी; ते धोंडो हरी काळीचे पूर्वीच कुटुंब सु॥ निधन पावले. बाळाजी हरी कुटुंब सु ॥ होते. ते बरवे याचेच पदरी पांढुरली मुकामी राहून गुदारा केला. त्याजला संतती नाहीं. त्याणी ही आपली वेगळी मिरास जमीन करून घेऊन उपभोग घेत होते. काळ उज्याडल्यावर स्त्री सुध्दा शके १७३१ चे साली नाशिक मुकामी निधन पावले. त्याचे उत्तर-कार्य डुबेऱ्याहून खर्च देऊन करविले आहे. हरी नारायणाची संतती राहिली नाहीं. बापूजी नारायण याची जेष्ट स्त्री इजला एक पुत्र गो-पाळ बापूजी म्हणोन होता. त्याणें दुसरी स्त्री केशवपंत वैद्य श्रीवर्धनकर कोकणांत होते. त्याची कन्या नवरी होती. तिचे नांव चिमाबाई. ते केसोपंतास पांढुरलीस आणून ती चिमाबाई कन्या आपल्यास दुसरी स्त्री केली. केसोपंताचा वृध्दापकाळ त्याजला दादोपंत म्हणोन येक पुत्र. तो त्याचे बरावर होता. त्याजला पंताचे वाड्यात कोठीचे कामावर चाकरी देऊन कामास लाविला. आपले घराचे पिछवड्यास पागा होती ती जागा दादोपंतास देऊन, त्याजपासून घर बांधवून त्याजला पांढुरलीस ठेविले. [ हे दादोपंत त्रिंबक रामचंद्र पुस्तककर्ते याचे पितामह होत. ] बापूजी नारायण याचा वृद्धापकाळ. राहणें सिन्नरास. वडील स्त्रीस येक पुत्र दुसरे स्त्री केली. तिजला संतती नाहीं. साडे तीनशें रुो पंताकडील नेमणूक. त्यांत गुदारान होय. सबब पेशवे सरकारात विनंति केली. त्यांणीं आणखी दीडशें रुो जाजती करून पाचशे रुो याची नेम-णूक करून देऊन बावती सरदेशमुखी प्रां गंगथडीकडे चालविले. ते गोपाळ बापूजी यास च्यार पुत्र जाले. पैा येक आपाजी रामचंद्र कोठू-रकर याचे काश्यपी लागून बाकी तीन राहिले. वडील पुत्रास एक पुत्र होता. त्या सुा सर्व कुटुंब काळांत नष्ट होऊन येक कृष्णाजी गोपाळ कुटुंब सुा राहिला. काळ उजाडल्यावर मौजे कोठूरे येथें होता. तो

इंग्रजी आमल जालीयावर स्त्री सुाा कोठुऱ्यास निधन पावला. येकूण नानो जोगदेव याची संतती कांहीं राहिली नाहीं. विठल जोगदेव याचे पुत्र गोविंद विठल मल्हारपंतांनीं इकडे आणून पाो पाटोदे येथील मामल्यावर ठेविले. त्यांणीं येवल्यास घर बांधून राहून वतन वृत्ती संपादन त्याच माहालांत करून, सरासरी त्याच पुरुषाची कारकीर्द मल्हारपंत व बाबूराव याचे बराबर चालून त्याचे सुमारास गोविंद विठल निधन पावले. त्यास पुत्र दोन. वडील पुरुषोत्तम गोविंद, कनिष्ट आबाजी गोविंद. पैाा पुरुषोत्तमपंतास संतती नाहीं. आबाजीस संतती दोन पुत्र; विठलराव येक कनिष्ट, व जेष्ट नारायणराव; त्यांत विठलराव पुर्षोत्तमपंतांनीं आपलेकडे घेतला, तोही थोडकेच दिवसांत पोटीं संतती नाहीं. येकूण उभयता बंधू व विठलराव तिघेही निधन जाले. येक नारायणराव मात्र राहिले. ते शके १७२४ चे सालीं निधन पावले. वंश बुडाला. नंतर नारायणराव याची मातोश्री व कारकून सखारामपंत याणी उद्योग करून राघो जोगदेव याचे वंशातील पुरुष, वाई कृष्णातीरीं होते. तेथून दोन पुत्र सखेबंधू आणून येक विठलराव याचे कुटुंबास, कनिष्ट नांव सखाराम; त्याचें नांव गोविंदराव ठेवून [दत्तक] घेतला. जेष्ट मोरोबा म्हणून होता तो जेष्ट नारायणराव याचे कुटुंबाकडे घेऊन दोघाचे वंश कायम केले. पैाा गोविंदराव यास देवआज्ञा होऊन त्याजला संतती पुत्र दोन जेष्ट गणपतराव कनिष्ठ दामोधरराव; व मोरो नारायण कायम आसोन त्याजला तीन पुत्र आहेत. एकूण विठल जोगदेव याची संतती सदरहु प्राो येवल्यास हालीं राहात आहेत.

मल्हारपंत यांनीं पांढुरली येथील पाटिलकी घेतली, यावर शके १६५८ चे सालीं मौजे पिंपळस पाो चांदवड येथील पाटिलकी तीन हिसे पूर्वी शके १६४२ चे सालीं घेतली होती. राहिली चौथाई ते ही खरीदी करून यकंदर दरोबस्त पाटिलकीचे खरीदीखत महजर करून घेऊन जमीदार याच्या साक्षी करून घेतल्या. स्वतंत्र वतन करून अहिवाट चालविली. तेव्हां कानडे देशमुख चांदवडास वतन करून कायम

होते. त्याजवर बाबूराव मल्हार यांणीं शके१६६५चे सालीं मौजे डुबेरें येथें कुरणे राहिली होती. पाटिलकीचे वतन मुसलमान पा याजपासून निमे वतन पा याजपासून निमे पै॥ निमे येकूण सारे गांवची तीन हिसे खरीदीकरून खरीदीखत महजर जमीदाराचे साक्षीनसी करून घेऊन, त्या पै॥ वरुगसे आधी पा होते. त्याजला वतन नव्हते. सबब जमीदार याचे रद्‌बद्‌लीमुळें साहावा हिसा देऊन बाकी पाच हिसे वतन वडीलपण मानपान सु॥ व हवेली नावजी गंगाजी पा राजे याची होती. खरीदी करून त्या पाटिलकीचे कामावर बाळाजी व नानाजी विश्वनाथ वाळुजकर सिन्नर येथील मोकाशाचे कामावर त्याजला योजून वतनाची वहिवाट चालविली. मौजे पाटोदे येथील डोंगराचे टेकीवर श्री देवी योगेश्वरी ची नवीन स्थापना करून देवालय पहिलें च बांधिले होतें.

बाजीरावसाहेब पुणीयास राहिल्यावर पंतानी तेथेच राहणे. पुणीयाचा शनवार खासगत वाडा तयार झाला. तेथून पुढें कांहीं कारणानें कुटुंब-खटले भेटावयास म्हणोन पुणीयासी नेले. कांहीं दिवस होते. त्या वेळेस बाजीरावसाहेब यांजपासून पंतांनीं साध्य केले ते—

१ प्रां जुन्नर येथील सुभा हुजूर पेशवे यानीं आपले मुलाचे नांवे ठेवून काम चालविले. त्या प्रांताची मजमूची आसामी हरकी पंतांनीं आपले निसबतीस करून घेऊन कारकून ठेवून वहिवाट चालविली.

१ प्रां राजापुरी कोंकणांत तेथे पांच खंडी तांदूळ याची वरात पुणीयास आणित जावे.

२ दस्तके कोंकणांतून हरयेक जिन्नस भरून आणावयाची बैल.

 १ पन्नास बैलाचे पुणीयास जिन्नस आणावयाचे खेपी ६

 १ शंभर बैलाच्या खेपा साहा गंगथडीस आणावयाचे

 ———

 २

———

४

एकूण चार कलमे पुणे मुकामी साधन करून घेतले. कसबे त्रिंबक येथें सरदेशमुखीचा आमल, कारकून कामावर होतेच; परंतु क्षेत्राचें ठिकाणीं वाडा असावा म्हणोन पंतांनीं त्रिंबकास मध्यमातच घर बांधविले. हे कलम नाशिकचे वाडा बांधल्याचे आहे. त्या ठिकाणीं ल्याहावयाचे आहे.

माहालानिहाय चे मोकाशे राज्यांनीं बहुत करून मराठे मानकरी यास दिल्हे होते. त्या मोकासा अमलांत बाजीरावसाहेब चौथाई बाबती म्हणोन अमल काढून तो बाबतीचा अमल सरकार खालशात सरदेश-मुखीकडे दाखल केला. त्यांत सरकार संगमनेर प्रां गंगथडी चौदा माहा-लचा अमल मल्हारपंताकडे येऊन सुभेदार बाबती सर देशमुखी प्रां गंगथडी हे नांव चालू जाले. तीन पुत्र पंताचे. जेष्ट बाबूराव दरबारीवळ-णात व मोठे योग्यतेनें राहून दुसऱ्याचे साधन ठेऊन त्याजपासून काम करून घेण्याचे दोन रुो वेळेस खर्च आला तरी करावा. मतलबात कमी पडले तरी पडो व लौकिकात योग्य दिसावे. उदारपणा विसी सामान्यात बरेच होतें. पोथी पुस्तकांत लक्ष पूर्ण असे. दुसरे रामाजीपंत याचे पेशवे दरबारांत वळण चांगले. दोन रुो मिळवावे यांत दक्ष. परंतु सरफी बुध्धी-खर्च करण्याविसी बुध्धी कमी. बहुत करून खासगत मतलब होईल त्यांत मनाची सक्ती फार. कांहीं वंचकता असेल असे वाटते. रत्नपरीक्ष च विशेष होते. विठलराव कनिष्ट हे सामान्यातच. स्वता कोणते पुढें होऊन काम करणें हें नाहीं च. दुसरा काय करितो हे मात्र मनांत आणावे. एकूण तिघांत पंताची आस्था व विश्वास रामाजीपंताचे ठिकाणीं विशेष. बाबती सरदेशमुखी प्रां गंगथडी सुभ्याचे नांव मात्र आंताजी मल्हार परंतु चौदा माहालचे काम करणें. कोठुरें मुक्कामीं ते पंतास समजावून रामाजीपंतांनीं करीत असावे × × घेणें देणें, माहालोमहाल ठराव करणें, हिशेब घेणें, ऐवज ठरावणें, कारकुनांनीं इतला करणें, तशाच जकाती विल्हेस लावणें, ऐवज हिशेब हे सर्व काम रामजीपंताचे हातून. त्या प्रा प्रापंच्याचा खर्च करणें व सरदेशमुखी चे पोटांत वृत्तीसंबंधीं वगैरे कज्याचे फैसल करणे.

त्यांत दोन रुो पैदास्त. खर्च कोठुरें मुकाशी रामाजीपंताचे हातून होत असे व सान्निध्यता फार याजमुळें पंताचा लोभ विशेष. त्याकामांत आंत बाहेर रामाजीपंताजवळ द्रव्य संग्रह फार. सरकारी पेशवेदरबारांत ऐवज देणें, हिशेब विल्हेस लावणें त्याचे हातून पंतांनीं काम चालवावे. बाबूराव मल्हार दरबारी हुषार पाहून बाजीरावसाहेब यांनीं प्रथमता औरंगाबादेस निज्याम मोगलसरकारचे राहणें तेथे वकीलीस पाठविलें. यांणीं निज्याम सरकारचे साधन ठेवून थोडकेच दिवस तेथें वकीली केली. त्या सुमारास पेशवे सरकारांतून सरंजामगांव मोकाशाचे मिळविले. त्याच्या अव्वल सनदा गहाळ जहाल्या. बंदोबस्ताविसीं ताकीदपत्रे पाहिल्यात होती. त्याचे सन साल लिहिले आहेत.

१ मौजे राजगांवपुरी पाो वळुज येथील मोकासा बाबतीचा चौथाई अमल याजबद्दल ताकीदपत्र पाहिल्यांत आहे. सन सलास सलासीन मया व अलफ म्हणजे शके १६५४ इंग्रजी सन १७३२ होतात.

१ मौजे सुलीभजन व मौजे चंदराबाद व मौजे मामलाबाद पाो हवेली दौलताबाद हे तीन गांवचा मोकाशाचा अमल बाबूराव मल्हार यास मिळाला. व काो रोजे येथील चौकी कुळमक्ता हे मोगलाई कडून मिळाले.

१ पाो सावलदबारे प्रांा खानदेश सुभे वऱ्हाड बालाघाट येथील मोकासा बाबती सरदेशमुखी देखील जकात सायर सुध्धा दरोबस्त अमल मिळाला. त्याची आव्वल सनद गयाळ जाली. परंतु राजणगांव वगैरे या सुमारे च मिळाले आहे. बाबूराव यास देवआज्ञा जालीयावर कृष्णराव याजकडे अमल देण्याविसी सनद आहे. तीं सुा इहिदेखमसैन म्हणजे शके १६७२ होतात. ते इंग्रजी सन १७५० होतात.

१ पाो सावलदबारे येथील घासदाणा पेशवेसरकारात घ्यावयाचा ठराव होऊन त्याचा मक्ता रुाो ३५० ते हि काम सरकारांतून याचे

निसबतीस लागले. येकूण तीन अमल, सरंजामाचे व घासदाणा सरकारचा येकूण माहालचा निमे स्वराज्य व निमे अमल मोगलाईचा त्या माहाली चालत होता.

---

औरंगाबादेस राहणे शामजी गोविंद टकले हे मुख्य कारभारी. याचे हातून शहरास जागा घेऊन मोठी हवेली बांधिली. गंगातीरास हरवक्त जाणे. फार जवळ पैठण व क्षेत्रहि जाणोन तेथें वाडा बांधिला. मोगल सरकारांतून दाहा हजाराचा सरंजाम देण्याचे बोलण्यांत आले. त्याच अवसरात दिल्लीचे वकीलातीचे काम बाजीरावसाहेबांनीं योजून रवानगी केली. ते औरंगाबादेस आले. तेव्हां कारभारी टकले यांणीं विनंती केली. दाहा हजाराचा मोगलाचे तहातील बोलण्यांत आला. हा मजकडे द्यावा. आपण मोठे कामावर जाता मी आपला आहे. ते यांणीं लोभ न धरितां टकले याजकडे दिल्हे. त्यांणीं तो सरंजाम मोगलाईतील डोंगर किल्हा वगैरे गांव आपले नांवे सरंजाम करून घेऊन सनदा घेतल्या. शहरचे हवेली व गांव माहाल सरंजामाचे. याची वहिवाट सर्व टकले याचे ताब्यांत. इतका विश्वास व देहनगी असून टकले याची वहिवाट कृत्रिमी ! याचे वर्णन करतां फार तपसील. बाबूराव मल्हार दिल्लीस जाऊन वकिली केली. एक दोन वेळ देशी आले होते. माळवे प्रांतांतील माहाल दरोबस्त पेशवे याजकडे दिल्ह्याच्या सनदा दिल्लीचे पातशहा याच्या घेऊन देशी आले. बाजीरावसाहेब याचा तसाच बाळाजी बाजीराव म्हणजे नानासाहेब याचाहि लोभ बाबूराव याजवर विशेष. सदाशिव चिमणाजी म्हणजे भाऊसाहेब याणीं बोलण्याबोलण्यांत एक वेळ सांगितले. वकीली म्हणजे काय ? येक भटाचे हातून वकीली सरकार घेईल. तो विषाद बाबूराव मल्हार यांस वाटून तसेच उठोन सातान्यास राज्याजवळ गेले. इकडे भाऊसाहेब यांणीं महादेवभट हिंगणे नाशिककर याजला वकीलीस योजून त्याचा पुत्र बापूजी माहादेव फार हुशार व आणखी हुषार कारकून योजून दिल्लीस रवानगी केली. बाबूराव मल्हार सातान्यास जाऊन

थोडे दिवस राज्याजवळ राहून आमात्यपद प्रधानकीचे घेऊन पुणीयास यावे. असे राज्याचे आश्वासन जाले. ते वेळेस वासुदेवपंत टकले वगैरे कारभारी मंडळ पुणीयास होते. याजला नानासाहेबांनीं सांगितले कीं बाबूराव यास आम्ही काय कमी केले आहे कीं, आमात्यपदाची योजना करून आम्हाजवळ येणार. तो मार कारभारी मंडळी पैा येकजण सातान्यास जाऊन बाबूराव याजला पुणीयास घेऊन आले. त्या वेळचा सातारे मुकामचा केलेला सिका काळाचे पूर्वी पाहिला होता. त्यांतील आक्षरे " राजाशाहू चरणी दृढभाव मल्हारी सुत बाबूराव " आसी होती.

रामाजी मल्हार हे रत्नपरीक्ष च विशेष म्हणोन सदरी दर्शविले त्याची चमत्कारीक गोष्ट ऐकली. ती अशी कीं, पुणें मुकामी कोणी कारागिरानें खडी साकरेची मोत्याची जोडी फार मोठी तयार करून ती जोडी येक उदमी घेऊन पुणीयास आला. सरकारांत दाखविली. शहरांतील परीक्षक यांणीं पाहिली. परंतु ही खोटी आहे असे कोणाचेही नजरेस न अले. ती जोडी घ्यावयाचे विच्यारे रामाजीपंत यास बोलावून दाखविली. त्याणी पाहून सांगितलें कीं ही जोडी आंगावर घालून उष्णोदकानें स्नान करू[न] नंतर किंमतीचा ऐवज द्यावा. असे उदमी कबूल करीत असल्यास घ्यावी. असे सांगतांच ते उदमी कबूल न करी. तेव्हां ही खडीसाकरेची आहे हे स्पष्ट सांगितले. असी मल्हारपंताचे कारकीर्दीची वर्णना कोठवर करावयाची. सिन्नराहून कोठून्यास गेल्यापासून सारखे चाळीस वर्षे नांदनुक येकाच पुरुषाची. पुत्रपौत्र, चहडता दिवस, दुखाचा लेश नाहीं. जसे द्वारकेस श्रीकृष्ण तसे या गंगथडी प्रांतात दानधर्म, लौकिक, अपराधी यास सिक्षा, मुलकाचा बंदोबस्त, जहागिरीचा अमल मोंगलाचा आसून त्याजवर वर्चस्व, मोगलाईकडील अमलदार दिल्लीहून आलेले व निज्याम सरकारचे शाईतखान व सेख मुसाफरखान व सैद लष्करखान आणखी कितेक हामीदार याचे लोभ. त्याजपासून येक चाहूर जमीन मौजे कोठूर येथे व येक चाहूर जमीन मौजे डुबेरें असी दोन चाहूर जमीन संपादन सनदा घेतल्या. ती जमीन चालू

जाली. आवरंगाबाद शहरा मधे निज्यामाकडील सरकारचा जकातीचा मोठा उपसर्ग. परंतु बाबूराव याचे हरयेक मालास जकात माफ. असे कितीक प्रकारचे ठेऊन पंताचे दौलतीचे पुरे दोन प्रहर शके १६७० चे सालापर्यंत जाले. येथून पुढे दिवस उतरतो आसे दिवस आले. शके १६७० चे साली मल्हारपंत यास कोठूर मुकामी देवआज्ञा जाली. बाबूराव मात्र जवळ नवते. वरकड सर्व कुटुंब सानिध्य आसोन देहे आवसान जाले. शके १६७१ चे साली बाबूराव वर्षश्राध्धाकरितां कोठुऱ्यास आले. आवघी मंडळी एकत्र होऊन बाबूराव यास सुमारें दोन माहिन्यांनीं देवआज्ञा जाली. पंताचे बराबरीचा पुत्र बंधू प्रा॰ मोजावयाचा. यानंतर वडील रामाजीपंत याचे हुकुमानें सर्व कारभार चालावायाचा. परंतु त्याचे मनांत कृत्रिम! याजवर शके १६७३ चे साली बाबूराव याचे जेष्ट पुत्र कृष्णराव याचे नांवे कृष्णराव अनंत म्हणोन बाबती सरदेशमुखी प्रां गंगथडीच्या सनदा जाल्या. व सावलदबारे वगैरे शहराकडील गांवच्या सनदा बाबूराव मल्हार मृत्यु पावले. याचे पुत्र कृष्णाजी बाबूराव याचे नांवे जाल्या. कृष्णराव याचे पुत्र येशवंतराव याचे लग्न दर्वे नाशिककर सरदेशमुखीचे कमाविसदार याची कन्या वधू नेमून नाशिकास लग्न जाले. कनिष्ट पुत्र भिकाजी बाबूराव याची मुंज्य जाली. याप्रा॰ च रामाजीपंत याचे चौघे पुत्राच्या लग्नमुंजी जाल्या.

शके १६७२ म्हणजे सन ११६० चे साली मोगलाई अमल नांदगिरी चा सरकार संगमनेर चा सरकारात आला. त्याचा बंदोबस्त दोन वर्षांत पुरा जाला. पाटोदे माहाल विंचूरकर याजकडे, मामलत चांदवड होळकराकडे, आकोले रामाजी मल्हार याचे पुत्र गणपतराव याचे नांवे. नाशिक मोरो विनायक दीक्षित याजकडे. मामले विल्हेस लागले. चौदा माहाल असेच लोकाकडे सांगितले. बाबती सरदेशमुखीचा मामला कृष्णराव याचे नावे जाला. ते समई पस्तीस हजार रु॰ माहाल मारची नेमणूक होती. ते दाहा हजार रु॰ कमी करून पंचवीस हजार रु॰ करून दिल्ही. नंतर शके १६७६ चे साली रामाजीपंत यास भाऊसाहेब यांणीं

बोलावून सांगितले की बाबती सराखीचा मामला तुम्हाकडे. जाहागिरीचा अमल सरकारात आला. हा तुम्ही आपले कडे करून घेऊन सरकारास ऐवजाची अडचण आहे, पांच लक्ष रुो रसद सरकारात द्यावी. याचे उत्तर रामाजीपंतानीं केलें. आज पावेतो आम्ही वहिवाट करून खर्च भागून बाकी ऐवज आकार साली सरकारात भरणा करीत होतो. त्याप्रो करूं. असे सरकारांनीं चालविले पाहिजे. नंतर भाऊसाहेबांनीं सांगितले. जाहागिरीचे अमलास माहाल मार वेगळे द्यावे. तुम्हास बाबती सराखीस वेगळे. ही सरकारची नुकसान आहे. हे होणार नाहीं. रसद देणे नसल्यास बाबतीचा सराखीची मामला सोडावा. रामाजीपंतानीं उत्तर केलें मामला सरकारचाच आहे. असें ऐकून भाऊसाहेबानीं पाटोदे व जकाती चौदा माहालच्या खेरीज करून बाकी बाबती सराखीचा अमल जाहागिरी चे अमलात मामलतदार याजकडे लावून दिल्हे. कृष्णराव याची प्रकृत गर्भश्रीमंत आसोन मोठी आमिरी चाल. आयाष आरामी. काम काजाकडे कांहीं लक्ष नाहीं ! रामाजीपंताचे मनांत विभक्तता व्हावी. असे कोठूर मुकामी घरकृत्यात कुरकुर उत्पन्न केली. त्या त्रासानें कृष्णराव उठोन पांढुरलीस आले. विठ्ठलराव पुणीयास होते. रामाजीपंत पुणीयास सरकारांनीं नेलेच होते ! मामल्याचा जबाब सदरी लिहिला त्याच अवसरात आम्हास विभक्त होणे. याचा तहनामा वेगळे पणाचा सरकारानीं करून येक कारकून द्यावा. त्याचे हातून आम्ही आपली विभक्तता करून घेऊ. ते समई बाबूराव याचे दोन पुत्र येक अमिरासाहेब व येक अज्ञान विठ्ठलराव ते पहिले पासून कोणतेही कामाकाजात नाहीत. होळकर मल्हारजी बावा याजकडे फौजदारी सरदारी जाली. त्या दौलतीचा सिकेनिसीचा दरक याजला मिळत होता. तोही विठ्ठलराव यांणीं कबूल केला नाहीं. रामाजीपंत यांनीं होळकर यांजपासून मौजे पिंपळस पो या गांवच्या मोकासा खेरीज करून दरोबस्त गांव आपले करून घेऊन सनदा घेतल्या होत्या. त्या काळीं रामाजीपंत याचा अगत्यवाद पेशवे सरकारांत विशेष. तो असा

कीं, कोठूर येथील वतन पहिले वडील वाट्याकडे यावे ते आपलेकडे व रामाजीपंत याचे कुटुंब स्त्रिया सा जणी, वडील वाट्यात येक कृष्णराव याची तसेच विठ्ठलराव याची येक. ते दागीने ज्याचे त्याजकडे व कोठूर वतन सरंजामसुध्धा रामाजीपंताकडे मोकासा राजपत्री समाईक तोही सत्ता स्वामित्व रामाजीपंताकडे. उचलून हिस्सा उभयतास द्यावा. असे कित्येक कलमाचे बंदोबस्त आपले मतलबाचे सरकारातून तह-नाम्यांत ठराऊन घेऊन वाटणीकरितां कारकून घेऊन कृष्णराव विठ्ठल-राव सर्वत्र कोठुऱ्यास आले. त्रिवर्गांनीं वृत्ती दौलत इमारती सरंजाम वगैरे सर्व वाटून घेतलें. त्यांत कृष्णराव [ व ] भिकोबा याजकडे तिसरे वाट्यास पांढुरलीचे वतन व शहर औरंगाबादचा [ व ] पैठणचा वाडा, नाशिकची पुऱ्यांतील जागा व सरंजाम सावलदबारे, रांजणगांव वगैरे व बाबती सरदेशमुखी प्रां गंगथडी येथील नेमणूक शिवरात्री उत्साह सुध्धां व कोठुरें येथील मोकासा बाबतीचा तिसरा हिस्सा याप्रो आले.

बाबूराव यांणीं मौजे कोठुरें येथील ज्याहागिर फौजदारीचा अमल मोगलाई कडील तो आपले सरंजामास लावून घेतला. मोकासा पहिला राजपत्री मिळाला होता. राहिली सरदेशमुखी ती रामाजीपंत यांणीं पेशवे सरकारांतून लावून घेतली. येकूण कोठूर येथील दरोबस्त अमल मल्हार दादाजी याजकडे एकंदर गांवची बेरीज रुो ३४५१ मल्हार दादाजी याचे नांवे सरकारचे कागदी खर्च पडत होती.

बाबूराव यांणीं तीन बाणलिंगे उत्तम पाहून आणिली. ती पैकीं एक मौजे पिंपळस येथें गंगातीरी माहाबळेश्वर म्हणोन देवालय बांधोन स्थापन केले. दुसरें मौजे पांढुरली येथें गांवाबाहेर नदीचे कांठी देवालय बांधून स्थापन केले. त्याचे नांव बाणेश्वर. तिसरें शहर औरंगाबाद येथील वाड्यात पुजाआर्च्या नित्य एकादशमी ब्राह्मण नैवेद्य दध्योदन असे योजून तेथें ठेविला. त्या बाणास साडे तीनशे रुो [ ची ] शाळुंका केली होती.

पाटिलक्यांची वतने च्यार पैकी त्रिवर्गाकडे तीन लावून मौजे डुबेरें येथील पाटिलकी समाईक राहिली. बाबूराव याचे कनिष्ट चिरंजीव भिकोबा हा आज्ञान आहे. आणि कृष्णराव सापत्न बंधू या मुलाचा सांभाळ करतील याचा भरवसा नाहीं. सबब डुबेरें येथील पाटिलकीस खर्च पडला होता त्या पैक्याचे दोन वाटे दोघाकडे देऊन ती पाटिलकी कृष्णराव याजकडे तिसरे वाट्यांत लावून दिल्ही.

चाळीस वर्षे दरोबस्त प्रांताची वहिवाट कोठुरें मुकामी जाली. त्या वेळचे लोकाचे, वतनाचे व कटकट कज्याचे निवाडे वगैरे कागदपत्र कोठुऱ्यास राहिले. कृष्णराव यास येक पुर्जा दिल्हा नाहीं. त्या कागदपत्राप्रकरणीं उपयोग कोठूरकर यांस आद्याप होत आहे.

कोठुरें मुकामचे वाटणीत कांहीं कृत्रिमता विठ्ठलराव यांनीं दस्ताऐवजानसी रामाजीपंत याचे पदरी घातल्यावरून थोडकेच दिवसांत पंताच्या अस्थी ठेविल्या होत्या त्या घेऊन कनिष्ट पुत्र धोंडो रामचंद्र बराबर असे रामाजीपंतास माहायात्रेचे उद्देशे जातानां कोणी शत्रूनीं यमुना उतरून मुसानगराजवळ घाला करून जिवें मारिलें ! शेजारी राधाबाई निजलेली तिजला उपद्रव नाहीं. तेथून धोंडो रामचंद्र निघोन, पुढें जाऊन माहायात्रा गयावर्जनादिक करून उभयता मातुश्रीसुध्धा कोठुऱ्यास आले.

त्रिवर्गाची वाटणी होऊन कोठुरें गांव रामाजीपंत याजकडे निखालस आलियावर मोकासा बाबतीचा अमल त्रिवर्गाचा समाईक राहिला. सत्ता स्वामित्व उभयताकडे नाहीं असेही ठरले होते. परंतु अमलाचे काम आहे. पुढें मागे कल्पना येऊन सत्तास्वामित्वावर येतील. हे येक; व दुसरे कादवा नदीजवळ आहे. त्याजला बंधारा कारसूलवडाली जवळ बांधून पाटाचे पाणी कोठूरचे शिवारास आणून बागाईत करून गांव उमेदीस आणून किफायत करावे, असे मनांत आणून गांवची पहिली ३४५१ त्याचा पंचमी हिसा मोकासा ६९३ रुा होतात (जमीदार दाहा रुा शेकड्याप्रो पुरे कलमाचा मक्ता करून ऐवज घेतात.) ते मक्ता

ठरावून घ्यावयाचा तह करून एकंदर मोकासा बाबतीचे पंचम हिशास्या मक्ता पांचश त्रिवर्गाचा ठरावून ते त्रिवर्गानीं घ्यावे असे केलें. या बंधाऱ्याची कांहीं खणली अद्याप खूण आहे. त्याच ठिकाणीं पुढें होळकरानें मौजे वडाली येथील पाटिलकी व देशपांडे यांणीं मौजे पिंपरी येथील पाटिलकी घेऊन बंधारा होळकरांनीं बांधून पाणी आणून दोन्ही गांव बागाईत आद्याप भरत आहेत. त्रिवर्गाची वाटणी होऊन विठ्ठलराव खटलेसुद्धां पुणीयास गेले. कृष्णराव पांढुरलीस गेले. कनिष्ट भिकाजी बाबूराव याचे लग्न रुद्राजी विश्वनाथ पेठ्चे भोगुरकर याची कन्या पाहून कृष्णराव याणी लग्न केले. कृष्णराव पांढुरलीस आले. गंगथडीचे मामल्याची वस्त रामाजीपंत यांणीं सोडिली. पाटोदे व जकाती खेरीज दरोबस्त बाबती सरदेशमुखीचे अमल मामलतदार याजकडे लागले गेले. ते समई पाटोदे माहालची मामलत विंचुरकर याजकडे होती. त्याणीं सरकारसनदेवाचून माहाली सरदेशमुखीची जप्ती शके १६७७ चे साली केली. ते समई तेथें गोविंद विठल याचे पुत्र पुरुषोत्तमपंत बाबा होते. त्यांणीं कृष्णराव अनंत यास मार लिहून आपण त्वरित निघोन पुणीयास गेले. भाऊसाहेबास मजकूर कळविला. त्यांणीं विंचूरकराचा कारकून बोलावून विचारले कीं, पाटोदे येथील सरदेशमुखीची जप्ती करावयास कोणी सांगितलें आणि पुरुषोत्तम गोविंद यांस पत्र दिल्हे कीं, पो पाटोदे येथील सरदेशमुखीची मामलीयत तुमची तुम्हाकडे कायम असे. तुम्ही आपले समाधान असो देणे. मागाहून थोडकेच दिवसांत कृष्णराव पुणीयास गले. सरकार नानासाहेबाची भेट जाली. पहिले नाते आसून दुसरे नानासाहेब यांचे साडुभाऊ. नानासाहेबास आगत्यवाद; इतका भाऊसाहेबास कमी; असो भेट होऊन विनंति केली बाबुराव याची नेमणूक सरकारांनीं आमचे हिशास तहनाम्यांत लावून दिल्ही. रामाजीपंत यांणीं मामला सोडिला. उत्तर झाले कीं तुमचा धंदा तुम्ही करावा. नंतर विनंति केली. माहाल दरोबस्त भाऊसाहेबांनीं मामलतदार याजकडे लावून दिल्हे. आमचाही बंदोबस्त सरकारांनीं करून दिल्हा.

पाहिजे. नंतर नानासाहेबांनीं भाऊसाहेबास सांगितलें कृष्णराव याचे नेमणूकीचा बंदोबस्त करून द्यावा. त्यावर भाऊसाहेबांनीं उत्तर केले कीं, मामले द्रोवस्त विल्हेस लागले. काम नाहीं. तेव्हां निमे नेमणूक मिळेल तितकीच कृष्णराव यांणीं कबूल करून पंचवीस हजार पैा साडेबारा हजार रुपये त्यांत द्रकदार व शिवरात्रीचे उत्साहाचे साहा हजार खेरीज वर्षासनकरी ब्राह्मण याप्रो नेमणूक पावले. नंतर कृष्णराव यांणीं विनंति केली अधिकार असल्याखेरीज यांत मोठेपणा नाहीं. पंताचे व बाबुराव यांचा मोटेपणा सरकारांनीं ठेविला. आसा माझाही राहील अशी तजवीज सरकारांनीं केली पाहिजे. हा मजकूर समजून भाऊसाहेब, नानासाहेब ते सन सबा समानीन म्हणजे शके १७०८ चे सालापावेतो सरसुभाकडे वहिवाट चालली. कृष्णराव घरी येऊन जो सरकारांनीं बंदोबस्त करून दिल्हा, परंतु सुभेदार बाबतीं सरदेशमुखी प्रां गंगाथडी पहिले चालत होते ते कायमच राहिले. यांतच संतोष मानून गुदारा करून राहिले. येक कारकून नेहमीं काम-काज विशेष नाहीं. परंतु दरबार संरक्षणार्थ ठेवावा. येखादे साली आपणही जावें. किल्ले त्रिंबक हे पेशवे सरकारांनीं घेऊन त्रिंबकास नानासाहेब, भाऊसाहेब आले. शके १६७७ त्रिंबकेश्वरचे देवालयाचा कारखाना चालू केला. कृष्णराव भेटीस गेले. विनंती करून मेजवानी-करितां पांढुरली[स] बोलाविले. ते मान्य करून नानासाहेब व भाऊसाहेब उभयताही पांढुरलीस मेजवानीस आले होते. भिकाजी बाबुराव आज्ञान याचे वाटणीचा बंदोबस्त कृष्णराव यांजकडून नीट राहणार नाहीं, असा विचार सरकारांनीं करून तिसरे हिशाचे वाटणीपैा निमे ऐवज सरकारांत ठेविला. वरकड इष्टेट कृष्णराव याचे जिमेस लावून याचा लेख लिहून घेतला कीं, चिरंजीव थोर होऊन वाटणी मागूं लागतील ते समयीं बिन खर्ची वाटणी याची यास देऊं. विठलराव मल्हार पुणीयास होते. याजला संतती नाहीं. रामाजीपंत यांस चार पुत्र आसोन त्याजला पुत्र दिल्हा नाहीं. त्याचे तिसरे वाट्याचे इष्टेट घेऊन पुणीयास राहिले. कारण

पिंपळे गांव, कुरण लोहोगांव, पुणे येथील हवेली व बाग, पन्नासा बैलाचे दस्तक तांदुळ पांच खंडी व जुन्नर प्रांताची मजमु सर्व तिकडेच होते. वृत्ती वाटणीची व नाशिक हवेलीइतके मात्र या प्रांतांत. तेथें कारकून ठेवून काम चालविले. शके १६८० चे साली विठ्ठलराव यांस पुणे मुकामी देवआज्ञा जाली. स्त्री रखमाबाई बराबर सहगमन केले ! पैसा जवळ होता त्याचा दानधर्म, देहेनगी व नेवरे येथील लक्ष्मीनारायण याचे देवालय बांधावयास पंचवीस हजार रुपये दिल्हे. याप्रो व्यवस्था करून राहिले. द्रव्य इष्टेट ते कारकूनाजवळ राहिले. ते वर्तमान इकडे आलियावर कृष्णराव भिजाजी; याचे कोण जातो. कोठूरकर पैा ज्येष्ठ आपाजी रामचंद्र गेलेच नाहींत. गणपतराव रामचंद्र गेले. कृष्णराव यांणीं बराबर कोणी असावे म्हणून भिकोबा अज्ञान सरासरी तेरा वर्षाचे वयाचे यासच दिल्हे. तेथें जाऊन वडिलाची उत्तरगती करून सरकार आज्ञे त्याजकडील इष्टेटाचे दोन विभाग करून घेतले. त्यांतही आंतबाहेर काय केले असेल त्याचा धर्म ते जाणेत ! परंतु उघड दृष्टीस येण्यासारखे रोकडीचा ऐवज विभागास यावयाचा त्या पैा रोकड ठेवून साडेपांच हजार रुो याचा कर्जरोखा लिहून दिल्हा व पिंपळसचे पाटिलकीचे व पाो सिन्नर कुलकर्ण समाईक; पैा पाटिलकीचा भिकोबाचा हिस्सा चौथा. त्याचे बाक्षिसपत्र आपले नांवे भिकोबापासून करून घेतले. अशी कृत्रिमता रामाजीपंत भाऊ प्रोच जाणावी. वतने व पिंपळेगांव समाईक निम्मे निम्म व नाशिकची हवेली कृष्णराव यांजकडे. पुणीयाची हवेली गणपतराव यांनीं घेतली. हे ही कृत्रिमच जाणावे. मजमू जुन्नरची व राजपुरीचे पांचखंडी तांदुळ व कुरण लोहोगांव व दस्तक पन्नास बैलाचे विठ्ठलराव याचे होते. ती कलमे सर्व कलमे गेली. कोणी येकांनीं त्याजकडे पाहून उद्योग केला नाहीं. पुणीयाचा बाग विठ्ठलराव याचे वाटणीचा होता. ती दरोबस्त जागा शहरचे वसाहतीकडे नारायणपेठेत घेतली. हा मजकूर येथें समजली यावर दुसरे वर्षीं कृष्णराव पुणीयास गेले. तेव्हां आम्हास वाडा नाहीं, जुना वाडा कोठूरकराचे वाटणीस गेला,

या बागा पैा आम्हास थोडीशी जागा द्यावी, अशी सरकारांत विनंती केल्यावरून कृष्णराव व भिकाजी बाबूराव यांजला जागा नेमून दिल्ही. त्यात येक विहीर बारव मोठी आली. तो पिंपळसचे पाटिलकीचा गणपतराव यांणीं घेतलेला कागद त्याजपासून भिकोबानीं जाणते जाली-यावर माघारा घेतला. दप्तरातच होता. हल्लीं सुमारें पंधरा वर्षे जाली येजमानास दाखवून फाडून टाकिला. त्या वाटणीचे वेळेस वासुदेवपंत टकले गंगथडी सुभ्याचे मजमदार पुणे मुकामी होते. परंतु गणपतराव याचे प्रत्यक्ष मातूळ त्याचे लक्ष सर्वस्व तिकडेच होते. कृष्णराव बंदोबस्त करून गेले. हे पाहून पहिल्यानें वासुदेव हरी टकले यांणीं सरकारांत कोठूरकराविसी विनंती करून त्याच मुकामी शके १६८० चे साली कोठुरें येथील जाहागीर फौजदारीचा आमल सरंजामास होता, तो इनाम करून घेऊन सनदा करून घेतल्या. त्यांत मोकासा बाबतीचा सर्व निवाडा लिहिला आहे. पाचसे मोकासा बाबतीचा मक्ता त्रिवर्गांचा ठर-विला होता. पैा तिसरे हिस्याचे विठ्ठलराव निधन पावले. बाकी दोन हिस्से राहिले. पैा निम्मे हिस्सा कृष्णराव व भिकाजी बाबूराव याजला देणे ऐवजी दरसाल अडीचशे रुा त्या दिवसापासून देत आहेत.

मल्हार दादाजी याचे सापत्न बंधू त्रिंबक दादाजी कोठूर्यास च्यारशे रुा याची आसामी देऊन वेगळे ठेविले होते. त्याजला त्रिवर्गांचे वाटणीचे वेळेस सरकारचे तहाप्रा पांच हजार रुा दिल्हे होते. परंतु फारखती जाली नव्हती. पुढें थोडकेच दिवसांत विठ्ठलराव मल्हार याची जिंद-गीची वाटणी जाली. त्या प्रा आणखी पंधरा हजार रुा त्रिंबक दादाजी यास देऊन निखालस फारखती शके १६८० चे साली घेतली. त्यांत मार तुमचा आमचा कांहीं संबंध नाहीं. नेवरीयाचे वतनसह हक म्हणोन फारखती जाली. ते त्रिंबक दादाजी यांस दोन पुत्र ज्येष्ठ खंडोपंत, कनिष्ट हरीपंत; खंडोपंतास दोन पुत्र; पैा येक बापू बर्वे म्हणून हल्लीं नाशिकास आहेत. दुसरे हरीपंत यांस तीन पुत्र पैा कनिष्ट नारो यास कांहीं नाहीं. वडील पुत्र मल्हार

हरी यांस तीन पुत्र पैा कनिष्ट यास कांहीं नाहीं. ज्येष्ठ गंगाधरपंत हल्लीं नंदुरबार येथें वकीली कोडतातील करून आहेत, त्याजला दोन पुत्र; पैकी वडील विश्वनाथ तो विंचूरचे कोडतात वकीली करून आहे. कनिष्ट त्याजवळ आहे. दुसरा पुत्र गणेशपंत हल्लीं नाशिकास राहत आहे. त्याजला एक पुत्र केशव तो गंगाधरपंत याजवळ नंदुरबारेस आहे.

गणपतराव रामचंद्र वासुदेवपंत टकले सु॥ पुणें मुकामी असतां कोठूरचे इनामपत्र हस्तगत करून नंतर आणखी सरकारास विनंती केली कीं रामाजी मल्हार यांस चौघे पुत्र कुटुंब मोठे, याचा निरवाह एक कोठूरावर चालत नाहीं. याचा बंदोबस्त सरकारांनीं केला पाहिजे. नानासाहेब यांणीं भाऊसाहेब यांस सांगून या चौघाचे निरवाहार्थ कांहीं गांव ता। कोन्हाळे पैा संगमनेर या पैा द्यावयाचे करून त्याच्या सनदा तयार करून नांव भरणें मात्र राहिले. भोजननंतर भरून पदरी घालावे असे बेताने गणपतराव यांस वाड्यांत भोजनास बोलाविले. ते दिवशीं कृष्णराव महादेव जोशी चासकर नानासाहेबाचे आप्त हेही भोजनास होते. वेळेस भोजनास यावे ते न होता स्मश्रू करावयास लागले. टकले यांनीं सांगितले आज स्मश्रू करूं नका. ते न ऐकिले ! स्मश्रूकरितां अवेळ लागला. इकडे सरकारचे बोलावण्यावर बोलावणे. याचे आटोपले नाहीं. तूप वाढून खोळंबले. शेवटीं भाऊसाहेबांनीं नानासाहेबास सांगितले आपण बसावे मी खोळंबतो. असें बोलून त्याजला बसविले. लागलेच आपणही बसले. मागून कांहीं वेळांनीं गणपतराव आले. तेही भोजन केले. कामाचा विरस जाला. भोजननंतर कचेरीत भाऊसाहेब बोलले कीं, याजला पंतांनीं काय कमी केलें. द्रव्यसंचय करून ठेविला आहे. असे बोलून सनदा केल्या त्या चासकर जोशी यास सिरपाव सुध्धा दिल्या.

खेबा एकच होऊन याचे मामलती पैा विल्हेस लागून राहिले. काय आहे याची निवड केली. तो नावती सरदेशमुखी पैा पाटोदे येथील काम पुरुषोत्तम गोविंद याजकडे आहे. ते याचेच नेमणूकी पहिलेपासून आहेत. तरी सिन्नर मोकासा याजकडेच आहे. व जकातीचे साल मृगाचे

नवते. सबब् विल्हेस लागले नाहींत. ते दरोबस्त व कांहीं पो दिंडारे पैा गांव राहिले होते. एकूण आठेचाळीस हजाराचा मुलुख निवडून कृष्ण-राव यास बोलावून नानासाहेब यांणीं सांगितलें; तुमची नेमणूक निम्मे. त्या बेतानें मुलुख विल्हेस लागणें राहिला; तो सुभा तुमचे निसबतीस चालेल. पाटोदे येथील बाबती सरदेशमुखीची मामलत तुम्हाकडून पहिलेपासून गोविंद विठ्ठल यांजपासून आजपावेतो त्याजकडे आहे. हल्लीं पुरुषोत्तम गोविंद याजकडे दरकदार सुा दोन हजार खासगी व मजमूची त्याचे निसबतीची आहे. त्याची नेमणूक दोनशे व हरि जिवाजी फडणीस याजला तीनशे येकूण पांचशे सुा अडीच हजार रुा त्याजला पावतील. बाकी कच्चे आकाराचा ऐवज व हिशेब साल दरसाल त्याजपासून तुम्ही पहिलेपासून घेत आला. त्या प्रो घेत जाणें. त्यांत तुमची खासगी नेमणूक पालखी सुा सात हजार दसऱ्याचा सिरपाव पावत होता. त्याज बाा नक्त रुा सवाचारशे व पुणे मुकामचा खर्च दरबारखर्च सुा पंधरासे रुा बाकी दरकदार नेमणूकी असाम्या चालवणूकी आहेत. ते वर्षासने तुमचे हातून पहिलेपासून पावत आहेत तीं ब्राह्मणाची. येकूण खर्च वजा जातां बाकी सदर मुलकाची जमेची सिल्लक राहिल, ती सरकारात देत जावी. या अनवये कृष्णराव याचा बंदोबस्त सरकारानीं करून दिल्हा. कृष्ण-राव व पुरुषोत्तमपंत बाबा उभयता सरकारचा निरोप घेऊन घरास आले. गंगथडी प्रांतास सरकारातून दोन सरसुभ नेमिले. नाशिक वगैरे सा मा-हाल हे सर्वोत्तम शंकर उर्फ आबा हशमनीस याजकडे व आकोले, संग-मनेर, पाटोदे, धाधरपळ, कोतूळ वगैरे हे बाळाजी माहादेव मांडवगणे याज-कडे लागले. ते मांडवगणे याचे एकंदर सरसुभ्याचे मुलकाचे पोटात. बाबती सरदेशमुखी निसबत कृष्णराव अनंत असे लागून हिसेब, रसद, भरणा, ठराव वगैरे सर्व बाळाजी माहादेव मांडवगणे याजकडे लागले. त्या दिव-सापासून बाळाजी माहादेव; पुढें नरसिंगराव बल्लाळ त्याजकडे रामराव नरसिंह बरवे याजकडील कृष्णराव, पुढें येशवंतराव कृष्ण; यावर त्रिंबकराव येशवंत, नंतर भिकाजी बाबूराव पावेतो. शके १६८० चे कृत्य—

कृष्णराव यांणीं पेशवे सरकारची आज्ञा घेऊन सुरतकर नबाब याची दिवाणगिरी कबूल करून नेमणूक करून घेऊन त्या नबाबाबरोबर सुरतेस गेले. त्याजला च्यार शो मुबादला दिल्हा. दोन वर्षांनीं परत आले. तो मुबदला त्याजकडे बुडाला. कांहीं परत वसूल पुढें मल्हारराव भिकाजी याचे कारकीर्दीपर्यंत येत होता. गंगाधर शास्त्री गायकवाड सरकाराकडून बाजीराव साहेबाचे वेळेस पुणीयासी आले होते. त्याजला मार समजाविला त्यांणीं कबूल केले कीं, तुमचा कारकून आम्ही गुजराथेत जाऊं लागलो म्हणजे बराबर द्यावा. तुमचा ऐवज उगवेल असी तजवीज करावयास येईल. भिकाजी बाबूराव याचा वाटा कृष्णराव याजवळ होता. कृष्णराव सुरतेस जाणार सबब यांणीं आपले हिशाचे इस्टेट त्याजपासून घेण्याकरितां सरकारचीं पत्रें आणून शामजी गोविंद टकले याचे पुतणे लक्ष्मण चिमणाजी याचे विद्यमाने शके १६८० चे साली घेतले. मौजे डुबेरें येथें राहावयास त्या पुरुषाचे तेरा वर्षांचे वय आसोन हिम्मत व हुशारी मोठी. डुबरे येथील पाटिलकीचे कामावर वाळूजकर येसाजी विश्वनाथ होते. दुसरे प्रां गंगथडी येथील दरकदार आसामी चिटणीस जनोबा परभू याचे लक्ष मात्र याजकडे होते.

कृष्णराव याचे दौलतीपैकीं पहिले सुरतकर नबाब याजला कर्ज दिल्हेला ऐवज फसला. मागाहून किलेपटा येथें दौलत लुटीत गेली. नंतर खराबीचे च दिवस. असें होताना शके १६८७ चे साली पांढुरली मुकामीं देवआज्ञा जाली. ह्याची स्त्री गोपिकाबाई यांणीं सहगमन केलें ! पुढें त्याचे पुत्र येशवंतराव कृष्ण यांचे नांवे बाबती सरदेशमुखीचा सुभा पहिले प्रो पेशवे सरकारांनीं बंदोबस्त करून दिल्हा. कृष्णराव अनंत मृत्य पावले. याचे पुत्र येशवंतराव कृष्ण यांचे नांवे सनद जाली. त्या सालचे सनद नरसिंगराव जीवन कमाविसदार पो पाटोदे याचे नांवे. माधवराव बल्लाळ प्रधान सन सीत सितैन मया व अलफ छ २९ जिलकाद पो मार ची बाबती सरदेशमुखी व जकातीची मामलत पेशजीपासून कृष्णराव अनंत यांजकडे होती, त्यास ते मृत्य पावले यास्तव सदरहु मामलत

मार निलेचे पुत्र राजश्री येशवंतराव कृष्ण याजकडे करार केला असे; तरी तुम्ही पो मारच्या जमीदारास ताकीद करून बाबती सरदेशमुखी देखील जकातीचा आमल पुरुषोत्तम गोविंद निा मार निल याजकडे सुदामत प्रो सुर[क्षी]त देवविणे. जातीची नेमणूक सात हजार रुो पैा येक हजार रुो ठेऊन बाकी सहा हजार रुो येशवंतराव यांणीं भिकाजी बाबूराव यांस देत जावे. म्हणोन पहिलेच सरकारांनीं कृष्णराव यास सांगितले होते. सावलद्‌वारे, रांजणगांव वगैरे गांवच्या सनदा कृष्णराव निधन पावली यावर येशवंतराव कृष्ण व भिकाजी बाबूराव उभयताचे नांवे पेशवे सरकारांतून सनदा जाल्या. कोठुरें मोकासा सुा वहिवाट निम्मे चालली. शके १६८९ चे साली पाो वणदिंडोरी येथील मामलत भिकाजी बाबूराव यांणीं केली. त्या माहाली एक हरकी आसामी येश-वंतराव कृष्ण दिवाण नेमणूक रुो २०० साधन केली. दुसरे वर्षी मामला निघाला. परंतु त्या आसामीची परत केली असती तर येका कारकुनाचा गुदारा चालता. ते जाले नाहीं. कृष्णराव शके १६८८ चे साली निधन पावले. दुसरे वर्षी पूर्ववत पो येशवंतराव कृष्ण याचे नांवे सनद जाली. परंतु माहाल चा ठराव रसद भरणा वगैरे बाळाजी माहादेव मांडवगणे सर सुभेदार यांजकडे होणे. त्या ठरावा समई माहाल मारचे नेमणूकीत साहा हजार रुो कमी करावयाचा ठराव करूं लागले. सबब त्या साली ठराव करून न घेतां मोघम रसद भरणा करून येशवंत कृष्ण व भिकाजी बाबू-राव उभयतांही पुणीयास गेले. माधवराव साहेब थोरले पेशवे येशवंतराव कृष्ण याचे माऊस बंधू; त्यांची भेट उभयतांनीं घेऊन मांडवगणे ठराव करितात हा मार निवेदन करून सरकारची सनद मांडवगणे बाळाजी महादेव यांचे नांवे घेतली कीं, बाबती सरदेशमुखी प्रां गंगथडी येथील मामलत सरकारातून येशवंत कृष्ण याजकडे आहे. त्याचे माहाल मार पैा सालगाा साहा हजार रुो कमी करावयाचा ठराव केला आहे म्हणोन विदित जाले. त्याजवरून मशारनिले याचे चालवणे जरूर जाणून सालाबाद नेमणूक पावत आहे ती येणें प्रो---

| | |
|---|---|
| ७००० खाशास नेमणूक | २२०० पुरुषोत्तम गोविंद कमाविसदार पो पाटोदे |
| ४००० यैन वतन | ३०० हरी जिवाजी फडणीस पो पाटोदे |
| १००० पालखी | ११७५ कारकून |
| २००० सिबंदी | ४७५ विनायक हरी टकले मजमदार |
| ७००० | २५० सिवराम आबाजी टकले फडणीस |
| ६००० शिवरात्री उत्साह बा। | २०० रामचंद्र जनार्दन चिटणीस |
| ४२५ सिरपाव | २५० केसो त्रिंबक मजमदार नीा बाबती |
| १५०० दरबार खर्च | ११७५ |
| ९०० चालवणुकी आसाम्या | १०० जिवाजी अनंत कमाविसदार पो दिंडोरी |
| ५०० गोपाळ बापूजी बर्वे | ३७७५ |
| ४०० त्रिंबक दादाजी बर्वे | |
| ९०० | |
| १५८२५ | |

१९६००

येकूणीस हजार सहाशे रुो मार निलेस देण्या विशी सनद नाना फडणीस याचे तेराविची मांडवगणे यांचे नांवे घेऊन ती त्याजला दाखवून परत घेतली. सन तिसा सितैन मया व अलफ म्हणजे शके १६९० होतात. भिकाजी बाबूराव याची स्त्री येमुनाबाई हे गरोदर होती. ते प्रसूत होऊन पुत्र जाला. त्याचें नांव गोपाळराव ठेविले. शके १६९१ चे साली पुणें येथे बागा पैा सरकारांतून जागा मागून घेतली पैा सुमारें चिपळोणकर यास दिल्ही.

जोगदेव भट याचे कनिष्ट स्त्रीचे ज्येष्ट पुत्र केशव जोगदेव–याचे ज्येष्ट पुत्र कृष्णाजी केशव हे नेवऱ्यास मोकदामी करून असतां तेथेंच मृत्यु पावले. कानिष्ट जिवाजी केशव याचे पुत्र हरी जिवाजी हे नेवऱ्याहून निघोन पुणीयास आले. तेथे मल्हारपंताची भेट जाली. पंतानीं त्याजला तिनशे रुा नेमणूक करून पो। पाटोदे फडणीसीची हरकी आसामी दिल्ही. पुणे मुकामी हरी जिवाजीस सरकारवाड्यांत लबेचे म्हणजे वाड्यातील खिजमतगार सु॥ लोकाची हजीरी चाकरी याचे सबनिसीचे काम सांगितले. त्यांणीं आपले कुटुंब कोकणांतून आणून कोठे तरी बाहेर कुटुंब राहण्यास जागा पहावी. ते कृष्णातरी को। निंब ( लिंब )-प्रांत वाई नजीक सातारा ही जागा त्याचे मनांत येऊन तेथें वाडा बांधावयाचा कारखाना चालविला. श्री लक्ष्मी नारायण कुल–स्वामीची मूर्ती स्थापन केली. पेशजी शके १६४० चे साली कर्यात नेवरे येथील मोकदमीचे वतनास नेमणूक नक्त व इनाम कदीम व जाजतीची करून घेऊन, त्याचे राजपत्र घेतले. त्या राजपत्रा प्रो। नेवऱ्यास आमल चालत असेल किंवा नसेल. [१]हरी जिवाजी यांनीं शके १६८२ चे साली नानासाहेब पेशवे यांजवळ विनंति केली कीं, नेवऱ्यास राजपत्रा-प्रो। इनाम चालत नाहीं. याचा मु॥ बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. आणखी काय समजाविले असेल ते नकळे; परंतु शके मारी नानासाहेब यांजपासून नेवऱ्याचे हक्काची नवीन सनद घेतली. त्यांत असा मतलब लिहिला आहे कीं, पेशजीचे राजपत्रांत एक चाहूर जमीन इनाम लिहिली. इतकी जमीन कोंकणप्रांतात निभणार नाहीं सबब कमी करून तीस बिघे करार करून दिल्हा आहे. असा मजकूर लिहिल्या-वरून मनांत आंदेशा येतो कीं, हरी जिवाजी यांनीं नेवऱ्याचे सनदेची जमीन कमी करून त्याचे मुबादला निंबास जमीन इनाम करून घेतली. हे खचित असेल असे वाटते. कारण एक चाहूर जमीन म्हणजे काय ? सरकारानें लक्ष रुा याची देहनगी दिल्ही असतां ती चालण्यास

१ लिंब घराण्याचे पुरुष.

अशंका नाहीं. मग हा तर राजपत्री इनाम दिलेला होता. याजला असे लिहिण्याचे कारण नाहीं. याजकरितां कृत्रिम दिसत आहे. तो केशव जोगदेव चे वंशापैा निंबास येक पुत्र हरी विनायक मात्र आहे. त्याजला पुत्र नाहीं. त्याजला नेवरे जवळ. सबब त्याणीं मात्र थोडी बहुत वहिवाट नेवऱ्यास ठेविली. ते म्हणतात बाळाजी विश्वनाथ पेशवे यांस बरवे याची कन्या दिल्ही तिचे नांव राधाबाई. ती आमची केशव जोगदेवाची कन्या! परंतु असे वाटत नाहीं. ती दादा जोगदेवाची असें वाटतें. कारण आप्ततेचा व पहिलेपासून कामाचा व मोठेपणाचे वहिवाटींचा मल्हारपंताचा ओघ. असा दुसरे कोणतेच बरवे मंडळीचा दिसत नाहीं. मल्हारपंत घांटावर आलियापासून त्रिवर्ग बंधू पैा आज पावणे दोनशे वर्षें कोणीच नेवऱ्याकडे गेले नाहीं. विठ्ठलराव मल्हार याजकडील पंचवीस हजार रुा [खर्चून नवरें येथें] कुलस्वामीचे देवालय बांधिले. व शके १७३८ चे साली वासुदेव रघुनाथ बरवे नेवरेकर पुण्यास भेटले. त्याजला कुलस्वामीचे नंदादीपास म्हणोन २० रुा देऊन पावती घेतली. व अलीकडे थोडे दिवस जाले वामनराव रामचंद्र बरवे नेवऱ्यास गेला होता असे सांगतात. इतके, याप्राो केशव जोगदेव यांचे वंशांत एक पुरुष आहे. त्या पुरुषाचा दुसरा बंधू राघो जोगदेव याची संतती हे रोजगार निमित्य नेवऱ्याहून घाटावर आले. त्यांनीं मोठाली कामे करून हालीं जाग जागीं आहेत. ते पहिले वंशावळीचे कलमांत लिहिले आहे. प्रस्तुत मल्हार दादाजी याची च्यार इसमे. त्यांत बाळो जोगदेव यांचा वंश मात्र मोकादमीचे वतन चांगले जुरतीनें करून नेवऱ्यास आहेत. वरकड इसमात कोणीच नाहीं. मौजे पिंपळस येथील पाटिलकीचे वतन स्वतंत्र असोन तेथील कुलकर्ण बुडाले. ते जमीदार गणपतराव यास दोन हजार रुा यास देत होते. भिकाजी बाबूराव हे अल्पवई; जाणते गणपतराव, याणीं दिकत करून कुलकर्ण घेतले नाहीं. हे आश्चर्य आहे. त्याचे ध्यानांत यावे. परंतु काय म्हणोन न आले हे समजुतीस येत नाहीं. कृष्णराव यांणीं मौजे शिवली पाो नाशिक येथें चौथाई पाा खो केली.

किलेपटा येथें मोगलाई किल्लेदार सोभागसिंग म्हणून होता. फार चांगला सुमनुष्य. मोगलाईचा आसून इकडील प्रांतांतील सर्व लोकांचे स्नेह असे वहिवाटीचा होता. कृष्णराव याचाही घरोबा असे. निजाम-सरकाराकडील कोणी करडा म्हणोन सरदार फौज सु॥ आला. मागाहून खासा निजामाची स्वारी सिन्नरापावेतो शके १६८४ चे साली आली होती. त्या सालास या प्रांतात करड्याचे साल म्हणतात. त्या भयानें या प्रांतस्थ लोकांनीं किलेपटा येथें घरची चीज वस्त नेऊन ठेविली. त्यांत कृष्णराव यांणीं ही आपले घरची वाटणीची दौलत पट्यास नेली होती. त्रिंबक सुर्याजी म्हणोन ग्रेक परभू जातीचा पेशवे सरकारचे पदरचा. त्याची योजना या मुलकांतील बंदोबस्त किले घेण्याची फौज देऊन रा केला. त्याणें किलेपटा आदी करून सतावीस किले त्या सालांत घेतले. त्यांत कृष्णराव याची दौलत पट्यास ठेविली. ती दरोबस्त लुटीस गेली. बहुत करून कांहीं जवळ राहिले नाहीं. स्त्रियांचे आंगावरील दागिने मात्र राहिले. निजामाची स्वारी सिन्नरावर आली ते समयीं मौजे डुबेरें येथें लूट होऊन बरवे याची हवेली खरीदीची त्यांत जुनी; व जे याचे हातची धाब्याची इमारत होती; ती दरोबस्त जाळून टाकिली. गांवकुसूं भिंतीमात्र राहिल्या. तो वाडा जनोबा दिवाणजी परभू चिटणीस गंगाथडीकडील होते त्यांणीं राहण्याचे सोईचा बांधिला. पूर्वेची भिंत मुस्तकीम वहाळीमुळें बांधिली.

शके १६९२ चे साली मौजे डुबेरें येथील पाटिलकीचे तक्षीमेची वाटणी करून घेतली. पांढरी वाटणे राहिली. समाईक ठेविली. या पाटिलकी प्रकर्णाचा तपसील पुढे लिहिण्यांत येईल. रामाजी मल्हार याचे चौघे पुत्र. याची वाटणी शके १६८२ चे साली जाली. रामाजीपंत याचे इतके कटाक्ष की, वडील वाट्यास गंगातीरी येऊन राहू, असे कारणास घर देखील दिल्हे नाहीं. चौघे बंधू विभक्त जाले. त्यात कनिष्ठ धोंडो रामचंद्र हे भिकाजी बाबूराव याचे समवई आसोन परस्परे लोभ ही विशेष. या मुळें भिकाजी बाबूराव यांणीं कोठू

ऱ्यास गेले तर धोंडो रामचंद्र याचे वाड्यांत राहावे. ज्येष्ठ पुत्र आपाजी रामचंद्र याचे गणपतरावचे वाकडेपणाने कोठुऱ्यांत आपाराव याजकडे बाधले इमारत न देता बखल जागा दिल्ही. व इमारत सिन्नरचा वाडा दिल्हा. याजमुळे आपाराव सिन्नरास राहूं लागले. कांहीं दिवसांनीं पिंपळस येथें राहिले. शके १६९४ चे साली मौजे सोनांबे येथील निम्मे कुलकर्ण खरीदी करून खरीदखत जमीदार याचे साक्षीनसी करून घेतले. पाटील व घर भाऊ याच्या साक्षी पुढे आल्या आहेत. जकात सरकार संगमनेर येथील मामलत येशवंतराव कृष्ण याचे परवानगीनें भिकाजी बाबूराव यांणीं केली होती. बाबती सरदेशमुखी प्रां गंगथडी च्या जकातीपैा नाशिक वगैरे साहा माहाल च्या जकाती व सिन्नर येथील मोकासा असे दादासाहेब पेशवे यांजकडे जाऊन, दिंडोरी पैकीं गांव गंगापूर संस्थानाकडे जाऊन, बाकी बाबती सरदेशमुखी पाटोदे व जकाती सात माहाल च्या व किरकोळ गांव दिंडोरी इतकें प्रकर्ण सरासरी याचे नेमणूकीचे बेतानेच राहिले. त्याचाच सालदर-साल मांडवगणे यांजकडे ठराव करावा असे चालले.

शके १६९२ ताा ९३ माधवराव साहेब थोरले याचे शरीर व्यथीस्त या कारणानें या प्रांतात मातुश्रीचे भेटीस गंगापुरास आले होते. ते कोठु-ऱ्यास हवा चांगली व कोणी सत्पुरुष संन्यासी होता त्याचे दर्शनास म्हणोन पहिल्यानें आले. ते फार दिवस आले. दुसऱ्यानें आले थोडकेच दिवस राहून गेले. पृथ्वीपतीची स्वारी गांवात येऊन गांवात राहिले. परंतु कोठुरकर कोणी ब्राह्मण याचक वृत्तीनें प्रभूजवळ गेला नाहीं. हे प्रभूस ही आश्चर्य जाले. रामाजी मल्हार याची कनिष्ट स्त्री रमाबाई इचा निर-वाह चौघे पुत्र आसोन जाला नाहीं. तो मार रमाबाई यांणीं गोविंद सिवराम खासगीवाले याजकडून श्रीमंतास कळविला. त्यांणीं चार रुो नेमणूक जिवंत आहेत तो पावेतो द्यावे. म्हणोन सिन्नर पाो येथें करून दिल्ही. ती [ नेमणूक ] बाईस देव आज्ञा जाली तथापी शके १७२३ चे साला पावेतो चालत होती. येशवंतराव [ व ] भिकाजी बाबराव उभयता

श्रीमंताचे भेटीस कोठुऱ्यास गेले होते. पहिल्यानें एक वेळ नाशिकास आले. ते समई येशवंतराव यांणीं पांढुरलीस येण्याची विनंती केली. ते समयीं विसाजी हरी सावरकर भोगुरकर यांणीं ही विनंती केली, कीं माझे घर पांढुरलीचे मार्गावरच आहे तेथेंही स्वामीचे चरण लागावे. ते मान्य करून श्रीमंत पांढुरलीस भोगुरावरून आले होते. आपाजी रामचंद्र बरवे कोठूरकर यांणीं संतान नाहीं सबब गोपाळ बापूजी बरवे सिन्नर याचा पुत्र औरस पुत्र जाला तरी वडीलपणा दत्तक मुलाचा असें कबूल करून दत्तक घेतला. त्याचे नांव रामराव आपाजी; पुढे त्याजला दत्तक पुत्र जाला. त्याचे नांव लक्ष्मणराव येकूण त्याजला दोन पुत्र संतती होती. गणपतराव याजला तिघी बायकास तीन पुत्र जाले. पौ मधील स्त्रीचा वडील पुत्र रामचंद्रराव, वडील स्त्री बारामतीकर याची कन्या तिचा पुत्र विठ्ठलराव, कनिष्ट स्त्रीचा पुत्र रंगराव, येकूण तीन संतती होत्या. तिसरे रघुनाथराव याजला पुत्रसंतती नाहीं. दोघी कन्या होत्या. येक सहस्रबुध्दे. दुसरी वैशंपायन याचे घरी दिल्ही. रघुनाथराव निधन पावल्यावर शके १७०४ त्याचे इष्टेट तिघा भावानी पंचवटी संस्थान बाईसाहेब यांजकडील कारकून मुकुंद पांडुरंग याचे हातून तीन विभाग करून घेतले. त्याचे वाटऱ्याची इमारत आपाजी रामचंद्र कोठूऱ्यांत इमारत नव्हती, सबब त्याजला दिल्ही. सिन्नरची इमारत त्याची पैा कनिष्ट धोंडो रामचंद्र याजला इमारत कमी मुळे निम्मे हिस्सा दिल्हा.

शके १६९६ चे साली जगजीवन पवार [ व ] राजाराम गोविंद यांणीं येऊन कोठुरें लुटून खंड वगैरे घेऊन फार खराबी केली.

शके १६९८ चे साली भिकाजी बाबूराव यांणीं गोपाळराव याचे लग्न, गोविंद दीाा पाटणकर सातारकर याची कन्या वधूसी केले, ते लग्न मोठे समारंभाचे जाले. नांव लक्ष्मी ठेविले. सातारे यास श्रीमार्तंडाचे स्थान आहे. त्या देवास सौ. यमुनाबाई यांणीं नवस केला. मला पुत्र जाहला म्हणजे तुझे नांव ठेवूं. त्याप्रों शके १६९९ भाद्रपद मासी पुत्र जाला. नांव मल्हारी ठेविले.

भिकाजी बाबूराव यांणीं राजे बहाद्दर यांजकडून सुजालपूर महाल मालवे प्रांतातील रसद देऊन केला. तो माहाल त्रिंबकराव नारायण व रघुपतराव नारायण आपसांतील कटकटीमुळें ज्याचा माहाल यांणीं केला. त्याचा सरंजाम सरकारातून जप्त जाल्यामुळें रसद बुडाली. सावकाराचे देण्याचा पेच जाला. त्या निकडी मुळें घरची वस्तवानी दरोबस्त मोडून सावकारा [ चे ] देणे वारले. कमती आली तेव्हां पंचवीस घोडी घरची निवडक चासकर यांस देऊन सावकाराचे फडचे केले.

येकूण कृष्णराव याजकडील दौलत सुरतकर नबाब व पटे किल्याची लूट मिळोन गेली. भिकाजी बाबूराव याची सुजालपूरचे मामल्यांत खर्च होऊन राहिली. ती येकूण दोघाची दौलत वडिलाचे वाटणीची बहुतकरून कांहीं राहिले नाहीं. शके १६९९ चे साली मौजे पांढुरली येथील वाटणी तक्षीम पाटीलकी करून घेण्याचा वजे पाा याचा तह ज्येष्ट वाा ७ चे मितीस जाला. याद जाली. येशवंतराव बाबा फार भोळसर पुरुष होता. त्याजवळ मुख्य कारभारी आंबादास गणेश कुलकर्णी डुबेरकर होते. त्याचे व भिकाजी बाबूराव याची चित्तशुध्धी नाहीं. अंबादासपंत त्रिंबकास सिंहस्त यात्रेस गेले होते. ते तिकडून मार्गातून धरून आणून कैदेत ठेविले. त्याजला त्या कैदेत वेड लागले. पुढें सोडून दिल्हे. ते डुबेऱ्यास घरीं येऊन थोडकेच दिवसांत मरण पावले.

येशवंतराव बाबा व भिकोबा तात्या उभयताचा एक विचार होऊन काम चालले. येशवंतराव यास पुत्र जाला. त्याचे नांव त्रिंबकराव ठेविले. शके १७०१ चे साली सुलिभंजन वगैरे दौलताबादेजवळ तीन गांवचे मुकासे समाईक होते ते पिरास देण्याकरिता सरकारांत घेतले. त्याचे मुबदला पेशवे सरकारांतून पाो सावलदबारे याचा सरंजामाचा माहाल होता त्या पैकीं सरकार आमला पैाा दिल्हा तो—

१ मौजे मुर्ती व पलसखेड येथील बाबती सरदेशमुखीचा आमल सिवाजी धानवडे सिलेदार याजकडे होता. त्याचे कोणी नाहीं सबब जप्त करून याचे मुबदल्यास दिल्ही. [ स ] मारे रुाो ७५

१ पो मार चा यास सरकारांत रुो ३५० याजपासून घेत होते त्या पैा निम्मे १७५ मुबदल्यास दिल्हे.

——

२

हा मुबदला देऊन फक्त पावणे दोनशे रुो घासदाण्याचे दरसाल सरकारांत घ्यावे इतके मात्र राहिले. दरोबस्त बाबती सर देशमुखी मोकासा जकात घासदाणा या सुा निम्मे आमल सारे माहाल पैा याजकडे जाला. शके १७०२ चे सालीं येशवंतराव कृष्ण याची प्रकृत बिघडली. ते समयीं भिकोबातात्या को वलिखडे मुखेड पो पाटोदे येथें सुभे मांडवगणे याजकडे गेले होते. त्याजला निकडीनें स्वार जाऊन ते पांढुरलीं आले. येशवंराव याची प्रकृत बिघडली. त्याजला देवआज्ञा जाली. स्त्री यमनाबाई व पुत्र त्रिंबकराव चार वर्षांचे वयाचे होते. त्याचे नांवे बाबती सरदेशमुखीची सनद जाली. मल्हारपंत ताा येशवंतराव च्यार पिढी कागदी पत्री सुभेदार पदवी सरकारची होती. ती कमी जाली. तोंडानें सुभेदार म्हणावे इतकेच राहिले ! दौलतीचा बंदोबस्त दरोबस्त भिकाजी बाबूराव निखालस आला.

शक १७०३ चे साली पाटिलकीचे तक्षीमेची वाटणी वजे पाा याजपासून करून घेतली. ते वाटणी पत्र इनामाचा उलगडा समजुतीनें जाला नाहीं. याजमुळें वाटणी पत्र वजे यांस दिल्हे नाहीं. काळी पांढरी सुा जाली. या पाटिलकीचा तपशील पुढें लिहिण्यांत येईल.

चौथे पानाचे तिसरे बंदाचे पाठीमागील शेवटचें थोडेसे लिहिणे राहिले. ते धोंडो रामचंद्र बर्वे याचे कनिष्ट स्त्रीची संतती तीन पुत्र जाले; वडील रघुनाथराव, दुसरे गोविंदराव, तिसरे पांडुरंगराव येकूण तिघे होते.

शके १७०४ चे साली मौजे पिंपळस येथील पाटिलकीचे महजर वगैरे कागद विठलराव याचे वाटणीचे वेळेस गणपतराव यांणीं नेले होते. ते वडिलाजवळ असावे म्हणोन माघारी घेतले. पाटिलकीचा कागद [illegible] घेतला होता. त्या सुा परत घेतले. त्रिंबकराव

येशवंत मृत्य पावले. कृष्णराव याची संतती राहिली नाहीं. एक स्त्री मैनाबाई मात्र होती. बावती सरदेशमुखी प्रां गंगथडी येथील सनद भिकाजी बाबूराव याचे नांवे जाली. मैनाबाईचे बोलणें तुमचे दोन पुत्रा पैा येक मला दत्त द्यावा. यांणीं सांगितलें तुजला मूल देऊं, परंतु दत्तविधान करणार नाहीं. याणीं गोपाळराव यांस तिचे समजुतीस्तव पांढुरलीस ठेविले. मैनाबाईचे म्ह[ण]णे मल्हारराव यास ते तात्यासाहेब कबूल न करीत मेनाबाईनें गोपिकाबाईसाहेब याजवळ जाऊन पंचवटीस तेथें यत्न केला. तुमचे बहिणीचा वंश वाढवावा; व पुणीयास जाऊन रास्ते याचे हातून खटपट केली. परंतु कांहीं सिद्धीस गेली नाहीं. परत वरास आली. तिची कटकट नेहेमीं. तात्यासाहेबाचे मागें रोज कुरकुर. शेवट शके १७०६ चे साली सरकारची परवानगी घेऊन गोपाळराव यांस घरी ठेविले. जवळ येसाजी विश्वनाथ यास ठेविले. येसोवा आज्याचे म्ह[ण]णे मुलाचे मातुळ कृष्णाजी रुद्र पेठ्ये ममतेचे आहेत. त्याजला जवळ आणून ठेवावे. तात्यासाहेबाचे मानस नव्हते. आग्रहाने पेठ्ये यास भोगुराहून आणून ठवलें. कनिष्ट चिरंजीव मल्हारराव बराबर घेऊन कुटुंबसुद्धा महायात्रेस गेले. माहायात्रा करून शके १७०७ चे साली परत येताना इकडून मैनाबाई माहायात्रे चे उद्देशे बंधू हरी आपाजी दर्वे यास बराबर घेऊन निघाले. उभयताची भेट मार्गांत जाली. बोलणी चालणी फार जाली. तात्यासाहेब घराकडे आले. बाई पुढें गेली. माघस्नानास प्रयागास गेली. तेथें प्रातःकाळी त्रिवेणी स्नानास गेली. ते दाटीमुळें निधन पावली! या प्रो पांढुरली संस्थान पैकी कोणी राहिले नाहीं. नंतर शके १७०८ चे साली सरसुभे मांडवगणे याचे कारभारी वासुदेव रामकृष्ण कुलकर्णी नाशिककर याजकडे वसूल गंगथडी पैा देऊ नये असा पेशवे सरकारचे ताकीद पत्र जाले.

पिंपळसचा खटला लुटून घरी आलीयावर पांढुरलीस प्रकर्ण कांहीं राहिले नाहीं. आतां गोपाळराव याचे नांवे बाबती सर देशमुखी गंगथडीची सनद आपले हते करून घ्यावी; असा विचार करून शके १७०९

चे साली पुणीयास गेले. सरकारात भेट घेऊन गोपाळराव याचे नांवे सनद करून देण्याची विनंति केली. ती सरकारानीं मान्य करून पहिले नेमणुकी प्रो नेमणूकें कायम करून गोपाळराव भिकाजी याचे नांवे गंगथडीची सनद करून दिल्ही. पन्नास बैलाचे दस्तखही त्याचे नांवे घेतलें. सरंजाम सावलदबारे, रांजणगांव सर्व त्याचे नांवे बंदोबस्त केला. पुणें येथील बागाची जागा वाडा नाहीं म्हणोन सरकारातून मागून घेतली. तेथें इमारत बांधलेली नव्हती. ती राहण्यापुरती पांच खण रुंदीची इमारत बांधून पुणीयाहून घरास येऊन श्री शिवरात्रीचा उत्साह जाला. नंतर मल्हारराव याचे लग्न माधवराव विनायक टकले गंगथडीचे मजमदार याची कन्या वधू लग्न करून नांव सिऊबाई ठेवून घरास आले.

पुणे मुकामी बंदोबस्त करून घेतला. ते समयीं सरकारांत कलमबंदीची यादी देऊन त्याजवर सरकारचे निकालाचे शेरे उगवून घेऊन नकल घेतली. त्यांतील मार—

१ पुरुषोत्तम गोविंद आज्ञेत राहून वर्तणूक करीत नाहींत त्या कलमास कारकून ठेवून वहिवाट करण

१ रामचंद्रराव कोठुरकर गंगथडीचा वारसा करून सरकारांत विनंति करितात. त्याजवर शेरा. तुमचे घरगुती वाटणीचे कागद आणून चौकशी करितां त्याचा वारसा या मामलतीत पुरत नाहीं.

१ पिंपळे निलख हा गांव सरकारांतून इनाम आहे. त्याची वहिवाट वडील पणें आम्ही करून निम्मे हिस्सा कोठुरकर यास देऊन त्याजवर शेरा. तुम्ही वहिवाट करून कोठुरकर यास हिस्सा द्यावा.

१ धोंडो रामचंद्र व लक्ष्मणराव आपाजी बरवे कोठुरकर याजकडे वाटणीसंबंधी व कर्जाऊ ऐवज येणे तो सुरळीत देत नाहीं. ते देविला पाहिजे. याजवर शेरा. मनास आणून वाजवी उलगडा केला जाईल.

येणेंप्रमाणें शेरे मारून घेऊन यादीची नकल बराबर आणिली. चैत्रमासी त्रिंबकेश्वरी दर्शनास गेले. तिकडून येतानीं पायास अजार जाला. कारंज्या प्रो नेहेमीं धार चालली. तसेच पालखीत घरीं आले. तेच दुखणें वाढून शके १७१० ज्येष्ट शु॥ ४चे दिवशी देवआज्ञा डुबेरें मुकामीच जाली. सर्व कुटुंब जवळ होते. त्याच सुमारे पुरुषोत्तम गोविंद येवलेकर हक जाले. तात्यासाहेबाचे ज्येष्ट पुत्र गोपाळराव फार सुरूप व गर्भश्रीमंती चालीचा होता. त्याचे नांवे तात्यासाहेबांनीं आपले देखतच सरकारी सनद पहिले नेमणूक प्रो करून घेऊन बंदोबस्त केला होता. कामाची निर्मळता होती व देणेही विशेष नवते.

शके १७०९ चे साली गंगथडीचे परिमार्जन जाले. पुढें तात्यासाहेब निधन पावले. ( हिशे प्रमाणे ) सिवरात्रीचा उत्साह पेशजी कोठुऱ्यास होत होता त्या प्रो कोठुऱ्यास व्हावा. येविसी पेशवे सरकारांत पत्रें लिहून दरबारांत मजकूर बोलूं लागले. त्याचा मजकूर सरकारांत समजाविला कीं, कृष्णराव विभक्त जाल्यापासून आज पसतीस वर्षे उत्साह पांढरलीस होतो. त्याचा सर्व तपास पाहून पेशवे सरकारांनीं रामचंद्रराव गणेश बरवे कोठुरकर यास निषेध करून गोपाळराव भिकाजी याचे नांवे पत्रोत्तर दिल्हे कीं, रामचंद्रराव याचा वारसा नाहीं. उत्साह चालत आल्याप्रमाणे करावा असे.

शके १७११ चे सिंहस्तास श्रीमंत धाकटे माधवराव साहेब यांची स्वारी नाशिकास आली होती. गोपाळराव नासिकास सरकारचे भेटीस गेले होते. डुबेऱ्यास येण्याविषयीं श्रीमंतास विनंति केली. नानाफडणवीस यांणीं उत्तर केले कीं, श्रीमंत यात्रेस आले आहेत, या स्वारीस येणे होणार नाहीं.

शके १७१२चे साली गोपाळराव यास पुत्र जाला होता. त्याजला सुमारें चार वर्षाचे वयांत देवआज्ञा जाली. त्याच सालीं त्याजला कन्या जाली. तिचे नांव वेणुबाई ठेविले. गोपाळराव यांणीं शरीराची मेहनत चांगली ठेवावी हा मनोदय. झोंबी खेळावी. कांहीं वेताळ मारुती यांची सेवा

करावी. बागांत लहानसें देवालय बांधिलें. मोतीबाग म्हणोन येक बागाची नवीन तयारी करण्यास आरंभ केला. कोणी पाहिलवाण आला असतां, त्यासी झोंबी खेळावी अशी योग्यता शरीरांत व हिम्मतही तशीच; शरीर संपत्ती विसी कोणाची निर्भत्सना फार करून करावी. काम काजा-विसी कारकून कांहीं करोत. त्यांत पहाणे कमी. कृष्णाजी रुद्र घरीं आणून ठेविले. त्यांणीं पांढुरलीस राहावे. तिनशे रुा नेमणूक; हाताखालीं दोन कारकून घोडी मागसें कुणबिणी कोठोळा गुजराती स्वयपाकास, येकूण सरासरी पांढरली संस्थानीचा अजमासें हजार रुा याचा खर्च, पाटल-कीची जमा तीनशे रुा, यजमानाचे मातुळ या कारणानें येसोबा आज्यास बोलावयाचे नाहीं. मामलयाचा बंदोबस्त आगोदरच जाला होता. लग्न मुहूर्त यात्रा मात्रा कांहीं येक दरबार खर्च सुा खर्च नाहीं. परंतु मालकाचे चीत्त पाहण्याचे दौलतीकडे कमी; सर्व कारकूनाधीन; तात्यासाहेब समाप्त झाल्यावर गोपाळराव साडेतीन वर्षे होते. देण्याचा अजमास दहा हजार रुा याचा. तितकें देखील फिटले नाहीं असा प्रकार. शेवटीं शके १७१३ मार्गशीर्ष वा ९ दिवशीं कोणी मूठ मारल्याचा प्रयोग करून मूठ टाकिली असा भास होऊन देवआज्ञा जाली !

शके १७१६ चे भाद्रपद मासी मल्हारराव भाऊसाहेब यांणीं डुबेरें मुकामी विचार केला कीं डुबेरें, गंगथडी वगैरे सर्व बंडाची ठाणीं; श्रीमंत पुणीयासी आले आहेत, तेव्हां आपणही पुणीयास जावे, असें येवलेकर यास पत्र लिहून त्याजला पुणीयास बोलाविले. आपण भाद्रपदमासी डुबेरें येथून खटले सुा पुणयिास कोंकण मार्गें निघोन गेले. बरोबर खटले खुद्द, जिजिबाई, स्त्रीया दोघी, गुजराथी दयाराम, कारकून पो येसोबा-आन्याचे चिरंजीव विठ्ठल येशवंत; उपाध्ये केळकर जनार्दन भट; त्रिंबक रामचंद्र वैद्य; घोडी मोठी १ व तटे मध्यम २ सिबंदी ६ माणसे असामी साहा; असे निघोन कल्याणास जाऊ[न] पुढें दुखणी फार जाल्या-मुळें मौजे कोल्हार नदी उल्हासचे कांठीं. तेथें राहून फाल्गुनमासी पुणीयास गेले. खास वाडा बाजी दिनकर राहात होते. खटल्यासुा

तेथें राहावयास जागा नाहीं. सबब चिपलोणकर याचे वाड्यांत राहिले. श्रीमंतांची भेट जाली. तालुके पटा सदाशिव भास्कर उगले वाकानिस याजकडे आमलत त्यांणीं वसई मुकामीहून दाहा गांव नवे किल्याकडे सनद आणिली होती. त्यात डुबेरें होतें. त्याच्या सनदा होऊन शके १७२७ चे सालीं कार्तीकमासी डुबेरें येथें ठाणें दाखल जाले.

शके १७२६ चे साली आश्विनमासी विंचूरकर पुणीयाहून येऊन गंगथडी, खानदेश, बागलाण या मुलखात बंडाची ठाणीं होती; [तीं] उठऊन सरकारची ठाणीं बसाविली. दरोबस्त प्रां विंचूरकर यांचे स्वारीकडे वहिवाटीस होता. ते गंगथडी येथील सनदा शके सत्तावीसचे साली जाल्या. त्या सनदा बराबरच येवलेकर दत्त मूल घेतले दोन पो विठलराव याजला गोविंद विठ्ठल दत्त पुत्र; त्याचे नांवे सनद सखारामपंत कारकून येवलेकर यांणीं घेतली. खंडेराव रास्ते यांचे नांवे सोडचिठ्ठी; मात्र आमल विंचूरकर यांजकडे होता. त्याजपासून गंगथडीची सोडचिठ्ठी घेऊन, येवल्यास आमल चालू जाला. सात माहालच्या जकातीचे आमल बसेल. नंतर कार्तिक शुा ५ पुणीयाहून शुा ११ स डुबेरें येथें दाखल जाले. शके १७२७ माघमासी श्रीत्रिंबकेश्वरची अर्च्या करावयास श्रीमंत बाबासाहेबांची स्वारी आली. विंचूरकर, बाळशास्त्री टोकेंकर, करवे उपाधे, दरबारचे मंडळ बराबर होते, भाऊसाहेब त्रिंबकास गेले होते, श्रीमंताची भेट जाली, बाळशास्त्रीबावाची भाऊसाहेबाची भेट जाली, पांढुरलीस कुंडमंडप होता, तेथें दक्षण द्वाराकडे ब्राह्मण कोण आहेत, असें शास्त्रीबोवांनीं विच्यारले, त्याजला उत्तर केले, आमचे येथें उत्साहाचा कुंडमंडप शंभर वर्षे होतो, हल्ली पांढुरली मुकामी उत्साह होत आहे. तेथें दक्षणद्वारास चितपावन आपस्तंभ प्रहिलेपासून आहेत, येजुर्वेदी माध्यंदीन नाहींत. हे ऐकून शास्त्रीबोवांनीं आर्चेच्या प्रकरणांत हे उदाहरण श्रीमंतास समजाविले, बरवे यांचे सिवरात्री अनुष्ठानाचें कुंडमंडपास शंभर वर्षांत यजुर्वेदी याचा प्रवाह नाहीं. भाऊसाहेब निरोप घेऊन उत्साहास पांढुरलीस आले.

उत्पन्न माहालचे थोडें. खर्च सारखा याजमुळें शके २६ चे साली कोंकणांतून पुणीयास जाऊन सत्ताविसाचे [ साली ] डुबेऱ्यास येई पावेतों चौदा महिन्यांत स्वारी खर्च पंधरासे रुा जाला. तितके शिलकी दागिने मोडून खर्च जाला. पुढेंही दरसाल खर्चाचे कमतीस पांचसातसे रुा याचे दागिनेच मोडून खर्च होत असे. मागील देण्याचा पेच हजारो रुपयाचा. त्याचे तगादे सावकाराचे नेहेमीं आसोन नित्य खर्चाची अडचण. इतके असोन हिमतीत कमी नाहीं. संतान नाहीं या काळजीत होते, तो कनिष्ट स्त्री रमाबाई यास शके १७३० चे मार्गशीर्ष वा। ९ स पुत्र जाला. त्याचे नांव गोपाळराव ठेविले. फार दिवसानीं पुत्र जाल्याचे उत्साह करून, दोनशे रुा बारशाचा खर्च जाला. परंतु मुलास हसली बिंदली करावयाची देखील सोन्याची घरी अडचण ! असे अडचणीचे दिवस. खर्चाचे कमतीचेमुळें व देण्याचे पेचामुळें भाऊसाहेब यांणीं फार [हाल] काढिले. ते त्याचे हिमतीनेच निघाले. गोपाळराव याची स्त्री लक्ष्मीबाई यांणीं शके १७२३ चे साली विभक्त राहावे असी इच्छा धरून दरसाल पांचसे नेमणूक करून घेऊन त्या नेमणूकीस रांजणगांव लावून घेऊन शहर अवरंगाबाद सातारयास राहण्यास गेली. तिकडेही बंडाचा उपद्रव होऊन रांजणगांवचा पैसा बाईस उत्पन्न न होय; कन्या वेणूबाई ते ही बराबर; खर्चास नाहीं; तिचा भ्रतार सहा महिन्यांनीं नष्ट होऊन वैधव्य आले. तेव्हां कन्येसुद्धां गोपाळराव याचा जन्म डुबेऱ्यास जाला तेच दिवशीं तेथें दाखल जाली. ती मरण पावेतो यांचे जवळच राहिली. ती सातारकर दीा याची कन्या; फार योग्य; दान धर्माकडे चित्त; नित्य प्रातःस्नान मरण पावेतो कधीं राहिलें नाहीं. प्रहर दिवस पावेतो देव देव असी फारच सुशील होती. पुढें दरसाल पेंढारी याचा दंगा सिबंदी ज्याजती जवळ ठेवणे आली. पो पाटोदे येथील आंबीकर मोकासे याजकडून बाबतीचे आमला बा। साडे पांच हजार रुा मक्ता येणे. तो मोकासा त्याचा जप्त होऊन पेशवे सरकारचे बेहेड्याची दफ्तराकडील कारकून देवधर उर्फ ढमढेरे याची कन्या श्रीमंतांनीं केली.

सरकारच सोयरे जाले. त्याजला आंबीकर याचा मोकासा जप्त करून रामचंद्र आण्णा पुत्र आबा व चुलत बंधु रावोबा दादा याजला सरंजाम दिल्हा. त्यांजकडून बाबतीचा पैसा बिलकुल आला नाहीं. प्रपंच उत्साह सुा खर्च व वर्षासनकरी, दरकदार वगैरे याचा ऐवज देणे. पुण्याचा स्वारी खर्च मागील सावकाराचे मनस्वी [ देणे ] असोन नव देण्याचा पेच फार आला. पेंढरी याचे दंग्यात घरचे राहिलेले दागिने भिकंभट केळकर उपाध्ये याजवळ ठेविले होते. ते त्याणीं त्याचे देण्यामुळें परत दिल्हे नाहीं.

पुढें मांडवगणे याचें सर सुभ्याचे पेट्यातून गंगथडी प्रकर्ण काढून हुजूर वेगळा आजमास ठराव होऊन आजमास जाला. सर सुभ्याचा दाखला कांहीं राहिला नाहीं. मौजे पिंपळस येथील पाटिलकीची वाटणी निम्मे निम्म डुबेरें व कोठुरें गांवचे लावणी संचणीचा उपयोग एका पासूनही होईना. गांव होळकर देशमुख याचे सादन कीं, निमगांवातील पहिले पाा सुरवडे, आहीर, मच्छागर, त्रिवर्ग कुणबीपणानें गांवात सेत वाहून पन्नास वर्षे होते. आडेपार्डे शेलावाटी बरवे यांणीं घ्यावे. हा विषाद त्याचे मनांत. नवे कुलकर्णी खरीददार टाकळी कोटमगांवकर येशवंत गुंडाजी हे ही मोठे; कांहीं दिवस आपाजी रामचंद्र पिंपळसेस राहात होते. ते वेळेस येशवंत गुंडाजी त्याजवळ चाकरीस असतां, भिकाजी बाबूराव यांणीं कुलकर्णाचे कागदावर साक्ष केली नाहीं. वडीलपणा याचा साक्ष जाली पाहिजे. सबब आपाराव पांढुरलीस येऊ लागले. त्याजबराबर कुलकर्णी कागद घेऊन येऊन आपाराव याचे हातून येशवंतराव बाबाची साक्ष तात्यासाहेबां[स] न समजाविता करून घेतली. त्रिवर्ग कुणबी यास कुलकर्णी आनकूल कजे कटकटी उपस्थित केल्या. महेश्वरास आहिल्याबाई पर्यंत गेले. तेथून परत चांदवडास आले. जिज्याबा भाऊ देशपांडे याचा व तात्यासाहेबाचा घरोबा स्नेह विशेष; त्याचे पत्र याजला येऊन तात्यासाहेब चांदवडास ते देशपांडे याचे घरीच राहिले. त्याचे म्ह[ण]णें याजला दरोबस्त वतना पैा तीन चाहूर पाा द्यावी. तीन चाहूर जमीनीचे अडे

व शेलावाटी इतके आम्हास द्यावे. हे तेथें जाऊन पोहोचले. निरोप घेतल्याशिवाय निवता नये. कोटूरकर घरभाऊ याची मदत कांहींच नाहीं तेव्हां तीन चाहूर वतन देण्याचें कबूल करून तिराईत गांवचे कुलकर्ण्यांचे हातची याद्दी सात कलमाची त्रिवर्गास करून देऊन सही केली. त्याजवर कुलकर्णी याचे हातचे कांहींच लिहिणे नाहीं. नंतर देशपांडे यांणीं तोड काढून येशवंत गुंडाजी याजकडून सही जालीयावर एक कलम लिहविले कीं, आहीर, मच्छागार, सुरवडे, असें पहिले लिहिण्याचा सिरस्ता होता. हल्ली सुरवड, आहीर, मच्छागर असे लिहिण्याचा ठराव जाला. असे हे कलम लिहून दस्तुर केला. पुढें खरीदखत करून द्यावे. त्याची गरज न ठेविता तीन चाहूर पाटिलकीचा ठाणे महजर त्रिवर्गास चांदवड मुकामी जमीनदार यांणीं करून घेतला.

कृष्णराव पांढुरलीस; भिकोबातात्या डुबेऱ्यास; विभक्तपणानें दोहो ठिकाणीं जाले; उभयतांची सापत्न मातोश्री वाराणशीबाई त्याजला जिजीबाई म्हणतात. त्याचे खुर्शास येईल तेथें उभयता जवळ रहात असावे. परंतु खर्चाची नेमणूक सालिना २०० रुो करून दिल्हे. त्यांनीं डुबेरें मुकामीं श्री मारुती जवळ वेगळे घर बांधून राहिली. एक बारव गांवचे उपयोगी असी देवालयाजवळ बांधिली. वृद्धपणा पावेतो होती. शेवट ओघाचा काळ उज्याडल्यावर मल्हारराव भाऊसाहेब पुणीयास गेले त्याजबराबर गेली होती. ती शके १७२७ आश्वीन शु॥ १०चे दिवशी रात्री निधन पावली. श्रीमंत बाजीरावसाहेब यांची भेट घेऊन आली यावर मागील रात्री शके १६९१ चे साली शहर पुणें येथें खासगत इमारत बांधावयाकरितां जुना बाग सरकारात वसाहतीकडे घेतला. त्या पैा जागा सरकारांतून मागून घेतली. त्या पैा गंगाधर भट चिपळोणकर याची व मोरोबादादा फडणीस याचे जुने घराची हमशाई नेहेमीं घरा लगत. दरवक्त कुरकुर होऊं लागल्यामुळें सिन्नरास राहावयास यावें; या हेतूनें दिनकर धोंडदेव यांणीं आपले वाड्याचे उत्तरेस नवा वाडा बांधिला परंतु सिन्नरास न येता त्याची सोई पुण्यांत राहण्याची याजमुळें भिकोबा तात्या याजपासून

भीड घालून सरासरी यांचे जागे पैा आजमासे चोथाई जागा मागून घेतली. सारखी आगवाडा पिछवाडा पावेतो घेतली. यांणीं स्नेह व आप्तता दोन्ही होती. दिनकरपंत दादा चा सिन्नर मुकामी स्नेह फारच होता. यास्तव जागा दिल्ही. शके १७१३ चे गोपाळराव यास देवआज्ञा जाली यावर त्याचे कनिष्ट बंधू मल्हाराव वय वर्षे १४ चे. बाबूराव याचे वशांत इतका ुरुष मात्र राहिला. त्याचे नांवे प्रां गंगथडीचा बंदो-वस्त पहिले नेनणूके प्रो सरकारांनीं करून दिल्हा. मल्हारराव याची स्त्री टकले याची कन्या तिचे आज्ञान वय सबब दुसरी स्त्री रामचंद्र दादाजी वैद्य पांढुरलीकर याची कन्या वधू योजून फाल्गुन मासी सिन्नर मुकामी लग्न होऊन नांव रमाबाई ठेविले. शके १७१५ ता १६ दोन साले जसे तसे गुदरली. परंतु सावकाराचे देणे वाढत चालले. कासका-जाची ( ? ) शके १७१७ साली गोपाळराव याची कन्या वेणूबाई याचे लग्न करून नारो कृष्ण दर्वे नाशिककर खानदेश बऱ्हाणपूरचे सरसुभे याचे मुलास दिल्ही. दौलतीचे खटले सर्व कारकूनाचे मुखत्यारीवर गोपा-ळराव याचे कारकीर्दीत होते. त्या प्रोच शके १७१७ चे साली श्रीमंत धाकटे रावसाहेब यास देव आज्ञा जाली. यावर बाजीराव साहेब पुणी-याचे गादीवर कायम जाले. सिंदेशाई माजली. मौजे डुबेरें या गांवचे पश्चिमेस मौजे सोनारी पो आकोले येथील सिवेचा कजीया मोगलाईपासून फार दिवसाचा खोटा तंटा काढिल्यामुळें सोनारकर याचा बस कोटीही या साल पावेतो बसला नाहीं. ते शके १७१८ म्हणजे सन १२०६ चे साली पुणें येथें दौलतराव सिंदे याजवळ अर्ज दिल्हा कीं, या गांवची पाटिलकी आपली आहे. सिंदे याची आहे. डुबेरकर सिवेचा तंटा करितात.

याचा बंदोबस्त साहेबी केला पाहिजे. नंतर शिंदे याजकडून गावास मसाला रुो हजार व कंबर खुलाई रुो पांचसे या प्रो स्वार ठेवून पंधरासे रुो घेतले. नंतर स्वाराचा खर्च भोवरगांव जमा करून सिंदे याच्या जबर-दस्तीनें सिवेस रूती घालून निवाड पत्र करून घेतले. पेशवेसर-

कारात त्या गोष्टीची दाद नाहीं. याजमुळें तो खर्च आजमासे तीन हजार रुा जाले. ते घरचे दागिने मोडून खर्च जाला. तो उलगडा शके १७१९ चे साली होऊन शके १७२० चे सालापासून सिंदे होळकर याचे फौजेचा बंडाचा आरंभ. अगोदर दोन वर्षे सिंदे याचे कंपू पागा वगैरे येऊन बंडाचा आरंभ जालाच होता. पु[ढें] शके १७२६ पर्यंत प्रांतात दंगा सारखा. मुलुख खराब, त्यांत भिलाचा दंगा मोठा याजमुळें मुलुख फार खराब जाला. मल्हारराव खटले सुा डुबेरें सोडून शके १७२२ चे सालीं सिन्नरास. शक १७२३ चे साली पांढुरली. शके १७२४ साली अव्वल त्रिंबक व नाशिक. दिपवालीस डुबेऱ्यास येऊन पुढे डोंगरांत पळून जाऊन शके १७२५ चे साल मौजे घोडवार व मौजे खडवाडी पाा आकोळे येथेंच सरसाल गुदारा करून शके १७२६ चे आधीक चैत्रमासी बंडाचे ठाणे डुबेऱ्यास होतेंच; परंतु मल्हारराव खटले सुा डुबेऱ्यास येऊन कृष्णाजी नारायण कारकून यास पेशजी घर बांधून दिल्हे होते, त्या घरांत राहिले. पदरचे कारकूनापैा येसाजी विश्वनाथ वाळुजकर शके १७२५ पौष्य शुा ५ मौजे आड येथें मृत्यू पावले. कृष्णाजी रुद्र पेठ्ये मौजे आवढेवाडी पाा नाशिक यथें माघ शुा ८ स मृत्यू पावले मातुश्री येमुनाबाई कार्तिक व॥ ११ मौजे आड मुकामी देवआज्ञा जाली. उत्तरकार्य सख [सर्व] तीर्थास जाऊन केले. ते समयीं मल्हारराव याचे वय सवीस वर्षांचे होते. जवळ कांहीं विशेष अर्थ राहिला नाहीं. परंतु त्या पुरुषाची हिम्मत फार मोठी. आभ्र कडाडले तरी निश्चय धरून राहणार. शके १७२६ चे साली पर्ज्यन्य काळी एक शेराची धारण. कोठे रुा याचा वक्तशीर आछेर याप्रो दिवस असतां, कोणी पाहुणा ब्राह्मण, मराठे फार येत त्याचा कंटाळा नाहीं. त्या समयास हा आपल्यावर वक्त आहे. कोणी मनुष्य जवळ राहिले नाहीं. तेव्हां बुध्धीस विपर्यास होऊन सर्व घरचे पाहणें जातीनिशी अले. परिणामही बुध्धीस कळून आला. परंतु पदरचे माणूस ते खुशीनें नांदेल तर आपण जा बोलावयाचे नाहीं. गुन्हा जाला तरी ताकिद करावी इतकेंच. शके १७२४ चे साली सिंदे होळकर

याची पुणे मुकामी लढाई होऊन श्रीमंत निघोन वसईस गेले. इंग्रज सरकाराशीं तह करून शके १७२५ साली पुणीयासी गादीवर आले. परंतु या प्रांतात बंडाची ठाणीं होतीच. पुणे मुकामी मात्र इकडील प्रांत सदाशिव माणकेश्वर, खंडेराव रास्ते, श्रीपतराव थेंडदेव दर्वे याजला मुलकाच्या सनदा मात्र दिल्या. परंतु ठाणे या प्रांतात कोणाचेही नाहीं.

शके १७३७ चे चैत्र शु॥ ५ गोपाळराव याचा व्रतबंध सोळाशे रु॥ खर्च लागला. शके १७३८ चे सालीं लक्ष्मीबाई कन्ये सु॥ माहायात्रेस गेली. त्याजला पांच साहासे रु॥ खर्चास काशीची हुंडी पाठविली. शके १७३९ चे कार्तिक मासी पुणें मुकामी पेशवे सरकार व इंग्रज बहादूर याची लढाई होऊन बाजीरावसाहेब राज्य टाकून निघोन उत्तर दिशेस कुटुंबा सु॥ गेले. ते अंतर वेदीत भागिर्थी तीरी ब्रह्मावर्त क्षेत्रीं जाऊन राहिले. पुणे येथील सर्व राज्याचा बंदोबस्त इंग्रजांनीं करून पेशवे सरकारचे पदरची मंडळीस भेटीस यावे असा जाहिरनामा प्रगट जाल्यावरून मल्हारराव भाऊसाहेब पुणीयास जाऊन भेटले. मागाहून गोविंद विठ्ठल येवलेकर हेही भेटले. हे शके १७४० चे मार्गशीर्षमासी. पुढें शिवरात्री उत्साह आला. त्याचे बंदोबस्ताविसी मार सरकारास जाहीर केला. आमचा नेमणूकीचा मामला पाटोदे खा॥ सरंजामी सावलदवारे, राजणगांवकर वगैरे हे सर्व आमची सारखी ज्यारी वहिवाट आसोन आमचे हातून सरकारांत आले आहेत. मागील कागदपत्र दंग्यामुळें कांहीं राहिले नाहीं. येक येशवंतराव कृष्ण याचे नांवाची येकूणीस हजार साहाशे रु॥ याची बाळाजी महादेव मांडवगणे सर सुभेदार याचे नांवाची सनद घरचे गलथी कागदांत सांपडली. ती नेऊन बडे साहेबास दाखविली. बडेसाहेब म्हणजे आलपिस्तन यांणीं पाहून पाटोदे हा माहाल गंगेचा अर्ध मुलकाची करून उत्तर तीर खानदेश चालत होते. त्याजकडे जाण्यास सांगितले. तिकडे कारकून जाऊन तिकडील ब्रीग साहेबाची भेट घेऊन त्यांणीं उत्साहाचे साहा हजार पाटोदे येथील मामलतदार यांजकडून साल दरसाल देत जाणे, अशी सनद करून दिल्ही. त्याप्रो

त्या सालचे रुो रोख येऊन उत्साह जाला. दुसरे साल शके १७४१ चे साली पाटोदे माहाल खानदेशांतून निघोन नगराकडे आला. नगरचे कलेक्टर पाटिंजरसाहेब; पुणे मुकामी हुकूम जाला कीं नगराकडे जावे. वडेसाहेब गोरनर होऊन मुंबईस गेले. पुणे मुकामी चापलीनसाहेब मुख्य आधिकारी दुय्यम कलाकटरसाहेब त्याजवळ दप्तर पेशवे. त्यातील माहितगार कारकून गणेश कृष्ण पेंडसे होते. नगरास जाऊन साहेबाची भेट घेऊन तसेच पुणीयास गेले. सर्व लोकाचे बंदोबस्त जाले. याचा नेमणूक पहिले प्रो जाला नाहीं. जातीचे खर्चास तीन हजार रुो व येवलेकर यास बारासे रुो अशी नेमणूक होऊन पुणीयाची चकती नगरास आली. **सावलदबारे** रांजणगांव येथील सोडचिठी व्हावी. परंतु सत्तावीस असामीचा मुलुक मोगलाचे लगती ची शिराकती होता. तो इंग्रजांनीं निजाम मोगल याजला दिल्हा. त्या सत्तावीस आसामी पैा कोणाकोणास नक्त नेमणूका करून दिल्या. कांहीं देणें राहिल्या. त्याजला हुकूम जाला कीं, तुम्हास सरंजामा एवजी नक्त नेमणूकीची तजवीज होईल.

म्हणोन मोघम राहिले. शिवरात्री उत्साहाचा ऐवज आला नाहीं. सबब सावकाराचा मुबदला घे[ऊन] शके १७४१ चा उत्साह जाला. शके १७४१ चे वैशाख मासी गोपाळराव याचे लग्न रामचंद्र जोशी बदलापूरकर **शिळापुरचे** जाहागीर[दार] याची कन्या वधू हे लग्न नाशिक मुकामी जाले. नेमणूक कमी जाली. खर्च सारखा. त्या संधीत भिकंभट केळकर याजवळ दागीने होते. ते येथें डुबेऱ्यास मजकूर न समजाविता आपले मुखत्यारीनें फरोक्त करून आपले देण्या पैा रुो आदा करून घेतले. पुढें शके १७४२ चे साली शिवरात्री उत्साहाचा ऐवज दुसालाचा दरसाल तीन हजार रुो प्रो साहा हजार नेमणूक होऊन पुणे मुकामी चार हजार रुो दरसाल देत जावे, म्हणोन चकती जाली आसोन नगर मुकामी पाटिंजर साहेबानीं तीन हजार रुो दरसाल प्रो साहा हजार रुो दिल्हे. सावलदबारे, रांजणगांव येथील बंदोबस्त करून घ्यावयाचा परंतु डुबेरे मुकामी मागील देणे व नवीन देणें. प्रापंच या

खर्चीचे. देण्याचे गवगव्यामुळें कोठें जाण्यायेण्यास जाले नाहीं. त्या अवसरात वडे लोकांचा पट पुणे मुकामी तयार; त्यांत मल्हारराव भाऊसाहेब याचे नांव लागले नाहीं. सबब मुंबईस जाऊन गौरनर साहेबाची भेट घेऊन पटाचे तिसरे प्रतीत नांव दाखल यज्यंट साहेबाकडे लिहून गेले. सरंजाम गेल्याचे मुा घेणे. हे काम मागेच पडले. लक्ष्मीबाई वहिनी माहायात्रेहून आली. त्याजला यात्रेसंबंधी देणें जाले. त्या देण्यास हजार रुा देऊन सालसंबंधी शंभर, वस्त्र व दान धर्मास द्यावयाचा पेशजी ठराव केला होता. त्या अन्वये पावत गेले. कन्या वेणूबाई तिचे सासरी कोणी नाहीं. सबब कधी नाशिक, कधी डुबेरें अशी राहत गेली. शहर औरंगाबाद येथील हवेली त्यावेळचे कारकून टकले कीं दाहा हाजाराचा सरंजाम मोगलाईकडून बाबूराव यास दिल्हा. तो त्याणी टकले यास दिल्हा. पैा कांहीं चालत असतां त्याचे नातू अमृतराव लक्ष्मण टकले यास कुबुध्धी उत्पन्न होऊन वाड्यापैकीं तिसरा हिसा इमारत फरोक्त केली. येविसी जगन्नाथ दीा सातारकर याचे पत्र आल्यावरून तेथें कारकून पाठविला. ती कटकट दोन वर्षे पुरवली. शेवटीं वाडा बरवे याचा खरा आहे आसा निवाडा. वाडा मोड तोड जालीच होती. राहिला वाडा तोहि फरोक्त करून दिल्हा. आवरंगाबादेकडे कांहीं नांव घेण्यास राहिले नाहीं. हजारो रुा खर्च करून बाबूराव यांणीं इमारत बांधली. त्याचे मातीचा व पाण्याचा पैका देखील उत्पन्न जाला नाहीं. याप्रां पदरचे कारकुनाची कृतघ्नता घडून आली. कागदपत्र शहरास होते. तेही गेले. कांहीं सांपडले नाहीं. कांहीं पांढुरली येथील वृत्ती संमंधी एक दोन नकला सापडल्या तितक्याच परत आल्या.

शके १७४६ चे साली कन्या अनुबाईचे लग्न केलें. पुरुषोत्तम रामकृष्ण बापट कल्याणकर यासी वर निश्चय करून डुबेरें मुकामी लग्न झाले, ते खरपडाचे साल सन १२३४ चे महागाई विशेष. लग्नास खर्च हुंड्या मुा फार जाला. शके १७४८ चे साली गोपाळराव यास कार्तिक वाा ९ पुत्र होऊन ती स्त्री प्रसूत. वायू होऊन मार्गशीर्ष शुा १ मृत्यू

पावली. मुलगा पावणे दोन वर्षांचा होऊन तोही निधन पावला. शके १७४८ जे फाल्गुनमासी धाकटी कन्या येसूबाई याचे लग्न वर कृष्णराव अनंत जोशी कुलगांवकर यांस दिल्ही. ते लग्न डुबेरें मुकामीच जाले. गोपाळराव याचे दुसरे लग्न शके १७४९ चे वैशाखमासी अमृतराव त्रिंबक पेठ्ये नाशिककर याची कन्या वधू वय वर्षें पाचाची होती. परंतु भाऊसाहेब याचा आग्रह माझे देखत मुलाचे लग्न करावें. या कारणानें लहान वयाची परंतु कुळवान चांगली जाणून लग्न केले. नंतर भाऊसाहेब याचे वय म्हणजे येकावन वर्षांचे होते. असे असून शरिरी दुखणे. क्षीणता, दुखणें फार होत चालले. दिवसेंदिवस चैन नाहीं. मौजे पिंपळस येथील पाटिलकी कोटूरकर याची निम्ये व डुबरेकर निम्ये. कोठूरकर यास फार जवळ आसोन गांवचे वहिवाट करून वतन चाळवावे. हे कोठुरकराच्यानें न होय. सबब पेशजी शके १७४० चे मौजे मारची पाटिलकीची वहिवाट भिकंभट केळकर याचे पाहणे राहून गुमास्ते कोडाजीपूरकर ठेवून काम डुबेरें निसबतीनें चालले. पांढुरलीहून लाकडे नेऊन गढींत नवी इमारत घर बांधले. राहण्याकरितां जुनी इमारत बंडाचे वेळेस गांवकरी यांणीं मोडून फरोक्त केली होती. सबब नवी बांधली. लगतचे मळयाची विहिर; पूर्वपार आपले नितवतीचा मळा सबब विहिर खराब तेही बांधिली. त्याजवर कोठूरकर विठ्ठलराव गणेश यांणीं कोणास न कळता चोरून निम्ये पो त्याचा निम हिसा तो विठ्ठलराव यांणीं गाहण तक्षीमदार याजकडे ठेविला. असे ऐकल्यावरून पुढें बळवंतराव रघुनाथ या इसमाचा निम्मेत तिसरा हिस्सा व लक्ष्मणराव आपाजी याचा निम्मेत साहावा हिसा, असे दोन इसम याजला डुबेरें मुकामीहून ऐवज देऊन गाहत [ गाहाण ] खत करून घेतले. यानंतर रामराव आपाजी याचा सहावा हिसा त्यांणी भाऊसाहेबाचे नांवचा रोखा लिहून भिकंभट याचे बोलणें होऊन तो रोखा डुबेऱ्यास आला. येथून न गेल्यामुळें तोच रोखा तक्षीमदार याजला देऊन त्यांणीं त्या रोख्याचे रुो कुणबी पाा पासून घेतले. कोठूरकर याचे निम्येचे इसमा पोा वामनराव

व बळवंतराव रामचंद्र याचे इसम मात्र राहिले. बाकी गहाण ठेवून अवघे इसमे खलास जाली वतना पासून.

शके १७४९ चे पौष्यमासी गंगास्नानास म्हणोन पिंपळसेस भाऊसाहेब गेले होते. त्या मुकामी गणेश येशवंत कुलकर्णी मौजे मार याचे बोलणे पडले कीं, कुणवी तक्षीमदार बडांत फार. वतना करितां खराब जाले आहेत. वतन बंडांत विकले. ते सोडविणे आहे. समाईक सोडवू म्हणोन शके १७३२ चे साली कागद लिहून दिल्हा होता. परंतु लावणीचे काम याचे माथ्यावर आहे. याजला चौथाई वतन कायम करून गावचे तक्षीमेची वाटणी करून घ्यावी. आम्हास पासोडी पै।। दाहा इनाम जमीन द्यावी. अशी दोन कलमे भाऊसाहेब याचे बोलण्यांत. गणेश येशवंत यासी नेम जाला. भाऊसाहेब तसेच निघोन डुबेऱ्यास आले. पुढें पांढुरलीस उत्साह गोपाळ यांणींच जाऊन केला. फालगुन मास जसा तसा दुखण्यातच जाऊन चैत्र शु।। १ स भ्रमवायू जाल्यासारखे होऊन शुध्धी बेशुध्धी असे जाले. उपचारार्थ नाशिकास जावे म्हणोन नाशिकाहुन डोली आणवून शु।। ८ चैत्र मास शके १७५० नाशिकास गेले. तेथें जाऊन उपचार वैद्याचे तसेच प्रायश्चित इत्यादि दानधर्म अंतकाली उत्क्रांत घेनू, चैत्र वा।। ५ चे रात्रीस भागवत श्रवण, सितोदकचे गंगास्नान, आपले वास्तूत कुटुंबाची सर्व माणसे सानिध्य. मोठे योगीयास व्हावयाचे नाहीं असे योग्यतेने निधन जाले. या पुरुषाची कारकीर्द शके १७१३ पासून शके १७५० पावेतो सदतीस वर्षे मोठे संकटाचे दिवस आसोन मोठे हिम्मतीनें दिवसलोट करून एकच पुत्र पोटी आसोन कांहीं दुख न होता कुटुंबांची माणसे सर्व कायम. वडिलाचे चाली प्रा प्रापंचाची योग्यता. दिवसानरूप मोठेपणा. वतनाविसी दक्षता. पूर्व जन्मातरीचा कोणी पुण्यवान पुरुष या लोकास आला ! भागिरथी स्नान त्रिस्थळीची यात्रा तीर्थरूपा बरोबर जाली. असे योग्यरूप. पहिली पन्नासी भरताच मृत्यू. हे सार्थकच मोजावयाचे ! येकच पुत्र गोपाळराव बाबूराव यांचे वंशाचे बीज राहिले. परंतु हाही पुरुष पूर्व जन्मांतरीचा

कोणी योगी च पुण्यवान जन्मास आला! परद्रोह, परस्त्री, परनिंदा, परद्रव्य याजविसी परांगमुख; स्नान संध्या, सुसिळता, यथाशक्ति दानधर्म, अन्नदानाविसी कोणासही विन्मुख नाहीं. उछगळता कोणावर व्हावयाची नाहीं. देवपितराची मर्यादा, तसी साधुपुरुष व वडील माणसे, पदरचे माणसाची आपराध जाला तर विशेष रागे भरणे नाहीं. त्याजला वालविणे हे नाहीं. वतनाविसी दक्षता. दुसऱ्याचा मोठेपणा चा किंवा द्रव्याविसी निरिछता! आपले पुण्यानें जे ईश्वर देईल त्यांत सर्वांचे संगोपन करून चार रुपये देणें जाले तरी चिंता नाहीं; लौकिक संरक्षणाची जपणूक, असे सर्व गुण संपन्न आसा सांप्रत प्रत्यक्ष आहेत! वरकड सर्व ऐकीव; हे प्रत्यक्ष लोकास दिसतच आहे! याचे माहिती पुस्तकांत काय ल्याहावयाची आहे. आज पावेतो वंश वर्तणूक लिहिली. त्यापेक्षी या पुरुषाचे ही येक वेरजेने कांहीं लिहितो.

शके १७५० चे साली भाऊसाहेब निधन पावल्यावर (लमस डीन) नगरचा कलेकटर त्याची भेट वैशाखमासी नाशिक मुकामी घेऊन, पुढें ज्येष्ठमासी नगरास जाऊन मालकमसाहेब गौरनर मुंबईचा याची स्वारी नगरास आली. तेथें जाऊन भेट घेऊन कलेकटरसाहेब याजवळ याद दिल्ही तीन कलमाची. गंगथडी नेमणूक, सावलदबारे, रांजणगांव सरंजाम प्रकर्ण. वडे लोकाचे पटांत नांव आहे त्याप्रो कायम असावे. येकूण तीन कलमाची याद दिल्ही. ती नगरास कौसलांत जाऊन गौरनरसाहेब पुणीयास होते तेथें आली. डुबऱ्याहून कारकून पुणीयास श्रावणमासी गेला. साहेबाची भेट [होऊन] मार श्रुत केला. गौरनरसाहेबाजवळ डंडलापसाहेब मुख्य काम पाहाणारे होते. पुणे मुकामी हुकूम जाला नाहीं. स्वारी सातारीयास जाण्यास निघाली. गणेश धोंडदेव केळकर साहेबाजवळ होते. ते स्वारीबराबर निघाले. त्याजला डंडलापसाहेबांनीं सांगितले बरवे याचे प्रकर्ण बराबर घेणे. कारकूनही स्वारी बराबर गेला. त्याची चौकशी स्वारीत जाली. कारकूनास बोलावून मजकूर विचारिला. कारकूनास मजकूर डंडलापसाहेबाचे हुजूर समजाविला, कीं गंगथडी हा

सरकारास मामला दिसतो परंतु ज्यावेळेस कोणाचे इनाम सरंजाम कांहींच कोणास नवते, त्या वेळचा हा राजे छत्रपतीपासून मामला. याजपेक्षां इनाम सरंजाम काय अधीक आहे. या गंगथडी सुभ्यावर आमची नेमणूक ही इनामापेक्षां आधिक आहे. कारण बाजीरावसाहेबाचे कारकीर्दीत इनाम सरंजाम बहुधा थोडच कारणीक राहिले. आमचा मामला त्यात नेमणूकही पेशवे सरकारांनीं चालविली. तो आमल आमचे हातून इंग्रजसरकारचे स्वाधीन जाला. असे सर्व पाहून वडिलास वडे साहेबाचे वेळेस नेमणूक करून दिल्ही. ती दाहा वर्षे वडीलास चालविली. हल्लीं सरकारानीं आम्हांस दरोबस्त करुन दिल्हा पाहिजे. सर्व मार दंडलापसाहबांनीं समजून गौरनरसाहेबास समजावून वडिलाचे नेमणूके प्रो हुकूम साहा हजार रुो याचा होऊन चकती कौसलांत जाऊन तिकडून येऊन ते समयीं कलेकटर वैठसाहेब याची भेट घोडनदी मुकामी कारकूनाने घेऊन, ऐवजाची परवानगी नगरास आणून साहा हजार रुो घेऊन मार्गशीर्षमासी कारकून डुबेऱ्यास आला. त्या नेमणूक [ प्रमाणें ] आज तीस वर्षे नगराहून ऐवज घेतच आहेत. सनद मिळोन येशवंत कृष्ण याचे नांवाची हीच. मागील कागद पत्र कांहीं सापडला नाहींच. परंतु सरकारचे कागदी पत्री हा गगथंडी सरदेशमुखीचा सुभा मल्हार दादाजी व बाबूराव मल्हार उर्फ आंताजी मल्हार याजकडे येविसीचा पुणें शहरांत रविवार पेठचे कुलकर्णी याजला मौजे महू पाो नाशिक येथील सरदेशमुखी राज्यानीं दिल्ही. त्याच्या सनदा आंताजी मल्हारचे नावच्या शके १६४१ चे सालच्या दृष्टीस पडल्या. त्या घेऊन सरकारांत येजंट कचेरीस दाखवून यादी दिल्ही कीं, या सनदा सरकार कागदी बारनिशीस आहेत कीं नाहीं याचा दाखला आम्हास मिळावा. त्याची चौकशी करून त्यांत येका सनदेचा दाखला कागदी सापडला. तो रुजू होऊन शेरा तसेच [ आ ] च्यार्य नाशिककर याजला दररोज आठ आणे छत्रपतीनीं सातारे मुकामी करून दिल्हा त्याची येकसे ऐशी रुपयाची त्याच सालची [सनद] त्याजवळ पाहिली आहे.

चांदोरीचे मठकरी गोसावी ब्राह्मण आहेत त्याची सनद तसेच कास्ताचे निवाडपत्र आहेत. हे इंग्रेजसरकारचा आमल सुरु जाल्याचे पूर्वी शंभर वर्षाचे दाखले आज कायम आहेत. त्याचे आगोधर छत्रपतीचे हुकूमानें वडील या प्रातांत येऊन सरदेशमुखीचा आमल बसविला. नंतर मौजे कोठुरें पाटिलकी शके १६३० चे साली [ झाली ]. येरवी अधिकारावाचून या प्रांतांत येऊन वतन साधन करणे ते येकटे येऊन व्हावयाचे नाहीं म्हणोन, मल्हार दादानीं आवल राज्याचे आज्ञांकित. बाळाजी विश्वनाथ याजला पेशवाई शके १६३६ त जाली. त्याचा आप्तपणा असल्याने लगत फार चालली. भाऊसाहेब यास दुसरी कन्या जाली तिचे नांव येसूबाई. तिसरे पानावर दुसरे बंदावर कोठूर येथील त्रिवर्गाचे वाटणीचे ठिकाणीं कलमे लिहिणे ती येणें प्रो—

१ वडिलाचे वेळेचा देव, सिलामूर्ती व धातुमूर्ती दरोबस्त रामाजीपंत याजवळ राहिले वडिलाच्या वेळचे कुलाच्यार, कुलधर्म दरसाल करावयाचा तपशील.

१ लक्ष्मी नारायण हा बरवे याचे वंशाचा कुलस्वामी आहे, त्याचा संभवेल तसा श्रावण मासी उत्साह करावा. अनकूल नसल्यास वा ८ चे दिवसी उपोषण, रात्रौ पुजा करून नवमी पारणे केले पाहिजे. होईल तितके ब्राह्मण भोजन या अन्वये करावे.

१ दुसरे देव आधिष्ठा, वरदाई, मावाई, धरणीधर, योगेश्वरी असे पांच देव. याचे नैवेद्य येका पत्रावळीवर तीन ठिकाणीं व एका पत्रावळीवर दोन ठिकाणी असे वेगळे पदार्थ वाढून नैवेद्य दाखवावे. ते कार्तिक शु॥ १ फाल्गुन वा॥ ५ चैत्र शु॥ १ आश्विन शु॥ १० श्रावण वा॥ ९ पारणे दिवशी असे नैवेद्य वाढून दाखवावे. नैमतीक गोंधळ होईल ते दिवसी दाखवावे.

१ श्री मार्तंड नवीन बसला याचे कुलधर्म दसरा, चंपाषष्टी, माघ शु॥ १५ येकूण तीन कुलधर्म करावे. तळी आरती, सवाष्ण ब्राह्मण, पुरणाचा नैवेद्य असावे. नवरात्रांत तुपाचा दिवा. चंपाषष्टीचे नव-

रात्रीस तेलाचा दिवा या प्रा॰ चाल. नवरात्रांत दरसाल गोंधळ घालावा. आश्विन मासाचे नवरात्रास सप्तशतीचा पाठ देवाजवळ. माळ दसऱ्या पावेतो व चंपाषष्टीस मल्हारी माहात्माचा पाठ प्रतीपदे पासून. या प्रा॰ साल दरसाल केले पाहिजे.

१ नवे लेकरूं जाले मुलगा जाला म्हणजे गोंधळ बोडण. कन्या जाली तर बोडण मात्र भरावे. तसेच देवी आलेल्या मुलास त्या पार पडल्या म्हणजे बोडण. लग्न मुंज्य जाली म्हणजे गोंधळ व बोडण भरीत असावे. मार्तंडाचे टाकात पाणी जाण्याचे कारणानें अगर नवसामुळें अथवा कांहीं अन्यत्र कारणामुळें टाक अथवा गेठा सोन्याचा आहे, देवाचा सिका आहे, तो नवा केल्यास कुलधर्म करून गोंधळ घातला पाहिजे.

---

येणे प्रा॰ देवाचे प्रकर्ण आहे. लक्ष्मी नारायणाची मूर्ती पांढुरली येथील लाहान करंगळी इतकी आहे. ती देवांत आहे. कृष्णरात्र याची भक्ती गणपतीकडे याजमुळें त्याणीं गणेशचतुर्थीचा उत्साह फार मोठा पांढुरलीस करावा. शके १६८० चे साली कृष्णराव सुरतेस गेले होते. तेथील कारागीर चांगले पाहून त्याज पासून गणपतीउत्साहास देव्हारा सरासरी येका मोठे खणाचा. त्या देव्हाऱ्यातच पाण्याची कारंजी, वरती पाण्याचा हंडा, त्याच्या नळ्या खांबातून. भोंवती चित्रें, हत्ती, घोडे वगैरे खांबातील नळ्या पाण्याच्या, चित्राचे तोंडातून नाकातून कारंजी उडावी आसा केला. त्याजला पांच हजार रु॰ यावर खर्च लागला आहे. सुरतकर नबाबाकडे ऐवज ही बुडाला. परंतु पैका खर्च करून देव्हारा पांढुरलीस आणिला. बंडांत त्याचा हंडा तांब्याचा, याजमुळें बंडवाल्यानीं काढून नेला. देवाऱ्हा आद्याप पांढुरलीस आहे. वाड्यांत माडीवर एका कोपऱ्यासी नेऊन ठेविला आहे. गणपतीचा उत्साह करीत होते. तो सर्व राहित जाला. ढुबेरें मुकामी सामान्य भाद्रपद शुा ४ चे दिवशीं मृत्तिका [ मूर्ती ] पुजन, सवाष्ण ब्राह्मण इतके चालत आहे.

डुबेरें मुकामी गोपाळ कृष्णाची म्हणजे मुरलीधराची तांब्याची मूर्ती मोठी सरासरी चार पांच तसू इतकी उंच नवी मिळून श्रावणमासी आष्टमी वा उत्साह वा। १ पासून नवमीस पारणे. नऊ दिवस दरोबस्त गांव-ी ब्राह्मण मंडळीस आमंत्रण. नवमीस सिन्नरकर पांच पन्नास. नवमीचे दिवशी पुरण. नऊ दिवस गोसावी आणून कीर्तन. शेवटी गोपाळ काला नवमीचे दिवशीं. मृत्तिका मूर्ती आष्टमीचे दिवशीं पूजन केले. ती मूर्ती तिसरे प्रहरी मिरवत नेऊन बागा जवळचे बारवेत जळप्रवाह करावा. या प्रा। उत्साहाचा आरंभ जाला. तो अदमासे शंभर वर्षे एकसारखा डुबेरें मुकामी चालत आहे. डुबेरें मुकामी गांवचे पूर्वेस बाग करून त्यांत सिवालयाची स्थापना केली. कुलस्वामी लक्ष्मीनारायण याचे पंचायतनाच्या मूर्ती भिकोबातात्यांनीं घेतल्या होत्या. त्याचे देवालय गावांत वाड्याचे दक्षिणेस मल्हारराव भाऊसाहेब यांणीं जनार्दन भट केळकर उपाधे याचे हातून बांधविले. ते धाबे होते. त्याजला वर माडी, कवलार व बाहेर पडवी स्वयपाकास जागा; असे गोपाळराव यांणीं केले. दुसरे कलम का। सिन्नर येथें आगरवाडीचे कुरण होते ते त्रिवर्गाचे वाटणीचे वेळेस निम्मे वडील वाटा व निम्मे रामाजीपंत याचा. दाखला वाटणीपत्रांत असेल नसेल परंतु वेगळा दाखला. कागदाचे गलतीत पाहिला होता. ते कुरण सिन्नर मुकामी आपाजी रामचंद्र होते, ते समयीं ते निम्मे व निम्मे डुबेरकर असे गवत आणीत होते. त्या कुरणास अद्याप सिन्नर मुकामी आपाराव याचा पाय आसे म्हणत आहेत. ते कुरण नानाफडणवीस याचे कारकीर्दीत सिंदे याचे प्रकर्ण चांगले उदयास आले, त्या काली सिंदेसरकारचे पदरचे मुसलमान म्हणजे राणेखान देवपुरकर यांणीं ते कुरण जबरदस्तीनें हस्तगत करून गवत नेऊं लागले. त्या घालमेलीत आपाराव पुणीयास गेले होते. त्यांणीं सरकार[चे] कानावर घालून राणेखान्याचे नांवें ताकीदपत्रें घेतली. मागाहून डुबेरचे कारकून कोणी गेले, त्यांणीं ते ताकीद पत्र आपाराव यास सांगितलें. हे आमचे यजमानास दाखवावयास पाहिजे. कुरण तुमचे आमचे समाईकीचे आहे, असे सांगून

त्याजपासून घेतले. आद्याप डुबेऱ्याचे दप्तरात पाहिले होते. त्या कुरणाचा उद्योग उभयतांनीं केला. सिंदे याजकडून कुरण सुटावें असा पेशवे सरकारांतून सिंद्यांकडे नेट पोहोचले नाहीं; यामुळें सिन्नरचे कुरण सिंद्याकडे राणेखानाकडे राहिले.

तीन कलमाची यादी दिल्ही. पैा नेमणुकीचा बंदोबस्त जाला. सरंजामाचे कलमाचा दंडलाप साहेबांनीं जबाब दिल्हा कीं, याजला दाहा वर्षे झाली आहेत. हा मजकूर बंगाल्यात म्हणजे कलकत्त्यास लिहिल्यावाचून होणार नाहीं. बंगाल खात्यास लिहून बंदोबस्त होऊन येण्यास दोन वर्षे लागतील. पटात तुमचे वडिला प्रो तुमचे नांव दाखल आहे. येकूण तीन कलमाचे उलगडे सरकारानीं करून कारकूनास निरोप दिल्हा. यापुढें आपले येथून कितीक घरगुती अडचणी सरकारांत खर्च खाऊन नेहमीं सरकारांत राहण्यास कमी पडल्यामुळें सरंजामाचा बंदोबस्त राहिला. नेमणुकीचे ऐवजांत च आज पावेतो गुदारा करून डुबेरें मुकामी आब्रु संरक्षण ठेवून वहिवाट होत आहे. शके १७५० चे साली श्रावण भाद्रपद मासी मौजे पिंपळस येथील पाटिलकीचे वृत्ती पैा निम्मे हिसा कोठुरकर तो पेशवी ऐवज देऊन गाहाण ठेविला होता. कुणबीपण त्रिवर्ग याचे कलहामुळें वतनाचा बंदोबस्त जमीन वाटणीस घर शेतीस कांहीं नसल्यामुळें अगोदर पौषमासी बोलण्यांत ठराव आला होता. तोच संकेत उपस्थीत होऊन, कोठुरकर याचे गाहाणाची अगोदर खरीदखते करून घेतली पाहिजेत. व तेही देण्यास उमेदवार. तेव्हां गणेश यशवंत कुलकर्णी याचे हतची वामन रामचंद्र खेरीज करून बाकी विठ्ठलराव रामराव सु॥ आपले नांवची खरीदखते करून घेतली. पुढें वामनराव राहिले होते. त्याचेही खरीतखत त्याचे हातचे होऊन साक्ष शंकर आमृत कुलकर्णी याची जाली. पहिली खरीद खतें जाली त्या समयीं या प्रांतांत स्टाप चालू होणार इतकी वार्ता मात्र. पुढें लवकरच चालू जाला ! आहीर मछागर सुरवडे या त्रिवर्गानीं विठ्ठलराव रामराव याचा हिसा गहाण ठेविला. त्याजपासून खरीद खते करून

घेतली. सबब गहाणाचा ऐवज त्रिवर्गास द्यावयास बोलाविले. ते समयीं गणेशपंत कुलकर्णी याचे बोलणे पडले कीं, येक चाहूर विठ्ठलराव, दीड चाहूर रामराव, येकूण अडीच चाहूर गाहाण ठेविले. याचा पैका आपण देऊ नये. हे कुणबी माणूष भरणा फार. चौथाई वतन चालावयाचे आपण कबूल केले. हे अडीच चाहूर येकूण सारे गांवचा तिसरा हिसा व दोन हिसे आपले वडील पण आपले. याजला उदाहरण जसे कोठूऱ्यास मोगल पाा तिसरे हिशाचे आहेत तसेच हेही नांदवावे. उत्तर तीरी गंगातीरी गांव. आपण वडील अगोदर. नंतर येथून कोठुऱ्याकडे प्रवाह असे कुशलतेचे बोलणें. परंतु वडी(ल) माणुस शहाणा जमीन वाटून घेणे असे प्रकार. तेही कबूल करून त्या वाटणीचा तहनामा येकूणीस कलमाचा जीमद्दार याचे साक्षिनसी होऊन पर्ज्यन्यामुळें तूर्त ५८४ बिघे जामिनीची वाटणी जाली. बाकी जमीन पुढें शके १७६७ चे साली होऊन वाटणी पत्र जाले. या वतनाचा तपशील पुढें लिहिण्यांत येईल.

गोपाळराव यास स्त्री पेठ्ये याची मुलगी केली ती वय लहान याजमुळें थोर मुलगी आकरा वर्षांची खेडकर माधवराव दीा मनोहर याची कन्या वधू पाहिली. ते लग्न चैत्र वाा ५ वडिलाचे वर्षश्राद्ध होऊन नंतर खेडास जाऊन ते लग्न केले. तिचे नांव पुढें रखमाबाई असे होते जाले. त्याच साली कार्तिकमासी मातुश्री रमाबाई बंधूचे भेटीस राजेगांवास जाऊन तेथून पंढरी, आवढा, परळी इत्यादिक यात्रा करून शके १७५२ फाल्गुन चैत्रमासी डुबेऱ्यास आली. शके १७५३ चे साली आधिक वैशाख कोटीलिंगाची यात्रा उभयता मातुश्री करून परत आल्या. लक्ष्मीबाई वेणूबाई सुा अगोदरच द्वारकेच्या यात्रेस गेली होती, तेही कोटीलिंग करून दाखल झाली. सरकार नेमणूक तीन हजार रुो. प्रापंच खर्च थोडा थोडा तरी चार हजार रुो दरसाल पाहिजेत. शके १७५३ साली थोडा बहुत व्यापार चालू केला. पुढें मातुश्री रमाबाई याणी रामेश्वरची यात्रा केली. सौ. रखमाबाई कनिष्ट स्त्री तिला कन्या खेड

मुकामी जाली होती ती गेली. पुढें शके १७५६ चे आश्विन वा। ३ प्रसूत होऊन पुत्र जाला. त्याचे नांव आनंदराव बाबा ठेविले. शके १७५७ चे फाल्गुन शु॥ ७ स सापत्न मातोश्री सिऊबाई यास देवआज्ञा जाली.

शके १७५८ चे आश्विन मासी खासा गोपाळराव कोल्हापूर यात्रेस जाऊन देवी दर्शन करून तसेच पुढें कार्तिक स्वामीची यात्रा करून येतानी निंब, वाई, धोम–महाबळेश्वर, तेथून शंभू महादेव, पंढरपूर, नरसिंहपूर अशी यात्रा होऊन राजेगांवास नारोपंत नानावैद्य मातुळ यांची भेट राजेगांवास घेऊन पुणीयास जाऊन माघ शु॥ ५ स घरी आले. पुढें पाटोदे येथील देवीची मूर्ती नवी स्थापना करून आर्च्या केली. शके १७५९ चे वैशाख शु॥ ३ स जेष्ट स्त्री राधाबाई प्रथम प्रसूत डुबेरें मुकामी होऊन मुलगा जाला. त्याचे नांव सिवराव असे ठेविले. त्या प्रसूतीचे दाहावे दिवशीं राधाबाईस वायूचा विकार होऊन वैशाख शु॥ १२ स निधन पावली. त्याचे आगोदर कनिष्ट रखमाबाईस दुसरा पुत्र जाला होता, त्याचे नांव भिकोबा तात्या ठेविले होते. ती ज्येष्ट स्त्री राधाबाई सकुमार, सुरूप, धारणा योग्य, मर्यादा मोठेपणा अंगीं असे रीतीची होती. ती निधन पावल्याचे दुःख फार मोठे. परंतु घरांत वडील माणसे व कनिष्ट स्त्री सावध रीतीची शाहाणी होती. याजमुळें घर कृत्यास प्रापंच्यास शरीर न्यून न पडल्यामुळें उघडीक पडली नाहीं. सिवराव याचे संगोपन होणे याजकरितां लक्ष्मणपंत गडबोले याची स्त्री उमाबाई हेची योजना करून उभयतास दरमाहा करून डुबेऱ्यास आणिले. तिणे मुलास पाजून शरीराची वृद्धि केली. शके १७६० चे साली भाद्रपदमासी मातुश्री सुा कन्यागती कृष्णास्नानास निंबास जाऊन घरी आश्विनमासी आले. मागें कनिष्ट स्त्रीस दुसरा दोन मुलगा भिकोबा होता तो निधन पावला. प्रजा मिलोन दोघीचे मुलगे इतकेच होते. थोरला मुलगा याचा वृत बंध शके १७६३ चे वैशाखमासी शु॥ ५ स केला. धाकटे मुलाची मुंजी करावयाची होती. ते देवी निघाल्यामुळें

राहिली. शके १७६२ चे साली श्रीत्रिंबकेश्वराची यात्रा. दोन आकरा प्रदक्षणा दोघा मुलाच्या झाल्यानंतर वृतबंध. कनिष्ट वृतबंध शके १७६४ चे साली जाला. पूर्वी शके ६१ कन्यागती मातोश्रीसाहेब याणी द्वारकायात्रा केली. मातोश्री लक्ष्मीबाई ताई शके १७६२ चे माघ शु॥ १५ नाशिक मुकामी निधन पावली. रावसाहेब संनिध होते. हे यात्रा व ताईचा मार या शकांत लिहिणें आहे. शके १७६४ चे मार्गशीर्ष मासी जेष्ठ पुत्राचा विवाह. वधू बापूजी काशिनाथ जोशी संगमनेर त्याची नात रामचंद्र बापूजीची कन्या. याचा निश्चय ते डुबऱ्यास येऊन डुबेरें मुकामी लग्न जालें. नांव लक्ष्मीबाई ठेविले. मातोश्री रमाबाई याचे शरीरास व्यथा उत्पन्न जाली. ती दिवसेंदिवस जाजती. भाऊसाहेबास देवआज्ञा जाल्या दिवसापासून मातुश्रीचे मन यात्रा दानधर्माकडे. किरकोल या प्रांतातील यात्रा, रामेश्वर, द्वारका, गंगाप्रदक्षणा तीन यात्रा मोठ्या केल्या. माहायात्रेचा उद्देश फार. रावसाहेब सुा जावे. परंतु घरचे आडचणीमुळें त्यांचे जाणे लांबणीवर. याजमुळें शके १७६५ चे कार्तिक वाा ५ मातुश्रीची तयारी होऊन डोली पुणीयाहून आणून माहायात्रेस गेली. त्रिबंक रामचंद्र बराबर होते. ती प्रयाग, मकर-स्नान समग्र येक माहिना करून शिवरात्रीस काशीस जाऊन नित्य भागिरथी स्नान; शरीर विगलीत. मागाहून रावसाहेब याचा येण्याचा हेतू धरून गयेस गेले नाहींत. शेवटीं शके १७६६ चे आश्विन वाा १४ चे दिवशीं काशीक्षेत्री देह विसर्जन केला. उत्तर कार्य त्रिबक रामचंद्र याचे हातून होऊन देशी पत्र आले. रावसाहेबाचे यात्रेस जाणे न होय. याजमुळें मार निलेस पत्र पाठवून त्याचे हातून तीर्थरूप मातश्रीचे गयेस जाऊन गया वर्जन करविले. नंतर शके १७६७ चे साली देशी आले. घरी कनिष्ट स्त्रीस एक दोन मुले झाली गेली. पांच चार वर्षें मुलगेच होत नवते. कनिष्ट चिरंजीवाचे लग्न शके १७७० चे माघ मासी वधू रघुनाथ हरि चिपोलणकर पुणेकर याची कन्या योजना होऊन ते सिन्नरास येऊन सिन्नर मुकामी लग्न जाले. तिचे नांव अन्नपूर्णाबाई ठेविलें. नंतर फाल्गुमासी रखमाबाईस कन्या डुबेरें मुकामी जाली. तिचे नांव बयाबाई ठेविलें. त्याजवर

मुलगा भाद्रपद वा। ६ शके १७७३ चे साली जाला. त्याचे नांव कृष्णराव भाऊ ठेविले. शके १७७५ चे ज्येष्ट वा। २ प्रसूत होऊन मुलगा जाला. त्याचे नांव रामचंद्रराव आणा ठेविल. असे कनिष्ट स्त्रीस तीन मुलगे व ज्येष्ट स्त्रीचा एक, चार पुत्र व कन्या असी पांच संतती; व कनिष्ट स्त्री पूर्वीं कुटुंबाची माणस गेली ती यथानुक्रमानें गेली. ती दुःखकारक कांहीं जाले नाहीं. शके १७५० चैत्र वा। ५ स भाऊसाहेब यास देवआज्ञा जाल्यापासून तागाईत शके १७७७ चे मार्गशीर्ष शु।। २ पावेतो आठावीस वर्षे रावसाहेब याचे कृत्याचे दिवस गेले. या दिवसात दुःख दरिद्र देशत्यागास गेले. आनंदाचे दिवस. संतती संपत्ती कटुंबाचे व पदरचे मनुष्याची सर्व अनकूलता. अग्नीची व गाइ ब्राह्मणाची सेवा, आनंदमय दिवस व वर्तणूकही आनंदमय. शके १७१० चे साली भिकोबा तात्यासाहेब यास देवआज्ञा जाल्याचे साली सावकारी देणे. ते कारकीर्द गोपाळराव व मल्हारराव व खासगत कारकीर्द मिळोन सदुसष्ट वर्षे बहुत देण्याचा पेच. दंग्याचे पूर्वींचा व दंग्याचे आलीकडील जुना पेच. त्याचे फार रोखे व नवा पेच जालेला. सर्व गोपाळराव याचे हातून सावकाराचे देणे वारून वडिलास ऋणमुक्त केले. त्या पैा आजपावेतो देणे राहिले. जुने देण्या पैा सिन्नरकर चिपोलणकर याची हप्तेबंदी केली. त्या पा। पुढील हप्ते देणे आहेत. ते कमकसर येक हजार रु॥ व नवे देणे चार हजार रुपयाचा पेच, इतके मात्र राहिले आहे. कुटुंबाची माणसें स्त्रिया व मुले याजला येथायुक्त दिवसमानाप्रमाणें अळंकार-भुषणे वस्त्र-प्रावर्ण तसाच तांबे पितल भांड्याचे सामान. कार्य प्रयोजनास दुसऱ्याचे घरी जावयास नलगे, असे व्यवस्थेनें प्रांपच्याची वेहेबुदी सर्व प्रों अनकूल गोपाळराव याचे हातून आजपर्यंत जाली आहे. कोणताही न्यूनतेचा प्रकार नाहीं. या आठावीस वर्षांत इमारतीस पांढुरली, डुबेरें, नाशीक, पुणे, पिंपळस येथील नवे जुने दागदुजीस मनस्वी पैसा खर्च जाला. व पिंपळसचे वतनासही फार पैसा खर्च जाला व पुणे मुकामीचा स्वारी खर्च, मुलाची कार्यप्रयोजने, यात्रा त्रिंबकेश्वराच्या प्रदेक्षणेच्या दोन वेळा. शिवाय

नाशिकचे ब्रह्मचारी बावा जवळचे अनुष्ठान संततीचे निमित्य, मातुश्रीच्या यात्रा असे हजारो रुो खर्च जाला. तितकाही त्याचे पुण्याईचे सद्बुर्ध्दीचे योगानें पार पडून देण्याचा पेच राहिला तो सद्री लिहिला आहे. याजला कुळारग घेण्याची थार डुबेरें व पिपलस येथें आहे. परंतु या दिवसांत देणे हे खरे; घेण्याचे शाश्वत मानवत नाहीं. शके १७७७ चे मार्गशीर्ष शुा ३ स दिवस प्राप्त जाला तो लिहिण्यास मती. स्तब्ध जाली त्याचा शेवट शके १७८० चे आधीक ज्येष्ट वाा १२ स जाला.

मल्हारपंत आती पुण्यवान याची थोडकीच प्रथा दर्शवितों. दादो जोगदेव हे नेवऱ्यास आपले घरी असतां त्याचे वडील कुटुंबास फार दिवस संतान होत नव्हतें. त्याकाळीं कोणी एक काशीचा कापडी भागीरथीची कावड घेऊन रामेश्वरास जाते जातानीं नेवऱ्यास याचे घरी मुकामास राहावे. त्याला अन्न उदक सुश्रुषा या बाईनें उत्तम प्रकारें द्यावी, असे कितीक खेपा जाल्या. त्याचे नांव मल्हारी होते. शेवटीं एक खेपेस आला, तो मुकामास राहून दुसरे दिवशीं जावे तों शरीर-व्यथेनें आठ चार दिवस तेथेंच राहिला. या बाईचा सत्कार पाहून बहुत संतोष पावला. जाते वेळेस बोलला कीं, मरावें आणि तुझे पोटीं जन्मास यावें, असे बोलून आपले घरी गेला. पुढें त्याजला कधी देव-आज्ञा जाली असेल न कळे. इकडे थोडकेच दिवसांनीं ही बाई गरोद्र नवमास भरतांच प्रसूत होऊन पुत्र जाला. ते बाळ रडूं लागलें. दाहा दिवसानंतर आंगारे धुपारे केले. गुणास न येई. अखेर या कापड्याच्या बोलण्याची स्मृति होऊन, त्याचे नांव मल्हारी होतें ते नांव ठेवतांच या मुलाचे रडूं राहिले ! ही गोष्ट बापूजी नारायण बरवे चुलत बंधू हे पांढुरलीस आलियावर त्या मुकामी त्यांणीं ही प्रगट केल्याचा मजकूर वडिलाचे मुखे ऐकिल्यावरून येथें लिहिला आहे.

कनिष्ट स्त्रीस पुत्र ५ पैा आज्ञान वयांत गेले २. बाकी तीन पैा दोघाचा वंश कायम.

१ केशव जोगदेव वडील
१ राघो जोगदेव धाकटा
२

वडील केशव जोगदेव याजला पुत्र कृष्णाजी केशव. जिवाजी केशव पैा कृष्णाजी केशव याजला संतती नाहीं. जिवाजी केशव याची संतती हाली कसबे लिंब्र कृष्णातीर नजीक सातारा येथें आहे.

दुसरे पुत्र राघो जोगदेव याचा वंश हाली वाई कृष्णातीर व कोंकण प्रांती, वसई–पापडी व पनवेल असे आहेत. कोणी नागपूरास. च्यार पैा येक घरी राहून तिसरे बंधू यात्रेचे उद्देशे किले सातारा कृष्णातीर येथील राजधानी चा बंदोबस्त होऊन राजे तक्तावर शके १५९६ चे साली बसले. तेथील सर्व अधिकार नवीन राज्याचा बंदोबस्त चालत आहे. तेथें हे त्रिवर्ग घरीहून निघाले. कृष्णातीरास येऊन सातार्‍याची सर्व हकिकत पाहून निघून तेथून क्षेत्र श्री त्रिंबक येथें शके १५९९ साली यात्रा करून परत घरी नेवर्‍यास गेले. त्यावेळीं उपाधे रुईकर त्रिंबककर आहेत.

---

## या घराण्यास मिळालेल्या सनदा व इतर लेख यांचे उतारे

श्री

राजश्री देशाधिकारी व देश लेखक वर्तमान व भावी प्रा राजापूर गोसावी यासी

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य.

सेवक बाळाजी विश्वनाथ प्रधान नमस्कार सुरु सबा अशर मया अलफ मा। कृष्णाजी केशव [व] मल्हार दादाजी मोकद्दम कर्यात नेवरें प्रां मजकूर यांणीं पुरंधरीचे मुकामी हुजूर येऊन विनंति केली कीं, पूर्वी आपल्या वडिलापासून हक रयेत निसबतीनें वख्त व ढेप जमीन बिघे इनाम आहे व पालक आहे. ऐसी यांस पूर्वी महाराज राजश्री कैलासवासी स्वामीचे

वेळेस एकसाहेबी होती. देश सुरक्षीत होता. त्याकरितां कालक्षेप चालत होता. अलीकडे धामधुमेकरितां आपणांस सेवा विशेष पडते. योगक्षेम चालत नाहीं. तर कृपाळु होऊन हकरयेत निसबतीनें हक व ढेप इनाम विशेष करून दिधलिया आपण सुखरूप राहोन त्यावरोन वर्तमान मनास आणिता पूर्वी देश सुरक्षित होता तेव्हां एका कारभारीयानें कारभार चालत होता. हक व इनाम कुटुंबाची निस्थिती होती. हल्ली धामधुमेकरितां चार गुमास्ते असलिया विराहित कार्यभाग चालतो ऐसा अर्थ नाहीं. पूर्वीचा हक व इनाम एकाची गुजाईस होती. आतां चार गुमास्ते लागगात. एकाकादिम हकावरी व इनामावरी कालक्षेप चालतो ऐसा अर्थ नाहीं. त्या करितां याजवरी कृपाळु होऊन येणे प्रो हक व इनाम कदीम व ज्याजती करून दिल्हे असे बी त॥

| | |
|---|---|
| हक रयेती निसबती | ढेप इनाम जमीन बिघे |
| लाहारी दाभोली | ९ कदीम जिराईत |
| १०० कदीम | २१ ज्याजती |
| ३०० ज्याजती | ६ बागाईत |
| —— | १५ जिराईत |
| ४०० | —— |
| | २१ |
| | —— |
| | ०।० |

पालक

| | | |
|---|---|---|
| घरे | म्हैसी | कदीम व ज्याजती याचा गावगना |
| १० | १० | थले चतुसीमा करून देणे |

एकूण एक लाहारी दाभोळी च्यारसे कदीम व ज्याजती मिळोन इनाम बिघे तीस कदीम व ज्याजती व पालक घरे दाहा व म्हैसी दाहा सुदामतीप्रमाणें करून तुम्हास पत्र सादर केले असे. तरी सदरहु प्रो

त्यांचे चालवणे या पत्राची तालिक लेहोन घेऊन असल पत्र भोगवटी-याकारणें यास परतून देणे जाणिजे छ १७ जिलकाद आज्ञाप्रमाण

श्री
राजा शाहु नर
पति हर्षनिधान
बाळाजी विश्वनाथ
मुख्य प्रधान

लेखन
सीमा

---

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ४५ विलंबी संवत्सरे आश्विन बहुल चतुर्दशी मंदवासरे क्षेत्रीये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यांणीं मोकदमानी देहाये कर्यात नेवरे सुभा प्रांत राजापूर यासी आज्ञा केली ऐसी जे कृष्णाजी केशव व मल्हार दादाजी बरवे मोकदम कर्याती प्रा मार यांणीं स्वामी संनिध येऊन साताराचे मुकामी विनंति केली कीं आपण

श्री
राजा शाहु नर
पति हर्षनिधान
बाळाजी विश्वनाथ
मुख्य प्रधान

श्री
श्री आई आदिपुरुष
श्री राजा शाहू छत्रपति
स्वामी कृपानिधि तस्य
श्रीनिवास परशुराम
प्रतिनिधि

स्वामीचे पुरातन सेवक आहो सेवा एक निष्ठेनें केली आहे व पुढें ही उमेद्वार आहो आणि आपले मुकाद्मीस पेशजी हक आहे तो कमतर आहे तो जाजती करून द्यावा व आपणास कांहीं जमीन इनाम देऊन वंशपरंपरनें चालविली पाहिजे म्हणून विनंति केली ऐसीयासी हे स्वामीचें एकानिष्ठ याचे चालवणे अवश्यक म्हणून याजवरी कृपाळू होऊन याचे मोकद्मीस जाजती हक व इनाम जमीन करून दिल्ही असे.

| | |
|---|---|
| मोकद्मीस हक रयेत निसबतीनें | इनाम जमीन वाडा मुरुग |
| लारी दाभोळी | कसबे नेवरे पैकीं बिघे |
| १०० कदीम | ८१० बागाईत अगर जमीन |
| २०० जाजती साल मारी | ।॥ १५ ढेप भातसेत जमीन |
| — | ·। ५ वरकस जमीन |
| ३०० | — |
| | १८ |

पालक
२५ म्हैसी १० घरे

येकूण हक रयेत निसबतीनें कदीम लारी एकसे व जाजती साल मार पासून लारी दोनीसे एकूण तीनशे लारी व जमीन इमान कसबा नेवरे पैकीं मुरग वाडा पैकीं जमीन तीन किते मिळोन एक चावर व पालक म्हैशी पंचवीस व घरें दाहा येणें प्रो करून दिल्हे असे तरी तुम्ही सदरहु प्रमाणें तीनसे लारी हक रयेत निसबतीनें ताकीद करून दरसाल देवीत जाणे व इनाम जमीन चतुः सीमा करून अवल दुमसिला ती प्रतीची विसा पांडाच्या बिघियानें नेमून याचे दुमाले करून यास व याचे पुत्र पौत्राची वंश परंपरेनें इनाम चालवणें व म्हैसी घरे पालक चालवणे प्रती वर्षी नवीन पत्राची आपेक्षा न करणे या पत्राची प्रती लेहोन घेऊन हे पत्र भोगवटीयासी मोकद्म मजकुरा जवळी परतोन देणें जाणिजे लेखनालंकार [ मर्यादेयं राजते ]

श्री.

॰ श्री ०
राजाशाहू नरप
ती हर्षनिधान बाजी
राव बल्लाळ मु
ख्य प्रधान

राजश्री सेकोजी आगरे सरखेल गोसावी यासी

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो बाजीराऊ बल्लाळ कुशल जाणोन स्वकीय लिहित गेले पाहिजे विशेष रा. कृष्णाजी केशव मोकदम का नेवरें याची स्त्री लक्ष्मीबाई का मज-कुरी आहेत त्याचे बेगमीस भात कैली बारुले मापे खंडी २ दोन देविले आहे तरी सदरहु दोन खंडी भात मौजे गोवल व सिरलवझी येथील ऐवज पैकीं साल दरसाल का मजकुरी प्रविस्ट करीत गेले पाहिजे या पत्राची तालिक लेहून घेऊन मुख्य पत्र मातुश्री जवळी भोगावटीयास परतोन देणें जाणिजे छ १९ रबिलौवल सुरु सलासैन मया आलफ " बहुत काय लिहिणे लोभ दीजे हे विनंति "

लखन
सीमा

---

श्री.

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री मल्हारपंत मामा स्वामी गोसावी यासी पो बाजीराऊ बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी कुशल जाणून स्वकीय लिहिणे विो वेदमूर्ती राजश्री सदाशिव भट पटवर्धन यासी प्रांत गंगथडी येथें वर्षासन रुपये १०० येकशे नेमणूक आहे ऐशी-

यासी सद्रहु शंभर १०० रुपयाचा बाबतीचा एकगांव नाशिक मध्यें शंभर १०० प्राती होत असतील तो देणे. कमजास्ती जागा न देणे जाणिजे छ. ४ सुाा सुमा सबा बहुत काय लिहिणे सद्रहु गांव यांणी घेतला नाहीं तरी सद्रहु रुपये शंभर वर्षासन पावते करणे " बहुत काय लिहिणे हे विनंती " ( शके १६५८ )

---

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री
आंताजी मल्हार सुभेदार सरदेशमुखी प्रांा गंगथडी
गोसावी यासी.

शेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुहुर सन खमस अशरीन मया व अलफ बदल देणे धर्मादाय वेदमूर्ती राजश्री भट्टाच्यार्य नाशिककर यास दररोज रुो -॥- निमे राजश्री छत्रपती स्वामींनी देविले असे तरी सद्रहु निमे रुपाया दररोज प्रोॉ साल दरसाल देत जावे प्रतीवर्षी ताजे सनदेचा हुजूर न करणे प्रती लिहून घेऊन मुख्य पत्र भट गोसावी यासी परतोन देणे सद्रहु ऐवज नाशिकचे सरदेशमुखी पैाा प्रविष्ट करणे येविसी आलाहिदा राजपत्रें सादर आहेत जाणिजे छ २१ रमजान मोर्तब.

---

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री
आंताजी मल्हार नामजाद व कारकून प्रांा गंगथडी
गोसावी यासी

शेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुमा सबा आर्बैन मया आलफ हुजुराती आकार साल पैाा बदल देणे वर्षासन वेदमूर्ती राजश्री व्यंकटाच्यार्य बिाा भट्टाच्यार्य राा काो नासिक यासी साल गुाा प्रोा

साल मांरी सो १८० येकशे ऐशी देविले असेत ग्रांमजकूरचे सरदेशमुखीचे ऐवजी हप्ता वैशाखमास पैकी आदा करून पावली याचे कबज घेणे तेणे प्रो मजुरा असेत जाणिजे छ जमादिलावल मोर्तब.

---

श्री
श्री रामराज पदांभोज
भ्रमराइतचेतसः विं
वात्मजस्य मुद्रैषा
राघवस्य विराजते

श्री लक्ष्मीकांत.

राजश्री बाबूराव मल्हार गोसावी यासी

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेों रघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी तुम्हाकडील कारकून कर्जाचे वसुलाबाा समागमे येतील त्यास खर्चास सालिना रुपये ४००० चार हजार केले आहेत या पैकी मौजे घारूड पाा बालापूर हा गांव तुम्हाकडे दिल्हा आहे त्याचा वसूल वजा करून बाकी सरसाल पावते करू छ ४ माहे शौवाल सुाा इहिदे खमसैन जाणिजे छ ५ माहे शौवाल बहुत काय लिहिणे " हे विनंती. " ( लेखनसीमा )

---

श्री
राजा शाहूनर
पाति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ
मुख्य प्रधान

श्री

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान ताा मोकदमानी मौजे रांजणगांव पाा वाळुज

सुहुर सन सलास सलासीन मया अलफ मौजे मजकूर सालगुदस्ता राजश्री बाबूराव मल्हार यास मुकासा आहे त्या प्रो साल मजकुरी करार असे तरी तुम्ही मारनिलेसी रुजू होऊन मुकास बाबेचा वसूल सुरळीत देणे जाणिजे छ १५ रबिलावल " आज्ञा प्रमाण. " ( लेखनसीमा )

---

## मौजे पांढुरली, पिंपळस व कोठुरें येथील बरवे यांची अलीकडील माहिती

पांढुरली हा गांव देवळाली स्टेशनपासून सुमारें ५।६ मैलांवर आहे. या गांवास लागून प्रयागी नांवाची लहानशी नदी वाहते. या नदीचे पाणी उन्हाळ्यांतही वहातें. सदरहु नदीचे कांठीं या बरवे घराण्यांतील दोन स्त्रिया सती गेल्या. त्यांचे दोन चिरेबंदी चौथरे व श्रीगणपतीचें लहान देऊळ व या देवळाजवळ लहानसा एक बाण स्थापन केलेला आहे. त्याला लागूनच एक लहानसें कुंड आहे. या कुंडांतील पाणी नेहमीं उत्तम असतें. नदीचे कांठीं गांवास लागून श्रीबाणेश्वराचें देवालय आहे. श्रीमारुतीचें देवालय फार जुनें असून अगदीं गांवास लागून आहे. या देवालयाचे पूर्वेस बरवे यांचा विस्तीर्ण वाडा आहे. वाड्यांतील चौक फार मोठे असून, वाड्याचा मुख्य दरवाजा अंबारीसह हत्ती आंत जाईल एवढा मोठा आहे. वाड्यांत श्रीविठ्ठलाची काळ्या पाषाणाची मूर्ति अदमासें २॥ हात उंचीची फारच चांगली आहे. गांवापासून सुमारें अर्ध्या मैलावर एक टेंकडी आहे. या टेंकडीवर श्रीमल्हारीमार्तंडाचें देवालय आहे. हें देवालय मल्हारराव दादा बरवे सातार्‍याहून गंगथडीस येतांना मध्यें श्रीक्षेत्र जेजुरी येथें श्रीमल्हारीमार्तंडाचे दर्शनास गेले होते तेथून परत गांवीं आल्यावर बांधिलें आहे. पांढुरली गांवीं श्रीबाणेश्वराचा उत्साह पूर्वीं फारच मोठा होता; परंतु हल्लीं अगदींच न होण्याचें

कारण सरकारांनीं मेहेरनजर करून देवस्थानचें उत्पन्न आपले खातीं जमा केलें हें होय !

पांढुरलीचे त्रिबंकराव शिवराव उर्फ बाळासाहेब बरवे यांना सरकारांनीं थर्डक्लास सरदारांचे वर्गांत नमूद केलें आहे. बाळासाहेब यांना दोन पुत्र आहेत. हे कांहीं महिने पांढुरलीस व कांहीं महिने पुणें शहरांतील नारायणपेठेंतील वडिलार्जित जुन्या वाड्यांत रहातात. यांचे संग्रहीं दोन ऐतिहासिक वस्तू आहेत. पैकीं एक वस्तु श्रीमंत सौ. राधाबाई भट ( पेशवे ) यांची तसबीर. दुसरी वस्तु मल्हारदादा बरवे यांची अर्धांगी कीर्तिभूषण जिनें सर्व गंगथडी सर केली ती तलवार होय. लेखकाच्या विनंतीवरून पहिली वस्तु—वीरमाता श्रीमंत सौ. राधाबाई भट ( पेशवे ) यांची तसबीर व जुन्या दप्तरांतील पिढीजाद नोकरानें लिहिलेली यांच्या घराण्याची बखर ( सात जुन्नरी कागदावर पाठपोट मोडी लिहिलेली ) ह्या दोन्ही वस्तू 'भारत-इतिहास-संशोधक मंडळ' पुणें या संस्थेंत ठेवण्याबद्दल सरदार बाळासाहेब बरवे पांढुरलीकर यांनीं परवानगी दिली, त्याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत आभारी आहे.

डुबेरें येथें विश्वासराव रामराव उर्फ बाबासाहेब बरवे हे असतात. पिंपळस येथें गोपाळराव मल्हार यांचें कुटुंब जिजीबाईसाहेब, माधवराव गोपाळ व शंकरराव यांचे तीन पुत्र इतके असतात. जिजीबाईसाहेब ह्या हरी विश्वनाथ व वासुदेव या नातवंडासह नाशिक येथील दिल्ली दरवाजाजवळील आपल्या वडिलार्जित वाड्यांतही असतात. जिजीबाई यांना सरकार दरसाल बाराशें रुपये देत आहेत.

पांढुरली, डुबेरें, पिंपळस व कोठुरें या गांवीं मोठाले वाडे व देवालयें बरवे यांणीं बांधिलीं आहेत. त्यांत विशेषतः कोठुरें येथील वाडा व देवालय हीं फार मोठीं आहेत. कोठुरें हा गांव इनामी जहागीर आहे. हा गांव निफाड स्टेशनाजवळ आहे. कोठुरें येथील घराण्यापैकीं रंगो बळवंत व नारायण नरहर हे वकील होते. विनायक नरहर हे बी. ए.

एल् एल्. बी. असून धुळें येथे वकील आहेत. वासुदेव रंगनाथ हे एम्. ए. बी. एस् सी. असून पुलगांव मिलमध्यें आहेत. वासुदेव रंगनाथ, दिनकर पांडुरंग व गोविंद पांडुरंग हे रेलवेंत नोकर आहेत. लक्ष्मण विश्वनाथ हे ए. ई. मध्यभागचे ऑफिसांत आहेत.

मौजे कोठुरें हा गांव नाशिक जिल्ह्यापैकीं निफाड तालुक्यांत आहे. रेलवे स्टेशन निफाडपासून हा गांव तीन मैलावर आहे. कोठुरें श्रीगोदावरी नदीचे कांठीं आहे. या गांवीं इतिहासप्रसिद्ध मल्हारराव बरवे यांनीं दोन वाडे, दोन घाट, दोन धर्मशाळा व श्रीबाणेश्वराचे देवालयही फारच चांगलें बांधिलें आहे. या गांवीं महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरत असते. हें क्षेत्र फारच रम्य असल्यामुळें आजपर्यंत कित्येक साधुसंत येथें येत असत. या गांवीं श्री परमहंस स्वामी ब्रह्मानंद यांनीं तीन गायत्रीचीं पुरश्चरणें केलीं होतीं. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पादुका येथें स्थापिल्या असून दरवर्षी पुण्यतीथ मोठ्या प्रमाणावर होत असे. मल्हारराव बरवे यांनीं आपल्या भरभराटीचे वेळीं कोंकणांतून बरीच मंडळी आणून त्यांना आपले पदरीं आश्रय देऊन, त्यांच्या चरितार्थाकरितां जमिनी इनाम दिल्या. त्यामुळें हा गांव पूर्वी १०० । १२५ ब्राह्मणांच्या घरांनीं गजबजलेला असे. परंतु कालाच्या विचित्र घडामोडीमध्यें हल्लीं येथेंही बरेंच स्थित्यंतर घडून आलें असल्यास नवल तें काय ? गोदावरी नदीला कोठुरें गांवापासून खालीं सहा मैलांवर विद्यमान सरकारनें मोठा बंधारा बांधल्यामुळें येथील घाट पाण्यांत बुडाले आहेत. बंधारा बांधण्यापूर्वीं येथील हवा इतकी चांगली होती कीं, नुसत्या हवेनें कित्येक रोगी बरे झाल्याचीं उदाहरणें आहेत. येथें श्रीमंत थोरले माधवराव भट पेशवे यांनीं स्वारीनिशीं आठ दिवस मुक्काम केला होता. येथील विस्तीर्ण वाड्याचे कांहीं भाग अद्याप आहेत. ऐतिहासिक कालांत हें घराणें फार श्रीमान् होतें. परंतु पेशवाई बुडण्याच्या सुमारास पेंढाऱ्यांनीं हा गांव ३।४ वेळां लुटल्यामुळें येथील संपत्ति व पुराणवस्तूंचा बहुतेक नाश झाला ! सदरहु माहिती रा. रामकृष्ण व्यंकटेश व वासुदेव रंगनाथ यांनीं दिली.

## जि॥ नाशिकपैकीं येवलें येथील बरवे यांचा वंशवृक्ष



## कसबा येवलें येथील बरवे यांची माहिती

कसबा येवलें हा गांव नाशिक जिल्ह्यांतील तालुका आहे. या गांवीं रेशमी सनंग चांगलें बनतें. मल्हार दादाजी यांनीं आपले चुलत बंधु गोविंद विठ्ठल यांस नेवऱ्याहून आणवून आपले जवळ ठेविलें. पुढें गोविंद विठ्ठल यानेंच येवलें मुक्कामीं वाडा बांधून येथें राहून सरदेशमुखी चालविली. येवलेकरासंबंधींही सर्व माहिती पांढुरलीचे त्रिंबक रामचंद्र वैद्य यांनीं लिहिलेल्या वरील बखरींत आलीच आहे. विठ्ठल पुरुषोत्तम व नारायण आबाजी यांनीं राघो जोगदेवच्या वंशापैकीं वाई येथील वंशांतील सखाराम व मोरो यांस दत्तक घेतलें. सदरहु दोन्ही दत्तकांचा वंश चालूच आहे.

सदाशिव दामोदर हे सावकारी व मोत्याचा धंदा करितात. यांचे पुत्र विनायक व कृष्ण हे वडिलांचाच धंदा चालवितात. चिंतामण गणेश नोकर आहेत. विठ्ठल उर्फ रावजी गणेश हे नांदगांव येथें रहातात. हे पेन्शनर आहेत. यांना मरहूम मि. जिल्हाधिकारी जॅक्सन्साहेब यांनीं बरीच जमीन दिल्याचें समजतें. नारायण गंगाधर शेती करतात. गंगाधर हे व्यापारी आहेत. शंकर विश्वनाथ हे अव्वल कारकून होते. हे नुकतेच वारले. माहदेव रावजी हे रेल्वेकडे तारमास्तर आहेत. कृष्णाजी रामचंद्र मुंबई येथें आहेत. कचेश्वर त्रिंबक ह्यांच्या नांवानें सालीना बाराशें ( १२०० ) रुपयांची नेमणूक सरकारकडून मिळते. कचेश्वर त्रिंबक उर्फ पिलोबा यांनीं पुस्तकाचे कामीं मदत केल्याबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे. विष्णु गोविंद हे मध्यभाग लँड रेकार्डमध्यें नोकर आहेत. सदाशिवराव दामोदर यांनीं राहत्या घराचे माडीवर पूर्वी सरदेशमुखी अंमलाचे वेळीं ज्या जागेवर जरीपटका ( निशाण ) सदैव फडकत असे, ती जागा व वाड्यावरून शत्रूवर मारा करण्याची जागा वगैरे दाखविल्या. मी येवलें मुक्कामीं असल्यावेळीं या सरदेशमुख बरव्याचें जुने कागदपत्र मला पहाण्यास मिळाले नाहींत; याचें कारण, कचेश्वर त्रिंबक हे त्यावेळीं पुण्यास होते.

## प्रांत राजापूरपैकीं कर्यात नेवरें येथील खरवे यांचा वंशवृक्ष



# कर्यात नेवरें येथील बरवे यांची माहिती.

जोगदेवभट बरवे याचे वडील नारायण विठल; विठलच्या वडिलाचें नांव मिळत नाहीं. म्हणजे कर्यात नेवरें येथील बरव्यांचा मूळपुरुष विठलभट होय. जोगदेवभट शके १५०० त कर्यात नेवरें वाडा मुर्ग येथें असल्याचें पुढें नमूद केलेल्या दोन लेखांवरून सिद्ध होत आहे.

श्री.

आज भाटगत कुळे निमलावणी श्री शके १५२८ वरिखे पराभव संवछरे वैशाख अखेर दशमी ते वेळी वाडी मुर्ग खोत व माहाजनानी पेशक पासाव येऊन आलात केली जे किटोवाल नाईक नेमावणी मुळे मुळचे भाटकर मिरासी परागंदा होऊन पाठी नेमावणी राहिली सबब वाडी कारपडी होऊन वाडी उजाड होईल हे जाणोन ते वेळी वाडी मजकुरास उकिडवा बाधेकार बागवान निसबत थोरात होता त्यासी निमनेमावणीस लाविले वाटे ४ चार त्याजपैकीं दक्षिणेस भाटकर मिरासी नाईक वाटे २ व त्याचे उत्तरेस उकिडवा वाटे २ भाटकर मिरासी पैकीं असेत उत्तरेस उफाल वाटा पांचवा त्याची उगवणी केली जाईल येणेप्रमाणें चार वाटेची नेमावणी उगवणीस उकिडवा केला असे भाट मिरासी येईल ते दक्षिणेश वाटे दोन अनभवील येणेप्रमाणें लिखित दफात बार असे लिखित दामाजी तिमल कुल लिखीत जाणिजे वैशाख अखेर दशमी.

श्री.

छ श्री शके १५६५ वरीखे सुभानुसंवछरे चैत्र शु॥ पौर्णिमा तादिनी राजश्री त्रिविक्रम अग्निहोत्री साठे वाडी मुर्ग गोसावी यासी रामदे माहाजनी देसाई व गणो भास्कर सराप व नरसो पुरुशोत्तम खोत वाडे हार्य जोगदेवभट बरवे खोत व सातूभट उकिडवा व अनंतभट साठा व समस्त महाजनानी वाडी मुर्ग कसबा नेऊरे लिहून दिले भाट ऐसेजे वाडी मज-

कूरी तुम्ही भले थोर कुटुंबी असतां शाखभाजीस जमीन नाहीं असे पाहोन भाट निसबत जागली याचे नेमावणीस दिल्हे असे पुढें जागली कोणी येईल तो उत्तरे कडील निम तुम्हास मिरास करून दिल्हे असे या अलाहिदा मुलवस खाजण अग्नीहोत्रास दिल्हे साल दरसाल तुम्ही कमाविस करून खात जावे ! × × × × तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रास व आमचे पुत्र पौत्रानी चालावे यासी चुकेल त्यासी श्री देवाची आण असे तुम्ही त्रयोग्नीचे सेवा करून सुखी असिजे.

रामदे माहाजनी देसाई जोगदेवभट बरवे खोत कुको केशव कुलकर्णी
गणो भास्कर सराप अनंतभट साठे महाजनी मजकूर

---

## श्री.

आभये पत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी ताबा दादो जोगदेव बरवे खोत वाडा मुरुग कसबा कर्यात नेवरे सुभा प्रांत राजापूर सुा सलास मया व अलफ दिल्हे अभये पत्र ऐसिजे तुम्ही हुजुर येऊन विदित केलें की कृष्णो गणेश साठा वस्ती वाडा मजकूर यास पेसजी आगर होते त्यास धामधुमीमध्यें मोडक परागदा जाहला आगर सिपण यासी मरो लागले त्या उपरी केसो कृष्ण साठा बाप भाऊ यास माहालकरी यांनीं बोलावून नेला कृष्णा गणेश साठे याचे कोणी नाहीं याचे आगर सीपणे करितां मरो लागले तर या आगरास सिपणे घालणे म्हणोन माहालकरी याणी त्यास आज्ञा केली त्या वरून तो बोलिला कीं कृष्णो गणेश साठा याचे आगर मिरासेचे नव्हे सात पाच वर्षे त्याणे केले त्यास × × याकरितां परगदा जाहला परंतु आगर आपले मिरासेचे नव्हे त्या वरून मनास आणितां कृष्णो गणेशचे कोणी नाही व माहलचे कौल दाखविला त्या वरून हे अभये पत्र तुजला सादर केले आसे तर आगराची कीर्दी महामुरी करून

दिवाणचा महसूल देऊन सुखरूप राहाणे कोणे गोष्टीचा शक न धरणे केसो कृष्ण साठा यासी आगरास समंध नाही जाणिजे छ ५ माहे जिलहे.

---

जोगदेवभटाचे बंधु विठलभट. यांच्या वंशविस्तारापेक्षां जोगदेवभटाचाच वंश विस्तार मोठा आहे. जोगदेवभटाचे पुत्र सहा. व विठलभटाचे पुत्र दोन. जोगदेवाचे नातू बाबाजी बाळो. याचे नातू जनार्दन व रघुनाथ निळकंठ हे पुण्यास वर्षांतून कांहीं महिने रहात असत व यांचे घरा संबंधी पुढें दोन जुन्या कागदाचे उतारे देत आहे. त्यावरून हे शके १६९४ त पुणें येथें होते.

श्री.

राजश्री या विराजीत राजमान्य राजश्री जर्नादन निळकंठ व रघुनाथ निळकंठ बरवे मोकादम नेवरें हाली वस्ती पुणे स्वामींचे शेवेसी.

पो अंताजी विश्वनाथ मराठे सां नमस्कार विनंती उपरी × × ऐसेजे पुणीयामध्यें तुमची जागा होती ती आम्हास घर बांधावयास दिल्ही आम्ही घर बांधले उपरांत तुम्ही नांदावयास आला. ते समई म्हणू लागला की घरास पैका लागला यासाठीं निमे घरामध्यें तुम्ही रहावे व निमे घर तुम्ही आम्हास दिल्हे आम्ही तुम्हाजवळ पैका लागला तो मागू नये निमे घर मात्र आम्हास दिल्हे निमे घरासी तुम्हास बोलावयास संमंध नाही. जो पैका लागला तो मागावयाचा तुम्हास संबंध नाही. असा करार मातुश्री धोंडीबाई मामीने आपलें रुबरु करून दिल्हे. ते तुम्ही कबूल केले आम्ही कबूल केले निमे घरामध्यें आम्ही रहावे निमे घरामध्यें तुम्हीं रहावे यास अंतर करील त्यास श्रीची आण असे हे लिहिले सही शके १६९४ नंदननाम संवछरे जेष्ट शुा ३ त्रतीया सुा सलास सबैन मया व अलफ छ १ रबिलावल बिा

---

श्री.

राजश्री जनार्दन निळकंट बरवे मोकादम कर्यात नेवरें स्वामीचे शेवेसी.

पो चिंतामण हरी दीक्षित पटवर्धन नमस्कार विनंती उपरी आमचे वाड्याचे पिछाडीस पूर्वेस लागती जागा तुमची व कोणकराची आहे त्यास कोणकरी यांनीं आपले जाग्यातील जागा आम्हास दिल्ही त्या हदे प्रमाणें तुम्ही आपले जाग्यातील जागा सलग लांबी माहादोबा बाबाचे भिंती पावेतो आम्हास दिल्हीत त्याचे मोबदला आमचे घर आदितवारपेठेत गोविंदा सिपी×××× आहे ते इमल्या सुध्धा तुम्हास दिल्हे असे तुम्ही जागा आम्हास संतोषानें दिल्हीत मारफत अंताजी विश्वनाथ मराठे तुम्ही आम्हास जागा दिल्हीत त्या पलीकडे तुमच्या जाग्यात भिंत घालून × × आम्हास जागा दिल्हीत त्याचे पत्र करून द्यावेत येणे प्रो करार मिती चैत्र शुा १ शके ५५ विजय नाम संवछरे बहुत काय लिहिणे हे विनंती.

रघुनाथ निळकंठचे पुत्र वासुदेव रघुनाथ यांनीं काय कामगिरी केली, तें पुढील कागदावरून समजेल.

हुा

अज तर्फ उईलम हेनरी वाधीन साहेब बहादूर पर सियान सक्रटारी नीा सरकार वोा वासुदेव रघुनाथ बरवे मुकाम कसबे नेवरे वाडा मुरुग तालुके रत्नागिरी प्रांत कोंकण सुा खंमस सलासीन मियातैन व अलफ आम्हास बक्षिस व साहा महिन्याचा पगार मेजर रार्बटसन साहेब याणी देण्याचा कबूल केला होता त्याचे एकंदर रुपये ११०० देण्याविसी हुकूम व्हावा म्हणोन तुम्ही ताा २२ अप्रिल सन १८३४ इसवीर्चा अर्जी हुजुरांत दिल्ही तिचे उत्तर बंदीगान अली नबाब मुस्तता हजरत रैट हनराबल गवरनर साहेब बाहादुर दर इंलास कौंसल यांचे आज्ञेवरून लिहिले जाते जे तुम्ही जो दावा सागातां तो बहुत दिवसाचा आहे. इतके दिव-

सांत तुम्हांस अर्ज करण्यास बहुत आवकाश होता परंतु तुम्ही अर्ज न केला त्यास हाली तुम्ही दावा सांगता तो सरकारचे नजरेस बिलकुल वाजवी दिसत नाही सा तुमचा अर्ज नामंजूर रा छ १४ माहे शाबान मुा ता १६ दिशंबर सन १८३४ इसवी. W. H. Wathon

Secy. to Gt.

वासुदेव रघुनाथ यांनीं आपल्या पदरीं नोकर ठेवून, पेशवाई संपल्यावर कंपनी सरकारचा अंमल सुरू झाला, अशा वेळीं अडाणी लोकांवर दहशत बसवून कंपनी सरकारची चाकरी इमानें–इतबारें केली, हें जरी खरें तरी वरील पत्रावरून पहातां, इमानी नोकराशीं सरकार कसे वागले हें सिद्ध होत आहे. सदरहु हकाचे रुपये उशीरानें अर्ज आला या सबबीवर न देणें हें सरकारचे इभ्रतीस मोठें लांछन आहे. असो; सरकारनें बुडविलेमुळें व वासुदेवराव यांनीं 'श्रीकृष्णाप्रदक्षणा' गोकर्ण, रामेश्वर वगैरे यात्रा केल्या व दुसरें लग्न केलें. त्या मुलीचे वारसास ५५०० शें रुपये देऊन केलें. या सर्व कारणानीं कर्ज फार जाहलें होतें. प्रपंचविस्तार मोठा होता. हे शके १७७० मध्यें स्वर्गवासी झाले. यांना पुत्र सहा. सर्वांत धाकटे रामचंद्र खेरीज सर्वांनीं मोठाल्या अधिकाराच्या जागीं नोकऱ्या करून लौकिक संपादिला, हें पुढील माहितीवरून समजेल.

वासुदेव रघुनाथ यांचे सहा पुत्रांत सर्वांत मोठे विनायक वासुदेव होय. विनायकराव यांना एकदम चाळीस रुपये पगारावर नोकरी लागली. पुढें विजयदुर्ग येथें शिरस्तेदार झाले. या जागेवर असतां यांनीं अपूर्व युक्ति लढवून खोतांकडे सरकारसाऱ्याची बाकी फार थकली होती ती वसूल केली. खोतांकडून साऱ्याची बाकी वसूल करण्याचे कामीं इतर अधिकाऱ्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले होते. परंतु वसूल होईना. तेव्हां जिल्हा-अधिकारी यांनीं विनायकराव यांची काम करण्याची हुषारी पाहून यांना त्या कामीं नेमिलें. विनायकरावांनीं सर्व खोतांना जमवून समजावून सांगून पाहिलें. पुष्कळ वेळां मुदतीही दिल्या. खोतांनीं 'होय लवकरच बाकी देतों' असें सांगावें. परंतु कोणीही बाकी देत नाहींत, असें पाहून विना-

यकरावांनीं एकदम वरिष्ठाकडे दोनशें हत्यारी पोलिसांची मागणी केली. वरिष्ठांना मोठें आश्चर्य वाटलें कीं, 'हे इतके पोलिस कशाकरितां मागतात ?' परंतु वरिष्ठांनीं यांच्या हातून अन्याय होणार नाहीं हें जाणून पोलिस पार्टी पाठविली. इकडे पोलिस पार्टी येण्याचे पूर्वीं शंभर न्हावी बोलावून आणले. पोलिस पार्टी गांवांत आल्याचें खोतास कळलें. तरी खोत बेफिकीर होते. सर्व खोतांना अमुक दिवशीं सर्वांनीं कचेरींत येण्याचा हुकूम झाला, त्याप्रमाणें नेमलेल्या दिवशीं सर्व खोत जमले. अन्य जातीपेक्षां मराठे जातीचे खोत फार होते. हे मराठे खोत आपल्या त्या मोठमोठ्या मिशा व कल्ले यांच्या झोंकांत डोक्यावरील पिळदार पागोटीं घालून मोठ्या थाटानें कचेरींत आले होते. सर्व खोत जमलेले पाहतांच विनायकरावांनीं पूर्वसंकेताप्रमाणें हुकूम सोडिला. त्याबरोबर प्रत्येक खोतापुढें दोन पोलिस व एक न्हावी याप्रमाणें रुजू होऊन न्हाव्यानें खोताच्या कल्ल्यांवर व मिशांवर हल्ला केला. तेव्हां काय विचारतां? सर्व खोत म्हणाले, 'सरकार हें काय ?' तेव्हां विनायकराव शिरस्तेदार यांनीं त्यांना सांगितलें कीं, तुमच्या सर्वांच्या मिशा व कल्ले काढून आम्ही भरपाई करून घेणार!' हे शब्द ऐकतांच जो तो म्हणूं लागला कीं, 'हें काय! हें काय! सरकार आम्ही बाकी देतों.' तेव्हां पोलिसास हुकूम झाला कीं, खोतांबरोबर घरीं जावें व बाकी वसूल करून यावें. "द्रव्यापेक्षां अब्रू श्रेष्ठ" हा न्यायच आहे. वरील प्रकारच्या भीतीनें सर्व खोतांकडील बाकी वसूल झाली; व खजिना ( मिशाकल्ल्यांचे भरपाईनें न जातां द्रव्याची भरपाई होऊन ) जिल्ह्याकडे रवाना झाला. हें वर्तमान जिल्हा अधिकारी यांना समजतांच विनायकरावांस बोलावून सर्वांसमक्ष त्यांची फारच वाखाणणी करून त्यांना मामलेदाराची जागा देण्याबद्दल वर लिहिलें. पुढें कांहीं दिवस ते साळशी महालावर महालकरी होते. नंतर विजयदुर्ग, मालवण येथें मामलेदारी करून रत्नागिरीचे मामलेदार झाले. रत्नागिरी येथें सुमारें ७।८ वर्षें त्यांनीं मामलेदारीचें काम केलें. पगार मोठा झाला व पुष्कळ शिफारसपत्रेंहि मिळालीं. पुढें रत्नागिरीहून नगरजिल्ह्यांत दप्तरदारचे जागीं

नेमणूक झाली; तेव्हां नगरास जाणेचे पूर्वी रत्नागिरी येथील शहरवासी यांनीं विनायकरावांचा जो गौरव केला तो पुढील उताऱ्यावरून सर्वांस समजेल.

श्री.

सरटीफिकेट खाली सह्या करणारे जमेदार व सावकार व भले लोक रहाणार तालुके रत्नागिरी यांजकडून देण्यांत येतें ऐसाजे राजश्री रावसाहेब विनायक वासुदेव बरवे मामलेदार तालुके रत्नागिरी हे तालुके मजकुरी मामलतीचे कामावर सुमारें सात आठ वर्षे आहेत त्याणी रयत लोक वगैरे याचे इनसाफ व न्याय बहूत चांगले रीतीनें केले वर सरकारकामेही बरोबर रयतलोकाचे व सरकारचे नुकसान न होता हुशारीनें केली हे मामलेदार आणखी काहीं दिवस मामलतीचे कामावर तालुके मजकुरी असते तर रयतलोकाचे व सरकार नुकसान न होता फारच कल्याण जाहले असते परंतु सरकारनें मेहेरबानी करून त्यास मोठे अब्रूची जागा अहमदनगर येथील दप्तरदारीची दिल्ही हे ऐकोनही आम्हास मोठा आनंदच आहे याजकरिता हे सरटिफिकेट आम्ही सर्वांनीं मामलेदार यांस दिल्हे आहे ता २० माहे सपटेंबर सन १८४७ इसवी.

सह्या.

राघोबानायक सरदेसाई मामले प्रभानवल्ली सुभा प्रांत राजापूर व सुभा दाभोळ व देसाई ताा संगमेश्वर व ताा कोडिवरे व कसबा प्रभानवल्ली तालुके रत्नागिरी.

राघो सदाशिव फाटक खोत महाजन कुळकर्णी मौजे राहाटागर द. खु.

बाळाजी माहादेव आगाशे खोत माहाजन कुळकर्णी मौजे राहाटागर द. खु.

---

सर्टिफिकेटावर पुष्कळच सह्या आहेत. विनायकरावजी नगर येथें दप्तरदारीचे कामावर असतां, तेथेंच अधिक वैशाख वाा अमावास्येस शके १७७२ त स्वर्गवासी झाले. यांनीं एकंदर ३०।३२ वर्षे नोकरी केली. हे मोठे निःस्पृह व करारी होते. यामुळें सरकारदरबारीं यांचा मोठा लौकिक झाला. दप्तरदारीचे कामावर असतांना यांना कोल्हापूरचे दिवाणगिरी-

वर जाण्याचा हुकूम आला होता. त्यावेळीं हे आजारी असल्यामुळें यांनीं सरकारांत लिहिलें कीं, मी या आजारांतून उठणें शक्य नाहीं, तरी सरकार खाविंदानीं माझे बंधु शिकत आहेत, त्यांना सरकारांनीं लौकिकास चढवावें, अशी माझी मागणी आहे. विनायकरावांची मागणी सरकारांनीं मान्य केल्याचें पुढील माहितीवरून सहज लक्षांत येईल. विनायकरावानीं वडिलार्जित कर्ज फेडिलें. प्रपंच्याचा खर्च मोठा व सर्व बंधूंच्या शिक्षणासही बराच खर्च केला. शिवाय स्थावर व जंगम इस्टेटीची उत्तम व्यवस्था करून धर्मादाय कृत्येंही बरींच केलीं. शके १७६५।६६ त गांवच्या भगवती देवीच्या देवळाभोंवतालचा तट व देऊळ बांधिलें. आणि विहीर व फरशी केली. श्रीमानाईचें देऊळ शके १७६१ त बांधिलें. शके १७६७ त मौजे आडिवरें येथील श्रीमाहांकाळीचें देवळांजवळ श्रीचा नैवेद्य तयार करण्याकरितां मुदपाकघर बांधिलें व यावर देखरेख करण्याचें काम दिनकर कृष्ण भिडे खोत आडिवरें यांजकडे सोंपविलें. शके १७६७ त श्रीगणपती पुळें येथील उत्तर आंगच्या धर्मशाळेचा जीर्णोद्धार केला. आपलें उपास्य दैवत श्रीलक्ष्मी–नारायण या देवालयास लागून दिपमाळीपावेतों विस्तीर्ण लांकडी सभामंडप बांधिला. देवळाचे तटाचे आंत ईशान्य दिशेस असलेल्या श्रीहरिहरेश्वराचे देवळाचा जीर्णोद्धार केला. श्रीआदित्यनाथाचे देवळाचा जीर्णोद्धार केला. श्रीविश्वेश्वराचे देवालयाचा शके १७६२ त सुमारें १८०० शें रुपये खर्चून जीर्णोद्धार केला. चिंचवणे येथील श्रीसिद्धेश्वराचे देवळाच्या फरशीचा जीर्णोद्धार केला. लक्ष्मीनारायणाचे देवळांतील धर्मशाळा बांधिली. रत्नागिरीजवळील काळबादेवी येथील श्रीरामेश्वराचा व रत्नागिरी येथील श्रीभार्गवरामाचे मंदिरांचा जीर्णोद्धार केला. अशीं धार्मिक कामें बरींच केलीं आहेत. शके १७५६ त यांनीं पूर्वलौकिकास शोभेल असा रहाता वाडा बांधिला. रत्नागिरी येथील राहाटागर येथें शके १७६८ त घर बांधिलें. विनायकराव हे मोठे भाविक होते. नोकरीवर असतां कांहीं अडचणी आल्या अगर विशेष स्वप्नें पडूं लागलीं तर ' ग्रामदेवीस

कौल लावून प्रसाद पाठवावा,' अशीं घरीं पत्रें पाठवीत. विनायकरावांनीं सर्वांत पुण्यदायक काम जें केलें तें मालवण तालुक्यांतील मौजे आचरे येथील श्रीरामेश्वराचें उत्पन्न सोडविलें हें होय. मौजे आचरे येथील लोक सदैव त्यांची कीर्ति गात आहेत.

मे. एलफिन्स्टनसाहेब बहादुर यांनीं विनायकरावजींस १५० रुपयांची शाल व ब्लेन बाग बक्षिस दिली. सदरहु ब्लेन बागेस लागून असलेली फाटकांची जागा तीही फाटक खोत यांनीं त्यांना बक्षिस दिली. हल्लीं या ब्लेन बागेंतच गणपतराव नारायण बरवे रहात आहेत. स्वामित्वाबद्दल बरवे यांस कांहीं रुपये वार्षिक देण्याचें ठरवून त्या ब्लेन बागेंत हायस्कूल बांधिलें गेलें आहे. विनायकरावांना सांगली संस्थानचे सरदार अप्पासाहेब यांनीं लिहिलेलें पत्र पुढें देऊन हें चरित्र संपवितों.

श्री गणपतिर्जयति

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विनायकपंत बरवे स्वामी गोसावी यांसी

पो। चिंतामणराव पांडुरंग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष चिरंजीव राजश्री विनायकराव भाऊ यांची पत्नी चिरंजीव सौ। गंगाबाई कार्तिक व। ६ मंदवारीं प्रात:काळीं पांच घटका दिवसास प्रसूत जाहली, पुत्र जाहाला तुम्हास कळावे रवाना छ २७ माहे सवाल बहुत काय लिहिणें लोभ करावा " हे विनंति. "

---

गोविंद वासुदेव ऊर्फ बाबासाहेब बरवे यांनीं वडील बंधु रत्नागिरीस मामलतीवर असतांनाच मिऱ्यागांवावर तलाठी झाले. पुढें सुभाईतमध्यें दाहा रुपयांवर नोकर राहिले. पुढें पोलिसखातें स्वतंत्र झालें त्या वेळीं त्या खात्यांतील कारकुनाचे जागीं कायम झाले. हे विलक्षण बुद्धीचे व मोठे चौकस असत. गोविंदरावजी एके दिवशीं वरिष्ठ साहेबाकडे कांहीं प्रकरणें दाखविण्याकरितां गेले त्यावेळीं साहेबांनीं सर्व प्रकरणें पाहिलीं व

म्हणाले, ' गोविंदरावजी !! एका क्ष इसमानें आमच्याकडे फिर्याद आणिली आहे. तो म्हणतो, सोन्याचें जोडवें माझ्या रखेलीनें चोरिलें. त्याच्या सांगण्यावरून तिची झडती घेतली; धाकदपटशा करून पाहिलें, परंतु पत्ता नाहीं. तेव्हां तपासाचें काम तुम्हीं करावें.' त्यावर साहेबाच्या हुकुमावरून गोविंदरावजीनीं वरील जिन्नस त्या रखेलीनें ठेवलेल्या गुप्तस्थलापासून युक्तीनें काढला! अशी ही विलक्षण प्रकारची चोरी पकडून दिल्यामुळें गोविंदरावजीस एकदम हर्णै येथें कोतवालीची जागा मिळाली. पुढें संगमेश्वर येथें ही ते कांहीं वर्षे होते. प्रापंचिक अडचणीमुळें अखेरीस यांनीं नोकरी सोडिली. पुत्रवियोगामुळें व अन्य कारणानीं प्रापंचिक वृत्ति सोडून ते सारखे ईश्वरभजनांत निमग्न असत. व घरापासून १५।२० हातांवर एक लहानसें झोंपडें केलें होतें तेथें रहात; प्रापंचिक भार केशव जनार्दन याजवर सोंपवून दिला. यांना फुलांचा षोक फारच असे!! आपले गांवाचे आसपास कोस दीड कोस फिरून मिळतील तितकीं फुलें ते स्वतः आणीत; व ज्या दिवशीं फुलें पुष्कळ मिळतील त्या दिवशीं त्यांची देवपूजा फारच आनंदानें होई. लेखकास यांचें मृत्यूपत्र पाहण्यास मिळालें त्यावरून पाहतां यांचे कनिष्ठ बंधु नारायण वासुदेव यांनीं गोविंदबाबास प्रापंचिक व्यवहारांत फारच छळलें, असें स्पष्ट दिसून येत आहे.

कै. रावबहादुर नारायण वासुदेव बरवे यांचें मराठी शिक्षण होऊन इंग्रजी शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाल्यावर ते पोलिस सुपरिंटेंडेंटच्या ऑफिसांत दहा रुपये पगारावर नोकर राहिले. पुढें कांहीं वर्षांनीं डिस्ट्रिक्ट कोर्टांत गेले. रत्नागिरी, ठाणें नंतर पुणें; पुणें येथील कोर्टांतून संस्थान अक्कलकोट येथें न्यायाधीशाचे जागेवर गेले. पुढें कांहीं वर्षांनीं कारभारी झाले. तेरा वर्षें नोकरी झाल्यावर सन १८८४ त त्यांनीं पेन्शन घेतलें. सरकारी नियमाप्रमाणें पेन्शन १३४८२८२ झालें.त्या वेळीं संस्थानचे राजे अज्ञान, म्हणून त्यांची आजी श्रीमंत बयासाहेब यांनीं कारभारी नारायण राव यांना दरमहा पेन्शन दोनशें रुपये मिळावेत, अशाविषयीं सरकारांत

खटपट केली; परंतु नियमापेक्षां पेन्शन जास्त देतां येत नाहीं असें समजलेवरून, श्रीमंत बयासाहेब यांनीं दोनशें रुपये भरीची रक्कम संस्थानामधून देवविण्याची तजवीज केली. यावरून नारायणरावांनीं संस्थानची सर्व सुधारणा करून उत्तमप्रकारें कारभार केल्याचें सिद्ध होत आहे. नारायणराव दोनशें रुपये पेन्शन घेऊन नेवरें मुक्कामीं येऊन राहिले. हे रत्नागिरी डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाचे व्हाईस प्रेसिडेंट तहाहयात होते. तसेंच जेल व ल्युनाटिक असायलमचे व्हिजिटर होते. केशवराव जनार्दन यांचेबरोबर व्यवहार जमेना, म्हणून हे नेवऱ्यास न रहातां रत्नागिरी येथेंच रहात असत. हे सन १८९९ त वयाचे ७६ वे वर्षीं रत्नागिरी येथेच मृत्यू पावले. यांना पुत्र दोन; विष्णुपंत रेल्वेंत नोकर होते; यांना पुत्र तीन; व गणपतराव अकौंटंट ऑफिसांत नोकर असून वडिलार्जित घरांतच रहात आहेत. यांना पुत्र भालचंद्र व नारायण; कृष्णाजी विष्णु हे सासवड येथें सब्‌जज्ज कोर्टांत क्लार्क आहेत; चिंतामणी दत्तक गेला. श्रीधर हे पुणें येथें नोकर आहेत. गोपाळ वासुदेव हे भिवंडी व नसरापूर ( कर्जत ) येथें मामलेदार होते.

कै. रावबहादूर माधवराव वासुदेव बरवे, सी. आय. ई., स्टेटकारभारी ऑर दिवाण, स्टेट कोल्हापूर. माधवराव बरवे मोठा भाग्यशाली पुरुष. लहानपणापासूनच मोठा हुषार व कुर्रेबाज! यांचा मराठी अभ्यास झाल्यावर हे इंग्लिश शिकून एलफिन्स्टन कॉलेजांत गेले. सन १८५६ मध्यें डेप्युटी इन्स्पेक्टर झाले. सन १८६५ त डेप्युटी कलेक्टर झाले. नंतर सन १८७० त संस्थान कोल्हापूरचे कारभारी झाले. मध्यें कांहीं दिवस माधवराव फॅमिन कमिशनरचे जागीं होते. त्यानंतर परत दिवाणगिरीवर आले. या जागेवर असतां सन १८८२ त यांनीं अब्रूनुकसानीबाबद जी फिर्याद केली ती सर्वत्र महशूर आहेच. या जागेवर इतर कोणीही असता तरी त्याला त्याच्या अधिकारानुसार असेंच करावें लागलें असतें. माधवरावांनीं संस्थानचा कारभार फार उत्तम करून संस्थानची फार किफायत केली. तसेंच कोल्हापूरची सर्व सुधारणा यानींच केली. माधवराव

यांनीं आपला द्रव्यसंचय धार्मिक कृत्यांत बराच खर्च केला. त्यांनीं केलेल्या धार्मिक कृत्यांपैकीं कांहीं पुढें देतों:--

धोममहाबळेश्वर येथें श्रीकृष्णा उगमाजवळ एक धर्मशाळा बांधिली आहे. आंबेघाटांत एक तळी व धर्मशाळा बांधिली आहे. चारपांच हजार रुपये खर्च करून श्री गणपतीपुळ्याच्या देवळाचा जीर्णोद्धार केला आहे. तसेंच रत्नागिरीजवळील काळबादेवी खाडींतील श्रीरामेश्वराच्या देवालयाचा धक्का दोन हजार रुपये खर्च करून बांधिला आहे. याप्रमाणें कांहीं लहान लहान देवळांचे जीर्णोद्धार केले आहेत. माधवराव हे अविभक्त कुटुंबव्यवस्थेचे अभिमानी होते. यांनीं अजमासें ३०–३२ हजार रुपये एकत्र कुटुंबास खर्च केले. यांना सालिना पांच हजार रुपये पेन्शन होतें. माधवराव कायदेकौन्सिलचे सभासद होते. यांनीं रत्नागिरी येथें वडील बंधू विनायकराव यांनीं बांधिलेल्या घरावर दुमजला केला. हे नेहेमीं फिरते रहात असत. पुणें, महाबळेश्वर, मुंबई व रत्नागिरी या गांवांपैकीं विशेषतः पुणें शहरीं त्यांचें जास्त वास्तव्य असे. माधवराव सन १८९१मध्यें पुणें मुक्कामीं स्वर्गवासी झाले. यांचे चिरंजीव हरिभाऊ हे ग्रॅज्युएट असून फार हुषार होते. यांनीं चांगला लौकिक संपादिला असता; परंतु अकालिक मृत्यु पावले. यामुळें रावबहादुर यांना पुत्रशोक होणें साहजिकच आहे. हरिभाऊ यांचे दत्तक पुत्र विनायकराव ऊर्फ अप्पासाहेब; यांचें पूर्व नांव चिंतामणी होय. अप्पासाहेब हे रत्नागिरी येथें वडिलार्जित इस्टेट अनुभवून आहेत.

सन १८९३ त लंडन येथील मॅकमिलन अँड को० मध्यें छापून प्रसिद्ध झालेलें पुस्तक ‘दि गोल्डन बुक ऑफ इंडिया’ यांत माधवराव बरवे यांस सन १८७७ त रावबहादुर किताब मिळून ते पुढें सी० आय० ई० झाले; सन १८८५ त नारायणराव बरवे हे रावबहादुर झाले, असा उल्लेख आहे.

केशवराव जनार्दन बरवे मोकादम यांचा जन्म शके १७९१ त झाला. यांचा ज्या दिवशीं जन्म झाला त्याच दिवशीं घरांतील २५।३०

माणसें काशी यात्रेस गेलेलीं त्याच दिवशीं काशीस पोंचलीं. दिवाण बहादुर माधवराव यांनीं केशवरावास विद्याभ्यासाकरितां कोल्हापूर येथें आपलेजवळ ठेविलें होतें. पुढें कांहीं वर्षांनीं माधवराव यांनीं नेवरें येथें शाळा नव्हती, म्हणून शाळागृह ४०० रुपये खर्चून बांधिलें. व शाळा-अधिकाऱ्यांस लिहिलें त्यावरून शाळा सुरू झाली. या शाळेंत मराठी पांच इयत्ता झाल्यावर केशवरावांस इंग्रजी शिकण्याकरितां रत्नागिरी येथें ठेविलें. येथें नारायणरावाकडून विशेष त्रास होऊं लागल्यामुळें हे पळून नाटकांत गेले. हें माधवरावांस समजतांच नाटकांतून आणून घरीं ठेविलें. पुढें अभ्यास करून मराठी सहावी इयत्ता पास झाले. नेवरें येथील घरची सर्व व्यवस्था पाहूं लागले. तों सरकार दरबारीं माहितीकरितां केशव-राव यांनीं तलाठी, सुभांत कारकुनी, सेन्सर ऑफिसांत रेकार्डकीपर, देवगड येथील नवीन बोटखात्याचे स्पेशल ऑफिसर वगैरे नोकऱ्या सनं १८९१ अखेरपर्यंत केल्या. मागें सांगितलेंच आहे कीं, आचरें येथील श्रीरामेश्वराचें उत्पन्न विनायक वासुदेव यांनीं सोडविलें. एकदां आचरें गांवीं तेथील यांचे स्नेही पोष्ट मास्तर यांनीं भेटण्यास बोला-विल्यावरून त्यांना भेटण्याकरितां केशवराव गेले. तेव्हां आचरें येथील लोकांनीं ( श्रीरामेश्वराचें उत्पन्न ज्यांनीं सोडविलें त्यांचे नातू ) केश-वराव आल्याचें समजतांच सामोरे गेले. व त्यांना देवळांत नेऊन पान-सुपारी करून देवळाचे महाजनानीं बोलून दाखविलें कीं, हें देवाचें संस्थान तुमच्या आजोबांच्या खटपटीनें लाभलें. केशवरावांना घरच्या व्यवस्थे-करितां नोकरी सोडावी लागली. नारायणराव व केशवराव यांच्यांत चाललेल्या खटल्यांत खर्च बराच झाला. नारायणराव वारल्यावर पुढें आपसांत वांटण्या करून निकाल लावून घेतला. खुद्द नेवरें येथील जोग-देव भटाचे वास्तूंत विनायकराव यांनीं बांधलेल्या वाड्यांत केशवराव आपल्या मुलाबाळांसह रहात आहेत. यांना गांव मुनसफीचा अधिकार आहे. यांना इस्टेटीचें स्वास्थ्य करण्याकरितां अत्यंत त्रास सोसावे लागले. या घरांतील नामांकित वर्णन करण्यासारखी गोष्ट ती ही कीं, आला-

गेल्यास अन्नदान व उपास्यदैवत्य श्रीलक्ष्मीनारायणाची पूजा वगैरे चालविणें. विनायक वासुदेव नगर मुक्कामीं वारले. पुढें त्यांची क्रिया करीत असतां पिंडास कावळा शिवेना; जेव्हां वर सांगिल्याप्रमाणें अन्नदान व श्रीची पूजा यांत अंतर पडूं देणार नाहीं असें बोलले, तेव्हां ताबडतोब पिंडास कावळा शिवला! तसेंच नेवरें येथें गोविंदबाबांना घोंगडीवर काढलें असतां प्राण जाईनात. तेव्हां केशवरावानीं अन्नदान व लक्ष्मीनारायणाची पूजा वगैरेंत अंतर पडूं देणार नाहीं असें सांगितलें. तेव्हां त्यांनीं एकदम डोळे उघडून केशवरावाकडे पाहिलें आणि प्राण सोडिला!

केशवरावांनीं नेवरें येथें शाळेकरितां शेंकडों रुपये खर्चून शाळा मोठी व दुरूस्त केली. सदरहु खर्चाचे रकमेची भानगड होऊन, एका अदूरदर्शी विचित्र प्रांत साहेबांनीं सारासार विचार न करितां नेवरें येथील शाळाच बंद केली! वास्तविक पाहिलें तर या शाळेसाठीं कै. माधवराव बरवे व रा. केशवराव बरवे यांनीं पैसे खर्च केले व शाळेला जागाहि दिली. अशी स्थिति असतां ती अशा चमत्कारिक रीतीनें बंद करण्यांत यावी, हें विलक्षण आहे. शाळा नसल्यामुळें तेथील मुलांची मोठी गैरसोय होत आहे. तरी विद्याखातें इकडे लक्ष्य देऊन पुन्हां शाळा सुरू करील, अशी आशा आहे. नेवरें येथें बरवे यांच्या पूर्वजांनीं अश्वत्थाचे पार किती तरी बांधिलेले दृष्टीस पडत आहेत. गोविंद वासुदेव वारल्यानंतर सन १८९६ त यांचे घरांतील हत्यारें जप्त झालीं. पुढें केशवराव यांनीं घरांत हत्यारें ठेवण्याची परवानगी मागितली. तेव्हां मे. बमनजी कलेक्टर साहेबांनीं पैसे भरून लायसन घ्यावें असें फर्माविलें. त्याप्रमाणें पैसे भरून लायसनून हत्यारें ठेविलीं. परंतु ही गोष्ट आपल्या घराण्याशीं सरकारांनीं वाईट केली, हें केशवरावांच्या लक्षांत होतेंच. पुढें मे. मेकानकी साहेब बहादुर यांचेकडे दाद मागितली. तेव्हां मे. साहेब बहादुरांनीं सर्व गोष्टींचा पोक्त विचार करून, केशवराव जनार्दन बरवे मोकादम यांनीं आपलेजवळ हत्यारें मोफत बाळगावींत, असें लिहून यांच्याकरितां हिंदुस्थानचा हत्याराचा कायदा माफ आहे,

असें सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध करविलें. केशवरावांनीं लोकल बोर्डांत मेंबर असतांना शिरगांवहून कोतवड्यास व कोतवड्याहून नेवऱ्यास सडका केल्या. कोतवड्याहून नेवऱ्याची सडक यांनीं खासगी खर्चानें केली. सदरहु सडकेस बराच खर्च झाला; परंतु ५५० रुपये घेऊन ती सडक लोकल बोर्डाचे स्वाधीन केली. सरकारी मोठे अधिकारी, शिपाई व पान्थस्थ वगैरे लोकांची यांचे घरीं सारखी रहदारी असते. केशवरावजींचे पूर्वजांनीं धरणकरणी ग्रामदेवीचे नावचा नारळ पालखींत बांधिला होता; परंतु केशवरावांनीं देवीची परवानगी घेऊन चांदीची एक हात उंचीची मूर्ति करून नारळाऐवजीं शके १८२४ त पालखींत बसविली. केशवरावजी मोठे खर्चीक असून त्यांची वागणूक साधी जुन्या पद्धतीची आहे. केशवराव स्नानसंध्याशील आहेत. यांनीं घराचेजवळ उत्तर दिशेस औदुंबराखालीं श्रीदत्ताच्या पादुका स्थापिल्या आहेत. यांनीं जुने कागदपत्र पाहण्याचे कामीं व पुस्तकाचे खर्चाकरितां योग्य मदत केल्याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे.

कर्यात नेवरें येथील श्रीलक्ष्मीनाराणाचे देवालयाचे भोंवतालचा चिरेबंदी तट पूर्व पश्चिम लांबी १२२ फूट आहे. रुंदी दक्षिणोत्तर ७९।८ फूट आहे. तटाची उंची ७।६ आहे. सदरहु तटाचे आंत चिरेबंदी फरशीवर ३।९ उंचीच्या, ७८ फूट पूर्व-पश्चिम लांबीच्या व २५ फूट दक्षिणोत्तर रुंदीच्या चौथऱ्यावर श्रीचा गाभारा, पुढें सभामंडप व दुसरा नवा सभामंडप आहे. खालील फरशीचे तळापासून शिखराचे कळसाचे शेवटाची उंची अदमासें ५० फूट होईल.



केशवराव जनार्दन बरवे, मोकादम कर्यात नेवरें





डॉ. मनोहर हरि बरवे, सं. फलटण





## पुणें व संस्थान फलटण येथील हरवे याचा वंशवृक्ष



## पुणें व संस्थान फलटण येथील बरवे यांची माहिती

कर्यात नेवरेहून अनंत निघाला तो देशावर संस्थान फलटण येथें येऊन मालकाची मर्जी संभाळून तेथें मिरास मिळवून घर करून राहिला. पुढें याचा मुलगा व नातू ( गोपाळ व बापू ) सोलापूरास बरीच वर्षे पलटणींत सुभेदार होते. यामुळें यांना सोलापूरकर बरवे म्हणत. शंभू माहादेव व फलटण येथील दानपत्रावर त्यांच्या सह्या आहेत. बापूचें वय शंभरावर बरेंच गेलें होतें. ते वारले असें समजून पुढील सर्व तयारी करितात तों पुन्हां जिवंत होऊन बारा वर्षे वांचले ! यांचा मुलगा महादेव हा मोठा कुशल होता. याचा मुलगा नारायण याचे मुंजीचे मातृ–भोजनाचे वेळीं गोरे ( सोजीर ) घरांत शिरले व सर्व लूट करून गेले ! त्यामुळें माहादेव दीन स्थितीत सर्व कुटुंबासह पुणें येथें आला. नंतर पुणें येथील त्यावेळचे प्रसिद्ध माणकेश्वर यांचेकडे राहिला. त्यांच्या आश्रयानें कांहीं दिवस गेल्यावर पुणें येथें घर बांधिलें. सदरहु घर शनवारपेठेंत विद्यमान आहे. हा लेखणीबहाद्दर तर होताच; परंतु रांगोळ्या घालण्यांत याचा नंबर पहिला होता ! रांगोळ्या रंगी–बेरंगी फारच सुंदर घाली. बाजीराव पेशवे कोठें भोजनास जात तेथें रांगोळी महादेव बरवे यांनींच घातली पाहिजे असें होतें! कारण, या कामाबद्दल सालिना तीनशें रुपयांची नेमणूक होती. मरणसमयीं सर्वांशीं विचारपूस करून त्यानें शांतपणानें प्राण सोडिला. त्यावेळीं याचें वयमान शंभराचे पुढें होतें.

माहादेवाचे बंधू बाळकृष्ण नामांकित वैद्य होते; व जनार्दन घरचा सर्व कारभार पाही. नारायण पंडितगिरी करी. हरी नामांकित तालिमबाज होता. बडोद्यास जाऊन खंडेराव महाराज यांची मर्जी संपादन करून डाकूर संस्थानचे हरीभाऊ हे कारभारी झाले. हें काम उत्तम प्रकारें चाळीस वर्षे केलें. पुढें पुण्यास येऊन वडिलार्जित इस्टेट सोडविली. पुण्यांत यांचे घरीं केळीचें मखर फारच प्रेक्षणीय होत असे! तें यांचेंच हस्तकौशल्य होय.

महाराष्ट्र पुणेरी पगडीचे उत्पादक हेच होत. बाळंभट दादा ( ब्राह्मण मल्ल ) मोठे प्रसिद्ध होते. त्यांचें हे शिष्य होत. यांचें मत असें होतें कीं, " मरावें काशी अथवा मिराशी ! " हे आपले मिराशी येथें म्हणजे फलटण येथें वारले. त्यावेळीं त्यांचें वय ८० वर्षांचें होतें. यांनीं मल्लविद्येवर लेखही लिहिले आहेत. यांचे चिरंजीव मनोहरपंत हे संस्थान फलटनचे चीफ मेडिकल ऑफिसर आहेत. शिवाय दुसरीं हुद्यांचीं कामेंही यांचेकडे आहेत. श्रीमंत सरकारची यांचेवर पूर्ण कृपा आहे. यांनीं दोन वेळां तीर्थयात्रा केल्या. हे स्नानसंध्याशील आहेत. वागणूकही अगदीं साधी आहे. यांनीं शेतीवाडी बरीच केली आहे. यांना पुत्र पांच; ते तत्रे विद्यार्थी आहेत.

दामोदर बाळकृष्ण हे भगवद्भक्त होते. पुणें येथें हे आपले घरीं गोवर्धनाचा उत्साह मोठ्या थाटानें करीत. वामन जनार्दन यांनीं जी. आय. पी., सदर्नमराठा, राजपुताना, माळवा इत्यादि रेल्वेंत नोकरी केली. जवळ जवळ अटकेपर्यंत रेल्वेच्या नोकरीच्यासंबंधानें गेले होते. वामनराव यांस पुत्र दोन; अनंत व गंगाधर; गंगाधर हे वारले असून त्यांचे तीन मुलगे आहेत. अनंतराव यांचें वय पन्नाशीच्यावर आहे. यांना दोन मुलगे आहेत. अनंतराव हे मोठे लेखनव्यवसायी आहेत. ' पुणेंवैभव 'च्या शेवटच्या अमदानींत व ' जगद्धितेच्छू 'च्या आरंभीं कांहीं वर्षें हे त्या पत्रांत लिहीत होते. पूर्वीं ठाण्याचें ' सूर्योदय ' आणि ' हिंदुपंच ' या दोन पत्रांत यांनीं कांहीं वर्षें लिहिलें आहे. अलीकडे ' करमणूक ' पत्रांतही लिहीत होते. नाशिक येथें स्वतंत्र छापखाना काढून तेथें यांनीं बरींच वर्षें ' लोकसेवा ' पत्र चालविलें होतें. विशेषेंकरून नाट्यविषयाकडे यांचा प्रयत्न अधिक आहे. शुकरंभा, प्रतापसिंह, मातृशिक्षाप्रभाव, लोकमतविजय, समजुतीचा घोंटाळा, सुदाम, प्रल्हाद, शारदामंडन, गोपीचंद, भीष्मपर्व, कर्णपर्व, मिराबाई इत्यादि गद्यपद्य नाटकें यांनीं लिहिलीं असून त्या सर्वांचे प्रयोग रंगभूमीवर होत आले आहेत.

' नाट्यकला ' नांवाचें एक मासिक पुस्तकही हे चालवीत होते. नाट्यविषयाच्या सुधारणेसाठीं स्थापन झालेल्या 'भारत नाट्यसमाजा'चे हे एक ' कार्यकारी ' चिटणीस असून आज बारा वर्षें केवळ स्वतःच्या खटपटीनें हे नाट्यसंमेलनेंही भरवीत आहेत. नाट्यविषयाची आवड असलेले अनेक विद्वान् व थोर गृहस्थ आणि नाटकमंडळ्या या संमेलनांत जमून नाटकविषयाची सालदरसाल चर्चा करीत असतात. हल्लींही नाटकें रचून देऊन त्यांवरच यांचा विशेषतः निर्वाह चालू असतो. नाटकाशिवाय कांहीं निबंधात्मक, कवितात्मक व कथात्मक अशीं लहान लहान पुस्तकेंही यांनीं लिहिलीं आहेत. यांची रहाणी अगदीं साधी असून हे स्वभावानें फार गरीब आहेत.

परशराम दामोदर हे नामांकित गवई होते. हे पूर्ण विठ्ठलभक्त होते. सर्व संस्थानांत यांची मान्यता असे. यांनीं आळंदी येथें स्वामीचे मठाचा दरवाजा चांदीचा करून आपले नांव अजरामर केलें. यांचे दोन मुलगे उमरावतीकडे आहेत.

---

* अनंत हा पुरुष नेवऱ्याहून निघोन फलटण येथें आला, असें अनंताचे वंशजांचें म्हणणें आहे. नेवरेकरांचे वंशवृक्षांत, बाळो जोगदेव यांचा मुलगा अनंत व दुसरा राघो जोगदेव याचा खापरपणतू अनंत गणेश, असे दोनच आहेत. या दोघांपैकीं काळाचा विचार केला असतां बाळो जोगदेव याचा पुत्र जो अनंत तोच कदाचित् फलटणास आला असावा असें वाटतें.

# मौजे लिंब, श्रीक्षेत्र वाई, पनवेल व वसई–पापडी येथील बरवे याचा वंशवृक्ष.




---

+ गोविंद नारायण उर्फ गोविंद बुवा हे प्रसिद्ध महान् भगवद्भक्त झाले.

## मौजे लिंब येथील बरवे यांची माहिती

जोगदेवभटाचे पणतु हरि जिवाजी यांनीं श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे कारकीर्दींत खुद्द नेवरें येथील इनामी उत्पन्नाची अफरातफर करून सातारानजीक कृष्णाकांठीं लिंब येथें आपला तळीराम कसा गार करून घेतला वगैरे सर्व हकीकत सरदार पांडुरलीकर बरवे यांच्याजवळील मिळालेल्या बखरींत हरि जिवाजी यास मिळालेल्या विशेषणावरून कोणाच्याही लक्ष्यांत येण्यासारखी आहे. या हरि जिवाजीचा वंश लिंब येथें आहे. दत्तात्रय गोविंद व त्यांचे धाकटे बंधु श्रीपाद हे उभयतां बंधु हरि जिवाजीनें बांधिलेल्या वाड्यांत वास्तव्य करीत आहेत. हरि जिवाजीनें आपल्या घरास लागून लक्ष्मीनारायणाचें लहानसें देऊळ बांधिलें आहे. दत्तात्रेय व श्रीपाद हे वडिलार्जित उत्पन्न व नेवरें येथील मोकादमी हक्क यांवर प्रपंच करीत आहेत. दत्तात्रेय ह्यांना अपत्य नाहीं. श्रीपाद यास तीन मुलगे आहेत.

## श्रीक्षेत्र वाई येथील बरवे यांची माहिती

श्रीक्षेत्र वाई मुक्कामीं राघो जोगदेव याचे पणतु बाळाजी जगन्नाथ यांनीं वाई येथें वस्ती केली असें वाटतें. यांच्या चार पुत्रांपैकीं दोन पुत्र सखाराम व मोरो हे येवलेकर बरवे यांचेकडे दत्तक गेले. विद्यमान येवलेकर बरवे ह्यांचेच वंशज होत. बाळाजीचे पुत्र परशुराम याचे नातु रामचंद्र जगन्नाथ व गणेश त्र्यंबक हे आहेत. रामचंद्रपंत हे काठेवाड रेल्वेंत नोकर होते. हल्लीं रामचंद्रपंत व गणेश त्रिंबक हे नासिक येथें असतात. गणेश त्र्यंबक हे नाशिक येथें नाकेदार आहेत. बाळजीचे चौथे पुत्र काशीनाथ यांचे नातु **गोविंद नारायण**

हे महान् भगवद्भक्त होऊन गेले. गोविंदबुवा यांचे वडील नारायण शास्त्री हे अग्निहोत्री होते. नारायणशास्त्री यांनीं वाई मुक्कामीं कोरान्न मागून व अग्नीपुढें जें कांहीं मिळेल त्यावर चरितार्थ चालवीत. एकदां हे कोरान्नासाठीं सरदार रास्ते यांचे वाड्यांत गेले. रास्ते यांनीं यांचे लोट्यांत बरेंच द्रव्य घातलें. हे घरीं येऊन पहातात तों आंत रुपये व पुतळ्या ! त्या द्रव्यानें त्यांनीं कृष्णातीरीं वाई येथें घर व होमशाळा बांधून त्यांत ते राहिले. पुढें यांचें कुटुंब वारल्यावर यांनीं वाई सोडून श्रीक्षेत्र काशी येथें जाऊन तेथें बरेच दिवस स्नानसंध्या करीत असतां ते तेथें संन्यास घेऊन समाधिस्थ झाले. नारायणशास्त्री यांना पांच पुत्र होते. सर्वांत कनिष्ट गोविंद. हे गोविंद पूर्वपुण्याईच्या जोरावर या जन्मीं नामांकित सत्पुरुष होऊन गेल्याचें प्रसिद्ध आहेच. गोविंदबुवा यांनीं आमरण कडकडीत ब्रह्मचर्य पाळून निरंतर पायीं तीर्थयात्रा पुष्कळ वेळां केल्या. हे प्रत्यहीं बाराशें नमस्कार घालीत असत. गोविंबुवा हे लहानपणापासून फार हुषार व पारमार्थिक बुद्धीचे असल्यामुळें त्यांनीं बारावें वर्षींच वाई सोडिली. व तेथून सांगली वगैरे ठिकाणीं जाऊन शास्त्र वेदाध्ययन शिक्षण झाल्यावर ते थोडेसें इंग्रजीही शिकले. नंतर तीर्थयात्रा, स्नानसंध्या करण्याचा व समाधि लावण्याचा यांना अतिशय नाद लागला. यांनीं पुष्कळ वर्षें गोसाव्यांच्या संगतीनें अनेक तीर्थयात्रा केल्या. नंतर नर्मदाप्रदक्षिणा करून त्यांनीं हिंदुस्थानांतील सर्व तीर्थें व देवस्थानें पाहिलीं. अशारीतीनें स्वच्छंदानें फिरत असतांना नर्मदातीरीं श्रीगजाननमहाराज म्हणून एक गणपतिभक्त तपस्वी होते, त्यांची गांठ पडली. त्यांनीं गोविंदबुवांची वृत्ति पाहून यांचेवर कृपा केली व यांना गणपतिउपासना देऊन तें व्रत पुढें चालविण्याबद्दल उपदेश केला. व त्या गणपतिभक्तानें आजन्म खांद्यावरून वागविलेली श्रीगणेशगीतेची पोथी व श्रीगणपतिपंचायतन गोविंदबुवांचे स्वाधीन करून ते गजाननमहाराज नर्मदातीरीं समाधिस्थ झाले. गजाननमहाराजांचे हजारों भक्त होते व अद्यापिही पुष्कळ ठिकाणीं त्यांचे

भक्त आहेत. गोविंद्बुवांनीं श्रीगजनानाच्या उपासनेचें काम पुढें चालू केलें, व ज्या ज्या ठिकाणीं गजाननाचीं अनादिस्थानें आहेत तेथें तेथें जाऊन व त्यांचीं दर्शनें घेऊन व प्रयागाहून हरिद्वाराहून पायांनीं गंगेच्या कावडी आणून ठिकठिकाणचे गजाननाचे स्थानास अर्पण केल्या आहेत. यांचेवर हजारों भाविक लोकांची भक्ति बसली व लोक त्यांच्या देवाप्रमाणें भजनीं लागले. त्यांचे अनेक अलौकिक चमत्कार लोकांचे अनुभवास येऊं लागल्यामुळें वऱ्हाड, खानदेश, मध्यप्रांत या बाजूला यांचे लाखों भक्त झाले आहेत. गोविंद्बुवांनीं एरंडोल तालुक्यांतील श्रीक्षेत्रपद्मालय येथील श्रीगजाननाचे देवालयाचा जीर्णोद्धार केला. याकामीं हजारों रुपये खर्च झाला. त्यांनीं सर्व जातीच्या व धर्माच्या मनुष्यांना अन्नदान केलें व त्यांना त्यांचे स्थितीप्रमाणें स्वधर्माचरण व दानधर्म करण्याविषयीं बोध केला. गोविंद्बोवा लिंबाचा रस व फलाहार करून असत. त्यांतून आजन्म ब्रह्मचारी ! अत्यंत धर्मनिष्ठ ! व पूर्ण वैराग्यशील होते. यांचे तपाचें तेज इतकें अलौकिक होतें कीं, कोणत्याही मनुष्यानें यांचें दर्शन घेतल्याबरोबर त्या मनुष्याचें अंतःकरण आनंदानें प्रफुल्लित होई व त्या मनुष्यास बोवानीं जी आज्ञा करावी ती तो मान्य करी. गोविंद्बोवांनीं अनेक देवालयें, धर्मशाळा व विहिरी वगैरेंचा जीर्णोद्धार केला आहे. गोविंद्बोवा बरवे शके १८३६ पौष्य शु॥ ५ रोजीं श्रीक्षेत्र उपनदेव ता. चोपडें, जि. खानदेश येथें कैलासवासी झाले! क्षेत्र उपनदेव अगदीं डोंगरांत असून तेथें ऊन पाण्याचें उन्हाळें व 'शरभंग' ऋषींचा आश्रम आहे. गोविंद्बोवानीं त्या उन्हाळ्याला गायमुख बसवून पाण्याचें कुंड दुरुस्त करून, तेथें एक सांबाचें देऊळ व धर्मशाळा बांधण्याचें काम सुरू केलें होतें. गोविंद्बोवाच्या पश्चात् त्यांचे पुतणे नारायण बाळकृष्ण यांनीं सांबाचे देवालयाचें काम पूर्ण केलें. नारायणरावानीं गोविंद्बोवांच्या अस्थी घेऊन पादक्रमण करीत प्रयागीं जाऊन विसर्जन केल्या. तेथून गंगेची कावड आणून ती पद्मालय येथील श्रीगजाननास अर्पण केली. हरिद्वारास जाणेचाहि यांचा विचार आहे असें समजतें, नारायणराव यांचे मनांत

कै. श्रीगोविंदबोवांच्या पादुका उपनदेव येथें स्थापन करव्यात व त्यांचे नांवानें गजाननाचें देऊळ बांधावें असें आहे. व त्याप्रमाणें त्यांचे प्रयत्नही चालू आहेत.

आपल्या भगवद्भक्त चुलत्यानें आरंभिलेलें देवाळाचें काम पुरें करून त्यांच्या आस्थि भागिरथीस अर्पण केल्या. व त्यांनीं स्थापिलेल्या गजाननास गंगेची कावड पायीं आणून घातली. यावरून नारायणरावांचे धन्यवाद गावेत तितके थोडेच होतील. नारायणरावांनीं कुटुंब वारल्यावर अपत्यपाश नसल्यामुळें त्यांनीं जो मार्ग पतकरिला तो मार्ग त्यांना अत्यंत भूषणावह आहे. यांचे बंधु महादेव बाळकृष्ण हे मुंबई येथें गोपाळ सखाराम आणि कंपनींत नोकर आहेत.

---

## मौजे पापडी येथील बरवे यांची माहिती

गोविंद उर्फ आबाजीचे वडील नारायण हे नेवऱ्याहून पापडी येथें गेले असावेत असें वाटतें. पापडी या गांवीं अजमासें दीडशें वर्षें झालीं असावीं. गोविंद ऊर्फ आबाजी यास हवालदारीची नोकरी पेशवाईच्या अमदानींत होती. आबाजीचे चिरंजीव केशव हे सुमारें सन १८१२ सालीं जन्मले. केशव आबाजी यांचे नांवची इनामबागाईत जमीन (घरास लागून असलेली वाडी) बद्दलची सनद आहे. या इनाम जमिनीबद्दल सरकारदस्त $\frac{1}{2}$ भरावा लागतो. सन १८८२ सालीं केशवराव वारले. यांचे पुत्र विनायकराव हे हल्लीं आपल्या दोन पुत्रांसह वडिलार्जित घरांत असतात. विनायकरावानीं आपल्या हिमतीनें सावकारी व व्यापार ह्या उद्योगावर वडिलार्जित कर्ज फेडून टाकून जुन्या घरास लागून मुंबई तऱ्हेचा मोठा बंगला बांधिला आहे. सावकारी व व्यापार हल्लींही चालू आहे. सद्यःस्थितीला अजमासें पन्नास हजार रुपयांची असामी आहे. यांची वागणूक अगदीं

साधी आहे. यांचे पुत्र सदाशिवराव व नारायणराव वडिलांचाच व्यवसाय करितात. यांचे हिशास खुद्द नेवरें येथें घर, मोकादमी हक्क व इनाम आहे.

याच गांवीं हल्लीं अनंतराव बाबाजीराव बरवे म्हणून आहेत. यांचे वडील पापडी येथें आले असावेत. गोविंद ऊर्फ आबाजी यांनीं आपल्या इनामापैकीं निम्मे इनाम बाबाजी बरवे यास हे नेवरेकर बरवे म्हणून दिलें. सदरहु इनाम अनंतराव व त्यांचे पुत्र आत्माराम व राम हे अनुभवीत आहेत.

---

## पनवेल येथील बरवे यांची माहिती

सखाराम खंडेराव बरवे हे पूर्वीं अगदीं गरीब स्थितींत असून स्वतः-च्या कर्तबगारीवर ९ रुपये पगाराच्या तलाठ्याच्या नोकरीपासून नेटिव्ह आसिस्टंट कमिशनरच्या हुद्द्यापर्यंत चढले. हे सन १८९९ च्या फेब्रुवारींत निवर्तले. यांनीं आपलें रहाण्याचें ठिकाण पनवेल येथें केलें. यांचे पुत्र रामचंद्र सखाराम हे नॉर्दन डिव्हिजन कमिशनरचे ऑफिसांत पहिल्या प्रथम नोकरीवर लागून शेवटीं ठाणें जिल्ह्यांत मामलेदार या हुद्द्यावर असतां सन १८९९ सालीं वारले. यांचे दत्तक पुत्र विष्णुपंत हे हल्लीं पुणें येथें इन्पेक्टर जनरल ऑफ पोलिसच्या आफिसांत क्लार्क आहेत. हे नेवरे-कर बरव्यांपैकींच आहेत. यांना मोकादमीचा हक्क चालू आहे.



कै. रावबहादूर वामनराव तात्या बरवे, इनामदार जालगांव



गणपतराव वामन बर्वे, जालगांव; मुकुंदराव वामन बर्वे, बी. ए. स्मॉलकॉज जज्ज, इंदूर.

# मौजे जालगांव येथील बरवे यांचा वंशवृक्ष



# मौजे जालगांव येथील बरवे

- विसाजी पु. ४
  - १
  - कृष्णाजी उर्फ बचाजी
    - त्रिंबक उर्फ बाबाजी
      - रघुनाथ द.
        - नारायण
          - गंगाधर
            - विश्वनाथ
              - रघुनाथ
            - परशराम
              - हरी
              - विष्णु
          - त्रिंबक
            - रामचंद्र
              - शंकर
            - केशव
        - व्यंकटेश
          - रामचंद्र
            - अच्युत
              - व्यंकटेश
              - दामू
          - भाऊउर्फबचाजी
            - गोविंद
              - सदाशिव.
        - विष्णु
          - महादेव
            - दत्तात्रय
              - नरहरी.
  - ३
  - ४

# मौजे जालगांव येथील बरवे

- विसाजी पु० ४
  - १
  - २
  - गोविंद
    - आप्पाजी
      - बाळाजी
        - त्रिंबक
          - पुरुषोत्तम द.
            - °काशिनाथ
              - दत्तात्रय
              - भास्कर
        - सखाराम
          - जनार्दन
            - °भिकाजी उर्फ आपाजी
              - सखाराम
        - गोविंद पु० ७
          - रामचंद्र
            - °श्रीधर
              - °प्रभाकर
              - °महेश्वर
              - पांडुरंग
            - °रघुनाथ
            - °चिंतामणी द. गे
          - वामन द. गे.
          - कृष्णा
            - शिवराम°
            - °नारायण
              - शंकर
              - गोविंद
            - °त्र्यंबक
              - विनायक
          - पुरुषोत्तम द. गे.
          - विष्णु
            - °शांताराम
        - विश्वनाथ
          - °रावजी
            - °चिंतमणी ऊर्फ विश्वनाथ द०
              - सदाशिव
              - वासुदेव ऊर्फ दत्तात्रय
              - शंकर
      - रघुनाथ द. गे.
      - तात्याजी
        - वामन द.
          - गणेश
            - गोविंद
              - मधुसूदन ऊर्फ वासुदेव
            - °अनंत
            - °रामकृष्ण
          - °मुकुंद
  - ४

# मौजे जालगांव येथील बरवे यांची माहिती

मौजे जालगांव येथील बरवे घराणें नेवरें येथील वंशाचीच एक शाखा आहे. विसाजी राम यांचें कुटुंब मुलासह जालगांवीं जाऊन राहिलें. असें करण्याचें कारण विसाजीपंत हे पुण्यास पेशव्यांचे पदरीं तरुणपणांतच एकाएकीं वारले. त्यामुळें त्यांच्या कुटुंबावर दुर्धर प्रसंग गुजरला. पुण्याकडील निर्वाहाचा आश्रय तुटला व नेवरें येथें त्या कुटुंबाचा हिसा अगदीं थोडा असून निर्वाह होण्यालायक नाहीं, म्हणून त्या विसाजीपंताची बायको नेवऱ्याहून आपल्या चार मुलांनीशीं जालगांव ता. दापोली जिल्हा रत्नागिरी, या खेडेगांवीं जाऊन राहिली. त्यावेळीं तेथें मराठे लोकांचीं घरें दहाबारा व ब्राह्मणांचीं घरें एकदोन इतकीच वस्ती होती.

विसाजीच्या चार मुलांत कृष्णा ऊर्फ बचाजी हा हुषार होता. त्यास त्याचे आईनें पोट भरण्याकरितां पुण्याकडे पाठविलें. पेशव्यांकडे एकदम दाद लागेना; म्हणून पेशव्यांचे पदरचे सरदार गोखले यांजकडे शागिर्दीची नोकरी पत्करून, घोडे शिकविण्याच्या कामांत तरवेदी मिळविली. प्रारब्धअनकूलतेनें त्याच वेळीं पेशव्यांनीं नवीन घोडा घेतलेला, त्याचे जवळील पटाईत चाबूकस्वाराचे कह्यांत तो येईना. तोच घोडा बचाजीनें कह्यांत आणून शिकवून तयार केल्यामुळें, पेशव्यांची मर्जी सुप्रसन्न होऊन पेशव्यांनीं बचाजीस आपल्या खासगी पंक्तींत जेवणाचा हुकूम केला. त्याचवेळीं मुसलमानांशीं पेशव्यांच्या झटापटी चालल्या होत्या, त्या लढायांत बचाजीचें शौर्य दिसून आल्यामुळें, खोतीगांव व इनाम जमीन दिली. खोतीगांव व कुळकर्णी हक्क बचाजीनें मिळविले. बचाजीचा मुलगा व नातू पेशवाईचे अखेरीपर्यंत दाभोळचे सुभेदारीचे कामावर होते. जालगांव येथील बरवे यांचा सात चौकांचा वाडा पेशव्यांनीं एक लाख रुपये देऊन बांधविला. हल्लीं तो विभक्तपणामुळें नाहींसा झाला

आहे, तरी वाड्याचीं जोतीं शिल्लक आहेत. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनीं आपल्या सतीमृत चुलतीचे अंतकाळचे निर्वाणीवरून बरवे यांस पांगारी गांव इनाम करून दिला, तो हल्लीं चालत आहे.

बचाजीचे वंशजांनीं आपले भरभराटींत गांवोगांवीं वसुलाकरितां जावें लागे; व त्या वेळीं त्यांनीं ठिकठिकाणीं धर्मार्थ विहिरी आणि स्वतः-करितां घरें बांधिलीं आहेत. यांचें राहण्याचें मुख्य ठिकाण जालगांव व दाभोळ असें होतें. दापोली तालुक्यांत श्रीमंत आंग्रे यांचे दिवाण बाबाजी बिवलकर यांचे मौजे असूद गांवीं बरवे यांनीं श्रीगणपतीचें देऊळ बांधिलें. त्या देवाचे पूजा—नैवेद्याचा खर्च अद्याप बरवे चालवीत आहेत. तालुका चिपळूण पैकीं अंजनवेल गांवीं श्रीवेणूगोपाळचें देऊळ बांधिलें आहे. त्याचे पूजानैवेद्याबद्दलची नेमणूक सरकारांतून करून ठेविली आहे; ती अद्याप चालू आहे. जालगांव येथें श्रीरुद्रेश्वर, श्रीलक्ष्मीनारायण, श्रीगणपती, श्रीगोपाळेश्वर, श्रीबहिरी व श्रीमहालक्ष्मी इतक्या देवतांचीं देवालयें बांधिलीं आहेत. याचे खर्चाकरितां सरकारांतून नेमणूका करून दिलेल्या चालू असून हल्लीं कांहीं खर्च खासगीतून करितात.

दाभोळ येथें त्रिंबकराव व रघुनाथराव सुभेदारीवर असतां कोळथरें गांवीं वरचेवर जात असत. दाभोळपासून आदमासें ४।५ मैलांवर कोळथरें हा गांव आहे. याच गांवीं **श्रीकोळेश्वराचें** स्वयंभू स्थान आहे. हाच सर्व बरव्यांचा कुलस्वामी होय. कोळथरें येथें यांनीं घर बांधिलें होतें. सदरहू घर विभक्तपणाचे वेळीं बचाजीचे नातू रघुनाथ याचे वांटणीस गेलें. याचे मुलानें तीस चाळीस वर्षांपूर्वी तेथील महाजनास तें विकलें. कोळमांजरें गांवचा वसूल करण्याकरितां जुवेकर आडनांवाचा कोणी देवरुखा ब्राह्मण ठेविला होता. त्याणें फार दिवसांची आपली वहिवाट दाखवून तो गांव आपले नांवें पहिले मोज-णींत चढवून घेतला. या गांवीं बरवे यांच्या घराचा चौथरा हल्लीं विद्य-मान आहे. बचाजीचे चिरंजीव बाबाजी यास संतान नव्हतें; यास्तव

त्यानें आपला चुलत पुतण्या रघुनाथ यास दत्तक घेतला. बचाजी पुण्यास रहात व त्यांचे बंधु रामाजी व गोविंद आपल्या मातोश्रीजवळ राहून इनाम व खोती वगैरे इस्टेटीची व्यवस्था करीत असत. रामाजी यांचें कुटुंब मोठें; रामाजीचे पुत्र विसाजी; व विसाजीचे नातू विष्णु हरी; हे विष्णु हरी बरवे दापोली येथील लोकलबोर्डाचे व्हाईस प्रेसिडेंट होते. यांनीं सदरहु काम १०।१२ वर्षें उत्तम केल्यावरून यांना 'राव-साहेब' हा किताब मिळाला होता. यांना पुत्र चार; पैकीं सर्वांत वडील गोपाळराव हे घरची व्यवस्था पहात आहेत. सिताराम महादेव व धोंडो महादेव दोघेही वकील होते. धोंडोपंत गांवींच वकीली करीत होते. सितारामपंत खानदेशांतील जळगांवीं वकीली करीत होते. यांचा लौकिक तिकडेच विशेष आहे. हल्लीं जालगांवीं सीतारापंताचे नातू गणेश नारायण असतात. हे कॉलेज स्टुडंट आहेत.

या वंशांपैकीं दूरदेशीं गेलेले एक सखारामपंतच आढळतात. हे बडो-द्यास नोकर होते. हे जालगांवींच मयत झाले. यांचे पुत्र निळकंठ हे बी. ए. एल्‌ एल्. बी. असून हल्लीं वऱ्हाडांत पांढरकवडा येथें वकीली करीत आहेत. बचाजीचे दुसरे बंधु गोविंद याचे वंशज बरेच दूरदेशीं गेले होते. त्यांत पहिले वामन तात्याजी हे बहुत वर्षे शिंदेशाहींत सुभे व उज्जैन येथें सरसुभे होते. त्या राज्यांत त्यांचा फार लौकिक आहे. रावराजे दिनकरराव राजवाडे त्यास फार मानीत असत व युरोपियन लोकांतही त्यांचा मान असून त्यांस वेळोवेळीं चांगलीं सर्टिफिकिटेंही मिळालीं आहेत. वामनराव पेनशन घेऊन जालगांवीं राहिले; व तेथेंच सन १९०१ सालांत निवर्तले. रावराजे दिनकरराव राजवाडे यांचे चरित्रांत पहिलेच प्यॅरिग्राफांत वामनरावाविषयीं एक उत्तम लेख आहे असें समजतें. वामनरावजींचे वडील चिरंजीव गणपतराव हे शिंद्याचे राज्यांत सुभे होते. पुढें बाउंडरी सेटलमेंट ऑफिसरचें काम करीत असतां सन १९१२ त लष्कर–ग्वालेर येथें वारले. यांना पुत्र तीन; पैकीं गोविंद वारले असून याचे पुत्र मधुसूदन ऊर्फ वासुदेव लहान आहे,

अनंत हे घरीं आहेत व रामकृष्ण कॉलेजांत आहेत. गणपतरावांचे धाकटे बंधु मुकुंदराव हे बी. ए. असून हल्लीं होळकर स्टेटमध्यें इंदोर येथें स्मॉल कॉज जज्ज आहेत. वामनतात्याजी यांचे चुलत पुतणे रावजी विश्वनाथ हे सन १८६४–६५ सालांत पुणें मुक्कामीं ट्रेनिंग कॉलेजांत इंग्रजी, संस्कृत व मराठी शिकून मुंबई येथें सात वर्षें स्कूल मास्तराचें काम करून नंतर ग्वालेर संस्थानांत गेले. तेथें दोन वर्षें कारकुनी करून नायब कमाविसदार बजरंगड व सुसनेर या परगण्यांत होते. पुढें २।३ वर्षें मुंबई येथें ‘ गणेश मुकुंद ’ या नांवाचे पेढीवर मुनिमीचें काम करून पुन्हां ग्वालेर संस्थानांत जयाजीराव शिंदे यांचे जांवई शितोळे यांचेकडे त्यांच्या जहागीर परगण्याची मोजणी करण्याकरितां, मोतमीनची जागा पतकरली. दोन अडीचशें गांवाची मोजणी केल्याच्या त्रासानें प्रकृति फार बिघडल्यामुळें नोकरी सोडून जालगावीं आले. यांचा एकुलता एक मुलगा तोही वारला. यांणीं चुलत पुतण्या चिंतामणी यास दत्तक घेऊन नांव विश्वनाथ ठेविलें. हे विश्वनाथराव हल्लीं मुंबई येथें जनरल पोष्टांत ८० रु० पगारावर नोकर आहेत. यांचे पहिल्या घरचे सख्खे चुलत बंधु शांताराम विष्णु बरवे हे मुंबई म्युनसिपालिटींत नोकर आहेत. शिवराम कृष्ण हे बी. बी. अँड सी. आय. रेलवेंत स्टेशनरी स्टोअर ऑफिसांत नोकर आहेत. नारायण कृष्ण हे सोलापूर जिल्ह्यांत सब् ओव्हर सीयर आहेत. केशव त्रिंबक हे मुंबई कँप अँड को मध्यें नोकर आहेत. रामचंद्र त्रिंबक जालगांव येथें शाळामास्तर आहेत.

जालगांवीं जाण्यास हर्णै बंदरावर उतरावें लागतें. हर्णैहून बैलगाडीचा रस्ता विशेष रहदारीचा आहे. हा रस्ता दापोलीहून खेडास जातो; व दापोलीहून दक्षिणेकडे जालगांववरून दाभोळास जातो. हर्णै बंदर बोटीवर चढण्यास व उतरण्यास अत्यंत धोक्याचें आहे, म्हणून दाभोळ बंदर येथें उतरून जालगांव दापोलीस जाणें विशेष उत्तम!! दापोलीपासून जालगांव सुमारें एक मैल आहे. या गांवीं बरवे यांचीं घरें विशेष आहेत. देवालयास लागून बरवे आळीच आहे. या बरवे आळींतच सात

चौकी वाड्याचा कांहीं अवशिष्ट भाग दृष्टीस पडतो. या वाड्यास लागून एक मोठी पायऱ्याची विहीर आहे. या विहिरीला "कलावंतिणीची विहीर" असें म्हणतात. श्री लक्ष्मी-नारायणाचे देवळासमोरील बांधीव तळी फार मोठी आहे. जालगांव हा गांव जरी लहान आहेत, तरी तालुक्याचे ठिकाणास (दापोलीस)अगदीं जवळ असल्यामुळें व्यवस्थित दिसत आहे. रा. रावजी विश्वनाथ बरवे यांनीं परिश्रम घेऊन समक्ष व वेळोवेळीं टपाल मार्गें सर्व माहिती दिली, हें त्यांना अत्यंत भूषणावह आहे. रा. रावजींनीं दिलेल्या माहितीवरून व कागदपत्रांवरून, विसाजीच्या बायकोनें आपल्या चार पुत्रांसह नेवऱ्याहून निघोन मौजे जालगांव येथें वस्ती केली, हें सिद्ध होत आहे. जोगदेव भटाचे विसाजी हे पणतू होत. आतांपर्यंतच्या माहितीवरून **विठ्ठलभट** हा नेवरेकर बरवे यांचा मूळ पुरुष होय. विठ्ठलभटापासून पुढील सर्व नांवें जालगांवचे वशांत दिलीं आहेत. जालगांवच्या बरव्यांस मिळालेल्या उत्पन्नाच्या सनदांचे उतारे पुढील प्रमाणें आहेत.

---

## या घराण्यास मिळालेल्या सनदांचे उतारे

श्री
शाहू नृपहर्षेण सरखे
लस्य समुद्भुततुला सिंहस्य
मुद्रेयं सर्वोत्कर्षेण
राजते

श्री

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री तुलाजी आंगरे सरखेल ता रामाजी विश्वनाथ व कृष्णाजी विश्वनाथ व गोविंद विश्वनाथ लक्ष्मण विश्वनाथ बाड खोत मौजे सांकलोली ता जालगाऊ सा दाभोळ सुा सन इहिदे खमसैन मया व अलफ

तुम्ही हूजुर जंजिरे विजयदुर्गेचे मुक्कामीं येऊनु विदित केलें कीं मोजे मजकूर हा गांव आपला मिरासेचा खोती आपली ( होती ) आपले वडील चालवीत असतां मागें धामधुमीमुळें गांव उद्वस्त जाहला आणि परागंदा होऊन देशांतरास गेले. त्यापासून आपला पैवस्ता गांवीं नाहीं. हल्लीं आपण गांवची कमाविसी व कीर्दी माहामुरी करावया उमेद्वार आसो साहेबाचे एक जप्ती राज्य देवब्राह्मणाची स्थापना यथान्यायें होत आहे हें ऐकोन साहेबाचे सेवेसी विनंति करावया आलो मेहरबान होऊन पूर्ववत प्रा वतनावरी स्थापना करावी म्हणोन तपासिले अर्ज केला त्यावरून मनास आणून मौजे मजकूरची खोतीवतन तुमचे तुम्हांस करार करून दिल्हे असे तरी तुम्हीं गांवीं येऊन आपले वतनी ठिकाणावर घर घरबंद बांधून सुखरूप रहाणें गांवांत कुलेडाले आणून कीर्दी माहामुरी करून दिवाणदस्ताची उगवणी करणें. खोती वतन करार करून तुमचे माथा हर्की करार रुपये २०० दोनशें रुपये घेऊन खोती तुम्हांस करार केली असे. पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवून कीर्दी माहामुरी करून सुखरूप राहणें जाणिजे. रा छ १९ माहे जिल-काद ( लेखन सीमा )

---

० श्री ॅ
राजराम नर
पति हर्षनिधान
माधवराव बल्लाळ
मुख्य प्रधान

श्री

छ मा अजाम देशमुख व देशपांडे ता जालगांव तालुके सुवर्णदुर्ग सुभा दाभोळ यास माधवराव बल्लाळ प्रधान सुा सीत सितैन मया व अलफ. शके १६८८ व्ययनाम संवत्सरे. कृष्णाजी विश्वनाथ उपनाम बरवे गोत्र कौशिक सुत्र आश्वलायेन यांणीं हुजुर का पुणे येथील मुकामीं येऊन विनंति केली कीं आपण का जालगांव ता मजकूर येथें नूतन देवालय बांधून श्री लक्ष्मीनारायेण देवाची स्थापना करणार त्यास

श्रीचे पूजेस नेहमीं ब्राह्मण पाहिजे. त्याचे कुटुंबाचे संरक्षणार्थ नूतन इनाम जमीन दोन बिघे का। मजकुरी पड जमीन असेल त्यापैकीं कस्त मेहनत करून आवल होईल या पधतीची जमीन करार करून देऊन चालविली पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणून हें देवालय बांधोन श्रीची नवीन स्थापना करितात त्यास पूजेस ब्राह्मण नेहमी ठेवितील त्याचे कुटुंबाचे संरक्षणार्थ नूतन इनाम जमीन का। मजकुरी पडजमीन असेल त्यापैकीं कस्त मेहनत करून अवल होणे या पधतीची जमीन बिघे ८२ दोन बिघे कुलबाब कुलकानु हली पटी व पेस्तर पटी जलतरुतृणकाष्ठपाषाण निधिनिक्षेपादिसहित खेरीज हकदार करून नूतन इनाम करार करून दिल्ही असे. तरी सदरहु दोन बिघे पडजमीन असेल त्यापैकीं लिहिल्याप्रमाणें चतु:सीमापूर्वक नेमून देऊन मशारनिले श्रीचे पूजेस ब्राह्मण ठेवितील त्यास व त्याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालविणें. प्रातिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची नकल लेहून घेऊन हे असल पत्र भोगवटीयास मशारनिल्हेजवळ देणें जाणिजे. छ. १५ जिलकाद "आज्ञाप्रमाण" (लेखनसीमा)

---

श्री.

राजश्री रामाजी विश्वनाथ व बचाजी विश्वनाथ व गोविंद विश्वनाथ व लक्ष्मण विश्वनाथ उपनाम बरवे गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन वास्तव्य मौजे साखलोली ता। जालगांव सुभे दाभोळ गोसावी.

छ सेवक बाळाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार सु॥ तिसा खमसैन मया व अलफ दिल्हे इनाम पत्र ऐसेजे तुम्ही हुजुर कसबे पुणे येथील मुकामी येऊन विनंती केली कीं आपण पुरातन स्वामीचे राज्यातील सेवक एकानिष्ठपणें सेवा केली त्यास कुटुंबवत्सल आहो योगक्षेम चालत नाही यास्तव स्वामीनी कृपाळु होऊन नूतन इनाम जमीन करून दिली

या योग क्षेम करून सुखरूप राहो म्हणोन त्याजवरून मनास आणिता तुम्ही पुरातन राज्यातील सेवक श्रम साहास करून एकनिष्ठेनें स्वामी सेवा केली तुमचे चालवणे आवश्य जाणून तुम्हावर कृपाळू होऊन कुटुंबाचे योगक्षेमार्थ नूतन इनाम जमीन जिराइती बिघे ८२० वीस वहीत सन सीत खमसेनात राजश्री रामाजी माहादेऊ याजकडून चतुःसीमापूर्वक नेमून देविली होती त्यास मारानिलेनी सदरहु वीस बिघे जमीन कसबे जालगांव व मौजे साखलोली ता॥ जालगांव सुभे दाभोळ या दो गांवीं नेमून देऊन जाबता लेहून हुजुर पाठविला. तो मनास आणून त्याप्रमाणें हाली करार जमीन वहीत व पडीत बिघे ८१५ कसबे जालगांव पैकीं व ८५ बिघे साखलोली (त्यासी चतुःसीमा वगैरे व सर्व हश वगैरे सह वंशपरंपरेनें अनुभवणे ) छ १ जिल्हेज 'आज्ञाप्रमाण'
( लेखनसीमा )

॰ श्री ॰
राजाराम नरपती हर्ष-
निधान बाळाजी
बाजीराव प्र.

---

श्री

वतनपत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य बाळाजी पंडित प्रधान ताहा रामाजी विश्वनाथ व बचाजी विश्वनाथ व गोविंद विश्वनाथ व लक्ष्मण विश्वनाथ उपनाम बरवे गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन खोत मौजे साखलोली ता॥ जालगांव मामले जाफराबाद सुभा प्रांत दाभोळ सु तिसा खमसेन मया व अलफ दिल्हे वतनपत्र ऐसेजे. तुम्ही हुजुर कसबे पुणे येथील मुकामी येऊन विनंती केली कीं सुभा दाभोळ पैकीं सुरळीत मामले जाफराबाद महाल ६ सहा येथील देश कुलकर्ण व ज्या गावीं पुरातन वतनदार गाव कुलकर्णी नाहींत येथील गाव कुलकर्ण एकून दोनी वतने पुरातन राघो बल्लाळ व कृष्णाजी बल्लाळ व बहिरो

लक्ष्मण व माहादाजी लक्ष्मण व बाळाजी नारायण उपनाम कारले गोत्र जमदग्नी सूत्र आश्वलायन यांची त्यास कारले मजकूर यास वतन संमंधें वगैरे कर्ज बहुत जाहाले ते वारावयासी सामर्थ्य नाहीं कर्जदाराचे तो तगादे लागू लागले उपाय कांहीं नाहीं. तेव्हां विचार करून बाजीद होऊन आत्मसंतोषे मामले जाफराबाद महाल ६ सहा सुरलीतपैकीं तर्फ जालगांव सुभे मजकूर येथील देश कुलकर्ण दरोबस्त व मौजे टालसुरे शिवाय गाव कुलकर्ण एकून दोनी वतने आम्हास विकत देऊन वतनाची किंमत रुपये ४००१ चार हजार येक रुपया करार करून भरणा करून घेऊन तर्फ मजकूरच्या सदरहू दोन्ही वतनाचे खरेदीखत करून दिल्हे हे वाजीनस आपणाजवळ आहे ते स्वामिनी मनास आणूस आम्हावर कृपाळू होऊन त्याप्रमाणें आम्हास सरकारची वतनपत्रें भोगवटीयास करून द्यावीं म्हणून त्याजवरून तुम्ही खरेदी खत हुजुर आणून दाखविलें त्याचा मजमून श्री॥

खरेदीखत शके १६१८ धातानाम संवत्सरे आषाढ शु॥ पंचमी गुरुवासरे ते दिनी खरेदी करदे राजेश्री रामाजी विश्वनाथ व बचाजी विश्वनाथ व गोविंद विश्वनाथ व लक्ष्मण विश्वनाथ उपनाम बरवे गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन खोत मौजे सांखलोली त॥ जालगांव मामले जाफराबाद सुभा प्र॥ जालगाव मामले जाफराबाद सुभा प्रा दाभोळ यासी फरोख्त कर्दे राघो बल्लाळ व कृष्णाजी बल्लाळ व बहिरो लक्ष्मण व माहादाजी लक्ष्मण व बाळाजी नारायण उपनाम कारले गोत्र जमदग्नी सूत्र आश्वलायन देश कुलकर्णी व गाव कुलकर्णी सुभा दाभोळ सु॥ सबा खमसेन मया व अलफ सन ११६६ कारणे खरेदीखत लिहून दिल्ले ऐसेजे सुभे मजकूरचे देश कुलकर्ण व गांव कुलकर्ण येकूण दोनी वतनें पुरातन आपलीं आहेत. त्यास वतनसंबधें आपणास दिवाणांत खंडदंड पडले त्याजमुळे आपण कर्जदार जाहलो ते कर्ज वारावयास आपल्यास औकत नाहीं. म्हणून मामले जाफराबाद महाल ६ सहा सुरलीत पेकीं तर्फ जालगांव देह ३६ छतीस व मजरे ३ तीन येकूण सुमार

एकूण चाळीस येथील देश कुलकर्ण दरोबस्त व मौजे टालसुरे शिवाय देहे ३५ पसतीस व मजेर ३ तीन येथील गांवकुलकर्ण येकूण दोनी वतने खुष खरेदी रुपये ४००१ चार हजार एक रुपया किंमत करार करून सदरहु चार हजार एक रुपया रोख तुम्हापासून घेऊन हे खरेदीखत तुम्हास लिहून दिल्हे असे तर्फ मजकूरचे देहे व मजरे नांवनिशी बी॥

| | |
|---|---|
| १ का जालगाव | १ मौजे किनल |
| १ मौजे करंदे | १ ,, देवंके |
| १ ,, चोरी | १ ,, कलकी |
| १ ,, गव्हे | १ ,, वलणे |
| १ ,, सिरदे | १ ,, दादोली |
| १ ,, वणंद | १ ,, खिरडी |
| १ ,, तेरेवयगणी | १ ,, बुडिवली |
| १ ,, सणंवे | १ ,, कर्जाणी |
| १ ,, सडवली | १ ,, भानघर |
| १ ,, निगणे | १ ,, हातीप |
| १ ,, बोरधर | १ ,, शिरखल |
| १ ,, असुद | १ ,, टालसुरे |
| १ ,, नानंटे | १ ,, कुंभवे |
| १ ,, वोलगाव | १ ,, सांखलोली |
| १ ,, कोलबंद्रे | १ ,, पांगारी |
| १ ,, पाचवली | १ ,, तेठवली |
| १ ,, महाळुंगे | ३ मजरे |
| १ ,, चिखलगांव | १ उशीद |
| १ ,, गिव्हवणें | १ मिरवणे |
| १ ,, जोगेले | १ गोळील |
| २० | ३ |

१९

येकूण देहे ३६ व मजरे ३ येकूण सुमार एकूण चालीस येथील दरोबस्त देश कुलकर्ण व मौजे टालसुरे शिवाय देहे ३५ पस्तीस व मजरे ३ येकूण सुमार अडतीस येथील गाव कुलकर्ण येकूण दोनी वतने तुम्हांस दिल्ही असेत. सदरहु दोन्ही वतनास हक्क पुरातन राजभागास दर खंडीस गला कैली ॥- पौण मण व नख्त बाब दर रुपयास ॥- पाऊण अणा व वजनी किंमतीवर दर रुपयास ॥- पाऊण अणा व × × × × राजभागास दर हजारी रुा -।- पांच अणे येणें प्रमाणें आहेत तो तुम्ही घेत जाणे या शिवाय मोहतर्फा खुमास व बाजे खुमास व गौली वगैरे याजवर हक लाजीमा मानपान वगैरे उत्पन्न या महालचे सुदामत असेल ते व नवीन होईल ते दरोबस्त तुम्ही घेत जाणे सदरहु महालचे देश कुलकर्णाचे व गांव कुलकर्णाचे मानपान कानोकाई हेचे होतील ते तुम्ही घेत जाणे सुभे मजकूराचा देश कुलकर्णास शिरपाव आहेत त्यास आम्ही अर्धी देऊ आमचे मागून तर्फ मजकूरचा सिरपाव तुम्ही घेत जाणे. ताा मजकुरी हरयेक प्राप्त वतन संमंधे जाबली तर तुम्ही घेत जाणे व कामकारभार लिहिणे वगैरे कानुकाई हे तागाईत मजकुरचे सुदामत असतील ते तुम्ही घेत जाणे. ताा मजकुरची दोनी वतने तुम्हास आपले खुष रजावहीनें देऊन खरेदीखत लिहून दिल्हे असे तुम्ही दोनही वतनें आपलें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें उपभोग करून सुखरूप राहणें. सदरहू माटालच्या वतनासी आपल्यास अर्थाअर्थी संमंध नाहीं.

य़ा वतनासी हर कोणी तुम्हासी दिकहरकत करील त्यास आपण अगर आपले वंशीचा कोणी तुम्हासी दिकहरकत करील त्यास बेतालीस पूर्वजांची व श्री कुलस्वामीची शपथ असे हे खरीदी खत लिहून दिल्हे सही बी कलम राघो बल्लाळ कारले देश कुलकर्णी व गांव कुलकर्णी सुभे मजकूर

कृष्णाजी बल्लाळ कारले लिहिले सही बी। अ०

बहिरो लक्ष्मण कारले लिहिले सही बी। अ०

बाळाजी नारायण कारले लिहिले सही बी। अ०

महादाजी लक्ष्मण कारले लिहिले सही बी।

बालाजी नारायेण कारले

येणेप्रमाणें खरेदीखताचा मजकूर मनास आणिता कारले मजकुरी यांनीं ता। जालगांव मामले जाफराबाद सुभा प्रांत दाभोळ येथील देश-कुलकर्ण दरोबस्त व मौजे टालसुरे शिवाय गांव कुलकर्ण येकूण दोनी वतने आपले आत्मसंतोषें तुम्हापासून चार हजार एक रुपया घेऊन तुम्हास विकत दिल्ही. हे खरे जाणून तुम्हावर कृपाळू होऊन तर्फ मज-कूरची सदरहूप्रमाणें देश कुलकर्ण व गांव कुलकर्ण येकूण दोन्ही वतनें तुम्हाकडे करार करून देऊन हे वतनपत्र करून दिल्हे असे. तरी तुम्ही ता। मजकूरची सदरहूप्रमाणें दोनी वतने आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें ता। मजकूरची सदरहूप्रमाणें दोनी वतनें देखील मानपान हक लवाजिमा सुदामत चालत आला असेल त्याप्रमाणें अनभवून सुखरूप राहणें. वतनसंबंधें तुम्हाकडे नजर रुपये ५०० पांचशें करार केले ते सरकारांत पोता जमा असेत. जाणिजे छ. १९ रा वल आज्ञाप्रमाण (लेखन सीमा.)

० श्री ०
राजाराम नरपती हर्ष
निधान बाळाजी
बाजीराव प्रधान

# मौजे सागवे वाडा बुर्वे येथील बरवे.

- **विठ्ठलभट**
  - नारायणभट
    - **जोगदेव**
      - राघो
        - **गोविंदबुवा** पु. ८
          - गदाधर १
            - श्रीधर
              - पांडुरंग पु. ५
                - निळकंठ
                - वासुदेव
                - विश्वनाथ
                - लक्ष्मण पु. ५
                  - महादेवं
                    - पांडुरंगं
                      - दिनकरं
                      - लक्ष्मणं
                    - विश्वनाथ
                  - श्रीधर
                  - गणेशं
                  - रामचंद्रं
                  - गोविंदं
                - दिनकर
                  - केशव
                    - आत्मारामं
                    - भलोबां
          - गिरिधर २
          - गंगाधर ३
            - एकनाथ द.
              - माहादेव द.
                - कृष्ण उर्फ लक्ष्मीधर द.
                  - गोविंद
                  - माहादेवं
                    - रामचंद्रं
                    - लक्ष्मणं
                    - परशरामं
                  - विष्णुं
          - लक्ष्मीधर ४

## मौजे सांगवें वाडा बुर्वें येथील बरवे



## मौजे सागवे वाडा बुर्वे येथील बरवे




## मौजे सागवे वाडा बुर्वे येथील बरवे यांची माहिती

रत्नागिरी प्रांतांतील ता. राजापूर मौजे सागवे पोष्ट नाखरें वाडा बुर्वे येथील गोविंदबोवा हे मूळचे राहणार नेवऱ्यापैकीं होत. नेवरें येथील

मूळ पुरुष विठ्ठलभट. या पुरुषाचे पणतु राघो जोगदेव; या राघो जोगदेवाचे चिरंजीव गोविंद होत. हे गोविंद नाखरें येथें गेले. गोविंदबोवा यांना कांहीं कारणानें पश्चात्ताप होऊन ते श्रीक्षेत्र काशी येथें गेले. तेथें एका सत्पुरुषाची कृपा संपादून आपली कुलदेवता श्रीजगदंबा जोगेश्वरीची आराधना केली. तिच्या कृपेनें ते जें बोलत तें खरें होई ! त्यांनीं मौजे सागवे वाडा बुर्वे ता. राजापूर येथें एक मोठें खाजण बांधिलें. तें सातारकर श्रीछत्रपति शाहू महाराज यांनीं इसवी सन १७३९ त त्यांचे मुलाचे नांवें " लक्ष्मीधर व गंगाधर बुवा बरवे " इनाम करून दिलें. त्याच सुमारास गदाधर व गिरिधर बुवा बरवे या दोघांचे नांवें महाराजांनीं नवीन इनाम मौजे दाभोळे ता. देवगड येथें करून दिलें. गोविंद बोवा सत्पुरुष असल्याकारणानें त्यांची कीर्ति पुणें, सातारा, कोल्हापूर व सांवतवाडी वगैरे मराठी दरबारांत फार होती. ते श्रीक्षेत्र काशी येथें समाधिस्थ झाले.

लक्ष्मीधर बुवा बरवे हे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे गुरु होत. त्यांचें वजन पुणें, सातारा, सावंतवाडी व गोमांतक प्रांतीं चांगलें होतें. त्यांना पेशवे सरकार कडून नेमणूक होती; ती त्यांचे वंशज अद्याप भोगीत आहेत. लक्ष्मीधर यांचे दत्तक गेलेले द्वितीय पुत्र एकनाथ बुवा यांना, सांवतवाडी संस्थानचे अधिपति राजे खेमसावंत भोसले सरदेसाई यांनीं मौजे **कवठी** गांव इसवी सन १७६६ सालांत इनाम दिला. एकनाथ बुवाची एक मुलगी पुण्याचे सरदार रास्ते यांचेकडे दिली होती; व दुसरी मुलगी प्रसिद्ध सेनापति बापू गोखले यांना दिली होती. चिरंजीव महादेव बुवा हे गायनांत व तंतुवाद्यांत नामांकित होते. लक्ष्मीधर यांचे नातू रामकृष्ण बुवा यांना सातारकर महाराजांकडून साताऱ्यानजीक कांहीं जमीन इनाम मिळाली. यांचा लौकिक विजयदुर्ग प्रांतीं विशेष. नाखरें येथील बरवे पैकींच मौजे सागवे, दाभोळें, कवठी व सातारा येथें बरवे आहेत.

# मौजे पिंगळसई येथील ( जोगदेव ) बरवे

- **विठ्ठलभट**
  - नारायणभट
    - **जोगदेवभट**
      - राघो ( ६ )
        - गणेश
          - नारायण
            - गोपाळ
            - सदाशिव
            - रामचंद्र
              - हरी उर्फ आपाजी
                - रामचंद्र पु.५
                  - वासुदेव
                    - विनायक
                      - अनंत°
                    - वामन द. ग.
                    - परशराम°
                    - त्रिंबक°
                    - °रामकृष्ण B. A.
                  - महादेव
                    - भिकाजी°
                - शिवराम
                - बळवंत
                  - विष्णु°
                    - कृष्णा°
                - चिंतामण
                  - पांडुरंग
                    - बाळकृष्ण°
                    - चिंतामणी°
                - राघोबा
            - भिकाजी



रामकृष्ण वासुदेव बरवे. बी. ए. पिंगळसई



कै. रावबहादूर नारायण विष्णु बरवे, पुणें



अनंत वामन बरवे, पुणें

## मौजे पिंगळसई येथील (जोगदेव) बरवे यांची माहिती

राघो जोगदेव याचा नातू नारायण गणेश हा नेवऱ्याहून प्रथम हर्णै-मुरूड येथें आला. नारायण गणेश याचा पुत्र रामचंद्र उर्फ रामाजी यांणीं रोह्यानजीक अदमासें दोन मैलांवर असलेल्या पिंगळसई गांवीं वस्ती केली. रामाजीपंत हे पुणें येथें खासगीवाले यांचेकडे नोकर होते. नंतर अमदाबाद येथें कापडाचे व्यापारांत मुख्य मुनीम झाले. कापडाच्या व्यापारांत यांना विपुल संपत्ति मिळाली. अमदाबादेहून पिंगळसईस जाण्यापूर्वी पुणें मुक्कामीं पूर्वीचे मालक खासगीवाले यांचे भेटीकरितां हे आले होते. त्यावेळीं पर्वतीचें देवालयाचें काम पुरें झालें होतें. तें रमणीय काम पाहून त्याच नमुन्याचें एक देवालय बांधण्याचा त्यांनीं निश्चय केला; व त्याप्रमाणें पर्वतीचें देवालय बांधणाऱ्या गंवड्यांना बरोबर घेऊन पिंगळसई येथें गेले. व तेथें त्यानीं मोठा चौसोपी वाडा बांधिला. ते स्वतः गाणपत्य असल्यामुळें तेथें आपल्या मनोदयानुरूप पुणें येथील पर्वतीच्या देवालयाबरहुकूम देवालय बांधून त्यांत श्रीसिद्धिविनायक-पंचायतनाची स्थापना केली. पंचायतनमूर्ति संगमरवरी पाषाणाची असून मध्यभागीं असलेली श्रीगणपतीची मूर्ती उजव्या सोंडेची आहे.

रामाजीपंत अमदाबादेहून पिंगळसईस येत असतां वाटेंत बडोदें येथें उतरले होते. तेथील **सगुणी** नांवाची एक रजपूत स्त्री त्यांच्यावर मोहित होऊन, त्यांच्या मागोमाग पिंगळसई येथें पत्ता काढीत आली. रामाजीपंतानीं तिला परत जाण्याविषयीं पुष्कळ बोध केला. परंतु तिनें निर्वाणीचें एकच उत्तर दिलें कीं, 'राहीन तर तुमच्याजवळच राहीन ! ! नाहींतर प्राणत्याग करीन ! ! ' या तिच्या निश्चयामुळें त्यांचा नाइलाज झाला. व आपल्या इच्छेविरुद्ध तिला आपले येथें राहूं देणें त्यांना भाग पडलें. पुढें थोडक्याच दिवसांत तिची सासू व नवरा अशीं तिचा शोध करीत तेथें आलीं व त्यांनीं तिला आपले घरीं येण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला. परंतु तिचा पूर्वीचा निश्चय बिलकुल ढळला नाहीं. यामुळें त्यांना परत

जावें लागलें. सगुणी ही अत्यंत सुरूप असून आपल्या रजपूत स्वभावाप्रमाणें मोठी शूर होती. ती नेहमीं घोड्यावर बसून देवालयाच्या कामावर देखरेख करीत असे. तिनें कांहीं धर्मार्थ विहिरी पिंगळसईच्या आसपास आपल्या देखरेखी खालीं बांधलेल्या विद्यमान असून **सगुणीच्या विहिरी** या नांवानें त्या अद्याप प्रसिद्ध आहेत. सगुणी शूर होती इतकेंच नव्हे, तर ती अतिशय विनयशीलही होती. सगुणी नेहमीं ऐषआरामांत असून, तिच्या सेवेला बऱ्याच दास–दासी होत्या. एके दिवशीं रामाजीपंतांची पत्नी श्रीगणपतीचें दर्शन करून परत येत असतां, वाटेंत सगुणीची गांठ पडली. त्यावेळीं तिचा उंची पोषाख आणि बरोबर असलेल्या दास–दासींचा लवाजमा पाहून "अलीकडे **नाकापेक्षां मोतीं जड** होऊन स्वतः यजमानणीला दासीच्या दासींचा हा लवाजमा पाहून मान खालीं घालण्याची वेळ आली आहे! फार काय यजमानीण कोणची हें सुद्धां ओळखण्याची आतां पंचाईत झाली आहे !" असे शब्द उच्चारिले. हे मर्मभेदक शब्द सगुणीच्या अंतःकरणांत झोंबले आणि वाड्यांत जाण्याबरोबर तिनें आपल्या अंगावरील सर्व अलंकार काढून यजमाननीण बाईसाहेबांच्या पुढें नेऊन ठेविले. त्या दिवसापासून सगुणीनें अंगावर दागिना एकही न घालितां, पांढरें पातळ नेसण्यास सुरवात केली. व यजमानीण बाहेर जाऊं लागली म्हणजे तिचा जोडा आपल्या खाकेंत वागविण्याचा तिनें क्रम सुरू केला. अशा रीतीनें तिनें आपल्या विनयशीलतेनें व अत्यंत धार्मिक वर्तनानें घरांत वर्चस्व स्थापित केलें. व पुढें पुढें तर ती त्या घराचा आधारस्तंभच झाली. सगुणीची आपल्या यजमानावर अत्यंत निष्ठा होती. त्यांच्यापासून आपणास पुत्रप्राप्ति व्हावी, अशा हेतूनें तिनें अनेक व्रतें व उपवास केले. अखेरीस ती गरोदर राहिली. आपणास पुत्रप्राप्ति झाली तरच प्राण ठेवावयाचा; नाही तर प्राणत्याग करावयाचा, असा तिचा निश्चय ठरला होता. पुढें ती प्रसूत झाली व कन्या झाली आहे असें पाहतांच आपल्या पूर्वसंकेताप्रमाणें उशाशीं ठेविलेली कट्यार पोटांत खुपसून घेऊन तिनें देहत्याग केला! ही कट्यार

अद्यापि या घराण्यांत विद्यमान आहे. सुगणी ही नांवाप्रमाणें स–गुणी असून तिच्यासंबंधाची पुज्यबुद्धि या घराण्यांत अद्याप कायम आहे. या घराण्यांत कोणत्याही मंगल कृत्याच्या आरंभीं सगुणीच्या नांवानें पांढरें पातळ व चोळी सुवासिनीस देण्याची वहिवाट चालत आली आहे.

पिंगळसई हा गांव **अवचितगड** नामक किल्ल्याच्या पायथ्याशीं आहे. या किल्ल्याची **हावालदारी** या घराण्याकडे होती. या घराण्यास हावालदार या नांवानेंच तिकडे ओळखतात. पिंगळसई येथें पूर्वीं पुष्कळ वस्ती होती. परंतु किल्ल्याचें महत्त्व नाहींसें झाल्यामुळें तेथील प्रमुख घराणीं रोहें येथें रहाण्यास गेलीं. रामाजीचे पुत्र हरी उर्फ अप्पाजी यांचे नांवची त्या देवाच्या नैवेद्याची सनद शके १७३४ ची आहे. हरी उर्फ अप्पाजीचे नातू वासुदेव रामचंद्र हे रोहें येथें रहात असत. यांना पुत्र आठ; पैकीं विद्यमान तीन पुत्र आहेत. सर्वांत वडील विनायकराव हे पेण येथें वकील होते. हे स्वभावाचे करारी व फार उदार अंतःकरणाचे होते. या उदारपणाचा अनुभव प्रत्यक्ष लेखकास आहे. म्हणजे एके वेळीं या लेखकावर आलेल्या प्रसंगीं विनायकरावांनीं द्रव्याकडे व श्रमाकडे न पाहतां अत्यंत मदत केली, हें लेखक आजन्म विसरणार नाहीं. असो; कै. विनायकराव सार्वजनिक कामांतील मोठे पुढारी असून मोठे विद्याव्यासंगी होते. त्यांचे पुत्र अनंत हे नुकतेच म्यॅट्रिक झाले असून हल्लीं कालेजांत आहेत. परशरामपंत हे तीर्थयात्रा करीत ईश्वरी उपासनेंत निमग्न झाले आहेत. इतकेंच नव्हे तर त्यांना सत्पुरुष म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. त्रिंबकराव हे पोष्टखात्यांत नोकर आहेत. रामकृष्णपंत हे बी. ए. आहेत. यांणीं स्वामी रामतीर्थ समग्र ग्रंथ पूर्ण छापिले असून हल्लीं श्रीयोगवासिष्ठाचें भाषांतर करीत असून त्याचा एक पहिला भागहि नुकताच प्रसिद्ध झाला आहे. रामकृष्णपंत यांनीं पिंगळसई येथील श्रीगणेशपंचायतन देवालयाचे शिखराचा जीर्णोद्धार केला. यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ असून परोपकारबुद्धि विशेष ! स्वतःचें नुकसान झालें तरी हरकत नाहीं; परंतु त्याबद्दल एकदम टाकून बोलणें सहसा होणार नाहीं. विष्णु बळवंत हे कुर्ला येथें असतात. बाळकृष्ण पांडुरंग व चिंतामण पांडुरंग हे जी. आय. पी. रेल्वे ऑफिसांत नोकर आहेत.

## तालगांव येथील बरवे

- विठ्ठल भट
  - नारायण भट
    - जोगदेव भट
    - विठ्ठल भट
      - बाळ
      - गोपाळ
        - कृष्ण
        - गणेश
          - गोपाळ
            - बावजी
              - १ गोपाळ
                - धोंडो
                  - नारायण
                    - रघुनाथ
                      - गोविंद
                        - सदाशिव
                      - दात्तात्रय
                        - हरी
                      - गोपाळ
                        - शंकर
                      - कृष्ण
                      - धोंडो
                - बाळो
                - बिष्णू
              - २ केशव

# पुणें व वसई येथील बरवे

- विठ्ठलभट
  - नारायणभट
    - जोगदेवभट
    - विठ्ठलभट
      - बाळ
      - गोपाळ
        - कृष्ण
        - गणेश
          - गोपाळ
            - बाबजी
              - १ गोपाळ
              - २ केशव
                - त्रिंबक
                  - अनंत
                    - विनायक
                    - केशव
                    - पांडुरंग
                      - गोंदू
                  - विष्णु
                    - रामचंद्र
                - गणेश
                  - सखाराम
                  - लक्ष्मण
                    - विष्णु
                      - नारायण
                        - शंकर
                          - राम
                            - श्रीरंग उर्फ दिनकर
                          - लक्ष्मण
                            - मोरू
                          - दामू
                      - हरी
                        - वामन
                  - दाजी
                    - गणेश
                      - बळवंत
                        - दत्तात्रय B. A.
                      - सदाशिव
                        - मधुसूदन
                          - आण्णा
                          - बंडू
                      - अनंत

# पुणें, यवत व तारगांव येथील बरवे यांची माहिती

हें घराणें नेवऱ्याची एक शाखा आहे. बाबजी गोपाळ हे आपलीं दोन अपत्यें व कुटुंबासह पुण्यास आले. पुण्यास आल्यावर पेशव्यांचे खासगींत नोकरीस राहिले. धन्याची मर्जी संभाळून बाबजीनीं आपले मुलाचे नांवें सिंहगडाची सबनिशीची असामी मिळविली. केशव बाबजी, धोंडो गोपाळ व सखाराम गणेश यांचेकडे सदरहु आसामीची नेमणूक पेशवाईअखेरपर्यंत चालली होती. सिंहगड फार मजबूत किल्ला असून पुण्याला विशेष जवळ आहे. सबब श्रीमंत पेशवे यांनीं आपलें मौल्यवान् सामान तेथें ठेवून कडेकोट बंदोबस्त केला होता. लढाईचें सामानही मनमुराद होतें. यामुळें लढाईचे प्रसंगीं सखाराम गणेश बरवे सबनिस यांनीं सदरहू किल्ला बारा दिवस लढविला. पुढें राव बाजी यांनीं संस्थान-संन्यास घेतला नसता तर आणखी बरेच दिवस किल्ला लढविला गेला असता. सखारामपंत शूर व फर्डा कारकून होता. सबनिशीची असामी मिळाल्यावर बाबजीपंतांनीं पुणें मुक्कामीं वास्तू राहाण्यास पाहिजेबद्दल श्रीमंतांपाशीं विनंति केली. श्रीमंतांनीं रहाण्याकरितां जागा व घर बांधण्यास लागणारीं लांकडें सिंहगडाच्या रानांतील घरास लागतील तेवढीं घेण्याची परवानगी दिली. तेव्हां बाबजीपंतांनीं घर बांधिलें. या घरांतील विहीर केशव बाबजीनीं बांधिली. पुणें येथें इंग्रजी झाल्यावर सिंहगडाच्या दरकदारास इंग्रजींत नोकऱ्या देत होते. परंतु पेशवाई पुन्हां झाली तर आपल्याला फार त्रास होऊन सबनिसी जाईल, या भीतीनें कोणीच नोकऱ्या पतकरीनात ! घरांत उपासमारांत दिवस कंठिले. पुढें गणेश केशव बडोदेशाईंत डभईचे मामलेदार होते. लक्ष्मण गणेश अफूचा व्यापार करीत होते. यानंतर विष्णु लक्ष्मण व नारायण विष्णु यांना नोकऱ्या मिळाल्यावर या पिता पुत्रांनीं आपल्या घराण्याचा पांग

फेडला म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं, हें पुढील माहितीवरून लक्ष्यांत येईलच !

इंग्रजी झाल्यावर बावजीपंताचें वराणें फुटून त्याचीं चार घरें झालीं. बाबजीपंताचे भाऊबंद वऱ्हाडांत गेले, असें त्यांनीं तीर्थउपाध्यास लिहून दिलें. व कोणी नगरांत फडणीस आहेत असें म्हणतात. गोपाळ बावजी यानें पटवर्धन इलाख्यांत जाऊन तासगांव येथें वस्ती केली. हें घराणें तेथें अद्याप मध्यम स्थितींत नांदत आहे. यांचे वंशजापैकीं धोंडो गोपाळ हे रावबाजीचे कारकीर्दींत मामलतदार होते. रघुनाथ नारायण हे नामांकित वैदिक होते. ह्यांची हल्लीं तासगांव येथें सर्वत्र वाखाणणी होत असते. हे काशीयात्रेहून परत येत असतां, नाशिक त्रिंबकचे दरम्यान पाणगंगेतून जात असतां, पाणगंगेस अकस्मात् पाणी येऊन बुडाले. शके १८३७ श्रावण शु॥ १५. गोविंद रघुनाथ हे बी. ए. असून हल्लीं ईस्ट खानदेश जळगांव मुक्कामीं कलेक्टरचे चिटणीस आहेत. दत्तात्रय ऊर्फ दत्तंभट हे वैदिक आहेत. गोपाळ व कृष्ण शिक्षक आहेत. धोंडो हे सब-ओव्हसीयरचे क्लासांत अभ्यास करीत आहेत.

## कै. विष्णु लक्ष्मण ऊर्फ आप्पासाहेब यांचें जीवनचरित्र

बाबजीपंताचे दुसरे चिरंजीव केशवपंत यांचे वंशज हल्लीं पुण्यांत काळेवावरांत पंतांनीं बांधिलेल्या घरांत रहात आहेत. यांच्या वंशजांत विष्णु लक्ष्मण व नारायण विष्णु हे बरेच भाग्यवान् निपजले. विष्णु लक्ष्मण यांचे पूर्वजांनीं किल्ले सिंहगड येथील सबनिशी पेशवाईअखेरपर्यंत केली. किल्ल्याच्या दक्षिण पायथ्याशीं कल्याण नांवाचें एक खेडें आहे. तेथें यांच्या आजाच्या वेळेपासून वस्ती होती. शेतीभातीवर निर्वाह चालत होता. हे गांव पुण्यापासून अदमासें आठ कोस असावें. याच गांवीं विष्णुपंत यांचा जन्म शके १७४८ त झाला. यानंतर ५।६ वर्षांनीं या गांवाजवळच मोगीखाडीचा रामोशी उमाजी नाईक यानें बंड केलें. तें बरेंच जोरदार झालें. त्यावेळीं बरवे यांच्या जमिनी रामोशीच करीत असत. रामोश्यांनीं बरव्यांशीं इमान ठेविलें होतें. म्हणून त्यांनीं बरव्यांस

दुसरीकडे वस्ती नेण्याचें सुचविलें. व त्या रामोशांनीच त्यांना पुण्यास पोंचविलें. वाटेनें आवींचे घाटांत बंडवाल्यांची वस्ती होती, त्यांतून पार पडणें रामोशांच्या मदतीशिवाय कठीण होतें. लहानपणीं विष्णुपंत फारच अशक्त होते. त्यामुळें आईबापांस ते जगण्याचा भरंवसा नव्हता, पण देवाची करणी निराळीच होती. पुण्यांत आल्यावर नववे वर्षी यांची मुंज जाली. मुंजीचे आधीं मुलें कागदावर बसवीत नसत. परंतु विष्णुपंत हे सगळे धुळाक्षर करून कागदावर बसले. पुढें तीन वर्षें मॉनिटरी केल्यावर हापिसांत लहानशा चाकरीवर लागले. उत्तरोत्तर आपल्या हुषारीनें कांहीं वर्षांनीं सुपरिंटेंडेंटपर्यंत वाढले होते. सन १८८० त यांनीं पेनशन घेतली. पेनशन १२५ शें रुपये झाली होती. विष्णुपंताचा उद्योगी स्वभाव; सारखे कांहीं तरी उद्योगांत असणें. पेनशन-नंतर त्यांनीं **कोर्टमार्शलच्या** ऑफिसांत ३।४ वर्षें नोकरी केली. ती नोकरी द्रव्यलोभाकरितां नसून केवळ एका नातलगाला तेथें जडवून द्यावें म्हणून केली. तो गृहस्थ हल्लीं मोठ्या जबाबदारीच्या हुद्यावर आहे. विष्णुपंतांनीं सरकारी नोकरी सन १८४२ पासून १८८४ पर्यंत केली. या बेचाळीस वर्षांच्या कारकीर्दीत त्यांचे हातून बरेच लोकांवर उपकार झाले आहेत. त्यांपैकीं दोन लेले; एक घारपुरे; एक केळकर; एक सरंजामे व एक करंदीकर हे होत. हे सर्वजण पंतांच्या बरोबरीला चढले; व कांहीं पेनशन घेऊन परलोकीं गेले. पंतांनीं नोकरी सोडिल्यावर ३।४ वर्षेपर्यंत प्रवास केला. गया, रामेश्वर, अजमीर व इंदोर वगैरे ठिकाणें पाहिलीं. श्रीकाशीयात्रा पूर्वींच केली होती. सन १८९० त जिल्हा पुणेंपैकीं मौजे यवत येथें जमीन खरेदी करून तेथें घर बांधून राहिले. या खेडेगांवीं राहण्याचें कारण तेथील हवापाणी उत्तम आहे हें होय. कांहीं वर्षांनीं या ठिकाणीं बरीच वस्ती होईल असें भाकीत पंतांनीं केलें आहे. त्यांचा लिहिण्यावाचण्याचा व्यासंग फार होता. वय पहावें तों ८८।८९ पावेतों. परंतु लिहिण्या वाचण्यास चष्मा लागत नसे, हें या लेखकानें प्रत्यक्ष पाहिलें आहे. आपटे घराण्याच्या

इतिहासाच्या माहितीचीं कांहीं प्रकरणें व वंशवृक्ष या लेखकानें त्यांना यवत मुक्कामींच दाखविले. त्यावेळीं पंतांनीं या गरीब लेखकास 'तुमचें इतिहासाचें काम चांगलें होईल !' असा प्रेमळ अश्रुभरित आशीर्वाद देऊन "आमच्या बरवे घराण्याचाही इतिहास आमचे हातून लवकरच तयार होईल." असें म्हणाले. त्यांचें आचरण पवित्र होतें. उपकारबुद्धी मोठी होती. आपले भाऊबंद जवळ बाळगून त्यांचें शक्य तितकें हित त्यांनीं केलें. त्यांना पुत्र तीन; पैकीं नारायणराव हे रावबहादूर होऊन वारले. येवढ्या मोठ्या पदवीधर गुणवान् पुत्राचें आपल्या देखत मरण ! हें अशा उतारवयांत पंतांच्या प्रकृतीला थकवा येण्यास विशेष कारण झालें. आप्पासाहेब मौजे यवत येथेंच आषाढ वा। १० मी शके १८३६ रोजीं कैलासवासी झाले. त्यांचे पुत्र हरीभाऊ यांनीं नेत्रविकाराच्या त्रासानें ४६ वे वर्षी पेनशन घेतलें. हे पब्लिकवर्क्स खात्यांत नोकर होते. हरीभाऊ हे वडिलार्जित शेतीभाती करून यवत मुक्कामींच आहेत. यांनीं आप्पासाहेबांची इच्छा त्यांचे पश्चात् तरी पूर्ण व्हावी, या हेतूनें आपल्या घराण्याचा इतिहास विशेष माहितीसह छापण्याकरितां या लेखकास आज्ञा करून द्रव्याचें सहाय्य विशेष केलें. हे दिवसांतून एकदां तरी वडिलांच्या दहनस्थानाचें दर्शन घेतल्याशिवाय रहात नाहींत. त्याजागीं यांचे मनांतून समाधी बांधणेचें आहे. यांचा स्वभाव गरीब व शांत आहे. वैद्यकीचाही नाद विशेष आहे. यांचे तिसरें चिरंजीव दामूआण्णा हे सध्यां लढाईवर गेले आहेत.

कै. आप्पासाहेब यांनीं स्वहस्तें लिहिलेली **प्रस्तावना** व विद्वानांचे अभिप्राय हे दोन लेख यापुढें देत आहें. त्यावरून कै. आप्पासाहेबांचें मन घराण्याचें पुस्तक प्रसिद्ध करण्याचे कामीं किती उदास झालें होतें, तें स्पष्ट दिसत आहे.

---

# कै० आप्पासाहेब यांनीं लिहिलेली प्रस्तावना

बरवे हें कुल कोंकणस्थ ब्राह्मणाचें असून ऋग्वेदी आश्वलायन शाकलशाखी कौशिक गोत्री विश्वामित्र अघमर्षण कौशिक इति त्रिप्रवरान्वित आहे. या कुळाचें उपनांव "बाड" आहे. तें पेशव्यांनीं बदलून 'बरवे' असें ठेवलें. त्याबद्दल सनद अष्टागरचे बरवे घराण्यांत अद्याप आहे असें समजतें. यांची पूर्वीची वस्ती दाभोळनजीक कोळथरें येथें असून, सदरहु गांव जळाला या कारणानें नेवऱ्यांत गेली, अशी दंतकथा आहे व बरेच बरवे आपल्याला नेवरेकर म्हणतात; त्यांचीं कुळदैवतें कोळेश्वर व ग्रामदैवतें आदित्य, वरदान, धरणेकर, मानाई, वीरेश्वर वगैरे आहेत. सदरहू कुळदैवतें कोळथऱ्याचीं आहेत. यावरून हे लोक मूळचे तेथलेच असावे, असें मानण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. तथापि बरेच घराण्यांतील मंडळीस त्यांचें मूळचें गांव माहीत नाहीं. सबब या कुळाचें मूळ गांव ठरवितां येणें कठीण आहे. व उपलब्ध असलेल्या वंशावळी १० पिढ्यांपेक्षां जास्त मागच्या नाहींत. व क्षेत्रस्थ उपाध्यापाशीं १५०।२०० वर्षांपेक्षां जास्त जुने यात्रेकरूंचे लेख नाहींत. कारण, यात्रेकऱ्यांच्या नांवाची नोंदणी पेशवाईपासून अलीकडे करूं लागले आहेत.

या कुळाची बखर बनविण्याचा बेत आमचे मनांत फार दिवस घोळत आहे व या कामाला लागणारी माहिती सहज मिळेल, या घमेंडींत आम्ही होतों. त्याप्रमाणें ५।६ वर्षांमागें हें काम आम्हीं हातीं घेतलें व वर्तमानपत्रांतून जाहिराती देऊन बरवे मंडळीस त्यांच्या वंशावळी मागितल्या. नंतर बरेच दिवसांनीं पत्रेंही लिहिलीं पण कोणाचेंच उत्तर येईना; सबब हलकारे पाठविले, मित्र, सोयरेधायरे भरीस घातले. तेव्हां कांहीं थोर घराण्यांकडून कांहीं माहिती आली. येवढ्यावरच तीन वर्षें

लागलीं. आलेल्या माहितींतल्या शंकांचें निराकरण होण्यास दोन वर्षें लागलीं. अशा दिरंगाईचें कारण, मंडळीचा ग्रह असा झाला होता कीं, या कामांत इतिहासाचें नांव पुढें करून अंतिम हेतु कांहीं तरी निराळाच आहे. त्यामुळें मागें काय लचांड लागेल कोण जाणे; असे उद्गार कित्ती-कांनीं काढले! अद्यापही कांहीं लोकांचा असाच समज आहे, म्हणून त्यानीं काडीमात्र माहिती दिली नाहीं. असें जाहल्यावर आम्ही तीर्थउपाध्यां-कडे इलाज केला. तेथेंही असाच समज आहे, म्हणून देशस्थ भटांनीं माहिती देण्याचें अगदींच नाकारलें. कोंकणस्थ भटांनीं मात्र समजुतीवर येऊन मागितलेली माहिती दिली. त्याबद्दल त्यांचे आम्हांवर फार उप-कार झाले आहेत. कारण, त्यांचे मदतीवांचून आमचें काम इतकें झालें नसतें.

इतके दिवस आमचा समज असा होता कीं, तीर्थउपाध्ये यजमाना-पासून वंशावळी आग्रहानें घेतात. हा केवळ यांचा पोटपाण्याचा व्यव-हार आहे. कारण, ज्या उपाध्यांच्या वंशावळींत नवे यात्रेकरूंचे पूर्वज असतील त्या उपाध्याला त्यांनीं पूजला पाहिजे, असा सर्वत्र सांप्रदाय आहे. परंतु अनुभवावरून आतां समजलें कीं, असे लेख जर उपाध्या-जवळ नसते तर आमचें काम रेंळलें नसतें. कोर्टांत देखील या लेखांचा उपयोग भाऊबंदकीच्या कज्यांत होतो. उपाध्याच्या वंशावळीवरून हक्क सिद्ध करतां येतात. उपाध्यांना वंशलेख देण्यास पुष्कळ यात्रेकरू टाळा-टाळी करतात. तें आत्मघातक कृत्य आहे असें कधीं कधीं अनुभवास येतें. कांहीं थोर गृहस्थांनीं आपल्या वंशावळी व त्यांतील थोर माणसांचीं चरित्रें मोकळे मनानें पाठविलीं आहेत, तेवढ्याचीच बखर आम्हीं बनविली आहे. बाकीच्या लोकांच्या वंशावळी तीर्थउपाध्याकडून आल्या, त्या तशाच्या तशाच पुस्तकांत घातल्या आहेत. त्यांत अशुद्धें आम्हांस दिसत आहेत, पण त्या मालकांचे मदतीवांचून आम्हांस दुरुस्त करतां येणार येत नाहींत. आमचें पुस्तक त्यांचे हातीं गेल्यावर त्यांनीं आपला दुराग्रह सोडून त्या शुद्ध कराव्या.

या बखरीस बरवे कुळाचा एक वंशवृक्ष बनवून जोडावा, असा आमचा विचार होता; परंतु तो फसला; कारण हातीं आलेल्या वंशावळींत मूळ भाऊबंद पुरुषाचे कोणीच यातले नाहींत. सबब कोणाचा कोणाशीं संबंध लागेना. म्हणून वंशावळी जशाच्या तशाच ज्याच्या त्याच्या इतिहासाला जोडल्या आहे. तीर्थउपाध्येकडून आलेले लेख फार हयगईचे आहेत. व त्यांत यात्रेकरूंनीं लिहिलेले ठिकाणांत हल्लीं बरव्यांची वस्ती बिलकूल नाहीं. उदाहरण कुर्धे वगैरे गांव; त्यांतील लोक कोणीकडे झुकले तें समजत नाहीं. तेव्हां हें पुस्तक त्याचे हातीं पडल्यास त्यांनीं आपापल्या वंशावळी व पत्ते शुद्ध करावे, अशी आमची त्यांना आग्रहपूर्वक विनंति आहे. असें केल्यानें या पुस्तकाची दुसरी आवृत्ती अधिक शुद्ध निघेल. हें पुस्तक तयार करण्यांत आमच्या श्रमाचा, द्रव्याचा व काळाचा बराच व्यय झाला आहे, हें सांगण्यास नकोच. त्याचा बरवे मंडळींना तरी अभिमान असावा. कारण, त्यांत त्याचे जे थोर पूर्वज होऊन गेले आहेत, त्यांच्या सत्कृत्यांचा उल्लेख केला आहे तो स्मरणीय आहे. यामुळें पुढच्या पिढ्या याचें अनुकरण करून उत्तम मार्गाला लागतील व ज्यानीं त्यानीं नव्या पिढ्या व त्याची चरित्रें जसजशा होतील तसतशा या पुस्तकांत वेळचे वेळां मांडल्यावर पुढच्या शतकांत ते बरेच वाढून, मागील पिढ्या विस्मरणांत पडल्या त्याप्रमाणें पुढच्यांचें होणार नाहीं. आपलेप्रमाणेंच 'आपटे' कुळाचा इतिहास बनत आहे. १४ गोत्रांच्या लोकांना असेंच करण्याची स्फूर्ति देव देवो ही विनंति.

## विद्वानांचे अभिप्राय

रा. विष्णु लक्ष्मण बरवे या सन्माननीय गृहस्थानें बरवे वंशाचा वृत्तांत लिहिण्याचा हा केलेला प्रयत्न खरोखर वर्णनीय आहे. वंशाचा वृत्तांत लिहिल्यापासून वंशजाच्या अंगीं एकप्रकारचा उत्साह उत्पन्न होतो. युनिव्हर्सिटीचे ग्राजुएट झाल्यानें जशी सदुद्योगाविषयीं स्फूर्ति येते, तशी एका प्रख्यात वंशांतील आपण आहों, अशी भावना उत्पन्न झाल्यानें सदुद्योगाविषयीं स्फूर्ति स्वाभाविक निपजते.

कौशिक–विश्वामित्र हे ऋषि या घराण्याचे मूळारंभकर्ते असल्यानें त्या घराण्यांतील विचारी वंशजांचे मनावर त्या ऋषींच्या अलौकिक हठयोगाची व त्यांचे बुद्धिवैभवाची प्रतिमा सहज च उमटावयाची. ज्यांनीं राजऋषीचें ब्रह्मऋषि करून घेतलें व सावित्री मंत्र (गायत्री या नांवानें प्रसिद्ध असलेला) तो एकंदर या घराण्याचा आदिमंत्र होऊन बसला आहे, त्या ऋषींच्या हठयोग व बुद्धीमत्तेविषयीं विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. विष्णुपंतांचे मनावर ती प्रतिमा चांगली उमटली आहे, हें त्यांस पाहिल्या बरोबर लक्षांत येतें. त्यांचे या वयांत म्हणजे ९० वे वर्षीं ज्ञानार्जन व ज्ञानप्रसारण याविषयींची त्यांची लालसा पाहून विस्मय वाटतो. संतति, संपत्ति दोन्ही अनुकूळ असून सकाळपासून अस्तमानपर्यंत ज्ञानार्जन व ज्ञानप्रसारण या दोन्ही कामीं जे त्यांचे अव्याहत परिश्रम चालू आहेत, त्यांवरून असें वाटतें कीं, त्यांचे पूर्व-पूर्वज कौशिक ऋषि यांचे कर्तबगारीची फलिता येण्यास यांचें प्रत्यक्ष उदाहरण हें मोठें साधन आहे. त्यांनीं तयार केलेल्या वंशचरित्रावरून समजतें कीं, बरवे घराण्यांत अनेक कर्तबगार लोक होऊन गेले व होत आहेत. कोणी सिद्ध झाले, कोणी समशेर बहाद्दर व कलमबहाद्दर निवटले, कोणी दशग्रंथी वैदिक, कोणी वेदांती, कोणी नामांकित वैद्य, कोणी प्रख्यात मल्ल, कोणी गवई-वादनी झाले, तर कोणीं मुत्सद्दीपणांत प्रावीण्य दाखविलें, कोणी नाटकें रचण्यांत प्रख्यात जाले, कांहींनीं छापखाने घातले आहेत, बहुतांच्या कीर्ति व त्यांनीं मिळविलेलीं उत्पन्नें अद्याप चालू आहेत. पुढील पिढींतहि बरे च गुणी लोक निघाले आहेत. बरवे कुळांत कोणीं विद्यार्जनांत लौकिक मिळविला, म्हणजे विष्णुपंत त्यास द्रव्य-द्वारें उत्तेजन देतात. आपला हा वंशवृक्ष लिहिण्याचा प्रयत्न वंशाचे भावी उन्नतीस कारण होईल तर बहुत खटपट करून ज्यांनीं हें वृत्त तयार केलें आहे ते आपणास कृतार्थ मानतील.

स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम्

प्रो. शि. बा. परांजपे

# रावबहादुर नारायण विष्णु व गणेश दाजी यांचे विषयीं माहिती

हे उभयतां गृहस्थ सन १८५० व ५१ त जन्मले. हे चुलतेपुतणे असून स्वभावानें अगदीं भिन्न होते. पुतणे नारायण हट्टी व चुलते गणेश धीमा असे होते. नारायण दोन वर्षांनीं लहान असून गणेशाला फार छळी, कारण याला कोणीं सांगितलें कीं, गणेश तुझ्याशीं भाऊबंदकी करून तुला घरांतून बाहेर घालवील. यामुळें नारायण गणूस म्हणत असे चोरा नीघ आमचे घरांतून. पण गणूचे आईनें तें मनावर घेतलें नाहीं, इतकें च नव्हे तर नारायणावर ती विशेष ममता करी. शाळेंतून घरीं आल्यावर दोघेहि खाण्याला मागत. गणू जें मिळेल तें खाई. नारायण तें नको हें नको असें म्हणून रुसून बसे. मग काकीनें च त्याची समजूत करावी. तिला नारायणाची खोड समजली होती कीं, तूं अमुक घे असें म्हणतां उपयोगी नाहीं. तुला काय पाहिजे असें विचारलें म्हणजे खूष होऊन जें देतील तें खाई. हा हट्ट करितो म्हणून आई मारी. म्हणून तो आईला मारकी म्हणत असे. परंतु अमळ जर दृष्टि पडली नाहीं तर मारकी कोठें गेली ग काकी असें पुसे.

या मूर्तिद्वयांतील दुही म्याट्रिक होईपर्यंत जास्त होती. एका वर्गांत बसत नसत. दोघांचे खेळगडी निराळे, तसें च एका दिव्याशीं अभ्यासाला बसत नसत. नारायण चलाख होता, गणेशाच्या आधीं म्याट्रिक होऊन इंजिनीयर कॉलेजांत गेला. गणेश म्यॅाट्रिक झाल्यावर नोकरीस लागला. गणेशचे आतेबंधू वामन महादेव लेले यांनीं आपले ऑफिसांतील क्याशियरची जागा त्यास देवविली. सन १८७७।७८ चे दुष्काळांत सरकारनें एल. सी. ई. वर्गांतले सर्व मुलगे कामावर लाविले, त्यांत नारायणहि लागला. दोघांच्या मनांतील द्वैतभाव नोकरी लागल्यावर नाहींसा होऊन प्रेमभावच विशेष वाढला. गणेश तीन चार आफिसांत वर्ग होऊन पुण्यांत

म्यु. क. व जकात सु. जाहाला. गणपतराव यांनीं नोकरीवर असतांना चांगला लौकिक मिळविला. यांना पुणें येथें च प्लेगानें बळी घेतलें. या गणपतराव दाजीचे पुत्र बळवंतराव व सदाशिव हे गव्हर्मेंट मिलिटरी खात्यांत क्लार्क आहेत. व अनंत हे विद्यार्थी आहेत. बळवंतराव यांचीं मुलें विद्यार्थी आहेत. पैकीं दत्तात्रय हें यंदां च बी. ए. झाले. असून एल. एल. बीच्या वर्गांत आहेत.

नारायणराव यांची पहिली नेमणूक निरावर्केवर झाली. तेथें १५ वर्षें राहून बंधाऱ्याचें काम उत्तम केलें. पुढें गोदावरी बंधाऱ्याचे कामावर वर्ग झाला. तेंहि काम यांनीं उत्तम केलें असें सर्वतोमुखीं झालें. यांना कोठें नवें काम निघालें कीं त्यावर पाठवावें. यांनीं पुण्यानजीक खडकवासल्याच्या धरणाचे दरवाजे, शेठफळ तलाव वगैरे कर्में फार च उत्तम केल्यामुळें यांना गेल्या प्रसिद्ध दिल्ली दरबारांत रावबहादुरी व ५०० रुपये पगार करण्यांत आला. परंतु यांना मृत्यूनें लागलें च पछाडल्यामुळें, सदरहु बहुमानाचा उपभोग घडला नाहीं. नारायणराव फार खर्चीक होते. यांनीं आपल्या खर्चानें विलायतेंतलें **विलायती शिक्षण** शिकण्याकरितां दोन विद्यार्थी पाठविले होते, दोन मुंबईस पाठवून उद्योगधंद्यास तयार केले, सदरहु चौघेहि विद्यार्थी हल्लीं चांगल्या स्थितींत आहेत. दोन मित्रांचें कर्ज फेडलें. भाऊबंदांचीं लग्नें केली, महायात्रा केल्या, आणि वडिलोपार्जित घराचें पुनरुज्जीवन केलें. आसपासचीं घरें विकत घेतलीं, द्रव्यसंचयाकडे यांनीं विशेष लक्ष दिलें नाहीं. रावब. नारायणराव वैशाख शुध्द ८ शके १८३३ त कैलासवासी झाले. एकंदरींत आरंभीं म्हटल्याप्रमाणें विष्णु लक्ष्मण ऊर्फ आप्पासाहेब व यांचे चिरंजीव रावबहादुर नारायणराव या पितापुत्रांनीं कुटुंबाची स्थिति उत्तम सुधारून आपल्या पुढील वंशजांनीं कित्ता घेण्यासारख्या गोष्टींचें स्मारक करून स्वर्ग गांठला म्हणण्यास बिलकूल हरकत नाहीं. रावबहादुर नारायणराव ह्यांचे चिरंजीव शंकरराव म्हणोन आहेत. यांनीं सरकारी नोकरी धरली आहे. हे वडिलार्जित वाड्यांत च रहात आहेत.

ज्या पुरुषानें विश्वासूपणानें इमानें--इतबारें चाकरी करून शत्रूशीं सिंहगड किल्ला झुंजविला तो खरा वीर पुरुष सखाराम गणेश बरवे होय. सखारामपंताचे चुलते त्रिंबक केशव हे साताऱ्यास गेले. तेथें गडकऱ्याची असामी मिळवून तेथें च वस्ती केली. यांनीं व यांचे चिरंजीव अनंत यांनीं गडकऱ्याची नोकरी केली. इंग्रजी झाल्यावर गडकरी कमी केले व त्यांना नोकरीबद्दल दिलेल्या जमिनी त्यांचेकडे निम्मे जुडीवर ठेविल्या. त्याप्रों। त्रिंबकपंताची जमीन त्याच्या वंशजाकडे आहे. त्रिंबकपंताचे वंशज पांडुरंग अनंत इंजिनीयर खात्यांत पुण्यांत नोकर आहेत. बंधु विनायक हे पुणें येथें च आहेत. सदाशिव याचा मुलगा केशव इंग्रजी शिकत आहे. त्रिंबक केशव यांचे दुसरे चिरंजीव विष्णु यांचे पुत्र रामचंद्र नागपूराकडे नोकरीवर आहेत. ह्यामुळें सातारचें घराणें अगदीं च उठलें. तेव्हां आतां बाबजीपंतापैकीं वंशज तासगांव व पुणें येथें आहेत. वऱ्हाड प्रांतांतील वंशजांचा पत्ता नाहीं. हें घराणें नेवरें येथील जोगदेवभटाचे कनिष्ठ बंधु विठलभटाचे वंशजांचें होय.

# ( लोहगड ) आंबेगांव येथील बरवे यांचा वंशवृक्ष

- विठ्ठलभट
  - नारायण
    - जोगदेव
    - विठ्ठल
      - बाळ उर्फ बल्लाळ
        - कृष्ण
          - बल्लाळ
            - सदाशिव
              - बल्लाळ
                - माधव
                  - गोपाळ
                    - बल्लाळ
            - चहिरव
              - काशिनाथ
                - नारायण
                  - हरी
                    - शंकर
                      - पुरुषोत्तम
                      - माधव
                    - निळकंठ
                  - वामन
                    - त्रिंबक
                      - व्यंकटेश
                    - दामोदर B. E.
                      - मुकुंद
                    - प्रभाकर B. A. L. L. B.
                    - जनार्दन
                    - नारायण
                  - रामचंद्र
                    - गंगाधर
                    - गोविंद
                    - बाळकृष्ण
                - केशव
                  - माहादेव
          - गोपाळ
      - गोपाळ

## ( लोहगड ) आंबेगांव येथील बरवे यांची माहिती

पुणें जिल्ह्यांतलि लोहगडाचे पायथ्याशीं असलेल्या आंबेगांवीं भानूंचा वाडा विद्यमान आहे. सद्रहु वाडा मोठ्या बंदोबस्ताचा आहे. या वाड्यास लागून बरवे यांचें घर आहे. आंबेगांवचे भानूचा पुरुष कोंकणांतून जो देशी आला त्याचे बरोबर च बरव्यांचा बल्लाळ कृष्ण आला असावा असें वाटतें. बल्लाळाचे पुत्र सदाशिव व बहिरव हे आंबेगांवीं भानूंचे आश्रयानें होते. बल्लाळ हे श्रीक्षेत्र काशीस गेले होते. यांचेकडे जुने कागद्पत्र न मिळाल्यामुळें, विशेष महत्त्वाची माहिती मिळाली नाहीं.

बहिरव बल्लाळचे पणतू हरी नारायण हे कलेक्टर ऑफिसांत नोकर होते. हल्लीं पेन्शनर आहेत. रावसाहेब वामनराव नारायण हे प्रथम वयाचे २४ वर्षांचे सुमारास कलेक्टर ऑफिसांत नोकर होते. तेथून पोलिस खात्यांत बद्ली झाली. पुढें शंभर १०० रुपयांवर १९०१ त चीफ कान्स्टेबल झाले. नंतर १९०६ त पोलीस इन्स्पेक्टर झाले. सन १९०८ मध्यें २५० रुपये पगारावर डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस झाले. सन १९१५ त ‘ राव साहेब’ हा किताब मिळाला. हल्लीं ४०० शें रुपये पगार आहे. वामनराव ऊर्फ आण्णासाहेब यांनीं दोन वर्षांची फर्लो घेतली आहे. पुणें येथें शुक्रवार पेठेंत काळेवावरांत सन १९०० शें मध्यें घर बांधिलें आहे. रामचंद्रपंत पेन्शनर आहेत. शंकर हरी हे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसचे ऑफिसांत क्लार्क आहेत. निळकंठराव सर्वे डिपार्टमेंटमध्यें नोकर आहेत. त्रिंबक वामन हे कंट्रॅक्टर आहेत. दामोदर वामन हे माळशिरस येथें ओव्हरसियर आहेत. प्रभाकर वामन हे यंदा च बी. ए. एल. एल बी. झाले. गंगाधर रामचंद्र व महादेव केशव कॉलेजांत आहेत. कर्यात नेवरें येथील जोगदेव भटाचे बंधू विठलभट; विठलभटाचे पणतू बल्लाळ कृष्ण हे च बहुतेक देशावर आले असावेत; हे नेवरेकर बरवे होत.



कै० आनंदराव सखाराम बरवे, बी. ए. तारापूर

कृष्णाजी पांडुरंग बरवे, तारापूर





कै० पांडुरंग सखाराम उर्फ शामराव बरवे, तारापूर

# जिल्हा ठाणे कसब तारापूर येथील बरवे



# कसबे तारापूर येथील बरवे



## जिल्हा ठाणें कसबे तारापूर येथील बरवे यांची माहिती

तारापूरकर बरवे यांचे कोंकणांतील मूळ गांव चिपळूण तालुक्यांतील मौजे मिरजोल होय. मिरजोल येथें यांचे वंशज हल्लीं आहेत असें समजतें. मिरजोलहून चिमणाजी सोनभट ऊर्फ ( सांडभट ) बरवे हे तारापूर येथें आले. त्या कालीं उकिडवे आडनांवाचे एक गृहस्थ मोठे श्रीमान् होते. चिमणाजी हे उकिडवे यांचे घरीं शागिर्दीचें काम पतकरून राहिले. पुढें कांहीं वर्षांनीं कारकुनीचें काम करूं लागले. चिमणाजी हे मोठे धूर्त व लेखणीचे मजबूत ! यामुळें लवकर च हे मुख्य कारभारी झाले.

चिमणाजी कारभारी असतां यांचे पुतणे केशव बाळाजी व नातू सखाराम सदाशिव हेहि तारापूर येथें आले. सखाराम यांचे पुत्र कृष्ण हे महाड, रोहें, वसई वगैरे ठिकाणीं मामलेदार होते. कृष्णराव यांनीं श्रीक्षेत्र काशी येथें ता. २२–७–१८४५ रोजीं जलसमाधि घेतली. कृष्णराव यांनीं जलसमाधि घेतल्यामुळें यांचे कुंटुबास सरकारानीं पंचवीस २५ रुा॰ पेन्शन दिलें होतें. सखाराम कृष्ण कस्टममध्यें सर कारकून होते. यांना पुत्र पांच; आनंदराव बी. ए. होते; यांनीं बडोदा संस्थानांत हायकोर्ट जज्जाची नोकरी केली. यांना पुत्र दोन; रघुनाथ व निळकंठ; लेफ्टनंट रघुनाथराव हे एल. आर. सी. पी. असून हल्लीं लढाईवर गेले आहेत. निळकंठराव म्यॅाट्रिक पर्यंत शिकले आहेत. पांडुरंग सखाराम उर्फ शामराव हे एल. सी. ई. फेल होते; यानीं बडोद्यास इंजिनियरचें काम केलें होतें. यांचे दत्तक पुत्र कृष्णराव; हे विद्वांस घराण्यांतील असून यांचें पूर्व नांव काशिनाथ होतें. कृष्णराव हे थर्ड क्लास मेक्यानिकल इंजिनीयर इ. स. १९०८ त झाले. शामराव यांनीं तांदूळ सडण्याची गिरणी घातली होती. ती हल्लीं बंद आहे. श्रीधर सखाराम हे ग्वालियर येथें डॅाक्टर होते. यांचे दत्तक चिरंजीव सखारामपंत हेहि एल. एम. अॅंड. एस आहेत. यांचें पूर्व नांव नारायण असून हे गोंधळेकरां-पैकीं आहेत. श्रीनिवास हे सबइन्स्पेक्टर होते; हल्लीं घरीं च आहेत.

चिंतामण कृष्ण जव्हारसंस्थान मध्यें खासगी कारभारी होते; यांची मुनसफीची परीक्षा पास झाली होती. भिकाजी केशव यांचेकडे तारापूर येथील दिवाणी–फौजदारींचे अधिकार होते. सखाराम कृष्ण हे बी. ए. आहेत; हे नाशिक येथें रजिस्ट्रेशन हेड्क्लार्क आहेत. तारापुरापैकीं कांहीं मंडळी मुंबईस नोकर असून कांहीं इतर ठिकाणीं व कांहीं शेती–भाती करून आहेत. या घराण्यापैकीं बाळाजी सखाराम यांनीं साडेचार ४॥ बिघे जमीन इनाम मिळविली.

## सनदेची नक्कल

### श्रीगजानन

राजश्री बाळाजी सखाराम वस्ती कसबे तारापूर गोसावी यासी सेवक परशराम खंडेराव सुभेदार प्रांत वसई नमस्कार सु॥ खमस अशर मयातैन व अलफ (इ. स. १८१५) तुम्ही सुभा बाजीपुरा येऊन विदित केले कीं कसबे मजकुरी आहे त्यास मागिल दारचे परसाचे कुंपणा खाली खारट जमीन कोळी ओसिक तेथें खोची पडोन त्यात समुद्राचे भरतीचे खारे पाणी दर उदाणास येते तेणें करून झाडोऱ्यास उपसर्ग लागोन विहिरीचे पाण्यास नस मारून वाईट झाले याजकरितां खारट पैकीं अदमासे चार साडे चार बिघे जमीन घेऊन दगडी बांध हजार रुपये खर्च करून बांधिला आणि परसू केले त्यास आठ नऊ वर्षे जाहली तेथे कीर्द झाली नाहीं पुढें होत होत होईल, त्यास आम्ही कुटुंबवत्सल जागा मागील दारी खर्चवेच बहुत करून जागा केली याजकरितां ते जागा घरधंदा कडे माफ करून दिली पाहिजे म्हणून त्याजवरून मनास आणिता जुनी जागा वापरास पुरत नाहीं आणि विहिरींचे पाणी नासोन झाडोऱ्यास उपसर्ग लागो लागला यांजकरिता खर्चवेच करून दगडी बांद बांधून परसात जमीन घेतली हे जाणोन तुम्हास जमीन बिघे ४॥ साडेचार घर बांदास देऊन महालकरी आला यासी अलाहिदा सनद दिली असे तरी सदरहु जमीनीचा भोगवटा साल दर साल करणे जाणिजे छ २७ रमजान पा। हुजुर (लेखन सिमा)

---

## जि० रत्नागिरी ता० राजापूर मौजे गांवखडी येथील बरवे यांचा वंशवृक्ष.




*महादजी
कृष्णाजी
वासुदेव
लक्ष्मण
बाळाजी
रघुनाथभट
मोरो
दिनकर
परशराम
कृष्ण
गणेश
वासुदेव
गोविंद°
गणेश
वामन
श्रीधर°
केशव
विष्णु केशव ऊर्फ रावजी
पांडुरंग
हरी
पुरुषोत्तम°
लक्ष्मण°
दामोदर°
भिकाजी°
नारायण°
महादेव
गोपाळ°
द°
लक्ष्मण°
अंताजी°
दामोदर
जगन्नाथ°
शंकर°
वामन°
भास्कर°
पुरुषोत्तम°
दामोदर*
द. गे.
बाळकृष्ण°
विठ्ठल°
परशराम°
गोपाळ
वासुदेव
त्रिंबक
गणू
पांडुरंग
अच्युत
महादेव
दत्तात्रय



निळकंठ सखाराम बरवे, बी. ए., एल्. एल् बी. जालगांव

हरि परशराम चरवे, गांवखडी





## मौजे गांवखडी येथील खरवे यांची माहिती

या घराण्याचा मूळ पुरुष **वामन भट**. हे गांवखडी येथें नेवऱ्याहून आले, असें जुन्या वंशावळींत ध्वनित केलें आहे, तें अगदीं चूक आहे. नेवऱ्याचे मूळ पुरुष विठ्ठलभट व वामनभट हे दोघेहि नेवरें व गांवखडी येथील नसून कदाचित् कोळथरें येथील असल्यास असावे, परंतु असा अदमास करण्यापेक्षां जर १४०० शतकांतील माहिती खरी मिळाली असती तर खात्रीनें अमूक गांव असें सांगतां आलें असतें.

वामनभटाचे पुत्र गोपाळ व गोविंद या उभयतांचे वंशज गांवखडीहून देशावर गेले. गोविंदभटाचे वंशज पांचवे पुरुष माहादाजी, याचे पुत्र कृष्णाजीचे वंशज हल्लीं सातारा प्रांतीं आहेत. कृष्णाजीचे नातू परशराम बाळाजी यास पुत्र चार; विष्णु, रावजी, पांडुरंग व हरी. रावजी परशराम मामलेदार, यांचा वांई येथें वाडा होता. पांडुरंग अकौंटंट व हरी सब इंजिनियर असे होऊन गेले. हरीपंत पेन्शन घेतल्यानंतर शेतवाडी करीत असत. ते अर्धांग वायूनें मृत्यू पावले. नारायण रावजी हे प्रथम कलेक्टर ऑफिसांत होते. नंतर पोलिस सुपरिंटेंडेंटच्या ऑफिसांत हेड क्लार्क व शिरस्तेदारीचें काम करून सातारा येथें व सोलापूर जिल्ह्यांत चीफ कॉन्स्टेबलचें काम सन १८९६—१९०० पर्यंत केलें. पुढें १९०५ सी. आय. डी. ऑफिसांत होते. हल्लीं पुणें येथे रहात आहेत. दामोदर विष्णु से. मा. होते. शंकरराव व पांडुरंगपंत डॉक्टर आहेत. अंताजी विष्णु नाटकांत आहेत. जगन्नाथ पांडुरंग सातारा म्यु. पालिटींत नोकर आहेत. विठ्ठल हरी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटींत आहेत. लक्ष्मण विष्णु व गोविंद कृष्ण हे श्रीकृष्णाकांठीं मौजे गोंवे येथें आहेत. महादाजीचे नातू मोरो वासुदेव याचे पुत्रांपैकीं, वामन हे मुंबई येथें प्रायव्हेट स्कूलमध्यें होते. यांचे दत्तकपुत्र दामोदर हे गांवखडी येथें शेती वाडी करून आहेत. यांनीं च वंशवृक्षासह थोडीशी माहिती दिली, याबद्दल लेखक यांचा फार आभारी आहे. श्रीधर मोरेश्वर अबकारी सबइन्स्पेक्टर होते; हल्लीं पेन्शनर आहेत. भिकाजी केशव इंदोर येथें अकौंटंट ऑफिसांत असतात. महादेव गणेश ग्वालेर येथें नोकर आहेत. भास्कर ऊर्फ धोंडो व पुरुषोत्तम देशावर च असतात. दत्तात्रय विठ्ठल गांवखडीस शेतीवाडी करून आहेत. त्याचप्रमाणें पुरुषोत्तम व लक्ष्मण वासुदेव गांवखडी येथें आहेत. पेशवाईंत रामचंद्र महादाजी मामलतदार होते.

# मौजे ओटवणे प्रांत कुडाळ संस्थान सावंतवाडी येथील बरवे

- हरीभट
  - गणेशभट
    - पांडुरंगभट पु. ४
      - विनायक*
      - गंगाधर
        - रामचंद्र°
        - हरी°
        - गोपाळ°
          - महादेव°
          - शंकर
      - गणेश द. गे.
    - हरभट
      - गणेश द.

- महादेवभट
  - नारायण पु. ५
    - शंभू
      - गोविंद
        - दत्तात्रय
          - विष्णु°
        - शिवराम
          - नारायण°
        - श्रीपाद
          - नरहरी°
    - दिवाकर

- विठ्ठल
  - विश्वनाथ पु. ४
    - मोरेश्वर
      - नारायण°
        - गंगाधर°
    - सदाशिव
    - विष्णु
    - केशव

## प्रांत कुडाळ संस्थान सावंतवाडी मौजे ओटवणे येथील बरवे यांची माहिती

हरभट बरवे हे गोमांतकामधील साखळी प्रांतांतून ओटवणे येथें आले. यांचे नातू पांडुरंग गणेश; यांचे बंधु हरभट गणेश यांनीं श्रीकृष्णाकांठीं उगार गांवीं वास्तव्य केलें आहे. यानीं आपल्या पुतण्यास दत्तक घेतलें. त्याचें नांव गणेश. याचा वंश उगार येथें हल्लीं आहे. गंगाधर पांडुरंग यांचे पुत्र रामचंद्र, हरी व गोपाळ. हे संस्थान धारकडे असतात. गोपाळ गंगाधराचे चुलते विनायकभटजी हे विद्वान होते. यांनीं जन्मभर यात्रा व वेदांत अभ्यास केला. इंदोर संस्थानांतील मंडलेश्वर येथें चतुर्थाश्रमांत सन १९०१ त समाधिस्थ झाले. यांचे बरे च शिष्य तशा च वृत्तीचे तेथें आहेत. सदरहु माहिती गोपाळ गंगाधर बरवे यांनीं पाठविली.

महादेवभट बरवे याचे वंशज हल्लीं संस्थान मिरज येथें आहेत. हे बरवे कोंकणांतील ओटवणे येथील च असून, वरील गोपाळ गंगाधर बरव यांचे दशांतील आहेत. त्यांच्यापैकीं दिवाकर नारायण हे दशग्रंथी होते. यांचे पुतणे गोविंद शंभू यांच्या तीन पुत्रांपैकीं श्रीपाद आहेत. हे श्रीमंत मळेकर पटवर्धन यांचेकडे कुलकर्णपणाचे कामावर आहेत. विष्णु दत्तात्रय हे श्रीमंत मिरजकर यांचे देवाचे पुजारी आहेत. नारायण शिवराम हे जमखंडी येथें श्रीमंत जमखिंडीकराचें बंधूकडे पुजारी आहेत. यांचे वाड-वडील सोनकिर संस्थानीकांचे आश्रित होते. या घराण्यास हरदासपणा बद्दल ओटवणे गांवीं इनाम आहे. सदरहु इनामी उत्पन्न बरीं च वर्षे यांना पोंचत नाहीं. यांच्यापैकीं भाऊबंद बेळगांव नजीक वडगांव, उगार धाकटे, व हरीपूर या गांवीं आहेत. दत्तात्रय व श्रीपाद गोविंद यांनीं ही माहिती दिली.

विठ्ठलाचे पणतू नारायण शास्त्री बरवे हे गोमांतकांतून श्रीक्षेत्र वाई येथें येऊन सुमारें वीस वर्षें झालीं असावींत. हे शंकरउपासक असून शंकराचें नामस्मरण सारखें करीत असतात. प्रातःस्नान आटोपून " शिव शिव सांभ सांभ सदाशिव सांभ " या मंत्राचे गर्जनेंत श्रीक्षेत्रीं कोरान्न मागून उपजीविका करीत आहेत. यांचे पुत्र गंगाधर हे पुराण सांगतात व कीर्तनहि करितात. यांनीं शास्त्राध्ययन केल्यामुळें, यांना गंगाधर शास्त्री असें म्हणतात. यांच्या वडिलांच्या सांगण्यावरून हे मूळचे ओटवणे येथील होत. नंतर ओटवण्याहून नारायण शास्त्री यांचे वडील किंवा आजे यांपैकीं कोणीतरी गोमांतक प्रांतांतील खोतवडें गांवीं आले असावेत.

# मौजे-नागांव येथील चरवे

(गांवखडी) **वामनभट**
- गोपाळ
  - वामन
    - गणेश (गावडे गुळ्यास गेला)
    - गोपाळ
    - महादेवभट
      - गोविंदभट (हा पुरुष गांवखडीहून नागांव येथें आला सुमारें शके १६६२ त)
        - त्रिंबकभट
          - मोरेश्वर
            - सखाराम
              - चिंतामण
              - बाळकृष्ण
                - मोरेश्वर
            - वामन
            - माधव
              - रामचंद्र
                - भालचंद्र
                  - महादेव°
                  - जनूं°
                  - परशराम°
                - अनंत°
                - कृष्णा
                - विष्णु°
                - त्रिंबक°
                - निळू°
                - बापू
              - पिलू
              - गजानन
            - केशव
              - महादेव
          - गोविंद*
      - वामनभट
        - रामचंद्र (पुण्यास गेला)

- गोविंद*
  - जनार्दन उर्फ बाबा
    - विठ्ठल
      - सदाशिव
      - विष्णु
    - गोपाळ
      - परशराम द.
    - त्रिंबक
      - गोविंद
      - परशराम द. गे.
      - भार्गव
    - हरी
      - नारायण B.A.
        - जनार्दन
      - भास्कर
      - वासुदेव
      - पुरुषोत्तम
      - रघुनाथ
      - गणपती
    - विश्वनाथ
      - सिताराम
      - शिवराम
      - लक्ष्मण
  - काशिनाथ
    - गणेश
  - नारायण
    - मोरेश्वर
  - वासुदेव

---

## मौजे नागांव येथील बरवे यांची माहिती

नागांव हा गांव अगदीं समुद्रास लागून आहे. जिल्हा कुलाबापैकीं अलिबाग तालुक्यांतील हा गांव असून आलिबाग व आक्षी नागांव या दोहोंमध्यें अंतर फक्त खाडीचें आहे. आकशी नागांवास लागून असल्यामुळें, आक्षी नागांव असें म्हणण्याचा प्रघात पडला असावा. नागांव येथील बरव्यांचा मूळ पुरुष गोविंदभट माहादेव हा गांवखडहून सुमारें शके १६६२ त नागांव मुक्कामीं आला असावा. हें घराणें इकडील प्रांतीं वेदपठण व शास्त्राध्ययनामध्यें नामांकित आहे. या घराण्यांतील जनार्दनबाबा बरवे आद्वितीय पारायणी होऊन गेले. पुणें, नाशिक, पेण, काशी, इंदूर, ग्वालेर व इतर हि वेदाभ्यासाविषयीं प्रसिद्ध असलेल्या ठिकाणच्या वैदिक ब्राह्मणांस यांचें नांव माहीत आहे. ऋग्वेदांत क्रमाचें पारायण अहोरात्रींत अस्खलित वाणीनें व बिनचुक करणें हा वैदिक ब्राह्मण एक बुद्धिचमत्कार च समजतात. जनार्दनबाबांचा पुणें, काशी वगैरे स्थळीं तज्ज्ञ लोकांकडून पुष्कळ सन्मान झाला. यांचे पुत्र विठ्ठलभट यांची हि स्मरणशक्तीबद्दल फार वाहवा होती. माधवराव मोरेश्वर हे हरिदास होते.

भालचंद्र रामचंद्र हे शास्त्री व पुराणिक असून महाराष्ट्रांत व वऱ्हाडांत पुराण सांगण्याकरितां प्रतिवर्षीं जातात. यांचे चिरंजीव महादेव हे शास्त्र व गायन शिकलेले असून, सध्यां ' नूतन संगीत नाटक मंडळीं'त नट आहेत. हे तबला उत्तम वाजवितात. विष्णु रामचंद्र हे भिक्षुकी करितात. त्रिंबक रामचंद्र हे शाळामास्तर आहेत. निळू रामचंद्र मुंबई येथें कापडाचे दुकानीं नोकर आहेत. सदाशिव विठ्ठल हे कोठें तरी असतात. विष्णु सदाशिव सावकारी नोकरीवर आहेत. गोपाळ याचे दत्तक पुत्र परशराम हे जी. आय. पी–रेलवेंत सिग्नलिंगकडे आहेत. त्रिंबक जनार्दन हे हेडमास्तर होते. हल्लीं पेन्शनर आहेत. हरि जनार्दन मुनसब कोर्टांत कारकून होते. हल्लीं पेन्शनर आहेत. विश्वनाथ जनार्दन हे जी. आय. पीं-त नोकर होते. संपाचे वेळीं यांनीं नोकरी सोडिली. हल्लीं नागांव येथें शेतीभातीचा उद्योग करून असतात. गोविंद त्रिंबक हे मुंबई येथें कस्टम ऑफिसांत आहेत. नारायण हरि हे बी. ए. असून शिक्षण खात्याची एस्. टी. सी. ची परीक्षा होऊन हल्लीं शाळाखात्यांत मुंबई येथें एलफिस्टन हायस्कुलांत शिक्षक आहेत. हे १९१२ सालीं फर्स्ट एल्. एल्. बी. झाले; व या सालीं त्यांना युनिव्हर्सिटीचें एक बक्षिसहि मिळालें. रा. नारायणराव यांना हा गरीब लेखक हि असें सर्टिफिकिट देतो कीं, यांनीं आपल्या घराण्याचा वंशवृक्ष व माहिती जशी उत्तम तयार करून पाठविली, तशी बरवे घराण्यांतील एकाही व्यक्तीनें पाठविली नाहीं. वंशवृक्ष व माहिती खुलासेवार पाठविल्याबद्दल नारायणराव यांचा लेखक फार आभारी आहे. भास्कर हरि हे मोजणी खात्यांत नोकर आहेत. वासुदेव हरी हे एका गिरणींत रंगाच्या खात्यांत काम करितात. आक्षीचे बरवे व नागांवचे बरवे तीन दिवसांचे संबंधी आहेत. ती चाल अलीकडे पुष्कळ अंतर पडल्यामुळें कमी होत चालली आहे. केशवराव मोरेश्वर हे ७५ वर्षांच्या उमरीचे असून अलिबागेस राहतात. नारायण हरि बरवे हे आपणांस नेवरेकर बरव्यांपैकीं समजतात. परंतु, यांचा नागांव येथें आलेला मूळ पुरुष गांवखडीहून आल्यावरून हेही गांवखडीचेच बरवे होत.

## ता. आलिबाग मौजे आकशी येथील बरवे

राघो ( गांवखडी )

हरि

विश्वनाथ

रघुनाथ

सदाशिव

रघुनाथ

सदाशिव

नारायण

- विनायक — पृ. ५
  - विठ्ठल
  - हरि
  - बल्लाळ
  - वासुदेव
  - सखाराम
- वामन

आक्षीकर बरवे नागांवकर बरव्यांचे तीन दिवसांचे संबंधी आहेत. वरील वंशांतील रा. वामन नारायण बरवे हे सन १८९७ त अठ्ठावीस रुपये पगारावर ट्रामवे कंपनींत नोकर राहिले. स्वभावानें फार गरीब व भाविक आहेत. पूर्वी ट्रामवे घोड्यांचे सहाय्यानें चालत होती. हल्लीं विजेच्या सहाय्यानें चालत आहे. वामनराव हे नेकीनें नोकरी करीत आहेत, हें त्यांचे बढतीवरून सिद्ध होत आहे. " इ. सप्लाय अँड ट्रामवे कंपनी " असें नांव सदरहु ट्रामवे कंपनीनें धारण केलें आहे. हल्लीं रा. वामनराव चीफ स्टोअर कीपर असून पगार १५५ रु. आहे. विनायक नारायण बरवे यांनीं माहिती पाठविली. त्यांत आम्ही नेवऱ्याचे, असें यांचें ह्मणणें; परंतु तसें नसून यांचे पूर्वज हि गांवखडी येथील आहेत.

## ता. चिपळोण पैकीं मौजे सोनगांव येथील बरवे




†मोरो रामचंद्र बरवे यांनीं वंशवृक्ष पाठविला.

## ता. चिपळोण मौजे सोनगांव येथील वरवे




*रामचंद्र विष्णु वरवे यांनीं वंशवृक्ष पाठविला.

# मौजे सोनगांव येथील बरवे यांची माहिती

सोनगांव हा गांव चिपळूण तालुक्यांत श्रीक्षेत्रपरशुरामपासून दोन कोसांवर अगदीं खाडीजवळ आहे. या गांवीं गोपाळ हा पुरुष प्रथम आला. बाबजीपंत यांनीं रसाळगडची फडणिसी केली. गणेशपंत हे बाजीराव पेशवे यांचे पदरीं होते. गणेशचे पुत्र केशवपंत हे थोरले बाजीराव पेशवे यांच्या अस्थी प्रयागास घेऊन गेले. पुढें नेवरी व रावतळे येथें कांहीं जहागीर मिळविली. केशवचे दोघां पुत्रांनीं, श्रीपरशुरामाचे मंदिरांत नंदादिपाचा दिवा लावण्याबद्दल असलेल्या जमीनजहागिरीचे दोन विभाग करून ते विभक्त झाले. माहादाजी केशव यांनीं सोनगांवचें वतन संपादन केलें. यांना एक गणपतीची मूर्ती मिळाली होती. ती मूर्ती सोनगांवीं यांनीं च स्थापन केलेली अद्यापि आहे. सदरहु माहिती रामचंद्र विष्णु बरवे धारकर यांनीं दिली.

नारायण केशव यांचे वंशज सोनगांवीं आहेत. महादेव केशव यांचे वंशजांपैकीं केशव महादेव यांचा वंश व माहादाजीचे नातू वासुदेव गंगाधर यांचा वंशहि हल्लीं सोनगांवीं आहे. गंगाधर माहादजीचे वंशज गुजराथमध्यें कडी येथें व माळव्यांत धार येथें आहेत. नारायण केशव यांचे वंशजांपैकीं माहादेव विष्णु पोष्टांत नोकर आहेत. विठ्ठल रघुनाथ हे डेडलेटर ऑफिसांत आहेत. रामचंद्र गणेश वेद्र ऑफिसांत आहेत. दत्तात्रय मोरो हे मु० बैहर जिल्हा बालाघाटमध्यें तहसीलदार आहेत. मोरो रामचंद्र, लक्ष्मण विनायक व भिकाजी धोंडो वगैरे सोनगांवीं च असतात.

रामचंद्र विष्णु हे माळव्यांत असतात. गोविंद विष्णु हे धार संस्थानांत मामलेदार आहेत. यांना पगार १५० आहे. गुजराथमधील कडी येथें वामन गणेश यांचा वंश आहे. शामराव वामनराव हे आपल्या बंधूसह कडी येथें असतात. वामनराव यांचे वडील बंधु गोपाळराव यांचे पुत्र गणपतराव हे मुंबई येथें आहेत. या सोनगांवचे

घराण्यांत चरित्रवर्णन करण्यायोग्य पुरुष गणपतराव बरवे हे एकच होत. हें पुढील दिलेल्या त्यांच्या चारित्राचे माहितीवरून सर्वांचे लक्षांत येईल च.

## रा. गणपतराव गोपाळराव बरवे संगीतशास्त्री यांच्याविषयीं थोडी माहिती

गणपतराव गोपाळराव बरवे यांचा जन्म बडोदें येथें शके १७९५ पौष शु॥ ५ स झाला. गोपाळराव यांनीं गुजराथ देशांतील कडी मुक्कामीं घर केलें. गोपाळराव यांचे बंधु वामनराव यांचे पुत्र शामराव हे कनिष्ठ बंधूसह हल्लीं कडी येथें च आहेत. गोपाळराव गायकवाड सरकारची नोकरी सोडून कडी येथें घरीं राहून शेती करूं लागले. शेती करण्याच्या नादीं विशेष लागले. पुढें विभक्त राहिले. शेतकीच्या नादानें नोकरीवर मिळविलेलें द्रव्य खर्च झालें व शेतीचें उत्पन्न हि जेमतेम. तेव्हां गरीबींतच दिवस गेले. गणपतरावाची मुंज ५।६ वे वर्षीं झाल्यावर, यांचे मावसे कै. कृष्णाजी भिकाजी ताम्हनकर व कै. वामनराव मोरेश्वर जोशी यांनीं च गणपतरावांना लहानाचे मोठे केले. येवढ्या अवधींत यांच्या गुजराथी सात इयत्ता झाल्या होत्या. हे आपल्या वयाचे पंधरावे वर्षीं बडोद्यास आले. यांना इंग्रजी शिकण्याची मदत विशेष न झाल्यामुळें देशीभाषेंतून च शिकावें लागलें. यांना वाचनाचा नाद विशेष लागला. त्यांच सुमारास बडोदें येथें प्रो. गज्जर यांची नेमणूक होऊन, श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं **कलाभवन** नांवाची चित्र, शिल्प, यंत्र, रसायन वगैरे शास्त्रें व उद्योग-कला-धंदे शिक्षणाचें शिक्षण देण्याची उपयुक्त संस्था स्थापन केली.

सदरहु संस्थेंत एका मित्राच्या साहाय्यानें यांनीं हि प्रवेश केला. यांना रसायनशास्त्र व सृष्टिशास्त्राची विशेष अभिरुची उत्पन्न झाली. त्या वेळीं कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजचे **प्रो. कै. बाळाजी प्रभाकर**



गणपतराव गोपाळराव बरवे, मुंबई

**मोडक** यांची सृष्टिशास्त्रावरचीं व रसायनशास्त्रावरचीं पुस्तकें यांना अत्यंत उपयोगीं पडलीं. ह्या कालावधींत **प्रो. मौलाबक्ष** नांवाचे मुसलमान प्रसिद्ध गवई गायकवाड सरकाराचे आश्रयास होते. या गवयाजवळ हे संगीतहि शिकत होते. अशा रीतीनें सन १८८८ पासून १८९० पर्यंत बडोदे येथें राहून रसायनशास्त्र, सृष्टिशास्त्र, स्पेन्सरची मराठींतली ज्ञेयाज्ञेय मीमांसा वगैरे शास्त्रीय विषयांचें अध्ययन व संगीत कलेवर व्यासंग केल्यानंतर **प्रो. मौलाबक्ष** ह्यांनीं प्रेमबुद्धीनें गणपतरावांना नवसरी येथील गायनशाळेंत नोकरी दिली. येथें सुमारें पांच वर्षें होते. येथें आल्यावर स्वस्थता झाली. परंतु द्रव्यार्जन करणें फार कष्टानें होई. त्यांतलेत्यांत येथें एका गोष्टीची अनुकूलता होती. ती अशी कीं, गायन शाळेची नोकरी संध्याकाळचे एकदोन तास च होती. त्यामुळें सर्व दिवसभर फुरसत मिळे. त्या वेळांत लेख लिहून थोडथोडे पैसे मिळवूं लागले. व त्या पैशांतून यांनीं नवे ग्रंथ विकत घेतले. यांचा प्रथम लेख **संगीत शास्त्रांतील सप्तस्वर** हा गुजराथींत लिहिला होता. त्यानंतर डार्विनच्या उत्क्रांतिवादावर विचार करून **अनादिकालापासून चालत आलेली प्राणिजसृष्टि** व **हिंदुस्थानांतील खनिज संपत्ति** हे लहान निबंध लिहिले. त्यांस तेथील गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटी नामक उपयुक्त संस्थेनें चांगलें पारितोषिक दिल्यामुळें, यांनीं आणखी नवीन ग्रंथ विकत घेऊन वाचंनाचा अभ्यास जास्त वाढविला. यांनीं मराठी, गुजराथी व हिंदी वगैरे हजार बाराशें ग्रंथ वाचले. त्यांत च यांना ज्योतिष शास्त्राचा नाद लागल्यामुळें ज्योतिषावर हि एक ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ लिहिण्यास लॉकेयर, हर्षल सारख्यांचे सर्वमान्य इंग्रजी ग्रंथ मागवून ते दुसऱ्याकडून वाचवून घेऊन नंतर त्यांवर स्वतंत्र विचार करून लिहीत असत !

हे नवसरी येथें असतांना च गुजराथी भाषेंत **आर्यानंद** नांवाचें मासिक काढूं लागले. परंतु, द्रव्याच्या अभावामुळें एक वर्षानें तें बंद केलें. पुढें बडोदें येथील कै. जगन्नाथ विष्णु दामले एल्. सी. ई. ह्यांच्या आग्रहानें तेथील **धंदाशिक्षक** नांवाच्या गुजराथी भाषेंतील मासि-

काचे संपादकत्व यांना स्वीकारावें लागलें. यांनीं सर्व सृष्टिशास्त्राचा क्रमशः सारांश येईल व ह्या विश्वाच्या उत्पत्ति, स्थिति व प्रलय ह्यां विषयीं चांगलें ज्ञान होऊं शकेल अशा प्रकारचा **विश्वचर्या** नामक ग्रंथ लिहिला. सन १८९६ सालीं प्रो. **मौलाबक्ष** वारल्यामुळें गायन शाळेची नोकरी सोडून हे स्वतंत्र झाले. धरमपूर स्टेटचे राजेसाहेब यांचे जवळ हे संगीतशिक्षक म्हणून होते. नंतर काठेवाडांतील राजकोट येथील राजकुमार-कॉलेजमध्यें जुनागड नबाबचे कुमार शेरजुमाखानजी व जामनगर येथील राजकुमार जामसाहेब जसवंतसिंगजी यांचेजवळ संगीतशिक्षक ह्या नात्यानें राहिले होते. पुढें सन १८९९ सालीं काठेवाड, कच्छ व गुजराथेंतील सर्व राजेरजवाडे यांचेकडे जाऊन यांनीं संगीत विषयावर व्याख्यानें दिलीं. व प्राचीन संगीत ग्रंथांचा संग्रह करण्याच्या उद्योगास लागले. यांनीं सन १९०० सालीं **योगदिवाकर** नामक योगशास्त्रावर ग्रंथ लिहिला. त्यांत पंतजलीचा योग व तदुपरांत कर्म, भक्ति, ज्ञान, हठ, मंत्र, लय, तारक, नादानुसंधान वगैरे सर्व योगांचें निरूपण व्यवस्थित रीतीनें केलें गेल्यामुळें त्याचा खप फार झाला. आज त्याची एकहि प्रत यांचे जवळ सुद्धां शिल्लक नाहीं.

सन १९०० ते १९०४ पर्यंत हे बडोदें व अमदाबाद येथें होते. या अवधींत लेखनव्यवसाय बरा च झाला. बडोदें येथें १९०१ सालीं **लक्ष्मीविलास** राजमहालांत **श्रीमंत महाराज सयाजीराव** यांचे समक्ष ह्यांचीं संगीतशास्त्रावर भाषणें झालीं. व त्यांचे आग्रहावरून गणपतरावांनीं गुजराथींत **नादलहरी** नांवाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथांत आर्य व युरोपियन नादशास्त्राचा बरा च विचार केला आहे. ह्याच वर्षाच्या फेब्रुवारींत यांचा द्वितीयविवाहसंबंध बडोदें येथील—हायस्कूलचे एक शिक्षक गोखले यांची पुतणी कै. मोरो चिंतामण गोखले यांच्या कन्येशीं झाला. यांनीं अमदाबाद येथें असतांना **सूरतरंगिणी** नामक संगीत शास्त्रावरील प्राचीन ग्रंथाचें प्रसिद्धीकरण चालू केलें होतें. तो ग्रंथ प्रसिद्ध केल्यानंतर सन १९०५।१९०६ हीं दोन वर्षे ब्रह्मदेश, सियाम,

जावा, चीन व जपान येथें घालविलीं. येथें जाण्याचा यांचा मूळ हेतु असा होता कीं, आशियाखंडांतील ह्या पूर्वदेशीय लोकांत संगीत शास्त्र व कला ह्याचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे; व त्या देशांतील धर्म, आचार, रूढी, शास्त्रें, तत्त्वज्ञान, राहाणी, वगैरे विचार कोणत्या प्रकारचे आहेत तें समजावें. ह्याच सुमारास रशिया व जपानचें युद्ध चालू होतें. तर अशा वेळेस खुद्द जपान येथें लोकांची प्रवृत्ति कोणत्या प्रकारची आहे, हें प्रत्यक्ष पहावें व जपानी लोकांचे अंगीं असे कोणते गुण आहेत कीं ज्यांचे योगानें अवघ्या ४०।५० वर्षांत त्यांनीं स्वतःची उन्नति करून घेतली ? अशा उद्देशानें जाऊन सर्व प्रदेशाचें अवलोकन केलें. यांनीं मुंबई येथील सर्वमान्य गुजराथी साप्ताहिकांत **सूर्यपुत्रांच्या भूमिचें दर्शन किंवा प्रत्यक्ष पाहिलेलें जपान** ह्या नांवानें लेखमाला लिहिली. त्यांत जपानच्या प्रगतीचीं ११ कारणें देऊन त्या प्रत्येकाचें विस्तृत विवेचन केलें होतें. तीं कारणें येथें नमूद करण्यास योग्य वाटतें म्हणून देत आहें.

१ एक भाषा, २ एक लिपी, ३ एक वर्णजाति, ४ एक धर्म आणि धर्मसहिष्णुता, ५ बंधुप्रेम, ६ अद्वितीय देशभक्ति, ७ सतत उद्योग, ८ स्वराज्य, ९ विद्याप्रसार, १० कायदा हीच ज्यांची स्मृति, ११ अद्भूत क्षात्रवृत्ति, हे सर्व गुण प्रत्येक स्त्रीपुरुषांत पूर्णपणें भरलेले आहेत. सर्व जपानची लोकसंख्या अवघी ४॥ कोटींची आहे. परंतु काय चमत्कार झाला तो पहा, कीं वरील ११ गुणांचें पालन स्वभावतःच होतां सर्व जपान एक होऊन स्वतंत्र व एकजीव राष्ट्र बनलें. असो; जपानचा प्रवास आटोपून सन १९०७ सालीं अमदाबाद येथें येऊन यांनीं हारमोनियम तयार करण्याचा कारखाना काढला. यांत २।३ हजारांची खोट आल्यामुळें, सन १९०९ सालीं हे मुंबईस आले. आणि **गायनशास्त्र शाळा** नांवाची संस्था सुरूं केली. ती अद्यापि चालू आहे. यांनीं जपानहून आल्यावर **श्रुतिस्वर सिद्धांत** व **गायनवादन पाठमाला** हीं दोन संगीतशास्त्रादर पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं व केशव

चंद्रसेनच्या **नवसंहितेचें** गुजराथींत भाषांतर करून प्रसिद्ध केलें. अशा प्रकारचा यांचा आयुष्यक्रम चालू आहे.

विशेषतः यांच्या आवडीचे विषय सायन्स, तत्वज्ञान व संगीत हे तीन होत. ह्या तीन हि विषयांवर यांनीं अतिशय च व्यासंग व सतत मनन केलें आहे. शिवाय पुष्कळच नवीन उपपत्त्या, शोध व सिद्धांत बांधले आहेत. ते सर्वहि व्यवस्थित रीतीनें ग्रंथरूपानें देश–बांधवांपुढें मांडण्याचा त्यांचा विचार आहे. हल्लीं दुनियेंत ओलोपाथी, होमिओपाथी बायोकेमीक, क्रोमोपाथी वगैरे अनेक वैद्यकीय चिकित्सा प्रचलित आहेत. त्यांपेक्षां निराळ्या च तऱ्हेची **स्वर–चिकित्सा** किंवा **नाद-चिकित्सा** ह्यांनीं नवीन च शोधून काढिली आहे. अमुक रोगांवर अमुक स्वरांचें औषध देणें ही यांच्या चिकित्सेची सरणी आहे. ही कल्पना अगदीं नवीन च आहे. प्राचीन अर्वाचीन काळांतील उसनी किंवा उष्टी नाहीं. यांनीं वाद्यविषयांत हि नवीन नवीन वाद्यें केलीं आहेत. यांनीं वेदांत शास्त्रांतील पुष्कळ च कल्पनांना चालन देऊन नवीन तऱ्हेची रचना केली आहे. त्या सर्वांचें एक स्वतंत्र पुस्तक **जीवब्रह्ममीमांसा** नांवाचें ते लिहीत आहेत. व गीतारहस्यावर **रहस्य-रंजनी** नांवाची रहस्यपोषक टीका लिहिणार आहेत, व संगीत शास्त्रा-वरचें निर्णयात्मक व केवळ यांच्या च मतांचा विस्तार असून यांच्याच कल्पनेंतून प्रसव पावलेले सिद्धांत ग्रथित करून एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध करणार आहेत. यांच्या कल्पनेप्रमाणें यांची महत्वाकांक्षा श्री सद्गुरु सिद्धीस नेवो.

रा. गणपतराव यांना जी स्वरज्ञानाची शक्ति दोन तपें अभ्यास केल्यावर आली, ती शक्ति यांचे पांच वर्षांचे चिरंजीव **मनहर** यांच्यांत आतां-पासून च स्वाभाविक आहे. चिरंजीव मनहरपेक्षां २॥ वर्षांनीं मोठी अस-लेली वडील बहीण चि. नर्मदा ही स्वरपरीक्षणांत मनहर इतकी च किंबहुना याच्याहिपेक्षां जास्त हुषार आहे. चि. मनहर व चि. नर्मदा यांचेकडून दुसऱ्यास चीजा म्हणण्यास सांगून त्या चीजेचे वरील अर्भकांनीं

सा री ग म केल्याचें या लेखकानें प्रत्यक्ष ऐकिलें आहे. ही अलौकिक पूर्वार्जित परमेश्वरदेणगी होय. अवघ्या पांच वर्षांच्या मुलास अशा प्रकारची शक्ति असलेलीं उदाहरणें फारच कमी असतात. दुसरें उदाहरण येथें नमूद करणें जरूर आहे. आमचे दोस्त प्रोफेसर अबदुल करीमखां यांचे चि० पापा या अर्भकानें हि सारीगम करून कित्येक वेळां शेंकडों लोकांना आश्चर्यचकित केलें आहे.

एकंदरीनें गणपतरावजींचा आयुष्यक्रम लेखन, वाचन व मनन यांत च जात आहे. यांनीं लहानपणीं शाळेंत सुस्वरयुक्त कविता म्हणाव्यात. त्यावरून वर्गांतील मुलें व शिक्षक यांच्यावर प्रसन्न असत. द्वारका येथें कै. कृष्णाजीपंत ताम्हनकर यांजेजवळ असतांना येथें लहानपणांत च गुजराथी नाटकें पाहून यांना संगीताचा विशेष नाद लागला. तेव्हां पासून आतां-पर्यंत यांचा संगीतशास्त्र व कला ह्यांवर सतत मनन, पृथक्करण, एकीकरण, शोध, प्राचीन अर्वाचीन ग्रंथसंग्रह, प्रचलित संगीतशास्त्र वगैरेंवर सारखा व्यासंग चालू आहे. यांचा ह्या विषयावरचा व्यासंग किती आहे ह्याची कल्पना सन १९१२ आगस्ट ता. १३ व २० आणि सपटंबर ता. ३ चे केसरींत **भारतवर्षीय संगीतशास्त्रावरील प्राचीन ग्रंथ** हा लेख वाचून सहज होऊं शकेल. त्या लेखांत सुमारें ३०० शें हस्तलिखित ग्रंथांची यादी वगैरे देऊन संगीत शास्त्राच्या उन्नतीचा इतिहास लिहिण्यास काय केलें पाहिजे व त्याचें ऐतिहासिक युग कोणतें आणि प्रत्येक युगाचीं विशिष्ट लक्षणें कोणतीं ह्यांचा विचार थोडक्यांत करण्यांत आला आहे.

धार येथील विष्णु रामचंद्र व सोनगांव येथील मोरो रामचंद्र यांनीं पाठविलेल्या वंशवृक्षांतील वरचे नांवांत बरा च फरक आहे. शिवाय हे म्हणतात कीं, आमचा मूळ पुरुष नेवऱ्याहून निघोन गोवळ–पांवस येथें गेला. तेथून त्रिवर्ग–बंधु तीन ठिकाणीं गेले. एक मिरजोल, दुसरा सोनगांव, व तिसरा तळघरी. यांपैकीं फक्त सोनगांवचे वंशजांनीं माहिती व वंशवृक्ष पाठविले. वंशवृक्ष पाठविणारे दोघांनीं हि वंशवृक्षांत हयात व मयत समजण्याचें चिन्ह कांहींच केलें नव्हतें. आम्हीं पुढें विशेष माहिती मिळाल्यावर चिन्हें केलीं आहेत. नेवऱ्याहून कोणता पुरुष गोवळ–पांवस येथें गेला हें कांहीं च समजत नाहीं.

## श्रीक्षेत्र कल्होळी येथील बरवे




संस्थान जमखिंडी नजीक श्रीक्षेत्र कल्होळी हा गांव असून ह्या गांवाचें मुख्य दैवत श्रीव्यंकोबा होय. कल्होळी गांवास लागून जवळ असलेल्या डोंगरावर श्री व्यंकोबाचें देवालय आहे. श्रीव्यंकोबाची मूर्ति काळ्या पाषाणाची उभी असून फार मोठी आहे. हें स्थान फार रमणीय आहे. कल्होळी येथील बरव्यांचा मूळ पुरुष हरिपंत हा कोंकण प्रांतांतील मौजे वाडे-पडेल गांवठाण ता. देवगड जिा रत्नागिरी येथील रहाणारा. हरिपंत हे वैद्यकीवर निर्वाह करीत. यांचे पुत्र गणेशपंत हे कल्होळी येथें आले. गणेशपंताचे दोन पुत्रांपैकीं, बच्याजीचा वंश चालू आहे. बच्याजीचे पणतू कृष्णाजी गणेश हे कल्होळीस शेती करून आहेत. रामचंद्र अंताजी हे जमखंडी संस्थानांत म्युनिसिपालिटींत नोकर आहेत. महादेव कृष्णाजी कुंदगोळ येथें जमादार आहेत. येशवंतराव हेहि नोकर आहेत. रघुनाथ हे हुल्याळ येथील बरवे यांचेकडे दत्तक गेले. केशव दामोदर हे ग्वालेर संस्थानांत नोकर आहेत. व्यंकटेश रामचंद्र हे कॉलेजांत आहेत.

# मौजे वाडे–पडेल येथील बरवे

- रामकृष्ण
  - केशव
    - दामोदर
      - बाबदेव
        - राघोबा
        - धारू
      - नारायण पृ. ६
        - गणेश
          - बाळकृष्ण
          - हरी
            - गोपाळ
            - गोविंद
            - दिवाकर
        - बाळंभट उर्फ केशव
        - रामचंद्र
          - वामन
            - बापू उर्फ कृष्ण
              - काशिनाथ
            - हरी
          - नारायण
            - विष्णु
            - गोपाळ
            - शंकर
            - माहादेव
          - दामोदर L. M. & S.
        - गोविंद
        - विष्णु
      - सदाशिव

वाडे–पडेल हा गांव देवगड तालुक्यांत आहे. निर्वाळी हा गांव चिपळूण तालुक्यांत असावा, असें वाटतें. निर्वाळीचे बरव्यांची माहिती मिळाली नाहीं. वाडे–पडेल येथील बरव्यांपैकीं नारायण रामचंद्र हे पोष्टांत ८० रुपये पगारावर नोकर आहेत. विष्णु नारायण हेहि पोष्टांत च नोकर आहेत. डॉ. दामोदर रामचंद्र यांनीं मेडिकल कॉलेजच्या दोन परीक्षा झाल्यावर कांहीं अपरिहार्य कारणामुळें देवी खात्यांत नोकरी धरली. पुढें अदमासें दाहा वर्षांनंतर एल्. एम्. ॲण्ड एसच्या परीक्षेंत सन १९१४ त उत्तीर्ण झाले. सदरहु देवी खात्यांत च यांना हल्लीं शंभर रुपये पगार आहे. वंशवृक्ष व माहिती डॉ. दामोदरपंतानीं च पाठविली.

## जि॥ सातारा मौजे बावधन येथील बरवे.

- काशिनाथ
  - माहिती नाहीं
- हरि
  - परागंदा
- महादेव
  - रामचंद्र
    - पांडुरंग
      - महादेव
        - रामचंद्र
        - नारायण
          - रामचंद्र
          - गोपाळ
        - गणपती
          - बाळकृष्ण

ह्या घराण्यांतला कोणता पुरुष घाटावर आला हें नक्की समजत नाहीं. परंतु यांपैकीं च एक पुरुष निंबाळकरांचे पदरीं मनसबदार होता. पानपतचे लढाईंत तो पडला. फलटणास सदरहु बरव्यांचा वाडा होता. यांचेकडे शिंगणापूर महादेवाचा कांहीं हक्क होता. सदर पुरुष पडल्यावर त्याची स्त्री झाडाचे पाल्यावर निर्वाह करीत करीत दोन मुलगे हरी व महादेव असे घेऊन वांईस आली व वांईनजीक असलेल्या बावधन गांवीं कानिटकर यांचेकडे सदर दोन मुलगे ठेवून ती गेली. पैकीं हरी हा इंदुरास गेला अशी समजूत आहे. दुसरा महादेव याचा पुत्र रामचंद्र यानें घरदार केलें. याचा पुत्र पांडुरंग हा सातारा जिल्ह्यांत रेव्हेन्यु खात्यांत नोकर होता. हा इ. स. १८७२ त वारला. त्याचा पुत्र महादेव हे मुंबई हायकोर्टांत हेड शिरस्तेदार होते. हे इ. स. १९१५ त मुंबईस वारले. यांस तीन पुत्र. रामचंद्र हा पुणें डिस्ट्रिक्ट कोर्टांत होता. नारायण पुणें म्युनिसिपालिटींत नोकर आहेत. गणपतराव हे मुंबई हायकोर्टांत क्लार्क आहेत. या घराण्याचा पुरुष नेवरेकरांचे वंशवृक्षांतला च आहे, असें वरील माहितीवरून जरी सिद्ध होत नाहीं तरी जास्त शोध केल्यास सिद्ध होईल

## मौजे तळेगांव (दाभाडे) येथील बरवे

- चिंतामण
  - गणेश
    - सदाशिव द.
      - दत्तात्रय
    - अनंत

या वंशाची विशेष माहिती मिळत नाहीं. मौजे तळेगांव येथील दाभाडे यांचे हे उपाध्ये होत. गणेश चिंतामण हे उपाध्येपणावर होते. गणेश यांनीं श्रीक्षेत्र वांई येथील पाटणकरापैकीं दत्तक घेतला. त्या दत्तकाचे पुत्र रा. दत्तात्रय सदाशिव बरवे हे हल्लीं पुणें येथें डिप्रेस्ड क्लासेस मिशनमध्यें नोकर आहेत.

## मौजे सुसेरी येथील बरवे

- विठ्ठलपंत
  - वासुदेव
    - बल्लाळ
      - वासुदेव
        - गोपाळ
          - मोरेश्वर
        - बाळकृष्ण
      - नारायण
        - पांडुरंग
          - नारायण
          - भार्गव
  - गणेश
    - रघुनाथ
      - रामचंद्र
        - विनायक
  - रामचंद्र
    - विनायक
      - रामचंद्र
        - भिकाजी
        - महादेव
        - दिगंबर
      - गणेश
        - केशव
    - विठ्ठल
      - गोविंद
        - त्रिंबक
        - गंगाधर
      - चिंतामण
        - वामन
      - दत्तात्रय
        - पुरुषोत्तम
        - विठ्ठल
      - अनंत
        - कृष्ण

# मौजे सुसेरी येथील बरवे

सुसेरी हा गांव जि० रत्नागिरीपैकीं खेड तालुक्यांत आहे. हल्लीं सुसेरी येथें असलेल्या बरव्यांचा विठ्ठलपंत बरवे हा मूळ पुरुष प्रथम गुहागर येथें आला. पुढें शके १७०० मध्यें सद्रहू विठलपंतांनीं सुसेरी गांवीं वस्ती केली. ती वस्ती अद्यापि आहे च. ह्या बरव्यांचें कोंकणांतील मूळ गांव गुहागर नसून, वाडे–पडेल हा गांव आहे. वाडे-पडेल या गांवाहून गुहागर येथें विठल आला कीं विठलाचा बाप आला हें नक्की समजत नाहीं. या घराण्यांतील बल्लाळ वासुदेव हे वैद्यकी करीत होते. रघुनाथपंत व पुत्र रामचंद्रपंत हे चिपळूण येथें मुखत्यार वकील होते. विनायक रामचंद्र हे सुसेरी मुक्कामीं उत्तम वैदिक होते. गोविंद विठल हे मुंबई म्युनिसिपालिटींत इंजिनियर खात्यांत हेड क्लार्क १२५रु पगारावर आहेत. चिंतामण विठल हे सद्रहू खात्यांत च ७५ रु. पगारावर इन्स्पेक्टर आहेत. दत्तात्रय विठल यांना वैद्यभूषण ही पद्वी मिळाली असून हे खेड येथें च असतात. अनंत विठल हे सुसेरी येथें शेती-भाती करून आहेत. गोविंद विठल यांणीं पोर्तुगीज टेरिटरीपैकीं दमण स्टेशननजीक नगर अवेली या प्रांतांत थोडी जमीन खरेदी केली आहे. सद्रहू ठिकाणीं आपल्या उत्तरवयांत राहून शेतीभाती करण्याचा यांचा मानस आहे. रामचंद्र विनायक हे पेनशनर आहेत.

हें घराणें गरीब स्थितींतलें होतें. कोंकणांतील जमिनी महाग व पिकास हि कमी; शिवाय लांकूडफांट्याची स्थिति हि फार च अडचणीची, नोकरी दुर्लभ म्हणून दमणपैकीं जमीन जशी मेहनत करावी तशी पीक देणारी, लांकूडफाटा स्वस्त सबब खरेदी केली आहे.

## मौजे तळवणे ता. वेंगुर्लें येथील बरवे

- गुंडभट
  - धोंडभट ( ब्रह्मीभूत )
    - नारायणभट
      - नागोपंत
      - बाळशास्त्री
        - गोपाळ
      - दिवाकर
        - बाळकृ.
      - अंताजी
        - कृष्णं
    - रामभट
    - लक्ष्मणभट
    - गोविंदभट
      - दत्तोपंत पु. २

सद्रहू वंशावळींतील रा. कृष्णाजी अनंत बरवे हे हल्लीं अहमदनगर येथें फर्स्ट क्लास सब जज्ज कोर्टांत कारकून आहेत. यांचे वंशज सांगली येथें आहेत.

## आक्षी येथील बरवे

- बाबूभट
  - बाळंभट
    - शिवरामभट
      - रामचंद्रभट
        - विष्णुं
          - श्रीपादं
        - चिंतू
        - दत्तू
        - गोपाळं
      - नारायणं

हे बरवे मूळचे मौजे वाडे–पडेल ता. देवगड येथील होत. परंतु अलीकडे त्यांना मौजे आक्षी ता. आलिबाग येथें येऊन सुमारें २५ वर्षें झालीं. त्यामुळें आतां हे आक्षीचे बरवे झाले. रामचंद्रभट हे भिक्षुकी व शेती करितात, आणि नारायण शिवराम हे गोरक्षणावर व्याख्यानें देतात. शिवाय पुराण हि चांगलें सांगतात.

## जांभळी येथील ( जोगदेव ) बरवे



## जांभळी येथील ( जोगदेव ) बरवे यांची माहिती

जांभळी हा गांव भोर संस्थानांत आहे. या घराण्याचा जांभळी येथें कोणता पुरुष आला हें समजत नाहीं. प्रभाकरभटापासून मिळालेला वंश दिला आहे. गंगाधराचे नातू सदाशिवभट यानें गुंजरणें येथें वस्ती केली. पुढें सदाशिवभटाचे नातू नारायण यांनीं विंझर येथें वस्ती केली. गुंजरणें व विंझर हे दोन्ही गांव वरील संस्थानांत च आहेत. भिकाजी नारायण हे कुर्ला येथें आहेत. लक्ष्मण रामचंद्र यांनीं कुलाबा जिल्ह्यांत तळे या गांवीं इस्टेट केली असून हे तेथें च राहतात. केशव लक्ष्मण हे ठाणें येथें डि. पो. सु. ऑफिसांत क्लार्क आहेत. गणेश विठ्ठल यांचें वडिलार्जित रहातें घर नं. ७५२ चें सदाशिव पेठेंत आहे. गणपतराव दोघां बंधूंसह वडिलार्जित घरांत च रहात आहेत. महादेव व दामोदर रघुनाथ हे जांभळी येथें च असतात. श्रीधर रघुनाथ हे पुणें येथें नोकरीवर असतात. अनंत व हरि हे छापखान्यांत असतात.

## मौजे साकोर्डे प्रांत गोमांतक येथील बरवे

दादो
|
विठ्ठल
|
नारायण — सिताराम
|
विष्णु — विठ्ठल

(नारायण → विष्णु; सिताराम → विठ्ठल)

गोमांतक प्रांतांतील सांगे महालांत साकोर्डे गांवचे हे बरवे होत. विठ्ठल सीताराम यांनीं, आपणांस कांहीं माहिती नाहीं चुलते नारायण विठ्ठल हे पेडणें महालांत मौजे वारखंड येथें असतात त्यांना विचारावें, असें सांगितलें. परंतु, त्यांचेकडून हि कांहीं माहिती मिळाली नाहीं.

## गोमांतक प्रांतांतील मौजे होंड येथील बरवे. नं. १




नारायण बरवे हा कोंकणांतून गोमांतकामध्यें होंड गांवीं आला. यास पुत्र चार; या चार पुत्रांचे वंशजांनीं पुढें निरनिराळ्या गांवीं वस्ती केली. तीं गांवें वंशवृक्षांत नमूद केलीं आहेत. गोमांतक प्रांतांत एकंदर १५।१६ गांवांत बरवे यांचीं घरें आहेत. ह्या सर्वांचा मूळ पुरुष एक च असावा, असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु, हल्लीं मिळालेल्या माहितीवरून तें म्हणणें चुकीचें दिसत आहे. नारायण हा कोंकणांतील कोणत्या गांवचा हें सुद्धां समजत नाहीं. गोमांतकामध्यें हल्लीं जेवढे बरवे आहेत, तेवढ्यांचा कुलस्वामी श्रीकोळेश्वर आहे. यावरून यांचें मूळ वास्तव्य कोंकण प्रांतांतच होतें हें सत्य होय. हे जेमतेम शेती करून उपजीविका करीत आहेत. भिक्षुकी वगैरे करितात. परंतु वरील वंशवृक्षापैकीं साधारण विद्वान् सुद्धां कोणी झाला नाहीं.

# होंड नं. २




या वृक्षांतील माहिती नं. १ चे होंडचे मजकुरांत दिली आहे.

## गोमांतक प्रांतांतील मौजे देरगूण येथील बरवे नं. २




हे देरगूणकर बरवे हि, आपला मूळ पुरुष होंड येथें च आला असें सांगतात. या वंशापैकीं कृष्णाजीचा पणतू वामन केशव व वामन यांचा मुलगा नारायण हे नामांकित वैदिक होते. चिंतामण रामकृष्ण यांना खानापूर येथें इनाम जमीन आहे. गणेश लक्ष्मण हे नामांकित शास्त्री असून बेळगांव येथें मारूतीच्या देवळांत यांची संस्कृत शिक्षणाची शाळा अदमासें ८।१० वर्षांपासून चांगल्याप्रकारें चालत आहे.

## गोमांतक प्रांतांतील मौजें किनळफाळ येथील बरवे. नं. ३




हे सर्व शेतीभाती, भिक्षुकी वगैरे करून वास्तव्य करीत आहेत.

## गोमांतक प्रांतांतील मौजें डिचोली येथील बरवे नं. ४




वरील दामोदर व बाबल हे ‘ होंडच्या ’ वंशवृक्षांतील मूळ पुरुष नारायण याचे चुलत भाऊ किंवा पुतणे असावेत; असें वरील बरव्यांचे म्हणणें आहे. परंतु, आधाराशिवाय अनुमान करणें उपयोगाचें नाहीं. दामोदर यांस ५००० रु. उत्पन्न होतें. गोविंद नारायण विद्वान होते. या प्रांतीं मोठे लोकांत यांची मान्यता असे. हे जुगारी असल्यानें यांनीं घरा खेरीज सर्व इस्टेट जुगारांत घालविली. महादेव दामोदर हे २०००० रु. घेऊन या प्रांतांतून निघोन बेळगांव पैकीं देसूर येथें जाऊन राहिले. यांना देसूरकर देसाई यांचेकडून इनाम होतें. रामकृष्ण महादेव हे उत्तम शास्त्री व ज्योतिषी असून घोड्यावर बसण्यांत पटाईत होते. धंदा सावकारी करीत. सखाराम गोविंद हे नामांकित शास्त्री होते. स्पष्टवक्ते-पणाबद्दल यांची प्रसिद्धी आहे. यांचे नातू गोविंद विनायक ह्यांनीं च गोमांतकांतील सर्व बरव्यांची माहिती दिली. याबद्दल पुस्तककर्ता यांचा फार आभारी आहे. "

---

## बरवे मंडळींस आग्रहाची विनंती

**बरवे** घराण्याचा इतिहास लिहिण्यास आरंभ करण्याचे पूर्वी लेखकानें बरवे मंडळींनां लिहिलेलीं पत्रें जर पाहिलीं तर त्या पत्रांतून बरवे असें लिहिण्याऐवजीं बर्वे असें कधीं च लिहिलें गेलें नाहीं. मला हि मोठें नवल वाटतें कीं बरवे असें अर्थयुक्त लिहिणें सोडून बर्वे हें लिहिणें कसें रूढ झालें? बरवे घराण्यांतील मला मिळालेल्या जुन्या कागदोपत्रीं बरवे असें च लिहिलें असलेलें आमच्या एका सन्माननीय बरवे मित्रास दाखविलें आहे. शके १५२८ ते १६०० अखेरपर्यंत जुन्या कागदोपत्रीं व सनदांतून हि बरवे असें च लिहिलें आहे. पुढें शके १६४० ते १७४० चे दरम्यान सनदांमधून बरवे व दुसरीं बर्वे असें लिहिणें प्रचारांत आलें. तो च प्रचार हल्लीं चालू आहे. बरवे असें लिहिणें ऐतिहासिक दृष्टीनें व अर्थाचे दृष्टीनें या लेखकास उत्तम वाटल्यावरून या इतिहासांत बरवे असें च लिहिलें आहे. असें केल्यापासून बरव्यांपैकीं एकाद्या व्यक्तीस वैषम्य वाटल्यास त्याला लेखकाचा नाइलाज आहे. यापुढें सर्व बरवे मंडळी बर्वे असें न लिहितां **बरवे** असें च लिहितील अशी आशा आहे.

---

## श्रीकुलस्वामी व कुलदेवी

सर्व बरवे यांचा कुलस्वामी श्रीकोळेश्वर व कुलदेवी श्रीजोगेश्वरी होय. श्रीजोगेश्वरी मोगलाईंत जोगाईचें आंबें उर्फ मोमिनाबाद या गांवीं आहे. श्रीकोळेश्वराचें स्वयंभू स्थान दाभोळ बंदरापासून अजमासें चार मैलांवर असलेल्या कोळथुरें गांवीं आहे. स्वयंभू लिंगांतून चोवीस तासांत कोणत्या हि ऋतूंत सुमारें दोन शेर गंगा ( पाणी ) निघते. केव्हां केव्हां सिंहनाद हि होतो. श्रीकोळेश्वराचें देवालय लाटे यांनीं बांधलें. रामदुर्गचे भावे, लाटे, सोनगांवचे बरवे व जालगांवचे जोगळेकर आणि अनंत गणेश बरवे यांचे पांच नंदादीप श्रीपुढें चालू आहेत. अजमासें १६५ रुपये खर्चून दरवर्षी कार्तिकाचा उत्सव लाटे करितात. लाटे यांचे मार्फत च पूजा आहे. सरकारांतून हि या देवस्थानास इनाम व नक्त नेमणूक आहे. श्रीकोळेश्वर व श्रीजोगेश्वरीसंबंधीं विस्तृत माहिती देण्याची लेखकाची इच्छा पूर्ण होण्याचा सुयोग प्राप्त होणें श्रीकोळेश्वराचे च स्वाधीन आहे.

# कोंकणांत व देशावर हलीं बरवे ज्या गांवीं आहेत त्या गांवांची यादी

**जि॥ रत्नागिरीः**—रत्नागिरी, कर्यात **नेवरें**; ता. चिपळूण पैकीं सोनगांव, *मिरजोळ व *निर्वाळी; ता. खेड—तळघर व सुसेरी; ता. राजापूर—गांवखडी व सागवे वाडा बुर्वे; ता. देवगड—दाभोळें वाडी पाठद्री व वाडे—पडेल; ता. दापोली—जालगांव; सं. सावंतवाडी—कवठी व ओटवणें प्रांतकुडाळ; ता. वेंगुर्ला—तळवणे; **जि॥ कुलाबाः**—पनवेल व *आप्टे; आक्षी नागांव व *नागोटणें; ता. रोहे—पिंगळसई; ता. माणगांव—तळें; **जि॥ ठाणेंः**—वसई—पापडी व तारापूर; **जि॥ नाशिकः**—नाशिक, कोठुरें, डुबेरें, येवलें, पांढुरली व पिंपळस; **जि॥ साताराः**—सातारा, लिंब व गोवें, तासगांव, *इसलामपूर, श्री क्षेत्र वांई व बावधन; पुणें व यवत; **सं. भोरः**—जांभळी, गुंजरणे, व विंझर; मिरज, सांगली, *हरिपूर, उगार* ( धाकटे ); **सं. जमखंडीः**—कल्होळी; *वडगांव (शहापूर), फलटण संस्थान, तळेगांव ( दाभाड्यांचे ), ग्वालेर, इंदोर, धार, बडोदें व कडी; *धुळें, संस्थान-पिपलोदा, सोलापूर व मुंबई; **प्रांत गोमांतकः**—होंड, भोंबेडे, सांतोडे, पिसुर्ले, साकोर्डे, तळें, किनळफाळ, दरगूण, आंबेफाळ, न्हावेली, वाघुरें, डिचोली, बांबर, नारवें, कोदाळी व वारखंड.

* सदरहू गांवच्या बरव्यांनीं माहिती दिली नाहीं. उगार गांव हा कुडचीजवळ कृष्णा नदीचे पलिकडे आहे.

## गोमांतक प्रांतांतील मौजें डिचोली येथील बरवे नं. ४

- दामोदर
  - नारायण
    - गोविंद
      - सखाराम
        - विनायक
          - गोविंद ( गांव–डिचोली )
  - महादेव
    - विष्णु
    - रामकृष्ण
    - ( गांव देसूर )
- बाबल
  - आत्माराम
    - लाडू
      - आत्माराम
        - नरहरी
        - नारायण
        - ( गांव–नारवें )

वरील दामोदर व बाबल हे 'होंडच्या' वंशवृक्षांतील मूळ पुरुष नारायण याचे चुलत भाऊ किंवा पुतणे असावेत; असें वरील बरव्यांचे म्हणणें आहे. परंतु, आधाराशिवाय अनुमान करणें उपयोगाचें नाहीं. दामोदर यांस ५००० रु. उत्पन्न होतें. गोविंद नारायण विद्वान् होते. या प्रांतीं मोठे लोकांत यांची मान्यता असे. हे जुगारी असल्यानें यांनीं घरा खेरीज सर्व इस्टेट जुगारांत घालविली. महादेव दामोदर हे ३०००० रु. घेऊन या प्रांतांतून निघोन बेळगांव पैकीं देसूर येथें जाऊन राहिले. यांना देसूरकर देसाई यांचेकडून इनाम होतें. रामकृष्ण महादेव हे उत्तम शास्त्री व ज्योतिषी असून घोड्यावर बसण्यांत पटाईत होते. धंदा सावकारी करीत. सखाराम गोविंद हे नामांकित शास्त्री होते. स्पष्टवक्ते-पणाबद्दल यांची प्रसिद्धी आहे. यांचे नातू गोविंद विनायक ह्यांनीं च गोमांतकांतील सर्व बरव्यांची माहिती दिली. याबद्दल पुस्तककर्ता यांचा फार आभारी आहे.